म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक गोविंद शंकरशास्त्री बापट | सन १८९२ |
| --- | --- | --- |
| निबंध | | |
| संग्रहालय क्रमांक ८८३ | पुस्तकाचें नांव नीति मंदीर | |

७४

संक्र.

नीतिमंदिर

निबंध

# NÎTIMANDIRA

OR

# MANSION OF MORALITY.

BY

## GOVIND SHANKAR SHÂSTRÎ BÂPAT.

**Third Edition.—3,000 Copies.**

*Registered for Copy-right under the Government of India's Act XXV. of 1867.*

PRINTED AND PUBLISHED

BY

TUKARAM JAVAJI

PROPRIETOR OF JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS.

BOMBAY.

1892.

*All rights reserved by the publisher for this edition only.*

*Price* 10 *Annas.*

BOMBAY:

PRINTED AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGAR" PRESS.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| मन्वाज्ञा ... ... ... ... ... ... ... | १—११ |
| सत्य ... ... ... ... ... ... ... | १ |
| उद्योग ... ... ... ... ... ... ... | ,, |
| अतिभोजननिषेध ... ... ... ... ... | ,, |
| व्यभिचारनिषेध ... ... ... ... ... | ,, |
| पितृभक्ति ... ... ... ... ... ... | ,, |
| भ्रातृभक्ति ... ... ... ... ... ... | २ |
| गुरुभक्ति ... ... ... ... ... ... | ,, |
| शिष्याचरण ... ... ... ... ... ... | ,, |
| शिष्ययोग्यता ... ... ... ... ... ... | ,, |
| शिक्षणप्रकार ... ... ... ... ... ... | ,, |
| क्षमा ... ... ... ... ... ... ... | ,, |
| अहिंसा ... ... ... ... ... ... ... | ३ |
| आतिथ्य ... ... ... ... ... ... | ,, |
| श्रेष्ठत्व ... ... ... ... ... ... ... | ,, |
| सुखदुःख ... ... ... ... ... ... | ,, |
| सदाचरण ... ... ... ... ... ... | ४ |
| आत्मरक्षण ... ... ... ... ... ... | ६ |
| कन्याविक्रयनिषेध ... ... ... ... ... | ,, |
| स्त्रियांस त्यागविण्याविषयीं ... ... ... ... | ,, |
| स्त्रीधर्म ... ... ... ... ... ... ... | ७ |
| दंपतीधर्म ... ... ... ... ... ... | ,, |
| जितेंद्रियता ... ... ... ... ... ... | ८ |
| पुरुषार्थसाधन ... ... ... ... ... ... | ,, |
| धर्माचरण ... ... ... ... ... ... | ९ |
| प्रायश्चित्त ... ... ... ... ... ... | ,, |
| मोक्षसाधन ... ... ... ... ... ... | ,, |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| राजधर्म ... ... ... ... ... ... | १० |
| **विदुरवाक्य** ... ... ... ... ... ... | १२–३४ |
| पंडितलक्षण ... ... ... ... ... ... | १२ |
| मूर्खलक्षण ... ... ... ... ... ... | १३ |
| बुद्धिमत्ता ... ... ... ... ... ... | ,, |
| मित्रत्व ... ... ... ... ... ... | १४ |
| जितेंद्रियता ... ... ... ... ... ... | १५ |
| वर्ज्य ... ... ... ... ... ... ... | १६ |
| हानिकारण ... ... ... ... ... ... | १७ |
| संपत्तिलाभ ... ... ... ... ... ... | १८ |
| क्षमा ... ... ... ... ... ... ... | १९ |
| दुष्टता ... ... ... ... ... ... ... | २० |
| सत्कर्म ... ... ... ... ... ... ... | ,, |
| सुख ... ... ... ... ... ... ... | २१ |
| दुःख ... ... ... ... ... ... ... | ,, |
| लोकप्रीति ... ... ... ... ... ... | ,, |
| सुस्वभाव ... ... ... ... ... ... | २२ |
| धर्म ... ... ... ... ... ... ... | ,, |
| वाक्संयम ... ... ... ... ... ... | २३ |
| विद्यार्थी ... ... ... ... ... ... | ,, |
| राजधर्म... ... ... ... ... ... ... | ,, |
| पापपुण्य ... ... ... ... ... ... | २५ |
| स्वर्गलाभ ... ... ... ... ... ... | ,, |
| स्फुट ... ... ... ... ... ... ... | ,, |
| **हितोपदेशसार** ... ... ... ... ... ... | ३४ |
| मित्रलाभ ... ... ... ... ... ... | ४० |
| सुहृद्भेद ... ... ... ... ... ... | ७१ |
| विग्रह ... ... ... ... ... ... ... | १०० |
| संधि ... ... ... ... ... ... ... | १२७ |

# नीतिमन्दिर.

हें पुस्तक

संस्कृत ग्रंथांवरून

गोविंद शङ्करशास्त्री बापट

ह्यांनीं लिहिलें.

---

आवृत्ति तिसरी—३,००० प्रती.

---

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिली असे.

मुंबईमध्यें;

जावजी दादाजी यांच्या

"निर्णयसागर" छापखान्याचे मालक तुकाराम जावजी

यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

---

सन १८९२.

---

ह्या आवृत्तीसंबंधी सर्व अधिकार प्रसिद्धकर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

---

किंमत १० आणे.

# प्रस्तावना.

मन्वाज्ञा, विदुरवाक्य आणि हितोपदेशसार अशीं तीन प्रकरणें या पुस्तकांत आहेत. पहिलें, वेदतुल्य व परमपूज्य जी मनुस्मृति तींतील सनातन म्हणजे सर्व कालीं सर्वांस मान्य अशा धर्मांचें प्रतिपादन करणाऱ्या वचनांचें भाषांतर आहे. दुसरें, ज्यास पांचवा वेद असें म्हटलें आहे; असा जो इतिहासग्रंथ श्रीमहाभारत त्याच्या उद्योगपर्वांतील प्रसिद्ध विदुरनीतींतील निवडक वचनांचें भाषांतर आहे. तिसरें, जगत्प्रसिद्ध व राजनीतिपरिपूर्ण असा जो विष्णुशर्म्याचा हितोपदेश त्याचें भाषांतर आहे. संस्कृत भाषा न जाणणारे बाल, तरुण, वृद्ध व स्त्रिया इत्यादि सर्व प्रकारच्या वाचकांस या पुस्तकापासून मनोरंजन, नीतिशिक्षण आणि अंतःकरणसमाधान, हीं प्राप्त होतील अशी आशा आहे.

अहमदनगर,

ता० १२ आक्टोबर १८७९.

**गो० शं० शा० बा०.**

अवलक्षण ह्मणजे वाईटपणा नाहींसा होतो. दुराचारी मनुष्याची लोकांत निंदा होते, त्यास नेहमीं दुःख प्राप्त होतें, रोग होतात, त्याचें आयुष्य क्षीण होतें. मनुष्य सदाचारयुक्त, आस्तिक, परदोष न काढणारा, असा असला तर त्याच्याठायीं इतर शुभ लक्षणें नसतांही तो शंभर वर्षे वांचतो (चिरायु होतो). जें कर्म करितांना मनुष्याचा अंतरात्मा संतुष्ट होईल तें प्रयत्नानें करावें, त्याच्या उलट असेल तें वर्ज करावें. नास्तिकता, धर्मनिंदा, वेदनिंदा, द्वेष, ढोंग, गर्व, क्रोध, तीक्ष्णता, हीं टाकावीं. पुत्र आणि शिष्य यांशिवाय दुसऱ्या कोणावर काठी उगारूं नये. राग आला तरी कोणासही काठी मारूं नये. शिक्षणाकरितां मात्र पुत्र आणि शिष्य यांचें ताडन करावें.

अधार्मिक, पापी, यांचा लवकर नाश होतो, हें पाहून धर्माचरण करीत असतां दुःख प्राप्त झालें तरी अधर्माचरण करण्याचें मनांत आणूं नये. गाय गाभण झाली असतां ती कांहीं दिवसांनीं नियमानें विते, तसें अधर्माचें फल अमुक वेळीं येतें असें नाहीं, पण हलकेहलके वाढून तो कर्त्याचा समूळ नाश करितो. सत्य, धर्म, सदाचार, यांची आवड धरावी. शासनास पात्र असतील त्यांस शासन करावें. वाक्संयम (सत्यभाषणादि), बाहुसंयम (परपीडा न करणें), उदरसंयम (मिताहार), हे ठेवावे. धर्मविवर्जित अर्थकाम असतील ते सोडावे. पुढें दुःखप्रद होणारें (दरिद्यानें सर्वस्व दान करणें इत्यादि) अथवा लोकविद्विष्ट धर्माचरण असेल तेंही सोडून द्यावें. हस्तचापल्य (विनाकारण हातानें चाळे करणें), पादचापल्य (उगाच यथेच्छ भटकणें), नेत्रचापल्य (परस्त्रीदर्शनादि), कौटिल्य (वांकडेपणा), वाक्चापल्य (परनिंदादि), दुसऱ्याचा नाश करणें किंवा मनांत आणणें, या गोष्टी करूं नयेत. ज्या सन्मार्गानें पितृपितामहादि पूर्वज गेले त्या सन्मार्गानें चालावें, त्यानें चाललें असतां नाश होत नाहीं. थोडथोडी माती आणून मुंग्या वारूळ करितात, त्याप्रमाणें सर्व प्राण्यांस पीडा न देतां परलोकसाहाय्याकरितां हळूहळू धर्मसंचय करावा. परलोकीं साहाय्याकरितां आई, बाप, मुलें, बायको, भाऊबंद, कोणीही येत नाहींत; केवळ धर्म मात्र उपयोगीं पडतो.

प्राणी एकटाच जन्मास येतो, एकटाच मरतो, पुण्यफल एकटाच भोगितो, व पापफलही एकटाच भोगितो. लांकडाची धलपी किंवा मातीचें ढेंकूळ याप्रमाणें मेलेलें शरीर जमिनींत फेंकून भाऊबंद परत जातात, धर्म मात्र मनुष्याच्या बरोबर जातो; यासाठीं परलोकीं उप-

योगीं पडण्याकरितां नेहमीं हळूहळू धर्म संचय करावा, धर्मरूप मित्राच्या योगानें मनुष्य दुस्तर अशा दुःखांतून पार पडतो. धर्माविषयीं तत्पर, तपानें ज्याचें पाप नष्ट झालें आहे, अशा ब्रह्मस्वरूप पुरुषाप्रत धर्म परलोकास नेतो. ज्यास आपल्या कुळाचा उत्कर्ष करणें असेल त्यानें उत्तमांशीं संबंध ठेवावा, नीचांशीं कोणत्याही प्रकारें संबंध ठेवूं नये. आरंभिलेलें सत्कार्य निश्चयानें तडीस नेणारा, कृपालु, सहनशील, दुष्ट संग टाकणारा, हिंसा न करणारा, जितेंद्रिय, दान करणारा, असा मनुष्य स्वर्गाप्रत जिंकील. जागा स्वच्छ आहे असें पाहून पाऊल टाकावें, पाणी वस्त्रानें शुद्ध करून ह्मणजे गाळून घ्यावें, सत्यानें पवित्र असें भाषण करावें, मनास पवित्र वाटेल असें आचरण करावें. लोकांनीं अद्वातद्वा बडबड केली तरी सोसून घ्यावी, कोणाचाही अपमान करूं नये. अशा क्षणिक देहास्तव कोणाशींही वैर करूं नये. स्वहित इच्छिणारे असे जे दुःखी, बाल, वृद्ध, रोगी, यांनीं निंदा केली तरी समर्थानें सोसून घ्यावी. दुःखितांनीं निंदा केली असतां जो सोसतो, तो स्वर्गलोकीं मान्य होतो. जो ऐश्वर्यमदानें सहन करीत नाहीं, तो नरकास जातो. कर्माचें शुभाशुभ फल मरणोत्तर प्राप्त होतें; हें मनांत आणून मनुष्यानें मन, वाणी, शरीर, यांच्या योगानें सर्वदा शुद्ध कर्म करावें.

## आप्तरक्षण.

दान करण्यास समर्थ असा जो श्रीमान्, स्वजन दारिद्र्यानें दुःखी असून कीर्तीकरितां दुसऱ्याला देतो, त्याचा धर्म आरंभीं मात्र गोड परंतु परिणामीं कडू होय.

## कन्याविक्रयनिषेध.

शहाण्यानें कन्येचें किंचित्‌ही मोल घेऊं नये. जो लोभानें कन्येचा पैसा घेतो, तो मुलें विकणारा होय. जे मूर्ख स्त्रीधन अथवा स्त्रीला दिलेलें पालखी वगैरे वाहन व स्त्रीला दिलेलीं वस्त्रें यांचा उपभोग करितात ते अधोगतीस जातात.

## स्त्रियांस वागविण्याविषयीं.

बहुत कल्याण इच्छिणारे असे जे बाप, भाऊ, पति, दीर, यांनीं स्त्रियांचा मान राखावा, व त्यांस अलंकारभूषणें द्यावीं. जेथें स्त्रियांचा मान राहतो तेथें देव संतुष्ट होतात. जेथें स्त्रियांचा मान राहत नाहीं,

तेथील सर्व क्रिया निष्फल होत. जेथें कुलस्त्रियांस दुःख होतें, तें कुल सत्वर नाश पावतें. जेथें त्यांस पीडा होत नाहीं, तेथें त्याची सर्वदा भरभराट होते.

अपमानानें असंतुष्ट होऊन कुलस्त्रिया ज्या घराण्याचें अहित इच्छितात तीं घराणीं अवदसा पाठीमागें लागून सर्व प्रकारें नष्ट होतात. याकरितां हितेच्छु पुरुषांनीं सणवार, लग्नकार्य, इत्यादि उत्सवांच्या वेळेस वस्त्रालंकार, उत्तम भोजन, इत्यादिकांनीं कुलस्त्रियांचा मान राखावा. ज्या कुलांत पति भार्येवर प्रीति करितो, व त्याप्रमाणेंच भार्या पतीवर प्रीति करिते, त्या कुलाचें कल्याण निश्चयेंकरून होईल. स्त्री चांगली असली ह्मणजे सर्व कुल शोभतें. स्त्री वाईट असली ह्मणजे सर्व घराणें विशोभित होतें. लहान सुना, मुली, गर्भिणी स्त्रिया, यांस अतिथीच्याही पूर्वीं भोजन घालावें. त्यांस दिल्याशिवाय जो भक्षण करितो त्यास आपण कुत्र्याप्रमाणें भक्षण करितों हें समजत नाहीं.

## स्त्रीधर्म.

स्त्रीनें सर्वदा आनंदित असावें, गृहकृत्यांमध्यें दक्ष असावें, घरांतील सामान नीट ठेवावें; आणि काटकसरीनें खर्च करावा. पतीबरोबर स्वर्गास जाण्यास इच्छिणाऱ्या स्त्रीनें भर्ता जिवंत असतां अथवा मेल्यावर त्याचें अल्पही अप्रिय करूं नये. पति मृत झाल्यावर जी स्त्री ब्रह्मचर्य धारण करून राहते, ती अपुत्र असली तरी ब्रह्मचाऱ्याप्रमाणें स्वर्गास जाते. मन, वाणी, शरीर, हीं स्वाधीन ठेवून जी भर्त्यास अप्रिय असें आचरण करीत नाहीं, ती स्त्री भर्त्याबरोबर स्वर्गास जाते; आणि सज्जन तिलाच साध्वी असें ह्मणतात.

## दंपतीधर्म

जो प्रयत्नानें (कुसंगादिकांपासून) स्त्रीचें रक्षण करितो तो; संपत्ति, कीर्ति, कुल, आत्मा, स्वधर्म, यांचें रक्षण करितो. केवळ बलात्कारानें कोंडून ठेविल्यानें स्त्रियांचें दुराचारापासून रक्षण होतें असें नाहीं, यासाठीं पुढें सांगितलेल्या उपायांनीं त्यांचें रक्षण करावें. पैसा ठेवणें, खर्च करणें, स्वच्छता राखणें, पाक करणें, घरांतील सामानाची देखरेख करणें, हीं कामें स्त्रियांकडे सोंपावीं. नदी समुद्रास जाऊन तद्रूप होते, त्याप्रमाणें स्त्रीचा ज्या पुरुषाशीं विवाह होईल; त्याचे गुण तिला लागतात. ( यासाठीं पुरुषानें स्वतः सदाचारी राहवें ह्मणजे स्त्री

सदाचारी राहील हें तात्पर्य. ) संततीस कारणभूत अशा या स्त्रिया मोठें कल्याण करणाऱ्या होत. स्त्री आणि संपत्ति या दोन घराच्या मोठ्या शोभा आहेत, या दोहोंमध्यें भेद नाहीं. ( लक्ष्मीहीन घर जसें शोभत नाहीं, तसेंच स्त्रीरहित घर शोभत नाहीं, असें तात्पर्य. ) मरणापर्यंत परस्परांचें परस्परांवर प्रेम असावें हा थोड्यांत स्त्रीपुरुषांचा धर्म समजावा. परस्परांची फुटाफूट होऊन उभयतांस त्रास होणार नाहीं; असा विवाहित स्त्रीपुरुषांनीं सर्वदा यत्न करावा.

## जितेंद्रियता.

इंद्रियांच्या संबंधानें मनुष्यांस दोष लागतो, तीं स्वाधीन ठेविल्यानें मनुष्यांस सिद्धि (धर्म, अर्थ, काम, मोक्ष, हे चार पुरुषार्थ) प्राप्त होते. ज्याप्रमाणें सारथी घोडे स्वाधीन ठेवितो, त्याप्रमाणें नाशक विषयांकडे सक्त असणारीं इंद्रियें विद्वानानें स्वाधीन ठेवण्यास प्रयत्न करावा. विषयोपभोगानें विषयवासना शांत होत नाहीं; होमद्रव्यानें अग्नि प्रज्वलित होतो त्याप्रमाणें ती अधिक वाढते. ज्यास सर्व विषय प्राप्त होतात, व जो सर्व विषयांचा परित्याग करितो, त्या दोघांमध्यें विषयत्याग करणारा अधिक श्रेष्ठ होय. ज्ञानानें (नित्यानित्यवस्तुविवेक) विषायासक्त इंद्रियें स्वाधीन ठेवितां येतात, तसा केवळ विषयांचा संग सोडून दिल्यानें ठेवितां येत नाहींत. कातड्याच्या भांड्यांतून पाणी पाझरतें त्याप्रमाणें सर्व इंद्रियांतून एक इंद्रिय विषयासक्त झालें तरी तद्वारा मनुष्याची बुद्धि नष्ट होते. मनुष्य विद्वान् असो, किंवा अविद्वान् असो तो कामक्रोधांच्या स्वाधीन झाला ह्मणजे स्त्रिया सहज त्यास दुर्मार्गास नेतात. आई, बहीण, कन्या, यांशींही एकांतीं बसूं नये, इंद्रियसमूह फार बळकट आहे, तो विद्वानांससुद्धां पराधीन करतो.

इंद्रियार्थ ह्मणजे इंद्रियांस संतुष्ट करणारे विषय, त्यांचेठायीं यथेच्छ प्रसक्त होऊं नये. अतिविषयप्रसक्ति मनानें निवृत्त करावी.

## पुरुषार्थसाधन.

इतर उपायांनीं शरीरास पीडा न देतां इंद्रियें आणि मन स्वाधीन ठेवून सर्व पुरुषार्थ साधावे. धर्म आणि अर्थ (संपत्ति) यांसच कोणी श्रेय (कल्याण) ह्मणतात. (कारण ते इच्छा तृप्त करण्यास कारण आहेत.) कोणी काम व अर्थ यांसच श्रेय समजतात (कारण ते सुख-

हेतु आहेत.) कोणी नुसत्या धर्मासच श्रेय असें ह्मणतात. (अर्थकामहेतुत्वामुळें). वस्तुतः तिघांचा समुदाय हेंच श्रेय होय.

## धर्माचरण.

संतोष, क्षमा, मनोनिग्रह, अस्तेय (चोरी न करणें), शुद्धता, इंद्रियनिग्रह. शास्त्रज्ञान, ईश्वरज्ञान, सत्य, अक्रोध, हीं दहा धर्माचीं लक्षणें होत. धर्म हाच मनुष्याचा खरा मित्र होय. हा मरणानंतरही बरोबर येतो. बाकी सर्व शरीराबरोबर नष्ट होतें. पाप करणारा असें समजतो कीं आपलें पाप इहलोकीं कोणास ठाऊक नाहीं, परंतु देव त्यास पाहतो, आणि त्याचा अंतरात्मा जाणत असतो. (ह्मणजे त्याचें मन त्यास खात असतें). अहिंसा, सत्य, चोरी न करणें, शुद्धपणा, इंद्रियनिग्रह, हा चारी वर्णांचा साधारण धर्म मनूनें सांगितला आहे.

## प्रायश्चित्त.

शास्त्रोक्त कर्म न करणारा, निंदित कर्म करणारा, आणि विषयांचे ठायीं सक्त, असा मनुष्य प्रायश्चित्तास पात्र होतो. पाप केल्यावर पश्चात्ताप झाला असतां मनुष्य पापापासून मुक्त होतो. पुनः असें करणार नाहीं असा निश्चय केल्यानें पवित्र होतो. न समजून अथवा समजून निंद्य कर्म केलें असतां त्यापासून सुटण्याची इच्छा करणाऱ्यानें पुनः दुसऱ्यानें तसें करूं नये.

## मोक्षसाधन.

इंद्रियांचा निग्रह, रागद्वेषांचा क्षय, प्राण्यांची अहिंसा, यांच्या योगानें मनुष्य मोक्षास पात्र होतो. ज्यास ईश्वरज्ञान झालें तो कर्मांनीं बद्ध होत नाहीं. ज्यास ईश्वरज्ञान चांगलें झालें नाहीं तो संसारांत बद्ध होतो. हाडांनीं फुगलेलें, शिरांनीं वेष्टिलेलें, रक्तमांस यांनीं लेपटलेलें, जरा आणि शोक यांनीं युक्त, रोगांचें घर, क्षुधादिकांनीं पीडित, घाणेरडें, अनित्य असें जें हें पंचमहाभूतात्मक शरीर त्यास सोडावें. (देहात्मवाद धरून संसारांत बद्ध न होतां मोक्षसाधनाचा यत्न करावा असें तात्पर्य) वाग्दंड (वाणीचें नियमन), मनोदंड (मनाचें नियमन,) शरीरदंड (शरीराचें नियमन), हे तीन दंड ज्याच्या शरीरांत वसतात त्यास त्रिदंडी असें ह्मणतात. सर्व प्राण्यांविषयीं हे तीन दंड धारण करून आणि कामक्रोधांचें संयमन करून मनुष्य सिद्धि पावतो. सर्व शुभकर्मांमध्यें परमात्मज्ञान हें मुख्य होय. तें सर्व विद्यांमध्यें श्रेष्ठ. त्यापासून मोक्ष प्राप्त होतो.

# राजधर्म.

राजदंडाच्या भयानें स्थिरचर भूतें स्वस्थ राहतात, स्वधर्माचा त्याग करीत नाहींत. त्या राजदंडाची योजना अन्यायानें वागणाऱ्याच्या ठायीं अपराधांच्या मानानें राजानें देश, काल, शक्ति, विद्या, यांचा विचार करून करावी. राजदंड सर्व प्रजांवर अंमल करितो. राजदंडच रक्षण करितो. इतर रक्षक निजले असतां राजदंड जागृत असतो. शहाणे राजदंडास धर्महेतु असें ह्मणतात. हा राजदंड विचार करून चालविला असतां सर्व प्रजा संतुष्ट होतात. अविचारानें याची योजना केली असतां सर्व प्रकारें नाश होतो. आळस सोडून राजा दंडास पात्र अशा मनुष्यांस जर दंड करणार नाहीं, तर कोळी खिळ्यावर मासे भाजून खातात त्याप्रमाणें बळकट दुर्बळांस पीडा देतील. सर्व लोक राजदंडानें जिंकिले आहेत. स्वभावतः शुद्ध असा मनुष्य दुर्लभ. राजदंडाच्या भयानें सर्व जग उपभोगास पात्र होतें. अशा राजदंडाची योग्य योजना करणाऱ्या राजाचे धर्म, अर्थ, काम, हे तिन्ही पुरुषार्थ वाढतात. जो विषयासक्त, पक्षपाती, नीच, तो याच राजदंडाच्या योगानें नष्ट होतो. राजदंड हें मोठें तेज आहे. अशास्त्रज्ञांस तो चालवितां येणार नाहीं. तो अधार्मिक राजाचा बांधवांसहवर्तमान नाश करितो. ज्यास सहाय नाहीं, जो मूर्ख, लोभी, अशास्त्रज्ञ, विषयासक्त, अशा राजास तो न्यायानें चालवितां यावयाचा नाहीं.

शुद्ध, सत्यशील, सशास्त्र आचरण करणारा, सहाययुक्त, बुद्धिमान्, अशा राजास राजदंड सहज चालवितां येतो.

इंद्रियांचा जय करण्यास अहोरात्र उद्योग करावा. जितेंद्रिय राजास प्रजा स्वाधीन ठेवितां येतात. ज्यांचा परिणाम फार वाईट आहे अशीं दहा काममूलक आणि आठ क्रोधमूलक व्यसनें आहेत त्यांचा यत्नानें त्याग करावा. काममूलक व्यसनें जडलीं आहेत अशा राजाचे अर्थधर्म नष्ट होतात. क्रोधमूलक व्यसनें ज्यास लागलीं आहेत, त्याचा प्राणनाशसुद्धां होतो. मृगया, द्यूत, दिवानिद्रा, परनिंदा, स्त्रिया, मद्यादिपानापासून झालेला मद, गाणें, बजावणें, नाच, व्यर्थ फिरणें, हीं दहा काममूलक व्यसनें होत. पैशुन्य, साहस, द्वेष, हेवा, दुसऱ्याच्या आंगच्या गुणांस दोष लावणें, परद्रव्यहरण, कठोर भाषण, क्रूर दंड, हीं आठ क्रोधमूलक व्यसनें होत. ह्या दोन्ही प्रकारच्या व्यसनांचें मूळ लोभ असें शहाणे लोक ह्मणतात. हीं सर्व त्यापासून उत्पन्न झालीं

सं. वि. ४१२


मोठी संपत्ति, मोठी विद्या, मोठी सत्ता प्राप्त झाली अ उद्धटपणानें वागत नाहीं, तो पंडित होय. निरर्थक कर्म तेच शहाणे होत. बाकी उगाच कामें करणारे हे फाजील हो समजतों.

## मूर्खलक्षण.

शिकलेला नसून डौली, दरिद्री असून श्रीमंतीचा डौल ध..... कांहीं न करितां अथवा दुष्कर्म करून धनलाभाची इच्छा करणारा असा जो त्यास शहाणे लोक मूर्ख ह्मणतात. जो आपलें काम सोडून दुसऱ्याच्या कामांत हात घालितो, व मित्रांशीं लबाडीनें वागतो त्यास मूर्ख ह्मणतात. जे आपल्याविषयीं उदासीन त्यांची प्रीति संपाद ण्यास इच्छितो, आणि जे आपणावर प्रीति करतात त्यांस टाकितो बलवानांशीं द्वेष धरितो, तो मूर्ख होय. शत्रूंस मित्र मानितो, मित्रांचा द्वेष व नाश करितो, दुष्ट कर्म आरंभितो त्यास मूर्ख ह्मणावें उगाच काम माजवितो, सर्व ठिकाणीं संशय घेतो, जें लवकर कराव याचें त्यास वेळ लावितो, तो मूर्ख समजावा. पितरांची भक्ति करीत नाहीं, देवाची पूजा करीत नाहीं, उत्तम मित्र ज्यास मिळत नाहीं तो मूर्ख होय. बोलावल्याशिवाय जातो, विचारल्याशिवाय पुष्कळ बोलतो, ज्यावर कोणी विश्वास ठेवीत नाहीं त्यावर विश्वास ठेवितो तो मूर्ख व नीच मनुष्य होय. दुसऱ्यास ज्याकरितां दोष देतो तेंच आचरण आपण करितो, अंगांत सामर्थ्य नसतां रागावतो, तो फारच मूर्ख होय. आपल्या शक्तीचा विचार न करितां ज्यांत धर्म व अर्थ नाहींत व जें प्राप्त व्हावयाचें नाहीं त्याची कांहीं उद्योग न करितां इच्छा करणारा जो मनुष्य तो मूर्ख होय. शिकविण्यास योग्य नाहीं अशास शिकवितो, सेवा करण्यास योग्य नाहीं अशाची सेवा करितो, कृपणावर प्रीति करितो, तो मूर्ख होय.

## बुद्धिमत्ता.

धनुष्य धारण करणाऱ्यानें बाण सोडिला तर तो एकास मारील किंवा न मारील; परंतु बुद्धिमान् जो आहे तो आपल्या बुद्धीनें राजासहवर्तमान सर्व राष्ट्राचा नाश करील. जो कामक्रोध सोडितो, सत्पात्रीं दान करितो, तारतम्य जाणतो, बहुश्रुत, शीघ्र काम करितो, त्याचें सर्व लोक ऐकतात. दुर्बळांचा अपमान करीत नाहीं, प्रसंग पडला असतां शत्रूंची सुद्धां सावधपणें सेवा करितो, बलवानांशीं क-

ग्रह करीत नाहीं, योग्य वेळीं पराक्रम करितो, तो बुद्धिमान् समजावा. देशांतील आचार व रीतिभाति जाणतो, जातिधर्म जाणतो, तो सर्व समजणारा बुद्धिमान् होय. तो जेथें जेथें जाईल, तेथें तेथें सर्व लोकांमध्यें त्याची प्रतिष्ठा होईल. दंभ, मोह, मत्सर, पापकर्म, राजद्वेष, समुदायाशीं वैर; गर्विष्ठ, उन्मत्त, दुर्जन, यांशीं वाद; या गोष्टी सोडून देईल तोच बुद्धिमान् सर्वांमध्यें श्रेष्ठ होय. लोकांस न समजतांही जो पाप करण्यास आपल्या मनांत फार लाजतो, तो सर्व लोकांमध्यें श्रेष्ठ होतो; तो मोठा तेजस्वी, महात्मा, योग्य, असा होऊन सूर्याप्रमाणें शोभतो. उपायानें सफल होणारें कार्य यत्न करूनही सिद्धीस न गेलें तर बुद्धिमानानें मनांत दुःख मानूं नये. जीं कृत्यें करावयाचीं आहेत त्यांच्या कारणांचा विचार करावा. कारणांचा विचार करून मग कर्म करावें. त्वरेनें कोणतेंही कर्म करूं नये. हेतु, परिणाम, आपलें सामर्थ्य, यांचा विचार करून शहाण्यानें कर्म करावें अथवा सोडून द्यावें. मातीपासून सोनें काढितात त्याप्रमाणें उन्मत्ताच्या वडवडण्यापासून व मुलाच्या बोलण्यापासून तात्पर्य असेल तेवढें घ्यावें. निवडणारा ज्याप्रमाणें मातींतून धान्यकण मात्र वेतो, त्याप्रमाणें शहाण्यानें सद्वचन, सत्कर्म, सांपडेल तेवढें मात्र घ्यावें. सुख, दुःख, ऐश्वर्य, दारिद्र्य, लाभ, अलाभ, जन्म, मरण, हीं पाळीपाळीनें सर्वांस प्राप्त होतात, याकरितां शहाण्यानें हर्षशोक करूं नये. ज्याचें मन पापापासून निवृत्त होऊन सत्कर्मांकडे वळलें त्यानें प्रकृति ह्मणजे काय, विकृति ह्मणजे काय, हें सर्व जाणिलें असें समजावें. नीतिशास्त्रकार जो शुक्राचार्य त्याशिवाय अनीति करणार नाहीं असा पुरुष नाहीं; तथापि हातून वाईट कर्म झालें तर तसें पुनः न करण्याविषयीं जो निश्चय व यत्न करितो तोच बुद्धिमान् होय. मुखनेत्रादि नऊ ज्यास द्वारें आहेत; अविद्या, काम, कर्म, हे ज्यास तीन आधारभूत स्तंभ आहेत; शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, हे पांच ज्याचे साक्षी आहेत; ज्यांत क्षेत्रज्ञ आत्मा राहतो; अशा या शरीररूप घराला जो जाणतो, तो मोठा प्राज्ञ होय.

## मित्रत्व.

ज्याच्या रागाचें आपणास भय वाटतें तो आपला मित्र नव्हे, ज्याशीं साशंक वागावें लागतें तोही मित्र नव्हे, तर बापाप्रमाणें ज्यावर विश्वास ठेवण्यास हरकत नाहीं तोच मित्र, बाकीचे सोबती सम-

जावे. कोणत्याही प्रकारचा संबंध नसतां जो मित्रत्वानें आपणाशीं वागतो, तोच आपला बंधु व मित्र समजावा; तोच आपणास उपयोगी पडेल, तोच आपला मुख्य लाभ होय. ज्याचें मन चंचल, बुद्धि अस्थिर, जो वडिलांची सेवा करीत नाहीं, त्याचें मित्रत्व अनिश्चित होय. मित्राजवळ धन असो किंवा नसो, त्याचा मान राखावाच. जो केवळ आपल्या कामासाठीं मित्रत्व करणारा नसतो तो मित्राचा लहानमोठेपणा जाणत नाहीं. आपणास काय काय कामें करावयाचीं आहेत हें मनांत आणून, आपला आदा व खर्च पाहून, अनुकूल स्वभाव पाहून, योग्य मनुष्याशीं मैत्री करावी. कारण, मोठमोठीं कठिण कामें असतात तींसुद्धां मित्राच्या योगानें साध्य होतात.

शहाण्यानें आपल्या मनांत परीक्षा करून, बुद्धीनें जाणून, लोक काय ह्मणतात तें ऐकून, प्रत्यक्ष पाहून, समजल्यावर बुद्धिमानांशीं मैत्री करावी. बुद्धिमानांची सेवा करणारा, विद्वान्, धार्मिक, पाहतांच मन ओढून घेणारा, ज्यास मित्र आहेत, चांगलें बोलणारा, अशा मित्राचा संग्रह अवश्य करावा. चांगल्या कुळांतला असो किंवा वाईट कुळांतला असो, जो मर्यादेचें उल्लंघन करीत नाहीं, धर्माचरण इच्छिणारा, मृदु व नम्र, तो शंभर कुलीनांमध्यें चांगला. ज्यांचें चित्त एक, मसलत एक, बुद्धि सारखी, त्यांचें मित्रत्व कमी होत नाहीं. कृतज्ञ, धार्मिक, सत्यशील, भला, दृढ प्रीति करणारा, जितेंद्रिय, स्थिरमति, स्नेह न सोडणारा, असा असेल त्याशीं मित्रत्व करावें.

## जितेंद्रियता.

पदरच्या मनुष्यांस यथायोग्य देऊन जो नियमित उपभोग घेतो, पुष्कळ काम करून जो नियमित झोंप घेतो, शत्रूंनींही मागितल्यास देतो, असा जो जितेंद्रिय त्यास संकटें येत नाहींत.

ग्रह जसे नक्षत्रांचें आक्रमण करितात, त्याप्रमाणें आपल्या स्वाधीन नसतां यथेच्छ विषयोपभोग करणारीं जीं इंद्रियें तीं लोकांस आपल्या स्वाधीन करून घेतात. आपल्याबरोबर उत्पन्न झालेला व आपलाच पराभव करणारा असा जो इंद्रियसमुदाय त्याकडून जो जिंकिला जातो, त्याचीं संकटें शुक्लपक्षींच्या चंद्राप्रमाणें भराभर वाढतात. आपल्या इंद्रियांस स्वाधीन न ठेवितां जो प्रधानांस स्वाधीन करण्यास इच्छितो, त्याप्रमाणेंच प्रधानांस दावांत न ठेवितां जो शत्रूंस ताब्यांत आणण्यास इच्छितो, त्याचा नाश होतो. शत्रूप्रमाणें पहिल्यानें आपण

आपणास जिंकावें, नंतर प्रधान व शत्रु यांस ताब्यांत आणण्याचा यत्न करावा; ह्मणजे तो व्यर्थ जाणार नाहीं. राजा, शरीर हा पुरुषाचा रथ आहे, मन हा त्यास हाकणारा सारथी आहे, इंद्रियें त्यास वाहणारे घोडे आहेत; याकरितां चांगला कुशल सारथी जसा घोडे स्वाधीन ठेवून रथ घेऊन जातो, त्याप्रमाणें इंद्रियें स्वाधीन ठेविल्यास हाही सुखानें पार पडेल. घोडे स्वाधीन नसले ह्मणजे वाटेंत दांडगाई करून वाईट सारथ्यास रथांतून पाडितात त्याप्रमाणेंच इंद्रियें स्वाधीन नसल्यास पुरुषाचा सहज नाश करतील. इंद्रियें ज्याच्या स्वाधीन नाहींत तो मूर्ख होय, त्यास अर्थ असतो तो अनर्थ वाटतो, अनर्थ असतो तो अर्थ वाटतो, जें दुःखकारक असेल तेंच तो सुखकारक मानितो. जो धर्मार्थांस टाकून इंद्रियांच्या स्वाधीन होतो तो लक्ष्मी, प्राण, धन, स्त्रिया यांस लवकरच मुकतो. ज्यापाशीं संपत्ति पुष्कळ असून इंद्रियें स्वाधीन नाहींत त्याचें ऐश्वर्य नाहींसें होतें. मन, बुद्धि, इंद्रियें, हीं स्वाधीन ठेवून आपला आपण उद्धार करावा; आपला बंधु आपण, आपला शत्रुही आपणच. जो जितेंद्रिय तो आपला आपण बंधु, व जो जितेंद्रिय नाहीं तो आपला आपण शत्रु. मोठे मासे बारीक जाळ्यांत सांपडले ह्मणजे जसे ते जाळें कुरतुडण्यास यत्न करितात, त्याप्रमाणें काम आणि क्रोध हे दोन रिपु प्रज्ञेचा नाश करितात. आपल्या शरीरांतील इंद्रियरूप जे पांच शत्रु त्यांस जिंकिल्याशिवाय जो शत्रूंस जिंकावयास इच्छितो त्याचा शत्रु पराभव करितात. मोठमोठे राजेही इंद्रियें स्वाधीन न ठेविल्यानें आपल्या कर्मानेंच राज्यभ्रष्ट होऊन पराधीन झालेले दृष्टीस पडतात. पांच विषयांकडे जाणारे जे हे आपले पांच शत्रु त्यांस जो मोहामुळें स्वाधीन ठेवीत नाहीं, त्यास आपत्ति ग्रासून टाकिते. मन व पांच इंद्रियें हीं फार चंचल आहेत. जसें भांड्याला भोंक पडलें ह्मणजे त्यांतून नेहमीं हळूहळू पाणी पाझरत असतें, त्याप्रमाणें त्यांपैकीं जें जें इंद्रिय विषयासक्त होतें तद्वारा मनुष्याची बुद्धि नष्ट होते.

## वर्ज्य.

वाळलेल्या बरोबर ओलें जळतें त्याप्रमाणें वाईट व चांगला हे एकाद्या कचाटांत सांपडले ह्मणजे अपराधी कोण हें न कळून दोघांसही सारखा दंड होतो, याकरितां दुष्टांची संगति करूं नये. शहाणा जो असेल त्यानें, मूर्ख करितात त्याप्रमाणें विनाकारण कलह करूं नये.

असें केलें असतां कीर्ति प्राप्त होते, व संकटें येत नाहींत. लोकांच्या कल्याणाकडे न पाहतां आपणच सुख भोगणारा, दुष्ट, कृतघ्न, निर्लज्ज, असा राजा असेल त्याचा लोकांनीं त्याग करावा. दुसऱ्याची निंदा करणें, दुसऱ्यास दुःख देणें, याविषयीं जे उद्युक्त, नेहमीं लोकांत भांडणें लावण्याविषयीं खटपट करणारे, ज्यांची भेट घेतली असतां कांहीं तरी अडचण प्राप्त व्हावयाची, ज्यांच्याजवळ राहिलें तर मोठें भय प्राप्त व्हावयाचें, ज्यांच्याशीं घेणेंदेणें करणेंही मोठें भयंकर, जे फुटाफूट पाडणारे, कामातुर, निर्लज्ज, लुच्चे, व जे दुष्टलोकांत प्रसिद्ध आहेत, ज्यांच्या शेजारीं राहणें सुद्धां निंदेस पात्र, याप्रमाणें जे दुसऱ्याही अनेक दुर्गुणांनीं युक्त, अशा मनुष्यांशीं संबंध ठेवूं नये. मित्रत्वापासून होणारा लाभ व सुख हीं नाहींतशीं झालीं ह्मणजे दुष्टावर केलेली प्रीति सर्व नाहींशी होते, मग तो निंदा करूं लागतो, नाशास प्रवृत्त होतो, थोडेंसें वाईट करूनही त्यास संतोष होत नाहीं, असा जो दुष्ट, कृतघ्न, त्याची संगति शहाण्यानें समजून उमजून दुरूनच सोडून द्यावी. तृणांनीं आच्छादित अशा कूपावर पाय ठेविला असतां जसा नाश होतो, त्याप्रमाणें दुष्ट, अशिक्षित, अशांशीं स्नेह केला असतां मनुष्य नाश पावतो, याकरितां त्यांचा त्याग करावा. गर्विष्ठ, मूर्ख, रागिट, अविचारी, धर्मभ्रष्ट, अशांशीं शहाण्यानें मित्रत्व करूं नये.

## हानिकारण.

परधनहरण करणें, परस्त्रीचा अभिलाष धरणें, मित्राचा त्याग करणें, हे तीन दोष नाश करणारे आहेत. काम, क्रोध, लोभ, हीं तीन नरकाचीं द्वारें आहेत. हीं आपला नाश करितात; याकरितां त्यांचा त्याग करावा. निद्रा, आळस, भय, क्रोध, चेंगटपणा, सुस्ती, हे सहा दोष ऐश्वर्य इच्छिणाऱ्या पुरुषानें टाकून द्यावे. गाई, चाकरी, शेतकी, बायको, विद्या, नीचाची संगति, हीं सहा थोडा वेळ दुर्लक्ष केल्यानें वाईट होतात. पारध्यास हरिण भितात त्याप्रमाणें ज्याचें लोकांस भय वाटतें, तो समुद्रवलयांकित पृथ्वीचा राजा असला तरी त्याचा नाश होतो. ज्याचा पराभव व्हावा असें देवांच्या मनांत येतें, त्याची बुद्धि ते नष्ट करितात. असें झालें ह्मणजे त्यास नीचकृत्यें आवडूं लागतात. बुद्धि मलिन होऊन नाश होण्याची वेळ आली ह्मणजे अनीति असते तीच नीति वाटूं लागून त्याप्रमाणें वागावें असें वाटतें. गुरें राखणाऱ्याप्रमाणें काठी घेऊन देव पहात नाहींत, ज्याचें

रक्षण करावयाचें असेल त्यास बुद्धि देतात; ज्याचें करावयाचें नसेल त्याची बुद्धि नष्ट करितात.

जरा रूपाचें हरण करिते, आशा धैर्याचें हरण करिते, मृत्यु प्राणहरण करितो, द्वेषानें धर्माचरणाचा नाश होतो, क्रोधानें लक्ष्मी नष्ट होते, दुष्टाची सेवा केल्यानें स्वभाव वाईट होतो, कामानें लज्जा नाहींशी होते, आणि अभिमानानें सर्व नाहींसें होतें. हेवा करणारा, मर्म भेद करणारा निष्ठुर, वैर करणारा, लुच्चा, असा असतो त्यास पापाचरणामुळें लवकरच संकट प्राप्त होतें. हंस शुष्क सरोवरास सोडून जातात त्याप्रमाणें ज्याची बुद्धि अस्थिर, जो इंद्रियांच्या स्वाधीन, त्यास संपत्ति सोडून जाते. बुद्धिमानास पीडा देऊन मी दूर आहें, आतां त्याचें भय नाहीं, असें ह्मणून उपयोग नाहीं; बुद्धिमानाचे हात लांब आहेत, त्यास पीडा दिली असतां त्यांनीं तो मारितो. ज्यावर कोणी विश्वास ठेवीत नाहीं, त्यावर विश्वास ठेवूं नये. ज्यावर विश्वास ठेविला त्यापासून जें भय प्राप्त होतें तें समूल नाश करितें. जो मूर्खपणानें निंद्य कार्यें करितो, त्याचीं तीं कार्यें नष्ट होऊन तो प्राणास सुद्धां मुकतो. स्तुत्य कर्में करण्यापासून सुख होतें, परंतु तींच टाकून दिलीं तर पश्चात्ताप होतो. निंद्य आचरण करणारा, मूर्ख, द्वेष करणारा, अधार्मिक, दुर्भाषण करणारा, रागीट, यांस लौकर संकटें येतात. स्त्रिया, उन्मत्त, पतित, दुराचारी, यांपाशीं द्रव्य ठेविलें असतां तें गेल्याप्रमाणें समजावें. नदींत धोंडे बुडतात त्याप्रमाणें, जेथें स्त्री, लुच्चे, यांचें माहात्म्य; जेथें मूर्ख सत्ताधीश, तेथें लोकांचा नाश व्हावयाचाच. जो पापकर्म आचरीत नाहीं, त्याची भरभराट होते, परंतु एकवार पापकर्म हातून झालें तरी त्याचा विचार न करून पुन्हा तसेंच करितो तो भयंकर नरकांत पडतो.

## संपत्तिलाभ.

आपल्या ठिकाणीं लोक कोणत्या रीतीनें विश्वास ठेवितील हें ज्यास समजतें, दोष कळले असतां जो शासन करितो, कोणत्या अपराधास किती शिक्षा करावी हें ज्यास कळतें, त्या मनुष्यास पूर्ण संपत्ति प्राप्त होते. ज्यांविषयीं केलेला यत्नही व्यर्थ होण्याचा संभव आहे, अशीं कामें आरंभूं नयेत. शहाणा असतो तो प्रारंभीं एकादें कृत्य लहान दिसलें तरी पुढें मोठी फलप्राप्ति व्हावयाची असली ह्मणजे एकदम करण्यास आरंभ करितो, मध्यें विघ्नें आलीं तरी थांबत नाहीं. ज्याचीं

इंद्रियें स्वाधीन, ज्यानें मन जिंकिलें आहे, अपराध्यास दंड करणारा, विचार करून कर्म करणारा, त्यास अवश्य लक्ष्मी प्राप्त होते. सदाचरणापासून लक्ष्मी उत्पन्न होते, प्रौढपणानें वाढते, कुशलपणानें स्थिर होते, जितेंद्रियतेपासून सतत राहते. ज्यास मोठ्या संपत्तीची इच्छा आहे, त्यानें प्रथमतः धर्माचरण करावें. स्वर्गलोकापासून अमृत नाहींसें होत नाहीं, त्याप्रमाणें धर्मापासून अर्थ दूर रहात नाहीं. जो क्रोध आणि हर्ष यांचा वेग स्वाधीन ठेवितो, संकटकालीं मोह पावत नाहीं, तो लक्ष्मीप्राप्तीस योग्य होतो. केवळ बुद्धीनें संपत्ति प्राप्त होते, आणि बुद्धि नसल्यानें दारिद्र्य येतें असें नाहीं; या दोहोंचेंही कारण शहाण्यास समजतें; दुसऱ्यास कळत नाहीं. धैर्य, शांति, इंद्रियनिग्रह, शुचिर्भूतपणा, करुणा, मृदुभाषण, मित्रप्रीति, हीं सात धनप्राप्तीचीं साधनें आहेत. जे दुःखपीडित, उन्मत्त, नास्तिक, आळशी, इंद्रियांच्या स्वाधीन, उत्साहरहित, अशांजवळ लक्ष्मी वास करीत नाहीं. अतिसज्जन, अतिदाता, अतिशूर, बुद्धीचा गर्व वाहणारा, यांपाशीं लक्ष्मी भयानें जात नाहीं. अतिगुणवान् किंवा अतिनिर्गुण या दोघांच्या ठायींही लक्ष्मी रहात नाहीं. हिची गुणांवर विशेष प्रीति आहे असें नाहीं, तरी निर्गुणता असेल तेथेंही ती रममाण होत नाहीं. माजलेल्या गाईप्रमाणें संपत्ति अविचारी आहे, ती एके ठिकाणीं स्थिर होत नाहीं. प्रयत्न, इंद्रियनिग्रह, दक्षता, सावधपणा, धैर्य, स्मरणशक्ति, विचार करून कर्म करणें, हीं ऐश्वर्याचीं कारणें आहेत.

## क्षमा.

क्षमाशील जे आहेत त्यांमध्यें एक कमीपणा दिसतो, तो हा कीं, हे क्षमायुक्त असल्यामुळें लोक यांस अशक्त समजतात. परंतु हा कमीपणा समजूं नये; कारण क्षमा हें मोठें बल आहे. अशक्तांस क्षमा हितावह आहे, व सशक्तांस क्षमा हें मोठें भूषण आहे. क्षमा हें लोकांस स्वाधीन करून घेण्याचें साधन आहे. क्षमेनें काय प्राप्त होणार नाहीं? क्षमारूप खड्ग ज्याच्या हातांत आहे, त्याचें दुर्जन काय करील? तृण नाहीं अशा जागेवर पडलेला अग्नि आपल्या आपणच विझून जातो. ज्याच्या अंगीं क्षमा नाहीं तो दुसऱ्यास वाईटपणा देईल, व आपणही वाईट होईल, यासाठीं क्षमा हाच मोठा श्रेयस्कर धर्म होय. मूर्ख असतात ते कठोर भाषण करून व निंदा करून शहाण्यांस त्रास देतात, यामुळें त्यांस पाप लागतें, परंतु क्षमा करणारा स्वस्थ असतो. दुस-

ज्यास पीडा देणें हेंच दुष्टांचें बल, राजाचें बल शासन, स्त्रियांचें बल सेवा, आणि गुणवानांचें बल क्षमा होय. दुसऱ्यानें कठोर भाषण किंवा निंदा केली, तरी आपण तसें करूं नये; कारण क्षमा करणाऱ्याचा रागच त्यास जाळून टाकितो, आणि त्याचें पुण्य याकडे येतें. सत्कुलांमध्यें उत्पन्न झालेले जे साधु ते अग्नीसारखे तेजस्वी असतात, परंतु काष्ठांत अग्नि जसा गुप्त असतो, त्याप्रमाणें क्षमा धारण करून ते आपलें तेज प्रकट करीत नाहींत.

समर्थ जो आहे त्यास क्षमेसारखें सर्व ठिकाणीं, सर्व कालीं, भूषणप्रद व हितावह, असें दुसरें कांहीं नाहीं. अशक्तानें सर्वांची क्षमाच केली पाहिजे. शक्तिमान् आहे, त्यानें धर्मासाठीं क्षमा करावी, तसेंच ज्यास अर्थ व अनर्थ दोन्ही सारखे आहेत असा जो साधु त्यासही सर्वदा क्षमा हितकारक आहे.

## दुष्टता.

पदरच्या मनुष्यांस दिल्याशिवाय जो एकटा चांगलें मिष्टान्न भक्षण करितो, उत्तम वस्त्र वापरतो, त्यापेक्षां दुसरा दुष्ट कोण? हेवा न करणें, सरळपणा, शुचिर्भूतपणा, संतोष, प्रियभाषण, इंद्रियनिग्रह, सत्य, स्थैर्य, या गोष्टी दुष्टांच्या अंगीं रहात नाहींत. एकाएकीं विनाकारण रागावणें, तसेंच एकदम खुष होणें, याप्रमाणें अभ्रासारखा चंचल दुष्टांचा स्वभाव असतो. दुष्ट असतात ते दुसऱ्यांचे दुर्गुण जाणण्याविषयीं जसे उत्सुक असतात त्याप्रमाणें गुण जाणण्याविषयीं असत नाहींत.

## सत्कर्म.

आपण ज्याची सेवा करितों, जो आपली सेवा करितो, आणि जो मी तुझा आहें असें ह्मणतो, या तिघांस मोठें संकट प्राप्त झालें तरी सोडूं नये. सत्य, दान, उद्योग, हेवा न करणें, क्षमा, धैर्य, हे गुण पुरुषानें कधींही सोडूं नयेत. हें केलें असतां काय होईल, नाहीं केलें तर काय होईल, असा विचार करून पुरुषानें कर्म करावें अथवा सोडून द्यावें. मनुष्य नेहमीं जें मनांत आणितो, नेहमीं करितो, त्यासारखी त्याची बुद्धि होते, याकरितां सर्वदा सदाचरण करावें. सत्कर्म, धर्माचरण, विद्या, प्रयत्न, निष्कपटपणा, वारंवार साधूंची संगति, हीं मनुष्याचा उदय करितात. मनांत खेद न बाळगणें हें संपत्तीचें, लाभाचें व कल्याणाचें मूळ आहे. जो खिन्न असत नाहीं तो मोठा होतो आणि अनंत सुख पावतो.

## सुख.

धनलाभ, शरीरसंपत्ति, मधुर भाषण करणारी आवडती बायको, आज्ञाधारक पुत्र, जिच्या योगानें द्रव्य प्राप्त होईल अशी विद्या, हीं इहलोकचीं सुखें आहेत. जो जितेंद्रिय तो हीं आपणास प्राप्त करून घेईल, त्यास पाप देखील लागणार नाहीं, मग संकट कोठून येणार? आरोग्य, कर्ज नसणें, प्रवास करण्याची गरज नसणें, साधूंची संगति, पोटापुरतें उत्पन्न, कोणाचें भय नसणें, हीं सहा या लोकचीं सुखें आहेत. विनाकारण घरांतून बाहेर जात नाहीं; दुष्टांची संगति धरीत नाहीं, परस्त्रीचा अभिलाष करीत नाहीं, ढोंग व चोरी करीत नाहीं, नीचपणा करीत नाहीं, मद्यप्राशन करीत नाहीं, असा जो असेल तो सर्वकाळ सुखी असतो. मनुष्य आपलें कल्याण करून घेण्याचें ज्याप्रमाणें मनांत आणील, त्याप्रमाणें त्याचीं सर्व कार्यें सिद्धीस जातील यांत संशय नाहीं. हेवा न करणारा, कृतज्ञ, सर्वदा सत्कर्में करणारा, असा जो असेल त्यास मोठें संकट कधीं प्राप्त व्हावयाचें नाहीं. तो सर्व ठिकाणीं शोभतो. लोभाकृष्ट न होतां अधर्मानें मोठा लाभ होत असला तरी जो सोडून देतो, तो सर्प जशी कांत टाकितो त्याप्रमाणें सर्व दुःखें टाकून सुखानें राहतो.

## दुःख.

हेवा करणारा, निंदा करणारा, असंतुष्ट, रागिट, नेहमीं शंका घेणारा, दुसऱ्याच्या भाग्यानें उपजीविका करणारा, हे सहा नेहमीं दुःख भोगणारे होत. दुसऱ्याच्या द्रव्याचा, रूपाचा, पराक्रमाचा, कुलीनतेचा, सुखाचा, आणि सुदैवाचा हेवा करितो त्यास अनंत दुःख प्राप्त होतें.

## लोकप्रीति.

जो अविचारानें धर्म, अर्थ, काम, हे आरंभीत नाहीं; विचारिलें असतां खरें सांगतो; मित्रांशीं कलह करीत नाहीं; मान मिळाला नाहीं तरी शहाणपणामुळें रागावत नाहीं; कोणाचा हेवा करीत नाहीं; दया करितो; थोरांशीं विरोध करीत नाहीं; फाजिल बोलत नाहीं; कोणी भांडूं लागला तरी सोसून घेतो; अशा मनुष्याची सर्व ठिकाणीं प्रशंसा होते. जो सर्वांशीं शांतीनें वागतो, समशील, मृदु, लोकांस मान देणारा, शुद्धचित्त, तो अस्सल हिऱ्याप्रमाणें आपल्या कुलांत

शोभतो. नेत्र, मन, वाणी, कर्म, या चौहोंनीं लोकांस जो संतुष्ट ठेवितो ह्मणजे कोणाकडे वांकड्या दृष्टीनें पहात नाहीं, कोणाचें वाईट व्हावें असें मनांत आणीत नाहीं, कोणास वाईट बोलत नाहीं, कोणाचें वाईट करीत नाहीं, त्यावर लोक प्रसन्न होतात. जो उद्धटपणाचा वेष करीत नाहीं, पराक्रमाविषयीं दुसऱ्यांची निंदा करीत नाहीं, पुष्कळ पीडा प्राप्त झाली तरी कडू बोलत नाहीं, त्यावर सर्व लोक प्रीति करितात.

## सुस्वभाव.

कलह न लावणें, डौल न मिरविणें, नाश न करणें, अडचणींत असतांही वाईट काम न करणें, यास श्रेष्ठ लोक सुस्वभाव असें ह्मणतात. आपणास सुख झालें ह्मणजे आनंदांत निमग्न न होणें, दुसऱ्यास दुःख झालें ह्मणजे आनंदित न होणें, दिल्यावर पश्चात्ताप न करणें, यास सुस्वभाव असें ह्मणतात. अंगावर वस्त्र चांगलें असलें ह्मणजे सभेंत मान मिळतो, जवळ गाई असल्या ह्मणजे मिष्टान्न स्वाधीन होतें; वाहन जवळ असलें ह्मणजे मार्ग क्रमितां येतो, त्याप्रमाणें सुस्वभाव असला ह्मणजे सर्व प्राप्त होतें. सुस्वभाव हा मनुष्याचा मुख्य गुण होय. तो ज्यास नसेल त्यास आयुष्याचा, द्रव्याचा व बांधवांचा कांहीं उपयोग नाहीं

## धर्म.

धृतराष्ट्रा, मद्यादि सेवन करणारा, विषयासक्त, वायु वगैरे रोगांनीं वेडा झालेला, थकलेला, रागावलेला, भुकावलेला, धांदल्या, लोभी, भित्रा, कामपीडित, हे दहा धर्म जाणत नाहींत. याकरितां शहाण्यांनीं यांच्यांशीं फार प्रसंग ठेवूं नये. देवपूजा, अध्ययन, दान, तप, सत्य, क्षमा, करुणा, निर्लोभता हे आठ धर्माचे मार्ग आहेत. यांपैकीं पहिले चार ढोंगाकरितांही लोक आचरितात; परंतु पुढले चार खरोखर महात्मे जे आहेत त्यांचे ठिकाणीं राहतात. जें दुसऱ्यानें आपणास केलें असतां वाईट वाटेल तें दुसऱ्यास आपण करूं नये, हें संक्षेपेंकरून निष्काम धर्माचें लक्षण होय. याशिवाय बाकीचे धर्म सकाम होत. हे राजा, तुला सर्व गोष्टींतली मुख्य मोठी पुण्यकारक गोष्ट सांगतों ती ही कीं, कामानें, भयानें, लोभानें, फार काय पण जीव जात असला तरी धर्म सोडूं नये.

## वाक्संयम.

हे राजा, वाक्संयम करणें फारच कठीण आहे. अर्थयुक्त आणि मनोरंजक असें पुष्कळ वेळपर्यंत बोलणें अशक्य आहे. चांगलें भाषण केलें तर त्यापासून पुष्कळ कल्याण होतें, परंतु दुर्भाषणानें अनर्थ प्राप्त होतात. शस्त्रानें वृक्ष तोडिला तर पुनः फुटतो, परंतु वाग्बाणानें क्षत पडतें तें बरें होत नाहीं. बाणाचें सल शरीरांत राहिलें तर उपटून काढितां येतें, परंतु वाक्शल्य काढितां येत नाहीं. तें हृदयांत गढून वसतें. वाग्बाण मुखांतून सुटले ह्मणजे लोकांच्या मर्मस्थानीं जाऊन पडतात, त्यांनीं घायाळ केलेला मनुष्य रात्रंदिवस शोकांत असतो. याकरितां हे बाण शहाण्यानें दुसऱ्यावर सोडूं नयेत. कठोर भाषण, दुसऱ्यांचीं मर्में, हाडें, हृदय, प्राण, यांस जाळितें; याकरितां धर्मनिष्ठानें असें उग्र व दाहक भाषण नेहमीं वर्ज्य करावें. जो मर्मभेदक कठोरभाषणरूप कांट्यानें मनुष्यांस टोंचणारा त्याच्या तोंडांत नेहमीं अवदसा आहे असें समजावें. तो लोकांस पीडा देणारा होय. दुसरा आपणास अग्निदीप्त अशा तीक्ष्ण वाग्बाणांनीं प्रहार करूं लागला असतां मनांत संताप आला तरी शहाण्यानें माझें पाप घेऊन पुण्य देतो आहे असें समजून उगाच बसावें.

## विद्यार्थी.

श्रवण करण्याची इच्छा नसणें, जलदी, लोकांनीं केलेली वाखाणणी, हे तीन विद्येचे शत्रु आहेत. आळस, मद, मोह, चापल्य, गोष्टी सांगणें, स्तब्धता, अभिमान, लोभ, हे सात विद्यार्थ्यांचे दोष आहेत. सुखार्थी जो आहे त्यास विद्या कोठून होणार ? व विद्यार्थ्यास सुख कोठून होणार? सुख इच्छिणाऱ्यानें विद्या सोडावी, किंवा विद्यार्थ्यानें सुख सोडावें.

## राजधर्म.

हे राजा, एका बुद्धीनें कार्य कोणतें अकार्य कोणतें या दोहोंचा निश्चय करून मित्र, उदासीन, शत्रु, या तिघांस; साम, दान, दंड, भेद, या चार उपायांनीं स्वाधीन करून घे. पांच इंद्रियें जिंकून; संधि, लढाई, स्वारी, वेढा घालून वसणें, फितूर करणें, आपणापेक्षां अधिक बळकट असेल त्याचा आश्रय करणें, ह्या सहा गोष्टी केव्हां कराव्या हें जाणून; स्त्रिया, द्यूत, शिकार, मद्यपान, कठोर भाषण, कठोर दंड, द्र-

व्याचा असव्यय, हीं सात टाकून सुखी हो. हे सात दोष दुःख उत्पन्न करणारे आहेत, याकरितां राजानें सोडून द्यावे. मोठमोठे राजेसुद्धां नष्ट होण्याचीं कारणें बहुशः हींच असतात.

विष एकाला मारितें, शस्त्र एकाला मारितें, परंतु राजाची मसलत फुटली तर राजा व प्रधान यांसहवर्तमान राष्ट्राचा नाश होईल. अप्रबुद्ध, चेंगट, अविचारी, भित्रे, या चौघांशीं राजानें मसलत करूं नये. आपल्या राज्यांतील किल्ले वगैरे जाग्यांची व्यवस्था कशी आहे, आपला आदा व खर्च काय आहे, खजीन्याची स्थिति कशी आहे, देशांतील लोकांची कशी स्थिति आहे, अपराध्यांस कोणत्या प्रकारें दंड होतो, या गोष्टी जो राजा जाणत नाहीं, तो राज्यावर फार दिवस टिकत नाहीं. जो या गोष्टी चांगल्या जाणून धर्म आणि अर्थ या दोहोंविषयीं सावध असतो, त्याचें राज्य सुरक्षित रहातें. राज्य प्राप्त झालें ह्मणून अयोग्य आचरण करूं नये. जरेनें सौंदर्य नाहींसें होतें, त्याप्रमाणें अयोग्य आचरणानें राज्यलक्ष्मीचा नाश होतो. ज्याप्रमाणें भुंगा फुलाचें रक्षण करून मध घेतो, त्याप्रमाणें राजानें प्रजेस पीडा न देतां तिजपासून द्रव्य घ्यावें. माळी जसा वृक्ष कायम ठेवून फुलें तोडितो, त्याप्रमाणें लोकांस सुरक्षित ठेवून त्यांपासून पैसा घ्यावा, कोळसे करणाऱ्याप्रमाणें समूळ नाश करूं नये. स्त्रियांस क्लीब पति आवडत नाहीं, त्याप्रमाणें ज्या राजाच्या कृपेपासून कांहीं उपयोग नाहीं व क्रोधापासून कांहीं हानिही होत नाहीं, असा राजा लोकांस आवडत नाहीं. जो राजा अनीतीनें वागतो त्यास वंशपरंपरेनें राज्य मिळालें असलें तरी तें क्षणांत वाऱ्यानें अभ्र नाहींसें होतें त्याप्रमाणें नष्ट होईल. पूर्वीपासून सज्जन आचरीत आले अशा धर्माचें जो राजा आचरण करितो त्याचें राज्य, धनधान्यानें युक्त होऊन वृद्धि पावतें. अग्नीवर कातडें पडलें असतां तें जसें संकुचित होतें, त्याप्रमाणें धर्माचरण सोडून जो अधर्मानें वागतो, त्याचें राज्य संपुष्टांत येऊं लागतें. दुसऱ्याचें राज्य घेण्याकरितां जसा यत्न करावा लागतो त्याप्रमाणेंच आपलें राज्य संभाळण्याकरितां केला पाहिजे. राज्य धर्मानें मिळवावें आणि धर्मानें त्याचें रक्षण करावें. धर्मानें लक्ष्मी प्राप्त झाली असतां ती कधींही जात नाहीं. शत्रूप्रमाणें पहिल्यानें राजानें आपल्या मनाचा जय करावा. नंतर प्रधानास आपल्या स्वाधीन ठेवण्याचा यत्न करावा. नंतर शत्रूस जिंकण्यास प्रवृत्त व्हावें. असें केलें असतां प्रयत्न व्यर्थ जाणार नाहीं.

राजाचे सर्व मनोरथ तृप्त होण्याचें मुख्य कारण हें आहे कीं, त्यानें सर्वांस हितावह असून जें आपणास सुखकारक तें करावें.

## पापपुण्य.

पाप करणाऱ्याची दुष्कीर्ति होऊन त्यास पापाचें फळ भोगावें लागतें. पुण्य करणाऱ्याची सत्कीर्ति होऊन त्यास पुण्यफल प्राप्त होतें. मनुष्य वारंवार पाप करूं लागला ह्मणजे त्याची बुद्धि नष्ट होते. बुद्धि नष्ट झाली ह्मणजे तो सर्वकाळ पापच करूं लागतो. पुण्य करूं लागला ह्मणजे बुद्धि वृद्धिंगत होते. बुद्धि वाढली ह्मणजे तो सर्वदा पुण्यच करितो. पुण्य करणाऱ्याची सुकीर्ति होऊन तो स्वर्गास जातो. याकरितां मनुष्यानें सावध राहून पाप करूं नये. हेवा करणारा, मर्मभेदी, निष्ठुर, वैर करणारा, शठ असा जो पाप करणारा त्यास लवकरच संकट प्राप्त होतें. हेवा न करणारा, बुद्धिमान्, सर्वदा सत्कर्म करणारा असा जो असतो, त्यास मोठें संकट प्राप्त होत नाहीं. तो सर्व ठिकाणीं शोभतो.

## स्वर्गलाभ.

हे राजा, क्षमाशील प्रभु आणि दातृत्वयुक्त दरिद्री हे दोन स्वर्गावर राहतात. राजा, तपश्चर्यायुक्त संन्यासी आणि रणामध्यें मागें न हटतां मरणारा, हे सूर्यमंडलास भेदून वर जातात. सत्य, विनय, अध्ययन, विद्या, कुलीनता, सुस्वभाव, बल, धन, शौर्य, मधुर भाषण, हीं दहा स्वर्गप्राप्तीचीं साधनें आहेत. सदुपदेश ऐकणारा, नीति जाणणारा, दाता, परक्याच्या लोकांचा समाचार घेऊन भोजन करणारा, हिंसा न करणारा, दुष्कर्म न करणारा, कृतज्ञ, सत्यशील, मृदु स्वभाव असा, जो शहाणा तो स्वर्गास जातो.

## स्फुट.।।

बुद्धि, कुलीनपणा, इंद्रियनिग्रह, विद्या, पराक्रम, मितभाषण, यथाशक्ति दान, आणि कृतज्ञता, हे आठ गुण पुरुषास शोभा आणतात. राजा, समुद्र तरण्यास जसें नौका हेंच एक साधन आहे, दुसरें नाहीं, त्याप्रमाणेंच स्वर्गास जाण्यास सत्य हीच एक पायरी आहे हें तू जाणत नाहींस. अपात्रीं दान करणें आणि पात्र असेल तेथें न देणें हे दोन न्यायानें मिळविलेल्या द्रव्याचे गैर उपयोग आहेत. ज्याचें वाईट होऊं नये अशी आपली इच्छा असेल, त्यानें न विचारतांही पुण्यकारक कोणतें, पापकारक कोणतें, द्वेष्य काय, आणि अप्रिय काय, हें सांगावें.

आपत्ति प्राप्त झाली असतांही उद्विग्न होत नाहीं, सावध राहून उद्योग करितो, मनाचा मोठेपणा न सोडतां प्राप्त झालेलें दुःख सोसतो, असा जो मनुष्य तो धुरंधर होऊन शत्रूस जिंकितो. सज्जन घरीं आला असतां त्यास बसावयास द्यावें, व त्यास पाणी द्यावें, त्याचें कुशल विचारावें, आपलें वर्तमान सांगावें, नंतर यथायोग्य भोजन घालावें. स्वतः अशक्त असून व जवळ कांहीं साधनें नसून जो बळवानाशीं द्वेष करितो, ज्याचें धन चोरीस गेलें आहे, कामपीडित, चोर, यांस झोंप येत नाहीं. सत्यानें धर्माचें रक्षण होतें, आवृत्तीनें विद्या चांगली राहते, स्नानेंकरून शरीर स्वच्छ राहतें, सदाचरणानें कुल चांगलें राहतें. धान्य मोजून ठेवावें ह्मणजे कमी झालें असतां समजतें, घोड्यास फेरफटका करावा ह्मणजे तो चांगला राहतो, गाईला वारंवार जपत जावें ह्मणजे त्या चांगल्या राहतात, आणि स्त्रियांस चांगलें वस्त्र नेसावयास द्यावें ह्मणजे त्यांचा बोज राहतो. दरिद्री जे आहेत त्यांस नेहमीं भोजन फार गोड लागतें; क्षुधेमुळें त्यांस अन्नाची जी रुचि लागते ती श्रीमंतांस मिळणें कठिण. बहुतकरून श्रीमंतांस खाण्याची शक्ति नसते. भिकाऱ्यांस लांकडें देखील जिरतात. भिकाऱ्यांस पोट भरण्याचें भय, मध्यम जे असतात त्यांस मरणाचें भय, आणि थोरांस अपमानाचें मोठें भय असतें. संपत्तीचा अंमल, मद्याचा अंमल, असे अंमल पुष्कळ आहेत; परंतु संपत्तीचा अंमल असा आहे कीं, तो दारिद्र्य आल्याशिवाय जात नाहीं. सोनें चांगलें किंवा वाईट हें तावल्यानें समजतें, धार्मिकपणा आचरणानें समजतो, व्यवहारानें प्रामाणिकपणा समजतो, भयाच्या वेळेस शौर्य समजतें, दारिद्र्य आलें ह्मणजे धैर्य समजतें, संकटाच्या वेळेस मित्रपणा समजतो, आणि विपत्तीच्या वेळेस शत्रुभाव समजतो. बुद्धि, कुशलता, जितेंद्रियता, विद्या, पराक्रम, मितभाषण, यथाशक्ति दान आणि कृतज्ञता, हे आठ गुण पुरुषांस शोभवितात, परंतु राजानें लोकांचा सत्कार करणें हा गुण जो आहे तो सर्व श्रेष्ठ गुणांमध्यें अधिक शोभतो. जेथें वृद्ध नाहींत ती सभा नव्हे, जे धर्म सांगत नाहींत ते वृद्ध नाहींत, ज्यांत सत्य नाहीं तो धर्म नव्हे, व छळ करण्याकरितां जें सांगितलें तें सत्य नव्हे. दुसऱ्यांपासून शहाणपणा मात्र शिकतो तोच शहाणा, तो धर्मार्थ मिळवून आपलें सुख वाढविण्यास समर्थ होतो. रात्रीस सुख होईल असें दिवसास आचरण करावें, पर्जन्यकाळीं स्वस्थ राहण्यास सांपडेल असें आठ महिने करावें, वृद्धपणीं सुख होईल असें पूर्व वयांत करावें, परलोकीं

सुख होईल तें जन्मभर करावें. अन्न जिरलें तर तें चांगलें, सदाचरण न सोडतां वृद्धत्व पावली तर ती बायको चांगली, लढाईंत जय प्राप्त झाला तर शूराची प्रतिष्ठा, ज्यास परमेश्वरस्वरूप कळलें तो उत्तम तपस्वी होय. अधर्मानें धन मिळवून एक अडचण दूर केली तरी दुसरी उत्पन्न होते. जितेंद्रिय जे आहेत त्यांचा शास्ता गुरु, दुष्टांचा शास्ता राजा, परंतु गुप्त पाप करणारे जे आहेत त्यांचा शास्ता यम आहे. शूर, विद्वान्, आणि सेवा करण्यामध्यें निपुण, ह्या तिघांस पृथ्वी चोहोंकडे सुवर्णाच्या फुलांनीं भरलेली आहे. बुद्धीनें जीं कार्यें साधावयाचीं तीं उत्तम, शौर्यानें साधावयाचीं तीं मध्यम, कपटबलात्कारादि नीच उपचारांनीं साधावयाचीं तीं नीच होत. कोणाची निंदा करूं नये, कोणाचा अपमान करूं नये, मित्राचा द्वेष करूं नये, नीचांची सेवा करूं नये, गर्विष्ठ होऊं नये, दुराचरण करूं नये, आणि क्रोधयुक्त कठोर भाषण करूं नये. वस्त्राला जो पदार्थ लागेल त्याचा रंग त्यास येतो; त्याप्रमाणें मनुष्य साधूची संगति करूं लागला तर साधु होईल, दुष्टाची संगति करूं लागला तर दुष्ट होईल, तपस्व्याची संगति करूं लागला तर तपस्वी होईल, आणि चोराच्या संगतीनें चोर होईल. आपणास कोणी बोलला असतांही जो आगळीक करीत नाहीं, मारिलें असतांही जो स्वतः परत मारीत नाहीं, किंवा दुसऱ्याकडून मारवीत नाहीं, जो पापकर्म करणाऱ्यासही मारण्याची इच्छा करीत नाहीं, त्याचा देव देखील सत्कार करितात. बोलण्यापेक्षां न बोलणें बरें, न बोलण्यापेक्षां खरें बोलणें चांगलें, खरें असूनही प्रिय असेल तर त्यापेक्षांही चांगलें. खरें व प्रिय असूनही धर्मयुक्त जें भाषण तें सर्वांत उत्तम होय. जो मनुष्य ज्यांशीं सहवास करितो, ज्यांची सेवा करितो, ज्यांचें अनुकरण करण्यास इच्छितो तो त्यांप्रमाणें होतो. ज्या वाईट गोष्टीपासून मनुष्य निवृत्त होतो, त्यांपासून तो सुटतो; याकरितां सर्व वाईट गोष्टी सोडून दिल्या तर अणुमात्र सुद्धां दुःख होणार नाहीं. जो आपण जिंकिला जात नाहीं, व लोकांस जिंकण्याची इच्छा करीत नाहीं, जो कोणाशीं वैर बांधीत नाहीं, कोणाचा घात करीत नाहीं, कोणी निंदा केली तरी रागावत नाहीं, व स्तुति केली तरी फुगत नाहीं, वाईट झालें असतां अतिशोक करीत नाहीं, व प्रिय झालें असतां हर्षांत निमग्न होत नाहीं, सर्वांचें कल्याण इच्छितो, कोणाचें अकल्याण व्हावें असें मनांत देखिल आणीत नाहीं, सत्यभाषण करितो, स्वभावानें नम्र, जितेंद्रिय, असा जो पुरुष तो उत्तम होय. केवळ

तोंडानेंच गोडगोड गोष्टी सांगतो असें नाहीं; प्रसंग पडल्यास धनानें किंवा आंगमेहनतीनेंही उपयोगीं पडतो; देईन असें ह्मणाला तर देतो; दुसऱ्यांचे दोष जाणून मनांत ठेवितो तो मध्यम पुरुष होय. नेहमीं लोकांवर विश्वास न धरून कोणी चांगली गोष्ट सांगितली तरी ऐकत नाहीं, मित्राचा त्याग करतो, तो अधम पुरुष होय. ज्यास आपलें कल्याण करून घेण्याची इच्छा असेल त्यानें उत्तमाची सेवा करावी, प्रसंग पडल्यास मध्यमाची करावी, परंतु अधमाची कधींही करूं नये. ज्या पुरुषांच्या आचरणानें आईबापांच्या अंतःकरणास वाईट वाटत नाहीं, जे मन स्वस्थ ठेवून धर्माचरण करितात, जे सत्कीर्तीची इच्छा करितात, असत्याचा त्याग करितात, ते मोठे कुलीन होत. पशु, पराक्रमी पुरुष, द्रव्य, हीं जवळ असलीं तरी सदाचरण नसेल तर कुलीनता प्राप्त व्हावयाची नाहीं. सदाचरणी जे पुरुष त्यांपाशीं द्रव्य अल्प असलें तरी त्यांस कुलीन ह्मणतात. त्यांची मोठी कीर्ति होते. यत्नानें आपलें वर्तन चांगलें ठेवावें. कारण, द्रव्य येत जात असतें; द्रव्याच्या योगानें क्षीण झाला तरी तो क्षीण नव्हे, परंतु ज्याचें सदाचरण सुटलें तो मृतप्रायच समजावा. ज्यांचें आचरण चांगलें नसतें त्यांजवळ गाई, ह्मशी, घोडे, पुष्कळ असले व जमीन फार सुपीक असली तरी त्यांस बरकत येत नाहीं.

संतापानें रूप बिघडतें, बल नाहींसें होतें, बुद्धिभ्रंश होतो, अनेक व्याधि उत्पन्न होतात; जें मिळावयाचें नाहीं, त्यासाठीं संताप केला तरी तें मिळत नाहींच, शरीरास मात्र त्रास होतो, शत्रूंस आनंद होतो, याकरितां शोक करूं नये.

मनुष्य मरतो, पुनः उत्पन्न होतो, क्षीण होतो, वृद्धिंगत होतो, भीक मागूं लागतो, संपन्न झाला ह्मणजे त्याजवळ लोक मागूं लागतात, हा लोकांसाठीं शोक करितो, लोक यासाठीं शोक करितात; सुख, दुःख, भरभराट, दारिद्र, लाभ, हानि, मरण, जगणें, हीं सर्व पाळीपाळीनें सर्वांस प्राप्त होतात, याकरितां शहाण्यानें आनंद मानूं नये व शोकही करूं नये.

हे राजा, विद्या, तप, इंद्रियनिग्रह, लोभत्याग, यांशिवाय मनाची शांति व्हावयाची नाहीं. विद्येनें भयाचें निवारण होतें. तपानें ईश्वरप्राप्ति होते, गुरुसेवेनें ज्ञान प्राप्त होतें, योगाभ्यासानें मनाची शांति होते.

अध्ययन, युद्ध, पुण्यकर्म, तप, या गोष्टी करते वेळेस श्रम होतात; परंतु शेवटीं सुख प्राप्त होतें.

ज्यांचें चित्त स्वस्थ नाहीं ते मोठ्या मऊ बिछान्यावर निजले तरी त्यांस झोंप येत नाहीं, त्यांस स्त्रियांपासून सुख होत नाहीं, लोकांनीं स्तुति केली तरी बरें वाटत नाहीं, त्यांच्या हातून धर्माचरण होत नाहीं, त्यांस सुख प्राप्त होत नाहीं, त्यांस कोणत्याच गोष्टीचा चमत्कार वाटत नाहीं, त्यांस शांति आवडत नाहीं, त्यांस चांगली गोष्ट सांगितली असतां आवडत नाहीं, त्यांस लाभ होत नाहीं; व प्राप्त झालेल्याचें त्यांच्यानें रक्षण होत नाहीं. सारांश हे राजा, नाशाशिवाय त्यांचा दुसरा परिणाम होत नाहीं.

तंतु बारीक असतात परंतु सारखे असून एके ठिकाणीं पुष्कळ झाले असतां बळकट होऊन समुदायामुळें पुष्कळ आयास सोसतात, याचप्रमाणें सज्जनांची स्थिति आहे. गवताची एकेक काडी वेगळी ठेविली तर धुमसते, परंतु एकदम पुष्कळ पेटविल्या असतां जाळ होतो; त्याप्रमाणें जातींतले सर्व लोक एका मतानें वागतील तर मोठाले पराक्रम करतील. वृक्ष मोठा बळकट असून एकटाच उभा असेल तर खांद्यांसकट वारा त्याचा क्षणांत नाश करील, परंतु एके ठिकाणीं पुष्कळ वृक्ष असतात ते एकमेकांच्या आश्रयानें मोठालीं तुफानेंही सोसतात. त्याप्रमाणें जसा वारा एकट्या वृक्षाचा सहज नाश करितो, तसा, जो मनुष्य एकटा तो सर्व गुणांनीं युक्त असला तरी त्याचा नाश करितां येईल असें शत्रु मानितात. सरोवरांत कमळें वाढतात, त्याप्रमाणें एकमेकांच्या आश्रयानें कुलांतील सर्व लोकांची भरभराट होते.

जो आपणाशीं जसा वागेल त्याशीं त्याप्रमाणें वागावें हा धर्म होय. कपटी मनुष्यांशीं कपटानें वागावें आणि साधूंशीं भलेपणानें वागावें.

हे राजा, अतिमान, अतिवाद, मोठा अपराध, क्रोध, आपलपोटेपणा, मित्रद्रोह, हे सहा तीक्ष्ण बाण आहेत. हे मनुष्यांचें आयुष्य हरण करितात.

हे राजा, गोड गोड बोलणारे पुरुष पुष्कळ भेटतात, परंतु ऐकणाऱ्यांस आवडलें नाहीं तरी, त्यांचें ज्यांत हित असेल तेंच बोलणारा मनुष्य दुर्लभ आहे. धन्यास आवडेल किंवा नाहीं हें मनांत न आणितां जो धर्मयुक्त असेल तेंच सांगतो, तो मात्र मनापासून धन्याचें साहाय्य करणारा होय.

कुलाकरितां एका मनुष्याचा त्याग करावा, गांवाकरितां कुलाचा

त्याग करावा, देशाकरितां गांवाचा त्याग करावा, व आत्मसंरक्षणाकरितां पृथ्वीचा सुद्धां त्याग करावा.

पूर्वीपासून द्यूत हें मनुष्यांमध्यें वैर उत्पन्न करणारें आहे, याकरितां शहाण्यानें विनोदाकरितां देखील द्यूत खेळूं नये.

हे राजा, आपणावर ज्याची भक्ति आहे, जो आपल्या हिताविषयीं तत्पर, अशा चाकरावर जो कधींही रागावत नाहीं; त्या धन्यावर चाकर विश्वास ठेवितात आणि आपत्कालीं त्यास टाकीत नाहींत. जो धन्याच्या मनांतला अभिप्राय जाणून आळस टाकून सर्व कामें करितो, हिताच्या गोष्टी सांगतो, अनुकूल, कुलीन, आपलें सामर्थ्य जाणून काम करणारा, अशा चाकरावर आपल्याप्रमाणें प्रीति करावी. उद्योगी, धीट, चेंगट नाहीं, कृपाळू, शहाणा, विश्वासू, निरोगी, चांगलें भाषण करणारा, अशा प्रकारचा दूत असावा.

दुष्टांनीं केलेल्या मसलतींत पडून ती आपण गुप्त राखूं नये. तुमच्यावर माझा विश्वास आहे, असेंही सांगूं नये. वाईट मसलत चालली असली तर मला कांहीं काम आहे, असें सांगून तेथून उठून जावें.

जो मितभोजी आहे त्यास आरोग्य, आयुष्य, बल, सुख, हीं प्राप्त होतात. त्यास संतति चांगली होते, आणि त्यास लोक खादाड असें ह्मणत नाहीं.

आळशी, खादाड, लोक ज्याचा द्वेष करितात, कपटी, देशकाल न जाणणारा, वाईट वेष धारण करणारा, यांस घरांत ठेवूं नये. कृपण, निंदक, मूर्ख, रानांत राहणारा, लुच्चा, हलक्यांशीं संगति करणारा, निर्दय, वैर करणारा, कृतघ्न, यांकडे मोठी अडचण प्राप्त झाली असतांही जाऊं नये.

दुष्कर्म करणारा, मस्त, खोटसाळ, प्रीति न करणारा, स्नेह सोडणारा, गर्विष्ठ, या सहा हलक्या मनुष्यांजवळ राहूं नये.

मित्राच्या योगानें अर्थप्राप्ति होते, अर्थप्राप्तीच्या योगानें मित्र मिळतात, यासाठीं हे दोन्ही अन्योन्याश्रित आहेत, त्यामुळें एक नसला तर दुसरा प्राप्त होत नाहीं.

बुद्धि, पराक्रम, तेज, सत्व, उद्योग, श्रम, ह्या गोष्टी ज्यापाशीं असतील, त्यास निर्वाह कसा होईल ही काळजी कोठून प्राप्त होईल?

जो धर्म, अर्थ, काम, यांचें योग्यकाळीं सेवन करितो, त्यास हें तीन इहपरलोकीं प्राप्त होतात.

स्त्रिया, राजे, सर्प, अध्ययन, धनी, शत्रु, संपत्ति, आयुष्य, यांच्या ठिकाणीं विश्वास ठेवून कोणता शहाणा मनुष्य स्वस्थ बसेल ?

साप, अग्नि, सिंह, भाऊबंद, यांची मनुष्यानें अवज्ञा करूं नये. हे मोठे कठिण आहेत.

लांकडामध्यें अग्नि गुप्त असतो, परंतु लोकांनीं घर्षण केलें नाहीं तोंपर्यंत तो त्यांस जाळीत नाहीं; परंतु एकदा लोकांनीं पेटविलें ह्मणजे तें लांकूड सर्व अरण्य क्षणांत जाळून टाकितें; त्याप्रमाणें कुलीन जे आहेत ते दुसऱ्यांनीं पराभव केला नाहीं तोंपर्यंत अग्नीसारखे गुप्ततेजस्वी असतात.

चांगली सुशील स्त्री ही घराची लक्ष्मी व शोभा आहे, यासाठीं तिचा मान ठेवून उत्तम प्रकारें रक्षण करावें.

गोड बोलून दान करणें, मर्यादा पालन करणें, मधुर भाषण, यांच्या योगानें सर्व प्राणी मनुष्यांच्या स्वाधीन होतात. कलह न करणारा, दक्ष, कृतज्ञ, बुद्धिमान्, सरळ, असा जो आहे त्यापाशीं पैसा नसला तरी त्याकडे पुष्कळ लोक येतात.

हे राजा, जे प्रतिकूळ झाले असतां आपणास निर्वाहाची पंचाईत पडेल त्यांस देवाप्रमाणें भजत जावें. हे राजा, जे आवश्यक कामें असतील तेवढीं करितात, उगाच भलत्याच उद्योगांत पडत नाहींत, ते शहाणे होत असें मला वाटतें. विनाकारण अनेक खटपटी करणारे हे फाजील होत.

लुच्चा, हलकट, वेश्या वगैरे ज्याची स्तुति करितात तो जिवंत असून मेलेली होय.

हे राजा, जो समयास योग्य नाहीं असें बोलतो, तो बृहस्पति असला तरी त्यास मूर्ख समजून लोक त्याचा अपमान करितात.

ज्या हानीपासून लाभ होईल ती हानि नव्हे, व ज्या लाभापासून बहुनाश होतो तो लाभ हानिरूपच समजावा.

धृतराष्ट्रा, कित्येक गुणसंपन्न असतात आणि कित्येक धनसंपन्न असतात. धनसंपन्न असून गुणहीन असतील त्यांस सोडून दे. जो दीन, पीडित, अशा आपल्या आश्रितांवर दया करितो त्याचे पुत्र, पशु यांची वृद्धि होते.

हे राजा, जे आपणांस सुख इच्छितात, त्यांनीं भाऊबंदांचें कल्याण करावें. कारण असें करणाऱ्याचें कल्याण होतें. भाऊबंद गुणहीन असले तरी त्यांचा सत्कार करावा. कल्याण इच्छिणाऱ्यानें भाऊबंदांब-

रोवर कधींही भांडण करूं नये. त्यांसहवर्तमान सुखोपभोग करावा. बरोबर जेवणखाण करणें, गोष्टी सांगणें, या गोष्टी भाऊबंदांबरोबर कराव्या. भांडण कधींही करूं नये. भाऊबंदच तारितात व तेच बुडवितात. सद्वृत्त असले तर तारितात, व दुराचारी असले तर मारितात. ज्या श्रीमानाचा आप्त दारिद्र्यपीडित असतो, त्यास त्याचें पाप लागतें.

जीव क्षणभंगुर आहे यासाठीं पुढें पश्चात्ताप होईल असें कृत्य पहिल्यानें करूं नये. थोरांच्या भाषणाचा विचार करून, परिणाम मनांत आणून, जो कार्याविषयीं उद्युक्त होतो, तो चिरकाल कीर्तिमान् होतो. मोठमोठ्या पंडितांनीं पढविलें तरी जें तत्त्व समजावयाचें तें समजलें नाहीं, किंवा समजून त्याप्रमाणें वागलें नाहीं, तर तें सर्व व्यर्थ आहे. ज्यापासून पाप लागणार आहे असें कर्म जो आरंभीत नाहीं; त्याची भरभराट होते; व जो एकवार पाप घडलें तरी विचार न करून पुनः तेंच करीत जातो तो मूर्ख घोरनरकांत पडतो.

शास्त्र शिकल्याशिवाय किंवा थोरांचा समागम केल्याशिवाय बृहस्पतीसारखे बुद्धिमान् असले तरी त्यांस धर्म आणि अर्थ हे कळावयाचे नाहींत.

नम्रतेनें अपकीर्ति नाहींशी होते, पराक्रमानें संकटें नाहींतशीं होतात, क्षमेनें क्रोधाचा नाश होतो, आणि सदाचरणानें दुर्गुण नाहींतसे होतात.

धृतराष्ट्रा, ज्यांस हजार मिळतात ते वांचतात, व ज्यांस शंभर मिळतात तेही वांचतात, याकरितां लोभ सोडून दे. निर्वाह होणार नाहीं असें कधीं व्हावयाचें नाहीं. पृथ्वींत धान्य, द्रव्य, पशु, स्त्रिया, इत्यादि जितकें आहे तें सर्व एकट्यास प्राप्त झालें तरी तृप्ति व्हावयाची नाहीं; असा विचार जो मनांत आणितो, तो मोह पावत नाहीं.

धर्म नित्य, सुखदुःखें अनित्य, शरीर अनित्य, जीव नित्य, याकरितां हे राजा, अनित्य सोडून नित्याविषयीं यत्न कर, आणि संतोष धारण कर. कारण संतोषापासून लाभ होतो. पहा, मोठे बलवान्, महापराक्रमी धनधान्यसंपूर्ण, पृथ्वीचें राज्य करणारे, असे राजे राज्य व सर्व उपभोग्य पदार्थ सोडून यमाच्या स्वाधीन झाले. हे राजा, फार दुःखें सोसून वाढविलेला पुत्र मेला ह्मणजे त्यास घरांतून बाहेर काढितात, आणि मोठ्यानें रडत रडत लांकडाप्रमाणें चितेंत जाळून टाकितात. मेलेल्याचें धन दुसऱ्यास प्राप्त होतें, अग्नि किंवा पक्षी शरीर

खातात, पुण्य आणि पाप हीं दोन मात्र त्याबरोबर परलोकीं जातात. फलपुष्पहीन अशा वृक्षास सोडून पक्षी जातात त्याप्रमाणें भाऊबंद, मित्र, मुलगे, मेलेल्यास टाकून जातात, त्यानें केलेलें कर्म मात्र त्याबरोबर जातें. याकरितां मनुष्यानें प्रयत्नानें हळूहळू धर्मसंचय करावा.

बुद्धीनें मोठा, धर्मानें मोठा, आपला आप्त, विद्यावृद्ध किंवा वयोवृद्ध यांचा सन्मान राखून कोणतें करावें व कोणतें करूं नये असें जो त्यांस विचारितो त्यास कधींही मोह प्राप्त व्हावयाचा नाहीं. धैर्यानें कामादिकांपासून रक्षण करावें. नेत्रांनीं पाहून पाय टाकावा किंवा हात लावावा. मनोनिग्रह करून परस्त्री व अपशब्द यांपासून डोळे व कान यांस निवृत्त करावें. सत्कर्म करून मन व वाणी यांचें रक्षण करावें.

हे राजा, पुढें सांगतों हें सर्व भाषण ऐकून जाणण्यास जर समर्थ होशील, तर इहलोकीं मोठ्या कीर्तीस पावशील, व परलोकींही तुला कशाचें भय प्राप्त होणार नाहीं. तें वचन हें; आत्मा ही नदी आहे, पुण्य हें तिजमध्यें तीर्थोदक होय, दयारूप तिच्या लाटा होत, या अशा नदींत जो स्नान करितो, तो पुण्यकर्मा होय. तो पवित्र होतो. निर्लोभ ज्याचा आत्मा आहे तो सर्वदा पवित्रच आहे. हे राजा, काम, क्रोध, हे तिच्यामधले मगर, पांच इंद्रियें हेंच जल, अशा या नदीला धैर्यरूप नाव घेऊन तरून जा; ह्मणजे जन्ममरणाचीं संकटें नाहींतशीं होतील.

विषयांपासून इंद्रियें अगदीं निवृत्त करणें मरणापेक्षांही विकट आहे. तसेंच तीं अगदीं विषयासक्त झालीं असतां देवांचासुद्धां नाश करतील. सर्व भूतांच्या ठिकाणीं दया करणें, हेवा न करणें, क्षमा, धैर्य, मित्रांचा अपमान न करणें, हीं आयुष्य वाढविणारीं आहेत असें पंडित ह्मणतात.

लोकांनीं अन्यायानें आपल्या द्र. ाचें हरण केलें तरी मन स्थिर ठेवून तें न्यायानें पुनः प्राप्त करून .णें हें सज्जनांचें व्रत होय.

पुढें अडचण आली असतां ती निवारण्याचा उपाय जाणणारा, आरंभीं दृढ निश्चय करून प्रवृत्त होणारा, अशा मनुष्यास दारिद्र्य येत नाहीं.

ज्या सुखाचा उपभोग केला असतां धर्म आणि अर्थ यांचा नाश होणार नाहीं, त्याचा यथेच्छ उपभोग करावा. मूर्खाप्रमाणें सर्वच सुख सोडून द्यावयाचें असें करूं नये.

भलत्याच वेळेस गरीबपणा धरून उगाच बसणाऱ्या मनुष्याची कुत्सित मनुष्य हेलना करितात.

जो अधर्मेंकरून मिळविलेल्या द्रव्यानें पुण्यकर्म करितो त्याचें फळ त्यास कुमार्गानें द्रव्य मिळविलेलें असल्यामुळें मेल्यावर प्राप्त होत नाहीं.

स्त्री, धूर्त, आळशी, भित्रा, क्रूर, अभिमानी, चोर, कृतघ्न, नास्तिक, यांवर विश्वास ठेवूं नये.

पूज्यांचें वंदन करणारा, थोरांची संगति करणारा, अशा मनुष्याची कीर्ति, आयुष्य, यश, बल, हीं चार वृद्धिंगत होतात.

अतिक्लेश, व अधर्म करून किंवा शत्रूंस शरण जाऊन प्राप्त होणारा लाभ मनांत देखील आणूं नये.

झोंप घेऊन निद्रेला जिंकण्याचा यत्न करूं नये, उपभोगानें कामास जिंकण्याचा यत्न करूं नये, सर्पणानें अग्नीची शांति करण्याचा यत्न करूं नये, आणि पान करून सुरेचा जय करूं नये, तात्पर्य, त्याग करूनच यांचा जय केला पाहिजे.

जो दानानें मित्रांस वश करितो, युद्धांत शत्रूंस जिंकितो, अन्नपानेंकरून स्त्रियांस तृप्त ठेवितो, त्याचें जीवित सफल होय.

---

## हितोपदेशसार.

पशुपक्ष्यांच्या गोष्टी सांगून तद्द्वारा मनोरंजन करून अज्ञजनांस नीत्युपदेश करण्याची चाल प्राचीन काळीं सुधारलेल्या बहुतेक देशांत थोडीबहुत होती. ही चाल पडण्याच्या कारणाविषयीं शोधक लोक अनेक अनुमानें करितात. कोणी ह्मणतात कीं, मुलें, अशिक्षित मनुष्यें, इत्यादिकांस अशा प्रकारच्या गोष्टी ऐकण्याची विशेष आवड असते, यामुळें त्यांस ऐकण्यास अनुकूल करण्याकरितां त्यांची आवड ज्या प्रकारच्या गोष्टींविषयीं असते तशा प्रकारच्या गोष्टी सांगूनच त्यांस शिक्षण देण्याची ही युक्ति विद्वानांनीं योजिली असावी.

कित्येकांचें असें अनुमान आहे कीं, राजा, प्रधान, अथवा दुसरा कोणताही मोठा सत्ताधीश, दुर्गुणी अथवा व्यसनी असून लोकांवर जुलूम करूं लागला, ह्मणजे प्रजा त्रस्त होऊन जाते. राजा स्वतःच वाईट असला तर त्याचे दुर्गुण त्यास कळविण्याची मोठी पंचाईत असते. कारण त्यामुळें तसें करणाऱ्याचा सर्वस्वीं नाश व्हावयाचा. अधिकारी जुलुमी असले तरी त्यांचा राजापाशीं सतत प्रवेश असून

ते त्याच्या प्रीतींतले असतात; याकरितां त्यांविषयीं राजापर्यंत आगळीक पोंचविण्याची सवड नसते; व पोंचविली तरी त्यापासून मोठें भय असतें. बरें, असें फार दिवस चाललें ह्मणजे प्रजा अतिपीडित होऊन बंड करितात. अथवा परचक्र येऊन राज्याचा नाश होतो. यासाठीं वेळेस कानउघडणी होऊन सत्ताधीशांनीं नीट वागावें यासाठीं जे विद्वान् लोक हितचिंतक असत, ते असल्या प्रकारच्या कल्पित गोष्टी लिहून त्यांत त्यांचे दोष स्पष्ट रीतीनें लोकांच्या मनांत भरतील असें करीत; व असें केल्यानें बहुत वेळ त्यांचा विवक्षित उद्देश सिद्धीस जाई. या प्रकारचे अशा गोष्टी लिहिण्यांत अनेक उद्देश असतील.

अशा कल्पित गोष्टी मनुष्यांच्या न लिहितां पशुपक्ष्यांच्या लिहिण्यांत एक मोठा फ़ायदा आहे तो हा कीं, गर्विष्ठ, मदांध, दुष्ट, दुर्गुणी, लोक असतात त्यांस आपणांपेक्षां कोणी अधिक शहाणे आहेत असें वाटत नाहीं. त्यांस दुसऱ्याची स्तुति ऐकण्यापासून राग येतो. तेव्हां अशा कल्पित गोष्टी मनुष्यांच्या असल्या तर ते मनापासून ऐकणार नाहींत व तसें झाल्यानें आपला इष्ट हेतु सिद्धीस जाणार नाहीं. पशुपक्षी हे आपणांपेक्षां नीच; हें सर्वांस माहीत आहे; यामुळें त्यांविषयीं कसेंही लिहिलें तरी ते लक्ष लावून ऐकतील; व एकवार लक्षपूर्वक ऐकल्यावर तात्पर्य मनांत आलें ह्मणजे त्यांच्या मनास संस्कार झाल्याशिवाय राहणार नाहीं, असें मनांत आणून प्राचीन काळच्या विद्वानांनीं अशी योजना केली असावी.

सांप्रत काळीं वर सांगितलेल्या उद्देशानें कोणी पशुपक्ष्यांच्या गोष्टी लिहीत नाहींत; तरी कल्पित गोष्टी, नाटकें, कल्पित देशांचीं वर्णनें, वगैरे उपरोधी ग्रंथ लिहून अन्योक्तीनें राज्याधिकाऱ्यांचे वगैरे दोष बाहेर काढण्याचा प्रकार यूरोपखंडांतील सर्व सुधारलेल्या देशांत सुरू आहे. प्राचीन काळीं आपल्या या भरतखंडांत विष्णुशर्मा नांवाच्या पंडितानें संस्कृत भाषेंत हितोपदेश लिहिला, त्या ग्रंथाचें फारसी भाषेंत रूपांतर होऊन तद्वारा या गोष्टी यूरोपखंडांत गेल्या असाव्या, असें आलीकडील प्राचीन इतिहासशोधक विद्वानांचें मत आहे. ग्रीस देशांतील प्रसिद्ध विद्वान् इसाप यानेंही आपल्या प्रसिद्ध गोष्टी इकडलाच नमुना घेऊन लिहिल्या असाव्या असें अनुमान करितात. कसेंही असो, अशा प्रकारच्या गोष्टींपासून जगास शेंकडों वर्षें मनोरंजन व शिक्षण प्राप्त होऊन मोठा उपयोग झाला हें सर्वांस

माहीत आहेच. हें मनांत आणून हितोपदेश ग्रंथाचें भाषांतर संस्कृत न जाणणाऱ्या लोकांच्या उपयोगाकरितां केलें आहे.

इसापनीतीसारखे परकीय ग्रंथ इंग्लिश भाषेच्या द्वारानें आपल्या भाषेंत येऊन लोकप्रीतीस पात्र झाले असून हितोपदेशासारख्या आपल्या पूर्वजांच्या उत्तम ग्रंथाचें भाषांतर झालें नाहीं हें मनांत आणून हा यत्न केला आहे. सरळ भाषा; मध्यें स्मृति, पुराणें, वगैरे प्राचीन ग्रंथांतील अनेक वचनें, यामुळें हितोपदेश फारच मनोरंजक झाला आहे. त्यासारखी आल्हादजनकता सर्व ग्रंथाच्या गद्यात्मक भाषांतरांत येणें अशक्य आहे. तथापि अशा उत्तम ग्रंथाच्या भाषांतरापासून अल्पस्वल्प तरी उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं अशी आशा आहे. भाषांतर सर्व ठिकाणीं शब्दशः केलें नाहीं. कोठें तात्पर्य मात्र घेतलें आहे. कोठें कोठें मूळांतीलही कांहीं भाग गाळिला आहे.

## प्रस्तावना.

शहाण्यानें आपणास कधीं जरा येणार नाहीं, कधीं मरण येणार नाहीं, असें समजून विद्या आणि द्रव्य यांचें संपादन करावें. शेंडी धरून मृत्यू ओढीतच आहे असें समजून धर्माचरण करावें. सर्व धनांमध्यें विद्याधनच श्रेष्ठ आहे. कारण तें चोरितां येत नाहीं, त्याचें मोल नाहीं, व त्याचा कधींही नाश होत नाहीं.

नदी लहान असते तरी तिच्या योगानें मनुष्य दुर्गम समुद्रांत प्रवेश करितो, त्याप्रमाणें मनुष्यापाशीं विद्या असली तर तो हलक्या कुळांतला असला तरी तिच्या योगानें त्याचा राजाच्या दरबारांत प्रवेश होतो, आणि त्यास संपत्ति प्राप्त होते. विद्या विनय देते, विनयापासून योग्यता प्राप्त होते, योग्यतेमुळें धन प्राप्त होतें, धन प्राप्त झाल्यानें धर्माचरण घडतें, आणि धर्माचरणापासून सुख प्राप्त होतें. शस्त्रविद्या आणि शास्त्रविद्या या दोन लाभदायक आहेत. परंतु पहिलीचा उपयोग वृद्धपणामध्यें होत नाहीं व दुसरी सर्वकाल भूषणप्रद होते. नव्या वस्तूवर संस्कार केला असतां तो जात नाहीं यासाठीं गोष्टींच्या मिषानें या पुस्तकांत नीति सांगितली आहे. मित्रलाभ, सुहृद्भेद, विग्रह आणि संधि हीं चार प्रकरणें पंचतंत्रादि ग्रंथांतील गोष्टी घेऊन लिहिलीं आहेत.

## उपोद्घात.

भागीरथीच्या कांठीं पाटलिपुत्र (पाटणा) नांवाचें शहर होतें.

तेथें सर्व राजगुणांनीं युक्त असा सुदर्शन नांवाचा राजा होता. भाकार एके वेळीं कोणीं ह्मटलेले दोन श्लोक ऐकिले. गसि

अनेक संशयां छेदी परोक्षार्थासि दावि जें ॥
सर्वांचें नेत्र जें शास्त्र ज्या नाहीं अंध जो खरा ॥ १ ॥
तारुण्य धन संपत्ति प्रभुत्व अविचारही ॥
अनर्थहेतु प्रत्येक समुदायीं गती कशी ? ॥ २ ॥

हें ऐकून आपले पुत्र अविद्वान् असून नेहमीं दुर्मार्गानें चालतात हें मनांत आल्यानें दुःखित होऊन राजा ह्मणालाः—

जो विद्वान् नाहीं, धार्मिक नाहीं, असा पुत्र होऊन काय उपयोग? डोळा काणा असला तर त्यापासून पीडा मात्र होते. पुत्र न झालेला बरा अथवा होऊन मेलेला बरा, परंतु जगून मूर्ख असणें फारच वाईट. कारण पहिल्या दोन प्रकारांपासून एकवार दुःख होतें, परंतु यापासून क्षणोक्षणीं दुःख आहे.

तसेंच—

गर्भस्राव झालेला बरा, स्त्रीगमन न करणें बरें, जन्मतांच मेलेला बरा, कन्याच झालेली बरी, बायको वंध्या असलेली बरी, किंवा सल राहिलेलें बरें, परंतु सौंदर्य व द्रव्य यांनीं युक्त असला तरी मूर्ख पुत्र असूं नये. या चक्रासारख्या भ्रमण करणाऱ्या संसारामध्यें सर्व प्राणी मरतात, पुन्हा उत्पन्न होतात, परंतु जो उत्पन्न झाल्यामुळें कुलाची कीर्ति होते तोच उत्पन्न झाला असें ह्मणावें.

आणखी दुसरें.

गुणीजन मोजण्याच्या वेळेस ज्याच्या नांवानें बोट लवकर पडत नाहीं, अशा पुत्राच्या योगानें जर माता पुत्रवती होते, तर मग वंध्या ती कशी असते ?

आणखी—

दान, तप, शौर्य, विद्या, द्रव्यलाभ, यांतून एकाविषयींही ज्याची कीर्ति प्रसिद्ध नाहीं तो मातेचा केवळ विष्ठामलच होय.

दुसरें—

शेंकडों मूर्ख मुलांपेक्षां एक गुणी मुलगा चांगला. एक चंद्र अंधःकाराचा नाश करितो, परंतु तारे हजारों असले तरी कांहीं होत नाहीं. ज्यानें कोठें तरी पुण्यतीर्थीं मोठें कठिण तप केलें असेल त्याचा मुलगा आज्ञापालक, श्रीमान्, धार्मिक, बुद्धिमान् असा होतो.

माहीत.ळं आहे कीं—

स्कुल्-व्यप्राप्ति, नेहमीं आरोग्य, आवडती व मधुरभाषिणी बायको, ाज्ञापालक पुत्र, जीपासून धनप्राप्ति होईल अशी विद्या, हीं इहलो कचीं सुखें आहेत. जो आपल्या कुलाचा उद्धार करून बापाचा लौ किक करील असा एकच मुलगा असणें चांगलें. कोंड्यानें भरलेल्या पायलीचा जसा मनुष्यास कांहीं उपयोग नाहीं, त्याप्रमाणें केवळ पु ष्कळ मुलगे असल्यानें मनुष्य धन्य होत नाहीं.

यासाठीं आपले पुत्र गुणवान् होतील असा यत्न करावा. कारण आहार, निद्रा, भय, स्त्रीसंग, हीं सर्व मनुष्य आणि पशु यांमध्यें सा रखींच आहेत. ज्ञान हें मात्र मनुष्यांस अधिक आहे. तें ज्यांस नाहीं, ते पशूंसारखे होत.

कारण—

धर्म, अर्थ, काम, मोक्ष, या चार पुरुषार्थांपैकीं ज्यास एकही नाहीं, त्याचें जन्म शेळीच्या गळ्यांतील स्तनाप्रमाणें व्यर्थ होय. कोणी असें ह्मणतात कीं,

मनुष्याचें आयुष्य, कर्म, धन, विद्या, मरण, हीं पांच गर्भांत अ सतांच नियमित होतात.

आणि—

शिव नग्न राहतो, विष्णु सापावर निजतो, तस्मात् जें नशिबीं लि हिलेलें असतें तें मोठ्यांस सुद्धां प्राप्त होतें.

दुसरें—

'जें नशिबीं नाहीं, तें होणार नाहीं; नशिबीं लिहिलेलें असलें, तर चुकत नाहीं'. हें चितारूप विषाचा नाश करणारें औषध पिऊन कां स्वस्थ बसूं नये? हें ज्यांस उद्योग होत नाहीं अशा आळशांचें वचन आहे. कारण ज्याप्रमाणें एका चाकानें रथ चालत नाहीं, त्याप्रमाणें य त्नावांचून दैव सिद्धीस जात नाहीं.

तसेंच—

पूर्वजन्मीं केलेलें तें दैव असें आहे, तर पुरुषांनीं आळस टाकून यत्न करावा.

दुसरें—

उद्योगी मनुष्य पुरुषांमध्यें श्रेष्ठ होय. त्यास लक्ष्मी प्राप्त होते. दैव मुख्य हें मूर्ख लोकांचें ह्मणणें आहे. दैवास एकीकडे झुगारून आ पल्या शक्तीप्रमाणें उद्योग करावा. यत्न करून कार्यसिद्धि झाली नाहीं

तर काय दोष आहे? कुंभार मातीच्या गोळयास पाहिजे तो आकार देतो. त्याप्रमाणेंच मनुष्य जसें कर्म करील, त्याप्रमाणें त्यास फलप्राप्ति होईल.

आणखी असें आहे कीं—

एकाएकीं द्रव्याची रास पुढें आली तरी दैव स्वतः ती घेत नाहीं. तेथें मनुष्याचा यत्न पाहिजे. मनांत अनेक चांगल्या गोष्टी आणिल्या तरी त्या उद्योगाशिवाय तडीस जाणार नाहींत. निजलेल्या सिंहाच्या तोंडांत हरिण शिरत नाहींत.

ह्मटलें आहे—

ज्यांनीं आपल्या मुलाकडून विद्या करविली नाहीं, ते आईबाप मुलाचे शत्रु होत. हंसांमध्यें बगळा शोभत नाहीं, त्याप्रमाणें तो सभेंत शोभत नाहीं. पळसाचें फूल सुंदर असतें तरी सुवास नसल्यामुळें तें कोणास आवडत नाहीं; त्याप्रमाणें सौंदर्य, तारुण्य, यांनीं युक्त असे पुत्र मोठ्या कुळांत उत्पन्न झालेले असले तरी अविद्वान् असल्यास ते शोभत नाहींत.

दुसरें असें आहे कीं—

ज्याप्रमाणें जारापासून झालेला गर्भ स्त्रीस भूषणप्रद होत नाहीं, त्याप्रमाणें पुस्तकें वाचल्याशिवाय अथवा गुरूजवळ शिकल्याशिवाय जें ज्ञान असतें तें चौघांत शोभत नाहीं.

याप्रमाणें विचार करून पंडितांची सभा भरवून राजा त्यांस ह्मणाला, सर्व पंडित हो, मी बोलतों याकडे लक्ष असावें. माझे मुलगे नेहमीं दुर्मार्गानें चालणारे आहेत. त्यांस विद्या नाहीं, यासाठीं नीतिशास्त्र पढवून त्यांस पुनर्जन्म देण्यास समर्थ असा कोणी विद्वान् आहे काय?

कारण—

सोन्यावर कांचेचा खडा बसविला तरी त्यास पाचेची शोभा येते; त्याप्रमाणें सज्जनांच्या सान्निध्यानें मूर्ख हुशार होतो.

ह्मटलें आहे—

नीचांच्या संगतीनें बुद्धि भ्रष्ट होते, सारख्यांच्या संगतीनें तशीच राहते, आणि श्रेष्ठांच्या संगतीनें श्रेष्ठ होते.

इतक्यांत बृहस्पतीप्रमाणें सकलनीतिशास्त्रांचें तत्त्व जाणणारा विष्णुशर्मा नांवाचा पंडित बोलला—

महाराज, हे राजपुत्र मोठ्या कुळांत उत्पन्न झालेले आहत, यासाठीं मला यांस नीतिशास्त्र शिकवितां येईल.

कारण—

अयोग्य वस्तूवर कोणतीही क्रिया केली तरी ती सफल होत नाहीं. शेंकडों युक्ति योजिल्या तरी राघूप्रमाणें बगळयास पढवितां येणार नाहीं. या कुलामध्यें निर्गुण अपत्य उत्पन्न व्हावयाचें नाहीं, रत्नांच्या खाणीमध्यें कांच कशी सांपडेल?

याकरितां मी सहा महिन्यांत आपल्या पुत्रांस नीतिशास्त्रामध्यें प्रवीण करीन. हें ऐकून राजा नम्रतेनें बोलला:—

पुष्पाच्या संगतीनें किडा देखील थोरांच्या मस्तकीं वसतो. मोठ्यांनीं स्थापना केली ह्मणजे दगडाचा देव होतो.

ज्याप्रमाणें उदयगिरीवरील वस्तु सूर्याच्या सान्निध्यानें प्रकाशित दिसतात, त्याप्रमाणें सत्समागमानें मूर्खही ज्ञानालंकृत होतो.

यासाठीं आमच्या पुत्रांस नीतीचा उपदेश करणें आपल्या हातीं आहे. असें ह्मणून राजानें विष्णुशर्म्याचा मोठा सत्कार करून मुलांस त्याच्या स्वाधीन केलें.

नंतर एके समयीं राजपुत्र गच्चीवर सुखानें वसले असतां पंडित विष्णुशर्मा गोष्टींच्या प्रसंगानें ह्मणाला—

काव्य, शास्त्र, यांच्या विनोदानें बुद्धिमानांचा काल जातो, आणि व्यसनांत, झोंपेंत अथवा भांडणांत मूर्खांचा वेळ जातो. यासाठीं तुमच्या कर्मणुकीकरितां कावळे, कांसव, इत्यादिकांची चमत्कारिक कथा सांगतों.

राजपुत्र ह्मणतात—महाराज, सांगावी.

विष्णुशर्मा ह्मणतो ऐका, पहिल्यानें तुह्मांस मित्रलाभ सांगतों. त्याचा हा प्रथम श्लोक आहे.

## मित्रलाभ.

असाधन दरिद्रीही बुद्धिमान् सुहृदुत्तम ॥
साधिती शीघ्र कार्यातें काककूर्ममृगाखुसे[1] ॥ १ ॥

राजपुत्र—महाराज, ही काय गोष्ट आहे?

विष्णुशर्मा—गोदावरी नदीच्या तीरीं एक मोठा शेंवरीचा वृक्ष होता.

---

१ आखु म्हणजे उंदीर.

तेथें अनेक पक्षी चोहोंकडून येऊन राहत असत. एके समयीं पहांटेच्या प्रहरीं कमलिनीनाथ चंद्र अस्ताचलशिखराजवळ गेला असतां एक लघुपतन नांवाचा कावळा जागा झाला तों केवळ दुसरा यमच काय असा एक पारधी त्याच्या दृष्टीस पडला. त्यास पाहून कावळा मनांत ह्मणाला, आज सकाळच्याच प्रहरीं अपशकून झाला, पुढें काय संकट येणार हें कळत नाहीं. असें ह्मणून तो त्या व्याधाच्या मागून चालला. कारण, मूर्खास हजारों शोकाचीं कारणें व शेंकडों भयाचीं कारणें रोजरोज प्राप्त होतात, परंतु शहाण्यास कांहीं होत नाहीं.

दुसरें असें कीं, संसारी मनुष्यांनीं हें अवश्य करावें; मरण, व्याधि, शोक, यांपैकीं कोणतें आज प्राप्त होईल कोण जाणे, असें मोठ्या भीतीनें रोज मनांत आणावें.

नंतर त्या पारध्यानें एके ठिकाणीं थोडे तांदूळ फेंकून जाळें पसरून ठेविलें, आणि आपण एकीकडे जाऊन गुप्तपणें बसला. याच वेळेस चित्रग्रीवनामक पारव्यांचा राजा आपली मंडळी बरोबर घेऊन आकाशांतून चालला होता, त्यानें ते तांदूळ पाहिले, तेव्हां तो तांदुळांकरितां लुब्ध झालेल्या पारव्यांस ह्मणाला, ह्या निर्जन अरण्यांत तांदूळ कसे आले? याचा विचार केला पाहिजे. हें सुचिन्ह दिसत नाहीं. बहुतकरून ह्या तांदुळांच्या दाण्यांच्या लोभानें त्यांप्रमाणें आपणही जाळ्यांत सांपडूं. कारण, असें सांगतात कीं; कंकणाच्या लोभानें मोठ्या चिखलांत रुपलेला प्रवासी एका वाघानें मारिला. पारवे ह्मणाले; ही काय गोष्ट आहे?

चित्रग्रीव—मी एके वेळीं दक्षिणेकडील अरण्यांत फिरत होतों, त्या वेळेस एक वाघ स्नान करून हातांत दर्भ घेऊन उभा होता तो म्यां पाहिला. नंतर तो सरोवराच्या तीरीं येऊन एका वाटसरास ह्मणाला, महाराज, हें सुवर्णाचें कंकण घ्यावें. हें ऐकून त्या लोभी वाटसरानें विचार केला कीं, दैवानें हें प्राप्त झालें आहे. तथापि येथें जीव जाण्याचा संभव आहे, याकरितां आपण घेण्यास प्रवृत्त होऊं नये.

कारण—

वाईटापासून चांगली गोष्ट झाली तरी तिचा परिणाम चांगला होत नाहीं, जेथें विषाचा संपर्क आहे, तें अमृत असलें तरी मृत्युप्रद होतें. परंतु द्रव्य संपादन करणें ह्मणजे सर्व ठिकाणीं अडचणी आहेतच. ह्मटलें आहे,

संशय सोडून दिल्याशिवाय मनुष्याचें कल्याण व्हावयाचें नाहीं.

शंका न घेतां जर कार्यास प्रवृत्त होऊन कृतकृत्य होईल, तर त्याचें कल्याण होईल.

असो, आपण याची चौकशी करूं; असें मनांत ह्मणून त्या वाघास ह्मणाला, अरे, तुझें कंकण कोठें आहे? वाघानें हात पुढें करून कंकण दाखविलें. तेव्हां वाटसरू ह्मणाला, अरे, तू यमस्वरूपी, तुजवर विश्वास कसा ठेवावा? हें ऐकून वाघ ह्मणाला, सांगतों तें ऐक. मी पूर्वी तारुण्यांत फार दुराचारी होतों. अनेक गाई, माणसें, मारिल्यामुळें माझीं बायकामुलें मरून माझा निर्वंश झाला, त्यामुळें मला एका धार्मिकानें दानधर्म करण्यास सांगितलें. तेव्हांपासून वृद्धपणीं स्नानसंध्या करून दानधर्म करितों. माझे दांत पडून गेले, नखें गळालीं. आतां मजवर विश्वास ठेवण्यास कोणती हरकत आहे?

कारण—

यज्ञ, वेदाध्ययन, दान, तप, सत्य, धैर्य, क्षमा, निर्लोभीपणा, असा आठ प्रकारचा धर्माचरणाचा मार्ग आहे. यांपैकीं पहिल्या चार गोष्टी ढोंगी देखील आचरतात, परंतु दुसऱ्या चार खरा मोठा असतो त्याच्याच अंगीं असतात.

मी तर आतां इतका निर्लोभी झालों आहें कीं, हें हातांतलें कंकण कोणाला तरी देऊन टाकणार. असें आहे तरी वाघ माणसांला खातो; ह्या लोकापवादास काय करावें?

कारण—

एकाचें पाहून दुसरा करितो, ही लोकांची वहिवाट आहे, गाईला मारणाऱ्या ब्राह्मणाचें देखील खरें मानतील पण कुंटिणीनें धर्माची जरी गोष्ट सांगितली तरी ती लोकांस खरी वाटत नाहीं.

मी तर धर्मशास्त्र शिकलों आहें, ऐक.

आपला जीव जसा आपणास आवडतो, तसाच दुसऱ्यांचा जीव दुसऱ्यांस आवडतो, यासाठीं साधु आपणाप्रमाणें लोकांवर दया करितात.

आणखी—

कोणी कांहीं मागितलें असतां नाहीं ह्मणणें अथवा देणें, सुख, दुःख; प्रिय, अप्रिय, या गोष्टी आपणास लागू करून मनुष्यानें त्यांविषयीं विचार करावा.

तू फार दरिद्री आहेस ह्मणून तुला हें द्यावें असें माझ्या मनांत आहे. कारण, धर्मराजास कोणीं ह्मटलें आहे;

कुंतिपुत्रा, दरिद्र्यांचें पालन कर, समर्थास द्रव्य देऊं नको, रोग्याला औषधाचा उपयोग आहे, तें निरोग्याला देऊन काय करावयाचें आहे?

दुसरें—

देश, काल, पात्र, हीं पाहून प्रत्युपकाराची आशा न धरितां जें दान करितात तें सात्विक दान होय.

तर आतां या सरोवराच्या तीरीं स्नान करून हें सुवर्णाचें कंकण घे. हें ऐकून तो लोभी मनुष्य वाघाच्या बोलण्यावर भरंवसा ठेवून स्नानास चालला तों मोठ्या चिखलांत रुपला, तेथून त्यास निघतां येईना. त्यास चिखलांत फसलेला पाहून वाघ ह्मणाला, अरेरे, गाळांत बुडालास मी तुला काढतों. असें ह्मणून वाघानें हळू हळू त्याजवळ जाऊन त्यास धरिलें; तेव्हां तो मनुष्य मनांत ह्मणालाः—

दुष्टानें धर्मशास्त्र ह्मटलें किंवा वेदाध्ययन केलें तरी तो चांगला व्हावयाचा नाहीं. गाईचें दूध जसें स्वभावतः चांगलें असतें, त्याप्रमाणें जो मूळचा चांगला तोच चांगला.

आणखी—

ज्याचीं इंद्रियें स्वाधीन नाहींत त्याचीं सर्व पुण्यकर्में हत्तीच्या स्नानासारखीं आहेत. कुस्त्रीला जसा अलंकार घालून कांहीं उपयोग नाहीं, त्याप्रमाणें क्रियेवांचून ज्ञान हें केवळ भार होय.

यासाठीं मीं या वाघावर विश्वास ठेविला हें चांगलें केलें नाहीं. ह्मटलें आहे—

ज्यांस शिंगें आहेत असे पशु, नद्या, ज्यांस नखें आहेत असे प्राणी, ज्यांच्या हांतांत शस्त्र आहे असे मनुष्य, स्त्रिया आणि राजा यांवर कधींही विश्वास ठेवूं नये.

दुसरें—

इतर सर्व गुणांपेक्षां प्रथमतः सर्वांच्या स्वभावाची परीक्षा पूर्वीं करावी; कारण सर्व गुणांस मागें टाकून मूळस्वभाव पुढें येतो.

आणखी—

चंद्र आकाशांत संचार करितो, अंधःकाराचा नाश करितो, त्यास हजार कर (किरण) आहेत, नक्षत्रमंडलामध्यें वास करितो, तरी त्यास दुर्दैवानें राहू ग्रासतो. तस्मात् कपाळीं लिहिलेलें चुकविण्यास कोणी समर्थ नाहीं असें ह्मटलें पाहिजे.

असें ह्मणत आहे तोंच वाघानें त्यास फाडून खाल्लें. ह्मणून तुह्मांस सांगतों कीं, अविचारानें कधींही कर्म करूं नये. कारण—

आपणास जिरणारें असें अन्न, शहाणा मुलगा, चांगली चाल लाविलेली बायको, इमानानें सेविलेला राजा, नीट विचार करून केलेलें भाषण, आणि विचारपूर्वक केलेलें कर्म हीं पुष्कळ दिवस गेले तरी अपकार करीत नाहींत.

हें भाषण ऐकून एक पारवा गर्वानें ह्मणाला, अंः, काय बडबड लाविली आहे ?

संकट आलें ह्मणजे ह्मातार्‍यास विचारावें. सर्व ठिकाणीं याप्रमाणें विचार करूं लागलों ह्मणजे जेवणाचीसुद्धां पंचाईत.

कारण—

पृथ्वीवर सर्व अन्नपाणी हें शंकांनीं व्याप्त आहे; मग खावें काय आणि वांचावें कसें ?

ह्मटलें आहे—

हेवा करणारा, निंदक, असंतुष्ट, रागीट, नेहमीं शंका घेणारा, दुसर्‍याच्या भाग्यावर उपजीविका करणारा, हे सहा दुःखी असतात.

हें ऐकून सर्व पारवे तेथें बसले. कारण—

लोक मोठमोठीं शास्त्रें पढणारे, बहुश्रुत, लोकांस शिकविणारे, असे असले तरी लोभानें मोहित झाले ह्मणजे दुःखांत पडतात.

दुसरें—

लोभापासून क्रोध, काम, मोह, नाश, हे उत्पन्न होतात. लोभ हें पापाचें मूळ आहे.

नंतर ते सर्व पारवे जाळ्यांत सांपडले. नंतर ज्याच्या भाषणानें ते जाळ्यांत सांपडले, त्यास शिव्या देऊं लागले.

ह्मटलें आहे—

समुदायाचा पुढारीपणा करूं नये, कार्यसिद्धि झाली तर फळ सारखें. कार्यघात झाला तर पुढें होणार्‍याचें थोबाड फुटतें.

त्यास इतर पारवे शिव्या देतात हें पाहून चित्रग्रीव ह्मणाला, हा याचा दोष नाहीं. कारण—

संकट यावयाचें असलें ह्मणजे मित्रसुद्धां त्यास कारण होतो.

दूध काढावयाच्या वेळेस आईचाच पाय वासरास बांधावयाचा खांब होतो.

दुसरें—

उपायांस दूषणें देण्यांत हुशार असून काय उपयोग ? संकटांत पडलेल्यांचें दुःख निवारण करण्यास जो समर्थ तोच मित्र होय.

विपत्कालीं आश्चर्य करीत वसणें हेंच कुपुरुषाचें लक्षण आहे; तर आतां धैर्य धरून याचा प्रतिकार करण्याची तजवीज योजावी.

कारण—

विपत्कालीं धैर्य, संपत्कालीं क्षमा, सभेमध्यें वाक्चातुर्य, युद्धांत पराक्रम, कीर्तीविषयीं आवड, विद्येचें व्यसन, हे मोठ्याचे स्वाभाविक गुण आहेत.

जो संपत्कालीं अतिहर्ष पावत नाहीं, व विपत्कालीं खेद पावत नाहीं, रणामध्यें धैर्य धारण करितो, तो त्रिभुवनाचा तिलकच होय. असा मुलगा क्वचित् एकाद्या आईस होतो.

दुसरें—

निद्रा, सुस्ती, भय, क्रोध, आळस, चेंगटपणा, हे सहा दोष ऐश्वर्य इच्छिणाऱ्या पुरुषानें टाकून द्यावे.

आतां असें करावें कीं, सर्वांनीं एकचित्त करून जाळें घेऊन उडून जावें. कारण—

क्षुद्र वस्तूंचाही समुदाय असला तरी कार्यसिद्धि होते. तृणाचें चऱ्हाट करून मोठमोठे हत्ती बांधितात. आपल्या कुळांतले अशक्त असले तरी त्यांबरोबर ऐक्य असणें श्रेयस्कर आहे. टरफल काढलेलें असलें तर तांदूळ उगवत नाहीं.

असा विचार करून ते सर्व पक्षी जाळें घेऊन उडाले. हें पारध्यानें दुरून पाहिलें; तेव्हां तो त्यांच्यामागून धांवूं लागला; आणि मनांत ह्मणाला—

हे पक्षी एकजूट करून जाळें घेऊन चालले आहेत, परंतु पडतील तेव्हां माझ्या तावडींत सांपडतील. नंतर ते पक्षी दिसत नाहींतसे झाले तेव्हां तो पारधी परत गेला. पारधी गेला हें पाहून पारवे ह्मणाले, आतां काय करावें? तेव्हां चित्रग्रीव ह्मणाला,—

आई, बाप आणि मित्र, हीं तीन स्वभावतः खरीं हितेच्छु; बाकीचे लोक प्रसंगानें हित करतात.

यासाठीं आमचा मित्र हिरण्यक नांवाचा उंदरांचा राजा गंडकी नदीच्या तीरीं चित्रवनांत राहतो त्याकडे जावें; तो हें जाळें कुरतुडून टाकील. हें ऐकून ते सर्व पक्षी हिरण्यकाच्या बिळाजवळ गेले. नेहमीं विघ्नें येतात हें पाहून बिळास शेंकडों भोंकें करून हिरण्यक आंत राहत होता, तो पारव्यांचें जाळें एकाएकीं पडलेलें पाहून भयानें हालचाल न करितां गुपचूप जाऊन वसला. तेव्हां चित्रग्रीव त्यास हाका मारून ह्म-

णाला, मित्रा हिरण्यका, कां आह्मांशीं आज बोलत देखील नाहींस? त्याचा शब्द ओळखतांच हिरण्यक त्वरेनें बाहेर येऊन ह्मणाला, माझा प्रिय मित्र चित्रग्रीव आला, आज मी मोठा धन्य आहें.

जो मित्राशीं संभाषण करितो, जो मित्राबरोबर राहतो, त्यापेक्षां दुसरा मोठा पुण्यवान् नाहीं.

नंतर ते सर्व पक्षी जाळ्यांत अडकले आहेत असें पाहून तो आश्चर्यानें चकित झाला आणि ह्मणाला, मित्रा, हें काय आहे? चित्रग्रीव ह्मणाला, आमच्या पूर्वकर्माचें हें फल असें ह्मटलें पाहिजे. कारण—

प्राणी दैवाच्या स्वाधीन आहे, याकरितां; ज्यास्तव, ज्यानें, जसें, जेव्हां, जें, जितकें, जेथें, चांगलें किंवा वाईट कर्म केलें असेल, त्यास्तव, त्यानें, तसें, तेव्हां, तें, तितकें, तेथें, त्यास प्राप्त होतें.

रोग, शोक, संताप, बंधन, दुःख, हीं मनुष्याच्या अपराधरूप वृक्षाचीं फळें होत.

नंतर हिरण्यक चित्रग्रीवाचें बंधन तोडण्यास पुढें झाला; तेव्हां चित्रग्रीव ह्मणाला; मित्रा, असें करूं नको; अगोदर माझ्या आश्रितांचे पाश तोड, नंतर माझे सावकाश तोडशील. नंतर हिरण्यक ह्मणाला, माझी शक्ति अल्प, माझे दांत नाजुक, यामुळें यांचे पाश तोडण्यास मी कसा समर्थ होईन? याकरितां दांत दुखूं लागले नाहींत तों अगोदर तुझे पाश तोडितों, नंतर शक्ति राहील त्याप्रमाणें यांचेही तोडीन. चित्रग्रीव ह्मणाला, हें खरें तथापि प्रथमतः यथाशक्ति यांचे पाश तोड. हें ऐकून हिरण्यक ह्मणाला, प्रथमतः आपला नाश करून घेऊन आश्रितांचें रक्षण करावें, असें नीतिशास्त्र जाणणाऱ्यांचें मत नाहीं. कारण,—

आपत्कालाकरितां धनाचा संचय करावा, धन खर्चूनही स्त्रीचें रक्षण करावें, धन व स्त्री यांपूर्वी आपलें रक्षण करावें.

दुसरें—

धर्म, अर्थ, काम, मोक्ष, या चार पुरुषार्थांचें संपादन करण्याचें मुख्य साधन जीव आहे. त्याचा नाश करणाऱ्यानें कशाचा नाश केला नाहीं? व त्याचें रक्षण करणाऱ्यानें कशाचें रक्षण केलें नाहीं?

चित्रग्रीव ह्मणाला, मित्रा, तूं ह्मणतोस अशीच नीति, परंतु आश्रितांचें दुःख सहन करवत नाहीं, ह्मणून असें ह्मणतों. कारण,—

शहाण्यानें धन आणि द्रव्य यांचा दुसऱ्यासाठीं त्याग करावा; जर

कधीं तरी त्यांचा खचीत नाश व्हावयाचा आहे तर परोपकारार्थ झालेला बरा. याशिवाय दुसरें येथें विशेष कारण आहे, तें हें कीं—

जात, द्रव्य, बल, हीं यांचीं आणि माझीं सारखींच आहेत, तर माझ्या प्रभुत्वाचा उपयोग केव्हां होईल ? तें सांग.

दुसरें—

वेतन दिलें नाहीं तरी हे माझ्यापासून दूर जात नाहींत; यासाठीं माझा जीव गेला तरी हरकत नाहीं, परंतु तू यांना वांचीव.

आणखी—

मांस, मूत्र, विष्ठा, हाडें यांनीं निर्माण केलेल्या माझ्या शरीराविषयीं आस्था सोडून, मित्रा, माझ्या कीर्तीचें रक्षण कर.

पहा—

जर नित्य व निर्मल असें यश, अनित्य आणि मलिन अशा शरीरानें मिळेल तर दुसरें काय पाहिजे ?

कारण—

शरीर आणि सद्गुण यांमध्यें मोठें अंतर आहे. शरीर क्षणभंगुर आहे, परंतु सद्गुण कल्पांतापर्यंत राहणारे आहेत.

हें ऐकून हिरण्यकास मोठा आनंद होऊन तो ह्मणाला, शाबास मित्रा, शाबास. या आश्रितांच्या वात्सल्यानें तू त्रैलोक्याचाही प्रभु होण्यास योग्य आहेस. असें बोलून सर्वांचीं बंधनें तोडून त्यांचा सन्मान करून हिरण्यक ह्मणाला, मित्रा, जाळ्यांत सांपडल्याबद्दल कोणत्याही गोष्टीनें खेद मानूं नको;

कारण—

शंभर योजनांपेक्षां अधिक दुरून ज्या पक्ष्यास आमिष दिसतें, त्यासच वेळ आली ह्मणजे जाळें दिसत नाहीं.

दुसरें—

चंद्र, सूर्य, यांस ग्रहण; हत्ती, सर्प, यांस बंधन; बुद्धिमानांस दारिद्र्य; या गोष्टी पाहून दैवच बलवान् आहे असें मला वाटतें.

आणखी—

उंच आकाशांत राहणाऱ्या पक्ष्यांसही विपत्ति प्राप्त होतात, मासे खोल समुद्रांत राहतात तरी त्यांस लोक धरतात, तेव्हां या जगांत चांगलें काय व वाईट काय ? चांगली जागा मिळून काय उपयोग ? दुःखरूप हात ज्यानें लांबविला आहे असा काल दुरून देखील ओढून आणतो.

याप्रमाणें सांत्वन करून आलिंगन देऊन चित्रग्रीवास त्यानें निरोप दिला. नंतर चित्रग्रीवही पक्ष्यांसहवर्तमान यथेष्ट गमन करूं लागला; तेव्हां हिरण्यक आपल्या बिळांत शिरला.

यासाठीं कसे तरी लहान मोठे पुष्कळ मित्र करून ठेवावे. पहा, एवढ्याशा उंदिरानें पक्ष्यांस जाळयापासून मुक्त केलें.

हा वर सांगितलेला पक्षी आणि उंदीर यांचा सर्व वृत्तांत लघुपतन नांवाच्या कावळयानें पाहिला; तेव्हां मोठें आश्चर्य वाटून तो ह्मणाला, हिरण्यका, तू मोठा योग्य आहेस. याकरितां मीही तुझ्याशीं स्नेह करण्यास इच्छितों. तर कृपा करून माझी ही विनंती कबूल कर. हें ऐकून हिरण्यक बिळांतूनच ह्मणाला, कोण रे तू? तो ह्मणाला मी लघुपतन नांवाचा कावळा आहें. यावर हिरण्यक हंसून ह्मणाला, तुझ्याशीं स्नेह कसा करावा? कारण—

ज्याचा ज्याशीं मेळ होण्यासारखा असेल, तेथें शहाण्यानें जुळणी घालावी. मी भक्ष्य, तू भक्षक, तर मैत्री कशी होईल?

दुसरें—

भक्ष्य आणि भक्षक यांचें मित्रत्व मोठ्या विपत्तीस कारण होतें. कोल्ह्यानें पाशांत पाडलेल्या हरणाचें कावळयानें रक्षण केलें. कावळा ह्मणाला, ही काय गोष्ट आहे? हिरण्यक सांगतो.

मगध देशांत चंपावती नांवाचें मोठें अरण्य आहे. तेथें एक हरिण आणि कावळा असे दोघे रहात असत. त्यांचा मोठा स्नेह असे. तो हरिण शरीरानें चांगला पुष्ट होता. एके समयीं तो इच्छेप्रमाणें पाहिजे तिकडे फिरत असतां एका कोल्ह्याच्या दृष्टीस पडला. त्यास पाहून कोल्हा मनांत ह्मणतो, वाः, याचें मांस फार चांगलें लुसलुशित आहे, हें खावयास मिळालें पाहिजे. असो. त्याच्या मनांत आपणाविषयीं विश्वास उत्पन्न करावा, असा विचार करून हरिणाजवळ जाऊन ह्मणाला, मित्रा, कसें काय, बरें आहेना? हरिण ह्मणाला, कोण रे तू? तो ह्मणाला, मी क्षुद्रबुद्धि नांवाचा कोल्हा आहें. या वनांत माझा कोणी इष्टमित्र नाहीं, यामुळें मी मेल्याप्रमाणें एकटा आहें. परंतु आतां तुजसारखा मित्र मिळाल्यामुळें माझा पुनर्जन्म झाला. आतां मी नेहमीं तुझ्यामागून फिरेन. हरिण ह्मणाला; बरें आहे. नंतर सूर्यास्त झाल्यावर ते दोघे हरिणाच्या राहण्याच्या ठिकाणीं गेले. तेथें चांप्याच्या झाडाच्या फांदीवर सुबुद्धि नांवाचा कावळा हरिणाचा परम मित्र बसला होता. तो या दोघांस पाहून

ह्मणाला, मित्रा, हा दुसरा कोण? हरिण ह्मणाला, हा कोल्हा आहे. आमच्याशीं स्नेह करण्यासाठीं येथें आला आहे. कावळा ह्मणाला, मित्रा, एकाएकीं आलेल्या आगंतुकावरोबर स्नेह करणें ठीक नाहीं. ह्मटलें आहे,—

ज्याचें कुल, शील, ठाऊक नाहीं त्याला रहावयास जागा देऊं नये. मांजराच्या दुष्टपणानें जरद्गव नांवाच्या ह्यातार्‍या गृध्राचा नाश झाला.

हरिण आणि कोल्हा हे दोघे ह्मणाले, ही काय गोष्ट आहे? कावळा ह्मणाला,—

भागीरथीच्या कांठीं गृध्रकूट नांवाच्या पर्वतावर मोठा एक वटवृक्ष होता. त्याच्या ढोलींत एक दुर्दैवी, नखें झडलेला, दांत पडलेला, असा ह्यातारा जरद्गव नांवाचा गृध्र रहात होता. त्याची दया येऊन त्याच्या निर्वाहाकरितां त्या वृक्षावर रहाणारे इतर पक्षी आपल्या भक्ष्यापैकीं थोडथोडा भाग त्यास देत असत; त्यामुळें त्याचें उपजीवन होत असे. कोणे एके समयीं दीर्घकर्ण नांवाचा मार्जार पक्ष्यांचीं पिलें खाण्यास तेथें आला. त्यास पाहून पक्ष्यांच्या पिलांनीं कलकलाट केला. हें ऐकून जरद्गव ह्मणाला, हा कोण येत आहे? तेव्हां दीर्घकर्ण गृध्रास पाहून भयानें ह्मणाला, मेलों रे मेलों. असो.

संकट प्राप्त झालें नाहीं तोंपर्यंत भ्यावें; येऊन बेतल्यावर भय सोडून धैर्यानें वागावें.

आतां इतक्या जवळ आल्यावर पळतां यावयाचें नाहीं, जें होणें असेल तें होवो. आतां यांस आपला भरंवसा येईल असें करून जवळ जातों. असा विचार करून जवळ जाऊन ह्मणाला, महाराज, वंदन करितों.

गृध्र—कोण रे तू?

दीर्घकर्ण—मी मार्जार.

गृध्र—चल, दूर निघून जा. नाहींतर मारून टाकीन.

दीर्घकर्ण—मी ह्मणतों तें ऐका. नंतर मारावें असें वाटल्यास मारा.

कारण,—

केवळ जात मनांत आणून कोणास मारूं नये, किंवा कोणाचा सत्कार करूं नये. त्याची चालचर्या पाहून नंतर योग्य वाटेल तें करावें.

गृध्र—सांग, येथें कां आला आहेस?

दीर्घकर्ण—मी येथें गंगातीरीं नेहमीं स्नान करून मांसभक्षण

सोडून ब्रह्मचारी राहून चांद्रायणव्रत करितों. आपण मोठे धार्मिक, ज्ञानी, सत्वशील आहां अशी मजपाशीं सर्व पक्षी आपली स्तुति करितात. याकरितां विद्येनें, वयानें, व बुद्धीनें वृद्ध जे आपण, त्यांपासून धर्म ऐकण्यास येथें आलों. आपण तर इतके धार्मिक कीं, अतिथीला ठार मारण्यास तयार झालां. गृहस्थाचा धर्म तर असा आहे कीं,—

शत्रुही घरीं आला असतां यथायोग्य त्याचा सत्कार करावा. तोडण्यास आलेल्या मनुष्यासमुद्धां वृक्ष छाया देतो. द्रव्य अनुकूल नसेल तर गोड बोलूनसुद्धां अतिथीचा सत्कार करावा. कारण,—

तृण, भूमि, उदक, आणि मधुर भाषण, हीं सज्जन कोणासही नाहीं ह्मणत नाहींत.

दुसरें,—

चंद्र चांडालाच्या घरावर देखील चांदणें पाडितो, त्याप्रमाणें साधु निर्गुण मनुष्यांवरसुद्धां दया करितात.

आणखी,—

ब्राह्मणांस अग्नि पूज्य, वर्णांमध्यें ब्राह्मण पूज्य, स्त्रियांस नवरा पूज्य, अतिथि सर्वांस पूज्य होय.

दुसरें,—आशाभंग होऊन अतिथि ज्याच्या घरापासून परत जातो त्यास तो आपलें पाप देऊन त्याचें पुण्य घेऊन जातो.

आणखी,—

उत्तम वर्णाच्या घरीं नीच आला तरी यथायोग्य त्याचा सत्कार करावा. कारण; अतिथीच्या सत्कारानें सर्व देव तृप्त होतात.

गृध्र—मार्जार मांस खाणारा, येथें पक्ष्यांचीं पिलें आहेत, ह्मणून मी बोललों.

हें ऐकून मार्जार भूमीला स्पर्श करून कानांवर हात ठेवून कृष्ण कृष्ण असें ह्मणून बोलला; मीं धर्मशास्त्र ऐकून विरक्त होऊन हें कठीण चांद्रायणव्रत आरंभिलें. कारण सर्व शास्त्रांचा पुष्कळ गोष्टींत विरोध आहे तरी, 'अहिंसा परमो धर्मः' ही गोष्ट सर्वांस मान्य आहे.

कारण,—

जे कोणाचीही हिंसा करीत नाहींत, कोणी पीडा दिली तरी सहन करितात, सर्वांस आश्रय देतात, ते स्वर्गास जातात.

दुसरें,—

एक धर्म हाच खरा मित्र आहे. कारण मरणानंतरही तो बरोबर येतो. बाकी सर्व शरीराबरोबर नष्ट होतें.

आणखी,–एक दुसऱ्याचें मांस खातो, या दोघांमध्यें केवढें अंतर आहे पहा. एकाची क्षणभर तृप्ति होते, परंतु दुसरा प्राणास मुकतो.

आणखी,—

प्राण्याला मरणाचें जें दुःख होतें, त्याचें अनुमान करून वर्णन करितां यावयाचें नाहीं.

आणखी सांगतों ऐक,—

आपल्या आपण उत्पन्न झालेल्या रानांतल्या भाजीनें देखील जें भरतां येईल, तें पोट जाळण्याकरितां मोठें पाप कोण करील?

याप्रमाणें बोलून गृध्राच्या मनांत आपणाविषयीं विश्वास उत्पन्न करून त्या झाडाच्या ढोलींत राहिला. नंतर रोज पक्ष्यांचीं पिल्लें धरून ढोलींत आणून खात असे. ज्यांचीं पिल्लें नाहींतशीं झालीं, त्यांनीं इकडे तिकडे शोधण्यास आरंभ केला; हें पाहून तो बोका ढोलींतून पळून गेला. नंतर शोध करीत असतां पक्ष्यांस त्या ढोलींत पिलांचीं हाडें सांपडलीं. तेव्हां ह्या जरद्गव्यानें आमचीं पिलीं खाल्लीं असें समजून त्यांनीं त्यास मारिलें. ह्मणून मी ह्मणतों कीं, ज्याचें कुलशील माहीत नाहीं, त्यास रहावयास जागा देऊं नये.

हें ऐकून कोल्हा रागावून ह्मणाला, ज्या दिवशीं पहिल्यानें हरिणानें तुला पाहिलें तेव्हां तुझेंही कुलशील त्यास माहीत नव्हतें; तर तुमचा दोघांचा स्नेह हल्लीं कां वृद्धिंगत होत आहे?

जेथें विद्वान् नाहीं, तेथें मंदबुद्धिसुद्धां पूज्य होतो. जेथें झाडें नाहींत तेथें एरंडाचीच मोठ्या वृक्षाप्रमाणें प्रतिष्ठा होते.

दुसरें—हा स्वकीय, हा परकीय, असें समजणें हलक्याचें काम आहे. खरे उदार असतात त्यांस सर्व पृथ्वी आपलें कुटुंबच आहे असें वाटतें.

ज्याप्रमाणें हरिण माझा आप्त त्याप्रमाणें तूही. हरिण ह्मणाला, असें बोलून काय करावयाचें? सर्वांनीं बोलून चालून विश्वासानें एके ठिकाणीं रहावें. कारण,—

कोणी कोणाचा मित्र नाहीं, व कोणी कोणाचा शत्रुही नाहीं. व्यवहारानें मित्र किंवा शत्रु होतात.

कावळा—बर ठीक आहे.

नंतर प्रातःकाळीं सर्व आपापल्या इच्छेप्रमाणें पाहिजे तिकडे गेले. एके समयीं कोल्हा हळूच हरिणाच्या कानांत सांगूं लागला, मित्रा, रानांत एकीकडे एक चांगलें पिकलेलें शेत आहे. चल मी तुला तेथें नेऊन दाखवितों. तसें केल्यावर हरिण दररोज तेथें जाऊन धान्य खात असे. नंतर शेतकऱ्यानें हें पाहून फांस लावून ठेविला. पुनः हरिण शेतांत आला तो त्यांत सांपडला. तेव्हां मनांत ह्मणूं लागला, हा यमाच्या पाशासारखा पारध्याचा फांस, यांतून मित्राशिवाय मला दुसरा कोण बाहेर काढील? नंतर कोल्हा तेथें येऊन ह्मणूं लागला, आपण केलेली युक्ति तर सिद्धीस गेली. याला कापतील तेव्हां मांस, रक्त, यांनीं भरलेलीं हाडें मला हटकून मिळतील, तीं पुष्कळ दिवस खावयास पुरतील. हरिण त्यास पाहून आनंदित होऊन ह्मणतो, मित्रा, एवढा फांस तोड, लवकर माझें रक्षण कर. कारण,—

संकटकाळीं मित्राची परीक्षा करावी, युद्धांत शूराची, कर्ज झालें असतां प्रामाणिकपणाची, दारिद्र्यांत बायकोची, आणि दुःखाच्या वेळेस इष्टमित्रांची.

दुसरें,—आनंदाच्या वेळेस, दुःखांत, दुष्काळांत, देशास संकट आलें असतां, राजद्वारीं आणि स्मशानांत जो उपयोगीं पडतो, तोच मित्र होय.

फांस वारंवार पाहून कोल्हा मनांत ह्मणाला, हा फांस फार बळकट आहे. मित्रा, हा फांस वादीचा आहे, आज आदितवारीं यास तोंड कसें लावूं? माझें बोलणें तुला खोटें वाटत असेल तर सकाळीं तूं जें सांगशील तें मी करीन. नंतर संध्याकाळीं हरिण वस्तीस आला नाहीं हें पाहून कावळा त्यास शोधावयास गेला. तेव्हां हरिणास फांसांत पडलेला पाहून ह्मणाला, मित्रा, हें काय? हरिण ह्मणाला, मित्राचें वाक्य ऐकिलें नाहीं. त्याचें हें फळ. ह्मटलें आहे,—

हितेच्छु मित्राचें वचन जो ऐकत नाहीं, त्यास लवकरच विपत्ति येणार असें समजावें. तो आपल्या शत्रूंस आनंद देतो.

कावळा—तो लुच्चा कोठें आहे?

हरिण—माझें मांस खावयाकरितां येथें जवळच लपून बसला आहे.

**कावळा**—म्यां पूर्वीं सांगितलेंच होतें कीं,—

आपण दुसऱ्याचें वाईट करीत नाहीं, एवढ्याच कारणानें पाहिजे त्यावर विश्वास ठेवूं नये. दुष्टांपासून गुणवानांस देखील भय आहे.

ज्याचा मृत्यु जवळ आला आहे त्यास दिवा गेला असतां घाण येत नाहीं, मित्राचें वचन तो ऐकत नाहीं, आणि अरुंधतीचा तारा त्यास दिसत नाहीं.

तोंडावर गोड बोलून पाठीमागें घात करणारा अशाशीं स्नेह करूं नये. तो तोंडावर दूध घालून आंत विषानें भरलेला घटच समजावा.

असें बोलून कावळा दुःखानें मोठा श्वास टाकून ह्मणाला, अरे दुष्टा, पापिष्ठा, त्वां केवढारे हा घात केला? अरे, गोडगोड गोष्टी बोलून खोट्या प्रेमानें भुलवून ज्यास आपणावर विश्वास ठेवावयास लाविलें, ज्यास तुझ्या स्नेहापासून हित होण्याची मोठी आशा, अशा गरीबास फसवावें काय?

ज्यानें आपणावर उपकार केला, ज्यानें आपणावर विश्वास ठेविला, अशा सज्जनास देखील जो संकटांत घालितो, अशा खोटसाळ मनुष्यास माते धरित्री तू कशी धारण करतेस?

दुर्जनांबरोबर स्नेह करूं नये, त्यांवर प्रीति करूं नये, निखारा जळत असला तर भाजतो, विझाला तर हात काळा करितो. दुष्टांचा स्वभावच हा;—

डांस जसा पहिल्यानें पायांवर पडतो, मग पाठीचें मांस खातो, हळू हळू कानांत चमत्कारिक गुणगुण करितो, छिद्र पाहिलें कीं एकाएकीं निःशंकपणें आंत घुसतो, त्याप्रमाणें दुष्टाची सर्व कृति आहे.

दुर्जन गोड बोलला तरी त्यावर विश्वास ठेवूं नये. त्याच्या जिव्हाग्रीं मात्र मध आहे, परंतु हृदयांत मोठें भयंकर विष आहे.

नंतर प्रातःकाळीं शेताचा धनी हातांत सोटा घेऊन तेथें येतांना कावळ्यानें पाहिला. तेव्हां तो ह्मणाला, मित्रा हरिणा, तू आपणास मेल्याप्रमाणें दाखीव; वायूनें पोट फुगवून स्तब्ध आडवा पड; मी तुझे डोळे चोंचीनें बोंचकरल्यासारखे करूं लागतों; मी जेव्हां काव काव शब्द करूं लागेन तेव्हां तू उठून एकदम धांव मार. त्याप्रमाणें हरिणानें केलें तो शेतकरी जवळ आला, आणि हरिण मेलेला पाहून हर्षानें ह्मणाला, वाः आपल्या आपणच मेलास. असें ह्मणून लवकर फांस सोडावयास लागला, तेव्हां कावळ्याचा शब्द ऐकून हरिण प-

दूरदिशीं पळून गेला. तें पाहून त्याच्या पाठींत मारण्याकरितां शेतकऱ्यानें सोटा फेंकिला, तो सोटा कोल्ह्याच्या कमरेंत बसून तो मेला.

ह्मटलें आहे,—

तीन वर्षांनीं, तीन महिन्यांनीं, तीन पंधरवड्यांनीं, किंवा तीन दिवसांनीं देखील फार मोठ्या पापपुण्याचें फल या लोकींच प्राप्त होतें.

ह्मणून मी ह्मणतों कीं, भक्ष्य आणि भक्षक यांची प्रीति मोठ्या विपत्तीला कारण होते.

लघुपतन पुनः ह्मणतो, तुला खाऊन टाकिलें तरी माझें पोट भरावयाचें नाहीं. तू जिवंत असलास तर चित्रग्रीवाप्रमाणें मी सुखानें राहीन.

दुसरें—तू आणि चित्रग्रीव यांचा जसा स्नेह आहे, त्याप्रमाणें जे पुण्यवान् आहेत ते भिन्न जातींचे असले तरी, त्यांचा एकमेकांवर विश्वास असतो.

आणखी,—

जसें समुद्राचें पाणी गवत पेटवून तापवितां यावयाचें नाहीं, त्याप्रमाणें साधु रागावला तरी त्याचें चित्त विकार पावत नाहीं.

हिरण्यक ह्मणाला, तू चपळ आहेस. चपळाबरोबर स्नेह कधींही करूं नये. ह्मटलें आहे,—

बोका, रेडा, एडका, कावळा आणि दुर्जन, यांवर विश्वास ठेविला कीं ते दांडगाई करूं लागतात. याकरितां त्यांवर विश्वास ठेवणें चांगलें नाहीं.

आणखी असें आहे कीं, तू आमचा स्वभावतः शत्रु आहेस. असें ह्मटलें आहे कीं,—

शत्रूशीं कितीही ऐक्य झालें तरी सांधि करूं नये. पाणी चांगलें तापलें तरी विस्तवास विझवून टाकितेंच.

दुर्जन विद्येनें भूपित असला तरी त्याची संगति करूं नये. सर्प रत्नांनीं भूपित असला तरी तो भयंकर नाहीं काय?

जें होण्यासारखें नाहीं, तें व्हावयाचें नाहीं. जें व्हावयाचें तें होईलच; पाण्यावर गाडा चालावयाचा नाहीं, व जमिनीवर नाव चालावयाची नाहीं.

दुसरें,—

पुष्कळ द्रव्य देऊन जो शत्रूंवर किंवा आपणावर जिचें प्रेम नाहीं

अशा स्त्रीवर विश्वास ठेवितो, त्याचा जीव द्रव्य आहे तोंपर्यंतच आहे असें समजावें.

लघुपतन—मीं सर्व ऐकिलें, तथापि तुझ्याशीं अवश्य स्नेह करावा असा माझा निश्चय आहे. असें घडणार नाहीं तर मीं अन्न वर्ज्य करून प्राणत्याग करीन. कारण,—

मडकें सहज फोडितां येतें पण प्रयत्नानेंसुद्धां जडतां यावयाचें नाहीं, त्याप्रमाणें दुष्टांची मैत्री आहे. परंतु सज्जनांची मैत्री सोन्यासारखी आहे, ती सहज घडते आणि कधींही मोडत नाहीं.

दुसरें,—

धातूंचा रस होतो ह्मणून त्यांची एकमेकांशीं जुळणी होते, पशुपक्षी यांचीही कारणानें मैत्री होते, मूर्खांची भयानें किंवा लोभानें संगत जमते, परंतु साधूंचा दर्शनानेंच स्नेह होतो.

आणखी,—

खरे मित्र आहेत ते नारळासारखे दिसतात, परंतु दुसरे असतात ते बाहेरून मात्र बोरासारखे सुंदर असतात.

आणखी,—

साधूंचा स्नेह मोडला तरी ते दुर्गुणी मनुष्याप्रमाणें आचरण करीत नाहींत. कमळाचे देंठ तोडले तरी तंतु त्यांस सोडीत नाहींत.

दुसरें,—

निष्कपटपणा, दान, शौर्य, सुखदुःखांचे ठायीं सारखेपणा, दक्षता, अनुकूलता, सत्य हे मित्रांचे गुण होत. ह्या गुणांनीं युक्त असा तुझ्याशिवाय मला कोण भेटेल?

हें भाषण ऐकून हिरण्यक बाहेर येऊन ह्मणाला, ह्या तुझ्या वचनामृतानें मी हृष्टपुष्ट झालों. ह्मटलें आहे,—

सज्जनांचें प्रीतियुक्त सयुक्तिक भाषण हें मंत्राप्रमाणें मन ओढून घेणारें आहे. तें जसा आनंद देतें त्याप्रमाणें उन्हानें तापलेल्यास थंड शीतळ पाण्यानें घातलेलें स्नान, मोत्यांचा हार किंवा सर्वांगीं लाविलेली चंदनाची उटी हीं सुद्धां आनंद देत नाहींत.

दुसरें,—

गुप्त गोष्ट उघडकीस आणणें, अस्तुटेपणा, निर्दयपणा, बुद्धि स्थिर नसणें, राग, खोटेपणा, द्यूत, हीं मित्राचीं दूषणें आहेत. यांपैकीं तुजमध्यें एकही दिसत नाहीं. कारण,—

कुशलपणा, सत्यभाषण, हीं भाषणाच्या प्रसंगानें कळतात. गांभीर्य, स्थैर्य हीं अनुभवाशिवाय कळत नाहींत.

दुसरें,—

ज्याचें अंतःकरण निर्मल असतें, त्याचें प्रेम वेगळेंच असतें; परंतु ज्याच्या मनांत कपट आहे तो तोंडानें फार गोड बोलतो. दुष्ट आहेत ते मनांत आणतील एक आणि करतील दुसरेंच, परंतु महात्मे असतात ते जसें मनांत चिंतितात तसेंच करितात.

याकरितां तुझ्या इच्छेप्रमाणें होऊं दे. असें बोलून हिरण्यक कावळ्याशीं स्नेह करून त्यास चांगले पदार्थ खावयास घालून संतुष्ट करून बिळांत शिरला. कावळाही आपल्या जागीं गेला. याप्रमाणें नेहमीं ते एकमेकांस खाण्याचे पदार्थ देऊन विश्वासानें गोष्टी सांगून काळ घालवीत असत. एके दिवशीं लघुपतन हिरण्यकास ह्मणाला, मित्रा, येथें पोट भरण्यास फार पंचाईत पडूं लागली; येथून दुसरे ठिकाणीं जावें असें मला वाटतें.

**हिरण्यक**—मित्रा, कोठें जाणार? ह्मटलें आहे;—

बुद्धिमान् एका पायावर उभा राहून दुसरें पाऊल पुढें टाकितो. दुसरें ठिकाण पाहिल्याशिवाय पूर्वीची जागा सोडूं नये.

**लघुपतन**—दुसरी जागा पाहिली आहे.

**हिरण्यक**—कोठें?

**लघुपतन**—दंडकारण्यांत कर्पूरगौर नांवाचें सरोवर आहे, तेथें मंथर नांवाचा कांसव माझा जुना मित्र रहातो. तो मोठा धार्मिक आहे. कारण,—

दुसऱ्यास उपदेश करण्यास सर्व पंडित आहेत, परंतु स्वतः धर्माचरण करणारा महात्मा एकादा असतो.

तो अनेक चांगले पदार्थ खावयास देऊन मला संतुष्ट करितो.

**हिरण्यक**—असें आहे तर मला तरी येथें राहून काय करावयाचें? कारण,—

ज्या देशांत सन्मान नाहीं, आप्त सोयरे नाहींत, एकादी विद्या प्राप्त होईल असेंही नाहीं, तो देश सोडून जावा.

दुसरें,—

जेथें उपजीवन होत नाहीं, कोणाचें भय नाहीं, लज्जा नाहीं, कुशलपणा नाहीं, दान नाहीं, तेथें राहूं नये.

आणखी,—

मित्रा; कर्ज देणारा, वैद्य, विद्वान् आणि जीमध्यें उदक आहे अशी नदी, ह्या चार गोष्टी जेथें नाहींत, तेथें राहूं नये.

याकरितां मलाही तेथें ने. नंतर कावळा आपल्या मित्राबरोबर वाटेंत अनेक चमत्कारिक गोष्टी सांगत खुशाल त्या सरोवराजवळ जाऊन पोहोंचला. मंथरानें त्यांस दुरून पाहिलें तेव्हां कावळ्याचा आदरसत्कार करून उंदराचेंही त्यानें चांगलें आगतस्वागत केलें. कारण,—

बाल, वृद्ध किंवा तरुण, कोणीही घरीं आला तरी त्याची पूजा करावी. अतिथि हा सर्वांस श्रेष्ठ आहे.

नंतर कावळा ह्मणाला, मित्रा मंथरा, या नव्या पाहुण्याचा चांगला सत्कार कर. हा पुण्यवानांमध्यें श्रेष्ठ, कारुण्यसागर, हिरण्यक नांवाचा उंदरांचा राजा आहे. शेषास दोन हजार जिभांनींसुद्धां याच्या गुणांची स्तुति करितां यावयाची नाहीं. असें ह्मणून त्यानें चित्रग्रीवाची गोष्ट सांगितली. मंथर हिरण्यकाचा सत्कार करून त्यास ह्मणाला, महाराज, ओसाड रानांत रहावयाचें कारण काय? हिरण्यक ह्मणाला, ऐका;—

चंपक नांवाच्या नगरांत एक संन्याशांचा मठ आहे. तेथें चूडाकर्ण नांवाचा संन्यासी रहात असे. तो जेवण झाल्यावर अन्न राहील त्यासकट झोळी खुंटीस लावून निजत असे. तो निजल्यावर मी झोळींतलें अन्न खात असें. नंतर त्याचा मित्र वीणाकर्ण नांवाचा संन्यासी तेथें आला. तो त्याबरोबर गोष्टी सांगत असतां, मला भिवविण्याकरितां जमिनीवर दंड आपटीत असे. हें ऐकून वीणाकर्ण ह्मणाला, मित्रा, माझ्या गोष्टीकडे तुझें लक्ष नाहीं. चूडाकर्ण ह्मणाला, माझें लक्ष आहे; परंतु काय करावें? हा उंदीर नेहमीं झोळींत उडी मारून भिक्षा खाऊन मला त्रास देतो. हें ऐकून वीणाकर्ण खुंटीकडे पाहून ह्मणाला, एवढासा उंदीर इतकी उंच उडी मारतो काय? याचें कांहीं तरी कारण असेल. हें ऐकून चूडाकर्ण ह्मणाला, खावयास मिळतें हेंच बहुतकरून मुख्य कारण असावें.

ज्याच्याजवळ धन आहे तो बळकट, हें जगांत सर्वकाळीं सर्व ठिकाणीं आहे. राजास सुद्धां धनामुळेंच सत्ता प्राप्त होते.

नंतर त्यानें कुदळ घेऊन माझें बिळ खणून पुष्कळ दिवस सांठवून ठेवलेलें आंतलें धान्य बाहेर काढिलें. मी तेव्हांपासून शक्तिहीन होऊन वेड्यासारखा इकडेतिकडे फिरत असें. पोटास मिळविण्याचें

मला सामर्थ्य नाहींसें होऊन भराभर चालण्यास सुद्धां शक्ति नाहींशी झाली. हें पाहून चूडाकर्ण ह्मणाला,—

ज्याजवळ धन आहे तो बळकट, तो पंडित. पहा हा दुष्ट उंदीर इतर उंदरांप्रमाणें आतां रोडका झाला.

दुसरें,—

ज्याजवळ द्रव्य नाहीं, तो वेड्यासारखा होतो. उन्हाळ्यांत ओढ्याचें पाणी आटतें त्याप्रमाणें त्याचे सर्व उद्योग नष्ट होतात.

आणखी,—

ज्याजवळ धन असेल त्यास मित्र मिळतात, त्यास आप्त ओळखतात, लोकांत तोच पुरुष, तोच पंडित होतो.

दुसरें,—

ज्यास मुलें नाहींत, मित्र नाहींत, त्याचें घर सुनें; मूर्खास चोहींकडे सुनें; आणि दरिद्र्यास सर्व ठिकाणीं ओसाड.

आणखी,—

इंद्रियें तींच, मन तेंच, अकुंठित अशी बुद्धि तीच, वचन तेंच, पुरुष तोच, परंतु धनाचा उबारा नाहींसा झाला कीं, क्षणांत वेगळा होतो, हें विचित्र आहे.

हें सर्व ऐकून म्यां विचार केला कीं, मला येथें रहाणें ठीक नाहीं. आतां आपली हकीकत दुसऱ्यास सांगणें देखील ठीक नाहीं.

कारण,—

द्रव्यनाश, मनोदुःख, गृहछिद्र, आपणास कोणीं फसविलें किंवा अपमान केला, तर शहाण्यानें या गोष्टी प्रगट करूं नये.

ह्मटलें आहे,—

आयुष्य, धन, गृहछिद्र, मंत्र, मैथुन, औषध, तप, दान, अपमान, हीं नऊ यत्नानें गुप्त ठेवावीं.

तसेंच,—

दैव अत्यंत प्रतिकूल होऊन प्रयत्न व पराक्रम व्यर्थ होऊं लागले ह्मणजे, दरिद्री असून शाहणा जो आहे, त्यास वनाशिवाय दुसऱ्या ठिकाणीं कोठें सुख होणार?

दुसरें,—शाहणा आहे तो मरून जाईल परंतु लोकांस दैन्य दाखविणार नाहीं. विस्तव विझून जाईल परंतु थंड होणार नाहीं

आणखी,—

ज्याप्रमाणें फूल सर्वांच्या डोक्यांवर बसतें किंवा रानांत नासून

दुसरें.

दारि [illegible]

[illegible]

[illegible] दुःख [illegible]

[illegible]

[illegible] कारण आहे.

आणखी,—

मौन धारण केलेलें बरें, परंतु असत्य भाषण करणें ठीक नाहीं. पुरुषास नपुंसकत्व प्राप्त झालेलें बरें, परंतु परस्त्रीगमन योग्य नाहीं. प्राणत्याग केलेला बरा, परंतु दुष्टांचें भाषण ऐकणें नको. भिक्षा मागितलेली बरी, परंतु दुसऱ्याच्या धनाचा अपहार करून सुख भोगणें चांगलें नव्हे. गोठा ओसाड असलेला बरा, परंतु द्वाड गुरूं असूं नये. वेश्या ठेवणें बरें, परंतु स्वस्त्री असून दांडगी असणें फार वाईट. अरण्यामध्यें राहणें बरें, परंतु अविचारी राजाच्या नगरांत [illegible] नाहीं. प्राणत्याग करणें बरें, परंतु दुष्टांची संगति असूं नये.

आणखी,—

सेवा सर्व मान हरण करते, चांदणें अंधकाराचा नाश करितें [illegible] सौंदर्याचा नाश करिते, हरिहरांची कथा पातकांचा नाश करिते, त्याप्रमाणें शेंकडों गुण अंगीं असले तरी एका याचनेमुळें ते नाहींतसे होतात.

असें आहे तर मीं आतां परान्नानें उपजीविका करावी काय? शिव शिव! हें तर दुसरें मृत्युद्वारच आहे.

कारण,—

दुसऱ्याचा पदर धरून त्याजवळ पांडित्य करणें, पैसा देऊन स्त्रीसुख घेणें, पराधीन भोजन, या तीन गोष्टींपासून पुरुषांची विटंबना होते.

रोगी, नेहमीं प्रवास करणारा, परान्नावर उपजीविका करणारा, दु-

म
हं
इ

ली ह्मणजे
ुःख होतें.
ानें वेळूच्या बारीक
टलें कीं, लोभी नेहमीं आपल

ज्याच ... र संपत्ति आहे. पायांत जोडा असला ह्मणजे सर्व भूमि चर्मा... च्छादिल्याप्रमाणेंच आहे.

दुसरें,—

संतोषरूप अमृतानें तृप्त असल्यामुळें ज्यांचें चित्त स्वस्थ आहे, त्यांस जें सुख होतें, तें धनलोभानें इकडेतिकडे धांवणारांस कोठून प्राप्त होणार?

आणखी,—

ज्यानें आशा सोडून निर्लोभीपणा धारण केला, तोच विद्वान्, तोच शास्त्रज्ञ, त्यानेंच सर्व कर्मे केलीं.

दुसरें,—

ज्यास धनवानांच्या द्वारीं कधीं जावें लागत नाहीं, विरहव्यथा ...सात्री लागत नाहीं, भकूप्रमाणें कधीं बोलावें लागत नाहीं, त्याचें ...वित धन्य होय.

अ... कारण,—

ह्मट...स लोभाची पीडा झाली आहे, त्यास दोनशें योजनेंसुद्धां ...प आयुष्...ंतुष्ट असतो त्याच्या हाताजवळ द्रव्य असलें तरी तो निः मान, हीं न...

तसेंच,— ा प्राप्त झाली आहे तर आतां काय करावें, याचा ... गले
दैव अत्यंत प्र... आहे. ह्मटलें आहे,— ... त्या

ह्मणजे, दरिद्री अ...या हा धर्म, आरोग्य हें सुख, निष्कपटपणा ह...
ठिकाणीं कोठें सुख ह...निश्चय हें पांडित्य होय.

दुसरें,—शाहणा ...

...विणार नाहीं. विस्तव होतात तेव्हां काय करावें आणि काय करू...
आणखी,— ां हेंच शहाणपण आहे. जे कार्य कोणतें व अ-
ज्याप्रमाणें फूल ...

कार्य कोणतें याचा निश्चय करीत नाहींत, त्यांस पदोपदीं विपत्ति प्राप्त होतात.

तसेंच,—

कुलाकरितां एकाचा त्याग करावा, ग्रामाकरितां कुलाचा त्याग करावा, देशाकरितां ग्रामाचा त्याग करावा, आणि आत्मरक्षणाकरितां पृथ्वीचासुद्धां त्याग करावा.

दुसरें,—

आयासाशिवाय उदक आणि भययुक्त मिष्टान्न ह्यांविषयीं विचार केला तर असें वाटतें कीं, ज्यांत स्वस्थपणा आहे तेंच सुखकारक होय.

याप्रमाणें विचार करून मी निर्जनवनांत आलों. कारण,—

वाघ, हत्ती, यांनीं युक्त अशा रानांत झाडाखालीं फळें खाऊन, पाणी पिऊन, गवतावर पडून, वल्कलें पांघरून राहणें बरें; परंतु भाऊबंदांमध्यें दरिद्री होऊन राहणें ठीक नाहीं.

नंतर माझ्या पुण्याच्या बलानें मला मित्र मिळाला, त्यानें मज- कृपा केली. आतां तुमचा आश्रय मिळाल्यामुळें मी केवळ स्वर्गा- हिल्याप्रमाणें आहें.

कारण,—

संसाररूप विषवृक्षाचीं हीं दोन मात्र गोड फळें आहेत. एकसुखा- त्यामृतपान, आणि दुसरें सज्जनांची संगति.

मन्थर ह्मणाला,—द्रव्य हें पायांच्या धुळीसारखें आहे, तारुण्य त्यावरील ओढ्याप्रमाणें चपल, आयुष्य पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें चल, वांचणें फेंसासारखें, असा निश्चय करून स्वर्गद्वार उघडणारा सा धर्म जो करीत नाहीं, तो ह्मातारपणीं पश्चात्तापयुक्त होऊन शोकानें जळून जातो.

तुह्मीं फार संचय केला त्याचा हा दोष. ऐका.

तळ्यांतल्या पाण्याचा उपयोग बाहेर काढणें, त्याप्रमाणें मिळविलें द्रव्य खर्च करणें हेंच त्याचें रक्षण होय.

ॱ ॱ ॱ उ- ॱ ह्म- रूं नये. यावर री रो- नरीं

दुसरें,—

कृपण खोल जमिनींत द्रव्य पुरून ठेवितो, परंतु तें तसेंच खालीं जाऊन नाहींसें होतें.

आणखी,—

आपण सुखोपभोग न घेतां जो धन मिळविण्यास इच्छितो, तो दुसऱ्याचें ओझें नेणाऱ्याप्रमाणें कष्ट मात्र भोगितो.

दुसरें,—दान व उपभोग ज्याचा होत नाहीं अशा द्रव्यानें जर लोक द्रव्यवान् होतात, तर त्याच द्रव्यानें आह्मांस द्रव्यवान् कां ह्मणं नये ?

आणखी,—

उपभोग न करणें या गोष्टीनें पाहिलें तर कृपणाच्या द्रव्याशीं लोकांचा मालकाप्रमाणेंच संबंध आहे. परंतु ह्याचें हें, असा जो विशेष संबंध आहे तो नाश झाला असतां यास दुःख होतें त्यावरून उत्पन्न होतो.

दान व उपभोग केल्याशिवाय ज्याचे दिवस जातात, तो लोहाराच्या भात्याप्रमाणें श्वास टाकितो तरी तो जिवंत नाहीं असें समजावें.

दुसरें,—

जो देत नाहीं व उपभोगही करीत नाहीं, त्याच्या द्रव्याचा काय उपयोग ? जो शत्रूंस पीडा देत नाहीं, त्याचें बल काय करावयाचें ? जो धर्माचरण करीत नाहीं, त्याच्या विद्येचा काय उपयोग ? आणि जो जितेंद्रिय नाहीं, त्याच्या जीवाचा काय उपयोग ?

ह्मटलें आहे,—

प्रिय बोलून दान देणें, गर्वरहित ज्ञान असणें, क्षमायुक्त शौर्य, द्रव्य असून व्यय, ह्या चार गोष्टी जगांत दुर्लभ आहेत.

तसेंच,—

नेहमीं संचय करावा, अतिसंचय करूं नये. फार संचय करण्याच्या संचयीमुळें धनुष्याच्या योगानें कोल्ह्याचा नाश झाला.

कावळा आणि उंदीर—ही काय गोष्ट आहे ?

मन्थर—कल्याणकटक नांवाच्या जागीं भैरव नांवाचा पारधी रहात असे. तो एकेवेळीं शिकार करण्याकरितां विन्ध्याद्रीच्या रानांत गेला नंतर एका हरिणास मारून घेऊन चालला असतां त्यानें एक भयंकर डुक्कर पाहिला. तेव्हां हरिणास खालीं ठेवून त्यानें डुकरास तीर मारिला. डुकरानेंही मोठी गर्जना करून पारध्याच्या आंगावर जाऊन त्यास धडक मारिली, तेव्हां तोडलेल्या झाडाप्रमाणें पारधी खालीं पडला. ह्मटलें आहे,—

विष, अन्न, शस्त्र, क्षुधा, रोग, पर्वतावरून पडणें, इत्यादि कोणतें तरी निमित्त होऊन प्राणी मरतो.

नंतर तेथें एक सर्प होता, त्याचाही त्या दोघांच्या झटापटींत चुराडा झाला. इतक्यांत एक दीर्घरव नांवाचा कोल्हा भक्ष्य शोधीत तेथें आला, त्यानें त्या मेलेल्या हरिण, पारधी, डुकर आणि साप यांस पाहिलें. तेव्हां तो मनांत ह्मणाला, अहो, आज माझी खाण्याची खूब चंगळ झाली. ह्मटलें आहे,—

ज्याप्रमाणें प्राण्यांस दुःखें आपोआप येतात, त्याचप्रमाणें सुखेंही येतात. तस्मात् दैवच प्रधान आहे.

असो, यांच्या मांसानें माझे तीन महिने जातील.

कारण,—

एक महिनाभर पारधी पुरेल, हरिण आणि डुकर मिळून दोन महिने जातील, सर्प एक दिवस पुरेल, धनुष्याची तांत आज खावी.

असें आहे तर पहिल्या भुकेस ही शुष्क नीरस धनुष्याची तांत खातों. असें ह्मणून तसें केल्यावरोबर तांत तुटून धनुष्य ताड्दिशीं उडालें तें त्याच्या छातींत बसलें, तेव्हां तो लागलाच मरून गेला. ह्मणून मी ह्मणतों कीं, संचय नेहमीं करावा, परंतु अतिसंचय करूं नये.

ह्मटलें आहे,—

धनवान् जिवंत असतां जें दुसऱ्यास देतो, किंवा स्वतःच्या सुखाकरितां खर्च करितो, तेवढेंच त्याचें द्रव्य असें समजावयाचें. मेल्यावर त्याच्या घरादारावर लोक चैन करितात. जें शिष्टाला देतोस किंवा रोजच्या निर्वाहास खर्चितोस, तें तुझें द्रव्य; बाकी दुसऱ्या कोणाचें तरी तुजपाशीं आहे असें समजलें पाहिजे.

असो, आतां गेल्या गोष्टीचा शोक करून काय उपयोग?

कारण,—

शहाणे लोक जें मिळविण्यासारखें नाहीं, त्याची इच्छा करीत नाहींत; नष्ट झालेल्याचा शोक करीत नाहींत; आणि विपत्ति प्राप्त झाल्या तरी मोह पावत नाहींत.

यासाठीं मित्रा, आतां त्वां स्वस्थ रहावें. कारण,—

शास्त्रें पढून सुद्धां लोक मूर्ख होतात. जो शास्त्राप्रमाणें आचरण करील तो विद्वान्. रोग्यानें उत्तम औषधाचें नामस्मरण केलें, तरी तो बरा व्हावयाचा नाहीं. दुसरें,—

जो उद्योग करण्यास भितो, तो मोठा ज्ञानी असला तरी त्याच्या ज्ञानाचा उपयोग व्हावयाचा नाहीं. आंधळयाच्या हातीं दिवा असला तरी त्यास वस्तु दिसेल काय ?

यासाठीं मित्रा, अशी स्थिति प्राप्त झाली तरी शांति धरावी. तू येथें आलास याबद्दलही विशेष वाईट वाटण्याचें कारण नाहीं.

कारण,—

राजा, कुलस्त्री, ब्राह्मण, प्रधान, स्तन, दंत, केंस, पुरुष आणि नखें हीं स्वस्थानापासून भ्रष्ट झालीं ह्मणजे शोभत नाहींत.

असें समजून शाहाण्यानें आपलें स्थान सोडूं नये. हें भाषण मू खांचें आहे, असें समजलें पाहिजे. कारण,—

सिंह, सत्पुरुष, हत्ती, हे आपली जागा सोडून जातात; आणि का वळे, मूर्ख व हरिण, हे जागच्याजागींच मरतात.

ह्मटलें आहे,—

शहाण्याला स्वदेश कोणता आणि परदेश कोणता ? ज्या देशांत तो जातो, त्यास आपल्या पराक्रमानें आपलासा करितो. दाढा, पंजे, शेंपूट, हीं आयुधें घेऊन ज्या वनांत सिंह जातो त्यांतच हत्तींला मारून त्यांच्या रक्तानें आपली तृषा शांत करितो.

दुसरें,—

बेडूक पाण्याच्या जागीं जातात, पक्षी सरोवरावर जातात, त्याप्रमाणें उद्योगी मनुष्याकडे आपल्या आपण संपत्ति येते.

आणखी,—

सुख प्राप्त झालें तर सुख भोगावें, दुःख आलें तर तेंही भोगावें कारण सुखदुःखें हीं चाकाप्रमाणें फिरत असतात.

दुसरें,—

जो उत्साहयुक्त, चेंगट नाहीं, कामामध्यें हुशार, व्यसनी नाहीं शूर, कृतज्ञ, दृढ मैत्री करणारा, अशा पुरुषाजवळ राहण्याकरित आपोआप लक्ष्मी येते.

आणखी असें आहे,—

संपत्ति नसली तरी शाहण्या मनुष्यास बहुमान मिळतो. कृपण जवळ द्रव्य असलें तरी त्याचा अपमान होतो. अनेक गुण प्राप्त हो ण्यास कारण अशी जी सिंहाची स्वाभाविक शोभा ती, कुत्र्यानें सो न्याची सांखळी घातली तरी त्यास प्राप्त होते काय ?

कोणीं ह्मटलें आहे,—

मी धनवान् होतों तेव्हां जर मला गर्व नव्हता, तर आतां द-रिद्री झाल्यावर कां खेद करावा? हातांतल्या चेंडूप्रमाणेंच मनुष्याचें वैभवास चढणें व उतरणें आहे.

दुसरें,—

ढगांची सावली, नवें धान्य, तरुण स्त्रिया, तारुण्य, संपत्ति, यांचा उपभोग अल्पकालच मिळावयाचा.

आणखी,—

उपजीविकेकरितां विशेप उपद्व्याप करण्याची गरज नाहीं. तिची तजवीज ब्रह्मदेवानेंच केली आहे. प्राणी गर्भांतून उत्पन्न होतांच आ-ईच्या स्तनांत दुग्ध उत्पन्न होतें. मित्रा, आणखी कोणीं असें ह्म-टलें आहे,—

ज्यानें हंस पांढरे केले, राघू हिरवे केले, मोर चित्रविचित्र केले, तो तुझी उपजीविका करील.

आणखी एका साधूचें ह्मणणें आहे,—

जी मिळवितांना फार दुःख देते, नष्ट झाली असतां शोक देते, आणि प्राप्त झाली असतां मदांध करिते, ती संपत्ति सुखावह कशी?

दुसरें,—

धर्माकरितां जो द्रव्यप्राप्तीचा उद्योग करितो, त्यानें निरिच्छ असावें हें बरें. कारण चिखलांत पाय बुडवून धुण्यापेक्षां दुरून जावें हें बरें.

भक्ष्य आकाशांत असलें तर पक्षी खातात, जमिनीवर असलें तर पशु खातात, पाण्यांत पडलें तर मासे खातात, त्याप्रमाणें धनवानांस सर्व ठिकाणीं भय आहे.

आणखी,—

प्राण्यांस जसें मृत्यूचें भय आहे, त्याप्रमाणें द्रव्यवानांस राजा, पाणी, अग्नि, चोर, दुर्जन, या सर्वांपासून भय आहे.

तसेंच,—

संसारामध्यें क्लेशच फार आहेत, त्यांत आणखी इच्छेप्रमाणें संपत्ति प्राप्त होत नाहीं, आणि इच्छा तर निवृत्त होत नाहीं, यापेक्षां दुसरें मोठें दुःख कोणतें आहे? आणखी सांगतों ऐका,—

धन मिळावयाचें कठिण, मिळालें तर रक्षण करावयाचें कठिण, मिळून नष्ट झालें तर मृत्यु आल्याप्रमाणें होतें, यासाठीं याचा विचा-

स्च करूं नये. जर एक आशा सोडली, तर मग भिकारी कोण आणि समर्थ कोण? तीच वाढवीत गेलें ह्मणजे आलीच कपाळीं गुलामगिरी.

दुसरें,—

एकादी वस्तु हवीशी वाटली ह्मणजे तिजविषयीं अधिक आशा सुटते; परंतु प्राप्त झाली असतां नकोशी होते.

फार बोलून काय उपयोग? आतां आमच्याशीं प्रेमभावानें वागून येथें स्वस्थ रहावें. कारण,—

मोठ्याचें प्रेम मरणापर्यंत रहातें, क्रोध क्षणभंगुर असतो, आणि दान निरपेक्ष असतें.

हें भाषण ऐकून लघुपतन ह्मणाला, मन्थरा, तू धन्य आहेस, मोठा स्तुत्य आहेस. कारण,—

मोठ्यांच्या विपत्ति मोठ्यांनींच दूर केल्या पाहिजेत. हत्ती चिखलांत बुडाला तर त्यास बाहेर काढण्यास हत्तीच पाहिजेत.

ज्यापाशीं याचक किंवा रक्षणार्थी येऊन आशाभंग होऊन परत जात नाहींत तोच पृथ्वींतील सर्व मनुष्यांमध्यें श्रेष्ठ, तोच उत्तम, तोच सत्पुरुष, तोच धन्य होय.

नंतर ते सर्व यथेच्छ आहारविहार करून संतोषानें व सुखानें लागले. नंतर चित्रांग नांवाच्या हरिणास कोणीं पीडा दिल्यामुळे तेथें आला. त्यास पाहून मन्थर भयानें पाण्यांत शिरला, उंद त्याप्र ळांत शिरला, कावळा उडून झाडावर बसला. नंतर कावळ्यानें निरखून सांगितलें कीं, भयाचें कांहीं कारण नाहीं. हें ऐकून सर्व एके ठिकाणीं येऊन बसले. तेव्हां मन्थर ह्मणाला, हरि शाल आहेस ना? यथेच्छ आहार करून उदक प्राशन करा वास करून या वनास भूषित करावें.

चित्रांग—पारध्यानें त्रासविल्यामुळें आपणास शरण आल आपणाशीं सख्य करण्यास इच्छितों.

हिरण्यक—आज तुमची आमची भेट मोठ्या प्रयत्नानें झ कारण,—

औरस पुत्र, आप्त, वंशपरंपरागत स्नेही, आणि ज्याचें दुःखाप रक्षण केलें, हेच स्नेही होत.

याकरितां तुह्मी येथें स्वस्थ आपल्या घराप्रमाणें रहावें. हें ऐकून रिण आनंदित झाला, आणि यथेच्छ आहार करून व पाणी पि ओढ्याजवळच्या झाडाच्या सावलींत बसला.

**मन्थर**—मित्रा हरिणा, या ओसाड रानांत तुला कोणी त्रास दिला? येथें पारधी आले आहेत काय?

**हरिण**—कलिंगदेशांत रुक्मांगद नांवाचा राजा आहे. तो चोहीं-कडचे देश जिंकावयास निघाला आहे. हल्लीं त्याच्या सैन्यानें चंद्र-भागा नदीच्या तीरीं तळ दिलेला आहे. उद्यां सकाळीं तो येथें येऊन कर्पूरसरोवराच्या कांठीं राहील, अशी बातमी मीं पारधी लोकांच्या तोंडची ऐकिली आहे. यासाठीं उद्यां येथें राहणेंही भयंकर आहे.

हें ऐकून कांसव भिऊन ह्मणाला मी पाण्यांत जातों. कावळा व हरिण ह्मणाले बरें आहे. नंतर हिरण्यक ह्मणाला पाण्यांत गेल्यावर मन्थराला भय नाहीं; परंतु जमिनीवरून जावयाचें असेल तर त्यानें काय करावें? कारण,—

जलचराचें बल पाणी, किल्ल्यांत राहणाऱ्याचें बल किल्ला, श्वाप-दांचें बल स्वस्थान, आणि, राजाचें मुख्य बल प्रधान होय. चिखलाच्या वाटेनें जाणाऱ्या कोल्ह्यानें हत्ती मारला त्याप्रमाणेंच जमिनीवरून तू जाऊं लागलास तर तुझी अवस्था होईल.

**मन्थर**—ही काय गोष्ट आहे?

हिरण्यक सांगतोः—

ब्रह्मारण्य नांवाच्या रानांत कर्पूरतिलक नांवाचा हत्ती होता. त्यास पाहून सगळया कोल्ह्यांनीं विचार केला कीं, जर हा कोणत्या तरी उ-पायानें मरेल तर याच्या शरीरानें आमचा चार महिने उदरनिर्वाह होईल. तेथें एका ह्मातान्या कोल्ह्यानें प्रतिज्ञा केली कीं, मी आपल्या बुद्धिसामर्थ्यानें याच्या मरणाचा यत्न करितों. नंतर तो ठक कर्पूरति-लकाजवळ जाऊन त्यास सांष्टांग नमस्कार घालून ह्मणाला, महाराज, कृपावलोकन करा.

**हत्ती**—कोणरे तू? कोठून आलास?

**कोल्हा**—मी कोल्हा आहें. सर्व वनपशूंनीं मला आपणांकडे पा-ठविलें आहे, कारण राजावांचून रहाणें ठीक नाहीं. यासाठीं आपण सर्व राजगुणांनीं युक्त असल्यामुळें आपणांस राज्याभिषेक करावा, अशी सर्वांची इच्छा आहे. कारण,—

ज्याचीं कुल, देश, आचार हीं शुद्ध आहेत; जो पराक्रमी व धा-र्मिक आहे, जो नीतिमध्यें निपुण आहे; तो भूमंडलाचा राजा हो-ण्यास योग्य आहे.

दुसरें,—

पहिल्यानें राजा पाहिजे, नंतर स्त्री आणि धन. पृथ्वीवर राजा नसला तर बायको कोठली आणि पैसा कोठला ?

आणखी,—

पर्जन्याप्रमाणें प्राण्यांस राजा हा आधार आहे. पर्जन्य एकादे वेळेस न पडला तरी लोक जगतात, परंतु राजा नसला तर जगावयाचे नाहींत.

जन नेहमीं विषयोपभोग करणारे आहेत; ते इंद्रियांच्या स्वाधीन आहेत; त्यांमध्यें एकादाही सदाचरणी निपजणें फार कठीण. परंतु राजदंडाच्या योगानें सर्व चांगले वागतात. अशक्त, पंगू, रोगी, कसा तरी कुलस्त्रीला शासन करण्यास नवरा पाहिजे; तसा लोकांस राजा पाहिजे.

यासाठीं जेणेंकरून मुहूर्ताची वेळ टळणार नाहीं असें करून फार त्वरेनें आपण यावें. हें ऐकून राज्याविषयीं लुब्ध झालेला कर्पूरतिलक कोल्ह्याच्या वाटेनें धांवूं लागला तों तो मोठ्या गाळांत फसला; तेव्हां ह्मणाला, मित्रा कोल्ह्या, आतां काय करावें ? मी गाळांत पडून मर
मागें फिरून पहा.

कोल्हा—महाराज, माझें शेंपूट धरून उठा. माझ्यासार
वचनावर तूं विश्वास ठेविला, त्यामुळें आतां हें मोठें दुःख भो
यासाठीं ह्मटलें आहे,—

संगति करावयाची असली तर चांगल्याची कर, गोष्टी सां
च्या असल्या तर सज्जनांशीं सांग. नंतर चिखलांत पडलेला ह
ल्यांनीं खाल्ला. यासाठीं मी ह्मणतों कीं, कोल्ह्याच्या वाटेनें
हत्ती मेला; इत्यादि.

तें मित्राचें वचन ऐकतांच भयानें वेडा झाल्याप्रमाणें मन्थ
शय सोडून दुसरीकडे चालला. ते हिरण्यक वगैरे सर्व त्यास
विघ्न येईल असें वाटून त्याच्यामागें चालले. नंतर मन्थर वा
असतां रानांत एक पारधी फिरत होता त्याच्या दृष्टीस पडला.
तो पारधी मन्थरास घेऊन तिरकमठ्यावर बांधून फिरून दमल्य
तहान भूक लागली होती ह्मणून घरीं चालला. तेव्हां हरिण, क
वळा, उंदीर, यांस मोठें दुःख होऊन तेही त्याच्या पाठीमागून चालले. हिरण्यक विलाप करूं लागलाः–एका दुःखसमुद्रांतून तरलों

नाहीं तोंच दुसरें प्राप्त झालें. एक विघ्न आलें ह्मणजे अनेक अनर्थ होतात.

स्वाभाविक मित्र दैवानें प्राप्त होतो, त्याचा निष्कपट स्नेह संकटकाळीं सुद्धां कमी होत नाहीं.

स्वाभाविक मित्राच्या ठिकाणीं जसा लोकांचा विश्वास असतो, तसा आई, बायको, बंधु यांवर नसतो. फार काय, पण, प्रत्यक्ष आपला बाप यावरसुद्धां तसा विश्वास नसतो.

याप्रमाणें पुष्कळ विलाप करून ह्मणतोः—

कालांतरानें अथवा जन्मांतरीं प्राप्त होणारीं आपल्या कर्मांचीं चांगलीं वाईट फलें म्यां येथेंच पाहिलीं.

किंवा हें असेंच,—

शरीरास नेहमीं पीडा असावयाचीच, संपत्तीमध्यें विपत्ति असावयाचीच, समागमाबरोबर वियोग असावयाचाच, तस्मात् सर्व क्षणभंगुर उत्पन्न झालें आहे.

पुनः विचार करून ह्मणतो,—

शोक, शत्रु, भय, यांपासून रक्षण करण्याचें साधन; प्रीति व विश्वास यांचें पात्र, असें मित्ररत्न कोणीं उत्पन्न केलें ? आणखी,—

मित्र हें डोळयांसाठीं प्रेमरसानें केलेलें रसायण; अंतःकरणांत आनंद उत्पन्न करण्याचें साधन; आणि सुखदुःखांचें पात्र आहे. जे दुसरे द्रव्याच्या लोभानें आपल्या चालत्या काळीं मित्र होतात, तसले सर्व ठिकाणीं मिळतात, परंतु आपली विपत्ति ही त्यांची परीक्षा पाहण्याची कसोटी आहे.

याप्रमाणें पुष्कळ विलाप करून चित्रांग आणि लघुपतन यांस हिरण्यक ह्मणाला, हा पारधी रानांतून गेला नाहीं तोंच मन्थरास सोडविण्याचा यत्न करावा.

**सर्व**—काय करावें तें लवकर सांगा.

**हिरण्यक**—चित्रांगानें पाण्याजवळ जाऊन मढ्याप्रमाणें पडावें, कावळयानें त्याचे डोळे बोंचकरल्यासारखें करावें, असें केलें ह्मणजे हटकून मांसाच्या लोभानें हा पारधी तेथें जाईल. नंतर मी मन्थराचें बंधन तोडीन. पारधी जवळ येतांच तुह्मीं पळून जावें.

चित्रांग आणि लघुपतन यांनीं तसें केलें. नंतर तो पारधी दमून पाणी पिऊन झाडाखालीं बसला होता; त्यानें हरिणास पाहिलें तेव्हां

आनंदित होऊन सुरी घेऊन हरिणाकडे चालला, इतक्यांत हिरण्यकानें मन्थराजवळ जाऊन त्याचें बंधन तोडिलें; तेव्हां तो लागलींच पाण्यांत गेला. पारधी जवळ आला असें पाहून हरिणही उठून पळाला. पारधी परतून झाडाजवळ आला तों येथें कांसवही नाहीं; असें पाहून मनांत ह्मणाला, माझ्या अविचारीपणास ही चांगली शिक्षा झाली. कारण,—

जो हातचें सोडून पळल्याच्या पाठीस लागतो, त्याचें हातचें जातें व पळतें तर गेलेलेंच आहे. नंतर तो आपल्या कर्मानेंच निराश होऊन घरीं गेला. यासाठीं पुष्कळ मित्र करावे, दुर्गम जागा असाव्या, पहा; कांसवास बंधन प्राप्त झालें असतां उंदरानें त्यास मुक्त केलें.

नंतर मन्थर वगैरे सर्व स्वस्थ होऊन आपापल्या जागीं गेले.

याप्रमाणें सर्व गोष्ट ऐकिल्यावर राजपुत्र ह्मणाले, ते सर्व सुखी झाले यामुळें आह्मांस आनंद झाला.

विष्णुशर्मा—तुह्मांस एवढ्यानें आनंद झाला, तथापि हेंही आणखी असो.

सज्जन मित्र प्राप्त होवोत, देशांत लक्ष्मी वास करो, मांडलिक राजे धर्मानें प्रजांचें पालन करोत, नूतन विवाहित वधू जशी आनंद देते त्याप्रमाणें साधूंच्या अंतःकरणास तुमची नीति संतुष्ट करो, आणि भगवान् मस्तकीं अर्धचंद्र धारण करणारा शिव, लोकांचें कल्याण करो.

## मित्रलाभ समाप्त.

# सुहृद्भेद.

**राजपुत्र**—महाराज, मित्रलाभ आह्मीं ऐकिला, आतां सुहृद्भेद ऐकण्यास इच्छितों.

**विष्णुशर्मा**—ऐका. सुहृद्भेदाचा हा पहिला श्लोक आहे.

बैल आणि सिंह यांची दृढ मैत्री वनांत जी ॥
होती ती अतिदुष्टानें कोल्ह्यानें सर्व नाशिली ॥ १ ॥

**राजपुत्र**—ही काय गोष्ट आहे ?

**विष्णुशर्मा**—दक्षिण देशांत सुवर्णवती नांवाचें शहर होतें, तेथें वर्धमान नांवाचा वाणी रहात असे. त्यापाशीं पुष्कळ द्रव्य होतें, तरी दुसरे भाऊ आपणापेक्षां फार श्रीमंत आहेत असें पाहून त्यास पुनः आपली संपत्ति वाढवावी अशी इच्छा झाली. कारण,—

आपल्यापेक्षां कमी आहेत त्यांकडे पाहिलें ह्मणजे मोठा कोण नाहीं? परंतु आपणापेक्षां मोठे आहेत त्यांकडे पाहिलें ह्मणजे सर्वच दरिद्री आहेत.

दुसरें,—

ज्याच्याजवळ द्रव्य आहे तो मनुष्य ब्रह्महत्या करणारा असला तरी पूज्य होतो. दरिद्री मोठ्या कुलांत उत्पन्न झालेला असला तरी त्याचा अपमान होतो.

आणखी,—

तरुण स्त्री वृद्ध पतीस आलिंगिण्यास इच्छित नाहीं त्याप्रमाणें जो निरुद्योगी, आळशी, दैवावर भरंवसा ठेवणारा, धाडशी नाहीं, अशा मनुष्याजवळ लक्ष्मी जात नाहीं.

आळस, स्त्रीसेवा, रोग, जन्मभूमीची आवड, संतोष, भय, हीं सहा महत्त्वाचीं विघ्नें आहेत.

कोणीं ह्मटलें आहे,—

थोड्या संपत्तीनेंही जो संतुष्ट होतो, त्याची संपत्ति ब्रह्मदेव वाढवीत नाहीं. कारण त्यास वाटतें कीं, यास पाहिजे तितकें आपण दिलें.—

दुसरें,—

ज्याला उत्साह नाहीं, व पराक्रमही नाहीं; असा पुरुष शत्रूंस आनंद देतो. असा पुत्र कोणत्याही स्त्रीस न होवो.

ह्मटलें आहे,—

मिळालें नसेल तें मिळवावें, मिळालें असेल त्याचें नीट रक्षण करावें, रक्षण केलेलें असेल तें वाढवावें, आणि व त्पात्रीं द्यावें.

कारण,—

मिळविण्याची इच्छा केली नाहीं, तर मिळावयाचें नाहीं, जा लेलें पुष्कळ असून त्याचें रक्षण केलें नाहीं, तर त्याचा आपल्या हा नाश व्हावयाचा. वाढविलें नाहीं आणि थोडथोडें खर्चिलें तरी का ळाप्रमाणें संपतें. ज्याचा उपभोग घेतला नाहीं तें व्यर्थच.

आणखी,—

काजळ थोडथोडें घेतलें तरी संपतें, वारूळ थोडथोडें वाढून उं होतें, हें मनांत आणून दान, अध्ययन इत्यादि कर्में यथाशक्ति करून प्रत्येक दिवस सफल करावा.

कारण,—

थेंब थेंब पाणी पडलें तरी घागर भरते. याचप्रमाणें विद्येचें नाचें आहे.

याप्रमाणें विचार करून नंदक व संजीवक नांवांचे दोन बैल डीस जुंपून नानाप्रकारच्या वस्तु बरोबर घेऊन काश्मीराकडे व्या रास गेला. ह्मटलें आहे,—

समर्थांस मोठें ओझें कशाचें आहे? उद्योगी असतात त्यांस काय आहे? विद्वानांस परदेश कोणता? आणि गोड बोलणारास रकी कोण?

नंतर तो वाटेनें जात असतां सुदुर्ग नांवाच्या मोठ्या रानांत सं वक पाय मोडून पडला. तेव्हां वर्धमान ह्मणतो,—

शहाण्यानें उद्योग पाहिजे तो केला तरी ब्रह्मदेवाच्या मनांत अ तेंच फल त्यास मिळेल.

परंतु,—

आश्चर्य करीत बसणें हें सर्व कामांचें विघ्न आहे. याकरितां तें स ढून देऊन जें करावयाचें तें तडीस नेण्याचा यत्न करावा.

याप्रमाणें विचार करून संजीवकास तेथें सोडून वर्धमान पुनः मंपूर नांवाच्या शहरीं जाऊन तेथून महाकाय नांवाचा एक मोठा बै

आणून गाडीला जुंपून चालला. नंतर संजीवकही मोठ्या कष्टानें तीन पायांवर भार देऊन उठला.

ह्मटलें आहे,—

आयुष्य असलें ह्मणजे समुद्रांत बुडाला, कडेलोट झाला, किंवा साप चावला, तरी त्याचें रक्षण होतें.

शेंकडों वाण लागले तरी आयुष्य संपल्याशिवाय प्राणी मरत नाहीं. आयुष्य संपलें ह्मणजे गवताचें कुसूं लागलें तरी मरतो.

दैव चांगलें असलें ह्मणजे ज्याचें कोणी रक्षण करणारा नाहीं त्याचें सुद्धां रक्षण होतें. दुर्दैव असलें ह्मणजे चांगलें रक्षण केलेलें सुद्धां नष्ट होतें. धन्यानें रानांत टाकून दिलेला वांचतो; घरांत असून वांचण्यास पुष्कळ यत्न केला तरी मरतो.

नंतर कांहीं दिवस गेल्यावर संजीवक यथेच्छ आहारविहार करून अरण्यांत फिरून मोठ्यानें डुरकूं लागला. त्या रानांत पिंगलक नांवाचा सिंह आपल्या पराक्रमानें संपादित केलेल्या राज्याचा उपभोग करीत असे. ह्मटलें आहे,—

पशु सिंहास राज्याभिषेक वगैरे संस्कार करीत नाहींत, परंतु पराक्रमानें राज्यसंपादन करून तो आपला आपणच पशूंचा राजा होतो.

तो सिंह एके समयीं तान्हेनें व्याकुळ झाल्यामुळें पाणी पिण्यास यमुनेच्या तीरीं गेला. त्यानें पूर्वीं कधीं जें ऐकिलें नाहीं, असें अकालीं झालेल्या मेघगर्जनेप्रमाणें बैलाचें डुरकणें ऐकिलें. तें ऐकून पाणी न पितां भयानें आपल्या जागीं परत येऊन हें काय असेल याविषयीं विचार करीत उगाच बसला. या सिंहाच्या प्रधानाचे मुलगे करटक व दमनक असे दोन कोल्हे होते. धनी उगाच बसला हें पाहून दमनक करटकास ह्मणतो, गड्या करटका, आज महाराज पाणी पिण्यास जाऊन तृषा शांत न करितां भ्याल्याप्रमाणें गुपचुप बसले आहेत.

**करटक**—मला वाटतें याची चाकरीच करूं नये. असें आहे तर तो काय करितो याची चौकशी करून काय करावयाचें? कांहींएक अपराध न करितां पुष्कळ दिवसपर्यंत आमचा यानें अपमान केला, त्यामुळें आह्मांस मोठें दुःख झालें. आणखी पहा,

दुसऱ्याची चाकरी करून द्रव्यप्राप्ति करून घेण्यास इच्छिणाऱ्यांनीं [काय] केलें नाहीं? या मूर्खांनीं शरीराचें स्वातंत्र्य होतें तें देखील [वि]कून दासीं करून टाकिलें.

दुसरें,—

दुसऱ्याची चाकरी करणारे थंडी, वारा, ऊन, यांचें जितकें दुःख सोसतात, त्याच्या थोड्या अंशाइतकें दुःख सोसून तप केलें तर अधिक सुख होईल.

आणखी,—

पारतंत्र्य नसणें हेंच जन्माचें साफल्य. जे पराधीन झाले त्यांस जिवंत ह्मणावें तर मेलेले कोण?

दुसरें,—

आशारूप भूत ज्यांच्या पाठीस लागलें आहे, त्यांस श्रीमंत लोक ये, जा, पड, ऊठ, बोल, चुप बैस, याप्रमाणें पाहिजे तें बोलून त्यांची चेष्टा करितात.

आणखी,—

वेश्या जशा धनप्राप्तीकरितां आपलें शरीर भूषित करून दुसऱ्यास उपभोगास देतात, त्याप्रमाणें मूर्ख जे आहेत ते द्रव्यलोभाकरितां गुण संपादून दुसऱ्याची सेवा करितात.

आणखी,—

जी स्वभावतः चपल, अपवित्र पदार्थाकडे सुद्धां जाणारी, अशी धन्याची दृष्टि ती आपल्याकडे वळली ह्मणजे चाकर तेवढ्यानेंच मोठें भाग्य समजतात.

दुसरें,—

बोलला नाहीं तर मूर्ख, बोलला तर वडबड्या, सहनशील असला तर भित्रा, नाहीं तर हलकट, जवळ उभा राहिला तर दांडगा, दूर राहिला तर भेकड याप्रमाणें चाकरी करणें योग्याच्यानें सुद्धां व्हावयाचें नाहीं.

पहा, काय चमत्कार आहे.

उच्चस्थितीस येण्याकरितां लवतो, उपजीवनाकरितां प्राण देतो, सुखासाठीं दुःख सोसतो, अशा सेवकापेक्षां दुसरा कोण मूर्ख आहे?

दमनक ह्मणाला, गड्या, हें मनांतदेखील आणूं नये, कारण, संतुष्ट झाले असतां जे सत्वर मनोरथ पूर्ण करितात, त्या श्रीमंतांची यत्नानें सेवा कां करूं नये?

आणखी पहा,—

श्वेतछत्र, चामर, हत्ती, घोडे, सेना यांनीं युक्त अशी संपत्ति, राजाची सेवा न करणाऱ्यास कशी प्राप्त होईल?

**करटक**—सगळें खरें, पण आह्मांस या गोष्टीची चौकशी करून काय करावयाचें? भलत्याच गोष्टींत कधीं हात घालूं नये.

कारण,—

करण्यास योग्य नाहीं अशी गोष्ट करण्यास जो इच्छितो त्याचा पाचर उपटणाऱ्या वानराप्रमाणें नाश होतो.

**दमनक**—ही काय गोष्ट आहे?

**करटक** सांगतो—मगध देशांत धर्मारण्याजवळ एके ठिकाणीं शुभदत्त नांवाचा कायस्थ जातीचा एक गृहस्थ रहात असे. त्यानें वाडा बांधण्यास आरंभ केला. तेथें आरेकस लांकडें चिरीत होते. त्यांनीं एक लांकूड बरेंच कापून मध्यें पाचर घालून ठेविलें होतें. तेथें मोठा एक वानर काळानें ओढून नेल्याप्रमाणें गेला, आणि ती पाचर धरून त्या लांकडावर बसला. तेव्हां त्याचें लांब शेंपूट लांकडाच्या चिरलेल्या दोन भागांत शिरलें. नंतर वानर स्वभावानें चपळ असल्यामुळें त्यानें मोठ्या जोरानें ती पाचर उपटली. तेव्हां शेंपूट चेंगरून तो मेला. ह्मणून मी ह्मणतों कीं, भलत्याच गोष्टींत हात घालूं नये.

**दमनक**—तें खरें, तथापि धनी काय करितो हें सेवकानें अवश्य पाहिलें पाहिजे.

**करटक**—ज्या प्रधानाकडे सर्व कारभार आहे, त्यानें तें करावें. चाकरानें दुसऱ्याच्या अधिकाराची वाटाघाट करूं नये.

पहा,—

धन्याच्या हिताच्या इच्छेनें जो दुसऱ्याच्या हिताची वाटाघाट करितो, तो, जसा गाढव ओरडून मार खाऊन मेला त्याप्रमाणें मरतो.

**दमनक**—हें कसें झालें?

**करटक** सांगतो—वाराणसी नगरांत कर्पूरपटक नांवाचा परीट रहात असे. तो आपल्या तरुण स्त्रीस कुशींत घेऊन रात्रीस स्वस्थ निजला होता, तेव्हां त्याच्या घरांत चोरी करण्यास चोर शिरला. त्याच्या आंगणांत गाढव बांधलेला होता; तो, तेथेंच एक कुत्रा होता त्यास ह्मणाला, मित्रा, तुझें हें काम आहे; तर मोठ्यांनीं भुंकून धन्याला जागा कां करीत नाहींस?

**कुत्रा**—बाबा, माझ्या कामाची चौकशी करण्याची तुला गरज नाहीं. मी रात्रंदिवस याच्या घराची राखण करितों, हें तुला ठाऊक

नाहीं काय ? आतांशीं यास पुष्कळ दिवस उपद्रव न झाल्यामुळें माझा किती उपयोग आहे हें त्यास कळेनासें झालें. त्यामुळें मला आतांशीं बरोबर खाण्यास देखील देत नाहीं. कारण, संकट नसलें ह्मणजे धनी चाकराची हेळसांड करितात.

गाढव—ऐक रे हलकटा,—

अरे, कामाच्या वेळेस मागत बसतो तो कसला चाकर व तो कसला मित्र ? धन्यानें सांगितल्याशिवायही जो मोठें काम करितो तो मात्र चांगला खरा.

कुत्रा—जो कामाच्या वेळेस मात्र चाकरांचा समाचार घेतो, तो धनी चांगला काय?

कारण,—

सेवकास वेतन देणें, धन्याची सेवा करणें, धर्माचरण करणें, पुत्रोत्पादन करणें, हें ज्याचें त्यानेंच केलें पाहिजे. दुसऱ्यास सांगतां येत नाहीं.

हें ऐकून गाढव रागावून ह्मणाला, अरे दुष्टा, तू मोठा पापी आहेस. संकटकाळीं धन्याच्या कामाची उपेक्षा करितोस. बरें असो, मीच धन्यास जागा करितों. असें ह्मणून मोठ्यानें ओरडला, तेणेंकरून परीट जागा झाला; आणि झोंप मोडल्याबद्दल रागावून त्यानें गाढवास सोट्यानें खुब मार दिला, त्यामुळें गाढव मेला. ह्मणून मी सांगतों कीं, दुसऱ्याच्या कामाची वाटाघाट करूं नये. तूच पहा कीं शिकार शोधून काढणें एवढेंच आमचें काम आहे, त्याची वाटाघाट आपण करावी. विचार केला तर आपणांस या वाटाघाटीची जरूर नाहीं. आमच्या जवळ पुष्कळ बेगमी आहे. दमनक रागावून ह्मणाला, तुह्मी केवळ पोटाकरितां राजाची चाकरी करितां काय ? हें तुह्मांस फार वाईट आहे. कारण,—

मित्रावर उपकार करावा, शत्रूंची खोड मोडावी, याकरितां शहाणे राजाश्रयाची इच्छा करितात. नुसतें पोट कोण भरीत नाहीं ?

जो वांचला असतां ब्राह्मण, मित्र, आप्त हे वांचतात, त्याचें वांचणें सफल ह्मणावयाचें. आपणाकरितां कोण वांचत नाहीं ?

आणखी,—

जो वांचला असतां बहुतांचें उपजीवन होतें, तो वांचतो असें ह्म

णावें. नाहीं तर कावळा देखील चोंचीनें आपलें पोट भरीत नाहीं काय ?

पहा,—

एकादा पांचांकरितां दुसऱ्याचा चाकर होतो, एकादा लाखांकरितां होतो, आणि कोणी शहाणा असतो तो लाखानें देखील होत नाहीं.

दुसरें,—

सगळीं मनुष्यें सारखीं असून एकानें दुसऱ्याचा चाकर होणें फारच वाईट आहे. तशांत जो चाकरांमध्येंही मुख्य नाहीं, त्याची जिवंत माणसांत गणना करावी काय ?

एकाद्यास थोडेंही पुष्कळ वाटतें.

ज्यावर मांस नाहीं, थोडी चरबी मात्र लागली आहे, असें हाडूक मिळून त्यापासून क्षुधा शांत झाली नाहीं तरी कुत्रा संतुष्ट होतो. जवळ कोल्हा आला असला तरी त्यास सोडून सिंह हत्तीला मारितो. कोणीही प्राणी संकटांत असला तरी आपल्या बळाप्रमाणें फळ मिळविण्यास इच्छितो.

सेव्य आणि सेवक यांमधील अंतर पहा—

कुत्रा तुकडा देणाऱ्यापुढें शेंपूट हालवितो, त्याच्या पायांत घोंटाळतो, भुईवर उताणा पडून आ पसरतो, पोट दाखवितो; परंतु हत्ती अन्न देणाऱ्याकडे गंभीर मुद्रेनें पहातो, आणि शेंकडों गोड शब्द बोलावे तेव्हां खातो.

दुसरें,—

शहाणे लोक ह्मणतात कीं, ज्ञान, पराक्रम, कीर्ति यांनीं युक्त असें जीवित क्षणभर कां असेना; त्याचेंच नांव जीवित. कावळा पुष्कळ दिवस वांचतो, आणि बळी खातो, त्याचा काय उपयोग ?

दुसरें,—

जो आपलें, वडिलांचें, पदरच्या माणसांचें, इष्टमित्रांचें आणि गरीबांचें हित करीत नाहीं त्याच्या जिण्याचा या लोकीं काय उपयोग ? कावळाही पुष्कळ दिवस वांचतो आणि बळी खातो.

आणखी,—

ज्यांस हित कोणतें, अहित कोणतें, हें कळत नाहीं, शास्त्र कळत

नाहीं, केवळ पोट भरण्याची इच्छा, अशा पुरुषपशूंमध्यें आणि इतर पशूंमध्यें भेद काय?

**करटक**—आपण मुख्य नाहीं, मग आपणांस चौकशी करून काय करावयाचें?

**दमनक**—प्रसंगानें मुख्य नसतात ते मुख्य होतात. मुख्य असतात ते अमुख्य होतात. कारण,—

स्वभावतःच कोणी कोणास चांगला किंवा वाईट वाटत नाहीं. मनुष्य आपल्या कर्मानेंच श्रेष्ठ किंवा नीच ठरतो.

आणखी,—

धोंडा खालून पर्वतावर नेण्यास मोठा आयास लागतो, परंतु वरून क्षणांत ढकलून देतां येतो. त्याप्रमाणेंच गुणदोषांचें आहे. गुण संपादन करण्यास यत्न लागतो, दोष तेव्हांच जडतात.

विहीर खणणारा खणीत खणीत खालीं जातो, आणि वाडा बांधणारा बांधीत बांधीत वर जातो, त्याप्रमाणेंच मनुष्य आपल्या कर्मानेंच श्रेष्ठ किंवा नीच होतो. यासाठीं बाबा, सर्व आपल्या प्रयत्नाच्या स्वाधीन आहे.

**करटक**—बरें, आतां तुझें ह्मणणें तरी काय?

**दमनक**—आपला राजा पिंगलक कांहीं कारणानें चकित होऊन परत येऊन उगाच बसला आहे.

**करटक**—तुला काय वाटतें?

**दमनक**—यांत न समजण्यासारखें काय आहे? ह्मटलें आहे,—

बोलल्यावर पशूला सुद्धां कळतें; घोडे, हत्ती, हे देखील खुणेनें समजतात; पंडित जो आहे तो कोणी बोलल्याशिवाय तर्क करतो. दुसऱ्याचें इंगित समजणें हेंच बुद्धीचें फळ आहे.

आकार, खुणा, हालचाल, बोलणें, दृष्टीची व चेहऱ्याची बदल, यांवरून मनांत काय आहे तें कळतें.

राजास भय वाटलें आहे, अशा प्रसंगीं त्यास आपलासा करून घेतों. कारण,—

प्रसंगासारखें भाषण करणें, स्नेहासारखें हित करणें, आपल्या शक्तीप्रमाणें क्रोध आणणें, हें ज्यास समजतें तो पंडित.

**करटक**—बाबा, तुला चाकरी करावयाची माहीत नाहीं.

पहा,—

बोलावल्याशिवाय जातो, विचारल्याशिवाय पुष्कळ बोलतो, मजवर राजाची कृपा आहे असें मानितो, तो मूर्ख समजावा.

**दमनक**—तुह्मी कशावरून मला चाकरी करावयाची माहीत नाहीं असें ह्मणतां? पहा,—

स्वभावतःच चांगलें किंवा वाईट काय आहे? जें ज्यास आवडतें तेंच त्यास चांगलें वाटतें.

दुसरें,—

ज्याचा जसा अभिप्राय असेल तो जाणून शहाण्यानें त्यास आपल्या स्वाधीन करून घ्यावें.

आणखी,—

राजानें, कोण येथें आहे? असें ह्मटल्याबरोबर, मी आहें, आज्ञा महाराज, असें ह्मणावें; आणि आपणाकडून होईल तितकें करून सांगितल्याप्रमाणें करावें.

आणखी,—

अल्प इच्छिणारा, धैर्यवान्, सावलीप्रमाणें पाठीमागें असणारा, हुकूम केला असतां शंका न घेणारा, असा असेल तर त्यानें राजाच्या वरीं रहावें.

**करटक**—कदाचित् भलत्याच वेळेस जवळ गेल्यामुळें राजा तुझा अपमान करील.

**दमनक**—हें खरें, तथापि चाकरानें नेहमीं धन्याजवळ अवश्य असलें पाहिजे. कारण,—

अडचणीच्या भयानें कार्य न आरंभिणें हें कुपुरुषाचें लक्षण आहे. दादा, अजीर्णाच्या भयानें भोजन कोण टाकतो? आणखी असें पहा कीं,—

जवळ असलेला मनुष्य विद्याहीन, अकुलीन, वाईट, असा असला तरी राजा त्यावर प्रीति करतो. राजे, स्त्रिया व लता हीं बहुतकरून जवळ असलेल्या वस्तूंचा आश्रय करतात.

**करटक**—तेथें जाऊन तू काय बोलशील?

**दमनक**—प्रथमतः स्वामी आपणास अनुकूल किंवा प्रतिकूल आहे हें पाहीन.

**करटक**—हें तुला कसें कळेल?

**दमनक**—ऐका. दुरून पाहणें, हंसणें, आदरपूर्वक प्रश्न करणें, पाठीमागें सुद्धां स्तुति करणें, प्रिय वस्तूच्या वेळेस स्मरण करणें, सेवा केली नाहीं ह्मणून न रागावणें, देणें, गोड बोलणें, दोष असतांही त्यांतील गुण घेणें, हीं अनुरक्त स्वामीचीं चिन्हें समजावीं.

दुसरें,—

कार्य लांबणीवर टाकणें, आशा वाढवून सफल न करणें, हीं शहाण्यानें प्रतिकूल धन्याचीं चिन्हें समजावीं.

हें जाणून जेणेंकरून तो माझ्या स्वाधीन होईल तसें करीन. कारण,—

बुद्धिमान् जे आहेत ते नीतिशास्त्राचा विचार करून असें सांगतात कीं, विघ्नें पाहूं लागलें ह्मणजे कार्यनाश होतो, परंतु, उपाय शोधूं लागलें असतां सिद्धि होते.

**करटक**—हें खरें, तथापि प्रसंगाशिवाय बोलणें योग्य नाहीं.

कारण,—

बृहस्पतिही अप्रासंगिक बोलूं लागला असतां त्याचा मूर्खपणा दिसून अपमान होईल.

**दमनक**—दादा, भिऊं नको. मी अप्रासंगिक बोलणार नाहीं, परंतु,—

आपत्ति प्राप्त झाली असतां, कुमार्गी गमन होत असतां, कार्याची वेळ निघून जात असतां, हितेच्छूनें विचारल्याशिवायही बोलावें.

वेळ आली असतांही जर मी मसलत सांगणार नाहीं, तर मी प्रधान होण्यासच योग्य नाहीं. कारण,—

गुणवान् ज्या गुणाच्या योगानें उपजीवन करतो, लोकांत प्रशंसा पावतो, तो गुण त्यानें रक्षण करून वाढवावा.

यासाठीं दादा, मला जाण्यास अनुमोदन दे. जातों बरें.

**करटक**—तुझें कल्याण असो, वाटेनें सुखरूप जा. तुझी इच्छा असेल तसें कर.

नंतर दमनक चकित झाल्याप्रमाणें होऊन पिंगलकाजवळ गेला. दुरून पाहिल्यावरोबर राजानें जवळ बोलावून त्याचा आदर केला, तेव्हां त्यास साष्टांग नमस्कार घालून खालीं बसला. नंतर उभयतां बोलूं लागले.

**पिंगलक**—दमनका, फार दिवसांनीं दृष्टीस पडलास.

**दमनक**—मी सेवक आहें. माझी महाराजांच्या पायांस कांहीं गरज आहे असें नाहीं. तथापि प्रसंगीं सेवकानें धन्याच्याजवळ अवश्य असावें ह्मणून मी आलों आहें.

आणखी असें आहे कीं,—

हे राजा, मोठ्या समर्थांसही दांत कोरण्यास किंवा कान खाजविण्यास गवताची काडी देखील उपयोगीं पडते; मग वाणी, हात, पाय, वगैरे ज्यास अवयव आहेत अशाचा उपयोग कां होणार नाहीं ?

फार दिवस महाराजांनीं मजकडे दुर्लक्ष केलें आहे. तथापि माझी बुद्धि मंद झाली आहे अशी शंका घेऊं नये. कारण,—

अग्नि खालीं केला तरी त्याची ज्वाळा वर यावयाचीच. त्याप्रमाणें धैर्यवान् जो आहे त्याचा अपमान झाला तरी बुद्धिभ्रंश व्हावयाचा नाहीं.

यासाठीं महाराज, आपण सर्व गोष्टी लक्षांत ठेवाव्या; कारण,—

हिरा पायांखालीं लोळवून कांचेचा खडा जरी मस्तकावर धारण केला, तरी हिरा तो हिराच आणि कांच ती कांचच.

दुसरें,—

राजा सर्व चाकरांस सारखाच पाहूं लागला ह्मणजे उद्योग करण्यास समर्थ असतात त्यांचा उत्साह नाहींसा होतो.

आणखी,—

हे राजा; चांगले, वाईट, मध्यम, असे तीन प्रकारचे लोक असतात, त्यांस त्याप्रमाणेंच तीन प्रकारच्या कामांवर ठेवावें.

कारण,—

चाकर आणि अलंकार यांची योग्य स्थलीं योजना केली पाहिजे. शिरपेंच पायांत घालीत नाहींत, व घागऱ्या डोक्यावर घालीत नाहींत.

दुसरें,—

सोन्याच्या आंगठीवर बसविण्यास योग्य असा हिरा जर शिशावर बसविला, तर तो रडत नाहीं व शोभाही देत नाहीं, परंतु बसविणाऱ्यास मात्र लोक मूर्ख ह्मणतात.

आणखी,—

जर कोणीं मुकुटावर कांचेचा खडा बसविला; आणि पायाच्या अ-

लंकारावर हिरा बसविला तर हिऱ्याची योग्यता कमी होते असें नाहीं, परंतु त्याला गुणाची परीक्षा नाहीं हें मात्र सिद्ध होतें. कारण,—

जो राजा हा बुद्धिमान्, हा स्वामिभक्त, हा शूर, ह्यापासून भय आहे, असा सेवकांविषयीं विचार करतो, त्याचेंच सेवकांपासून हित होतें.

ह्मटलें आहे.—

घोडा, शस्त्र, शास्त्र, वीणा, वाणी, स्त्री, पुरुष, हीं ज्याजवळ असतील, तीं त्याप्रमाणें चांगलीं किंवा वाईट होतील.

दुसरें,—

हे राजा, राजभक्त असून अशक्त असला, किंवा शूर असून अपकार करणारा असला, तर त्याचा काय उपयोग? मी राजभक्त असून शूर आहें. याकरितां माझा अपमान करणें आपणांस योग्य नाहीं. कारण,—

शहाण्या सेवकाचा अपमान केला तर तो खिन्न होतो, हें पाहून दुसरे शहाणे लोक जवळ येत नाहींत, शहाणे राज्यांतून गेले ह्मणजे नीति चांगली रहात नाहीं, नीति भ्रष्ट झाली ह्मणजे आपोआप सर्व पृथ्वीचा नाश होतो.

दुसरें,—

राजा ज्याचा सन्मान करितो, त्यास लोक मान देतात. राजा ज्याचा अपमान करितो, त्याचा लोक अपमान करितात.

आणखी,—

शहाण्यांनीं उत्तम भाषण मुलांपासूनसुद्धां ऐकावें. सूर्य नसला ह्मणजे दिव्याच्या उजेडानें पहात नाहींत काय?

**पिंगलक**—दमनका, हें काय ह्मणतोस? तू आमच्या मुख्य प्रधानाचा मुलगा, इतक्या दिवस कोणा दुष्टानें चाहाडी सांगितल्यावरून आला नाहींस. आतां सांग काय पाहिजे तें?

**दमनक**—महाराज, विचारितों एवढें सांगावें. आपण पाणवठ्यावर जाऊन उदक प्राशन केल्याशिवाय परत येऊन चकित झाल्याप्रमाणें कां बसलां?

**पिंगलक**—त्वां बरें विचारिलें. गुप्त गोष्ट सांगण्यास कोणी विश्वासू नाहीं, तथापि कोणास न कळवितां तुला मात्र सांगतों; ऐक. हल्लीं या रानांत कोणी विलक्षण प्राणी आला आहे. याकरितां हें सो-

ढून देऊन आपणांस दुसरीकडे गेलें पाहिजे. यासाठीं मी चकित झालों. मीं त्याचा मोठा अपूर्व शब्दही ऐकिला. त्यावरून असें वाटतें कीं, याचें बळ मोठें असेल.

**दमनक**—महाराज, हें मोठें भयाचें कारण खरें. तो शब्द आह्मींही ऐकिला. परंतु जो प्रथम आपलें स्थान सोडून मग लढाई करण्यास सांगतो, तो प्रधान ह्मणावा काय? आणखी दुसरें असें कीं, अशा संशयाच्या वेळेसच सेवकाचा उपयोग जाणावा. कारण,—

आप्त, बायको, चाकर, यांच्या बुद्धीचें व बलाचें सामर्थ्य मनुष्यास आपत्तिरूप कसोटीनें कळतें.

**पिंगलक**—मला मोठी भीति वाटते.

**दमनक**—(मनांत) एरव्हीं राज्यसुख सोडून दुसरीकडे जातों असें मजजवळ कसें बोलशील? (उघड) महाराज, मी जिवंत आहें तोंपर्यंत भिण्याचें कारण नाहीं. परंतु करटक वगैरे मंडळीसही आश्वासन द्यावें. कारण संकट दूर करण्यास आयत्या वेळेस पुष्कळ लोक जमणें कठीण.

नंतर दमनक आणि करटक यांस सर्वस्व देऊन राजानें त्यांचा सत्कार केला. नंतर वाटेनें जात असतां करटक दमनकास ह्मणतो,—

गड्या, आपणास भयाचें कारण दूर करतां येईल किंवा नाहीं, हें न जाणून भय नाहींसें करतों अशी प्रतिज्ञा करून ही मोठी देणगी त्वां कशी घेतली? कारण उपकार केल्याशिवाय कोणापासून बक्षीस घेऊं नये. राजापासून तर घेऊंच नये. कारण,—

त्यामध्यें सर्व तेजें वास करितात, त्याच्या कृपेच्याठायीं लक्ष्मी आहे, आणि क्रोधाच्याठायीं मृत्यु आहे.

ह्मटलें आहे,—

लहान आहे, मनुष्य आहे, असें समजून राजाचा अपमान करूं नये. कारण ही मनुष्यरूप मोठी देवताच आहे.

**दमनक**—(हसून) उगाच बैस. मला भयाचें कारण ठाऊक आहे. बैलानें डुरकी फोडिली. बैलास आह्मी देखील खातों; मग सिंहाविषयीं काय विचारावें?

**करटक**—असें आहे तर राजाची भीति तेथल्यातेथेंच दूर कां त्वां केली नाहीं?

दमनक—राजाची भीति तेथेंच दूर केली असती तर हा एवढा प्रसाद कसा प्राप्त झाला असता? कारण,—

चाकरानें धन्याची गरज कधींही नाहींशी करून टाकूं नये. धन्याची गरज नाहींशी केली तर चाकर दधिकर्णाप्रमाणें होईल.

करटक—ही काय गोष्ट आहे?

दमनक—उत्तरेकडे अर्बुदशिखर नांवाच्या पर्वतावर दुर्दांत नांवाचा सिंह आहे. तो पर्वताच्या शिखरावर निजला ह्मणजे एक उंदीर रोज त्याची सटा कुरतुडीत असे. एके दिवशीं सटा तुटलेली पाहून त्यास मोठा राग आला. परंतु उंदीर बिळांत असल्यामुळें त्यास सांपडेना; तेव्हां तो ह्मणाला,—

क्षुद्र शत्रु असतो तो पराक्रमानें हातीं येत नाहीं. त्यास मारण्यास त्याच्यासारखाच वीर पाठविला पाहिजे.

असा विचार करून गांवांत जाऊन दधिकर्ण नांवाच्या बोक्यास अभयवचन देऊन त्यानें आणिलें; आणि त्यास मांस खावयास देऊन गुहेंत ठेविलें. नंतर त्याच्या भयामुळें उंदीरही बिळांतून बाहेर येईनासा झाला. त्यामुळें सिंहाची सटा चांगली पूर्वीप्रमाणें होऊन तो स्वस्थ निजूं लागला. उंदराचा शब्द ऐकूं येऊं लागला ह्मणजे बोक्यास अधिकाधिक मांस खावयास देई. नंतर एके दिवशीं उंदरास फार भूक लागल्यामुळें तो बाहेर आला तेव्हां त्यास पकडून बोक्यानें मारलें. नंतर पुष्कळ दिवसांत उंदीर दृष्टीस पडला नाहीं, व त्याचा शब्दही ऐकूं आला नाहीं; त्यामुळें सिंह बोक्यास खावयास घालण्याची हेळसांड करूं लागला. त्यामुळें उपाशीं मरून शक्ति क्षीण होऊन दधिकर्णही मेला. ह्मणून मी सांगतों कीं, धन्याची गरज नाहींशी करूं नये.

नंतर दमनक आणि करटक दोघेही संजीवकाकडे गेले. करटक मोठ्या डौलानें झाडाखालीं बसला आणि दमनक संजीवकाजवळ जाऊन ह्मणाला, अरे वृषभा, पिंगलक राजानें अरण्यरक्षणाकरितां नेमिलेला सेनापति करटक तुला हुकूम करतो कीं, लवकर येऊन मला भेट, नाहींतर या वनांतून निघून जा. त्वां ऐकिलें नाहीं तर भलतेंच होईल. राजाला राग आला तर काय करील हें सांगवत नाहीं. हें ऐकून संजीवक ह्मणाला,—

राजांचा अज्ञाभंग, ब्राह्मणांचा अनादर, आणि स्त्रीची पृथक्शय्या हा शस्त्राशिवाय केलेला वधच आहे.

नंतर देशांतील चाल रीत ठाऊक नसल्यामुळें भयानें करटकाजवळ जाऊन त्यानें त्यास साष्टांग नमस्कार घातला.

ह्मटलें आहे,—

हत्तीवर बसून महातानें वाजविलेला नगारा आपल्या घोषानें जसा काय लोकांस सांगतोच कीं, बलापेक्षां बुद्धिच मोठी आहे; ती नसल्यामुळें हत्तीची अशी दशा झाली आहे.

**संजीवक**—(भिऊन) सेनापतिसाहेब, म्यां काय करावें तें सांगावें.

**करटक**—या अरण्यांत राहतोस याकरितां आमच्या महाराजांच्या चरणांचें वंदन कर.

**संजीवक**—ठीक आहे, मला अभयवचन असावें. हा चाललों.

**करटक**—वृषभा, सांगतों ऐक. ही शंका घेण्याचें कारण नाहीं. कारण,—

शिशुपाल भलभलतें बोलूं लागला तेव्हां कृष्णानें त्याला उत्तर दिलें नाहीं; मेघगर्जना झाली ह्मणजे सिंह हुंकार करितो; भालु ओरडली तर करीत नाहीं.

दुसरें,—

वारा तृणांला उपटीत नाहीं, कारण तीं सर्वदा मऊ असून लवलेलीं अशीं असतात; परंतु उंच झाडांस मोडितो, कारण, मोठा मोठ्याजवळ पराक्रम दाखवितो.

नंतर संजीवकाला कांहीं अंतरावर उभा करून ते दोघे पिंगलकाजवळ गेले: तेव्हां राजानें सन्मानपूर्वक अवलोकन केलें. नंतर त्यास नमस्कार करून खालीं बसले.

**पिंगलक**—तो प्राणी तुमच्या दृष्टीस पडला काय ?

**दमनक**—महाराज, आह्मीं त्यास पाहिलें. परंतु आपणांस जें वाटलें होतें तेंच खरें झालें. हा मोठा विलक्षण प्राणी आहे; तरी महाराजांची भेट घेण्यास इच्छितो. परंतु हा मोठा बळकट आहे, याकरितां आपण नीट तयारीनें राहून याची भेट घ्यावी. केवळ त्याच्या शब्दाला भिऊं नये. ह्मटलें आहे,—

शब्दाचें कारण कळल्याशिवाय शब्दाला भिऊं नये. शब्दाचें कारण ठाऊक असल्यामुळें कुंटिणीची मोठी प्रतिष्ठा झाली.

**पिंगलक**—ही काय गोष्ट आहे ?

**दमनक**—श्रीपर्वताजवळ ब्रह्मपूर नांवाचें नगर होतें. त्या पर्व-

ताच्या शिखरावर घंटाकर्ण नांवाचा राक्षस राहतो, असें लोक बोलत असत. एके समयीं एक चोर घंटा चोरून जात असतां त्यास वाघानें मारिलें. त्याच्या हातांतून पडलेली घंटा एका वानरास सांपडली. तो ती नेहमीं वाजवूं लागला. पुढें तो मनुष्य खाल्ला, असें लोकांनीं ऐकिलें; तेव्हां घंटाकर्ण रागावला आहे, तो माणसें खातो आणि घंटा वाजवितो, असें समजून लोक नगरांतून पळून गेले. तेव्हां तेथें एक कराला नांवाची कुंटीण रहात होती. तिला वाटलें कीं भलत्याच वेळेस घंटा वाजते ही बहुतकरून वानरांनीं वाजविलेली असावी. नंतर तिनें याचा पक्का शोध करून राजास अर्ज केला कीं, जर बरेंच द्रव्य खर्चाल तर मी या घंटाकर्णाचा नाश करितें. तेव्हां तिला राजानें द्रव्य दिलें. नंतर तिनें गणपतिपूजन वगैरे पुष्कळ ढोंग करून वानरांस आवडणारीं कांहीं फळें बरोबर घेऊन रानांत जाऊन तीं फळें फेंकून दिलीं. तेव्हां वानर घंटा टाकून फळांकडे गेला. कुंटीण घंटा घेऊन नगरास आली, तेव्हां सर्वांनीं तिचा मोठा सन्मान केला. ह्मणून मी सांगतों कीं, शब्दाचें कारण कळल्याशिवाय भिऊं नये.

नंतर संजीवकास त्या दोघांनीं राजाजवळ आणिलें. तेव्हां बैल आणि सिंह दोघेही मोठ्या प्रीतीनें राहूं लागले. कांहीं दिवसांनीं स्तब्धकर्ण नांवाचा सिंहाचा भाऊ तेथें आला. त्याचा आदरसत्कार करून बसावयास सांगून पिंगलक त्यास खावयास देण्याकरितां पशू मारण्यास चालला. तेव्हां संजीवक ह्मणाला, महाराज, आज मारलेल्या हरिणांचें मांस कोठें आहे?

**सिंह**—दमनक आणि करटक यांस माहीत असेल.

**संजीवक**—महाराज, आहे कीं नाहीं याविषयीं चौकशी करावी.

**सिंह**—( चौकशी करून ) तें नाहींसें झालें.

**संजीवक**—इतकें मांस त्यांनीं कसें खाल्लें?

**सिंह**—खाल्लें, दिलें, नासलें, रोज हेंच चाललें आहे.

**संजीवक**—महाराजांस कळविल्याशिवायच ते असें करितात काय?

**सिंह**—मला कळविल्याशिवाय करितात.

**संजीवक**—हें चांगलें नव्हे. ह्मटलें आहे,—

हे राजा, आपत्तीचा प्रतीकार करणें याशिवाय धन्यास कळविल्याशिवाय कांहींही करूं नये.

हे राजा, प्रधान कमंडलूसारखा पुष्कळ सांठविणारा आणि थोडें देणारा असावा. ज्याला क्षणाचें मोल वाटत नाहीं तो मूर्ख, आणि ज्याला कवडीची किंमत वाटत नाहीं तो दरिद्री.

जो कवडीपासून वाढवील तोच प्रधान चांगला. राजाचा प्राण जामदारखाना आहे.

आणखी असें आहे कीं, दुसरे कितीही गुण अंगीं असले तरी धनाशिवाय पुरुष सेव्य होत नाहीं. द्रव्यहीन झाला ह्मणजे त्यास वायको देखील टाकिते, मग लोक टाकितील यांत काय आश्चर्य ?

फार खर्च, निरिच्छपणा, अधर्मानें धन संपादन करणें, अव्यवस्था, आपण दूर रहाणें, या गोष्टींनीं खजीन्याची अव्यवस्था होते.

उत्पन्नाचा विचार न करितां यथेच्छ खर्च करितो, तो कुबेरासारखा श्रीमान् असला तरी भिकारी होतो.

**स्तब्धकर्ण**—दादा, मी सांगतों ऐक. दमनक करटक हे आपले पुष्कळ दिवसांचे चाकर आहेत. लढाई, तह, वगैरे करण्याचें काम यांकडे आहे, यांस द्रव्याच्या कामावर कधीं नेमूं नये. कोणत्या कामावर कोणता मनुष्य नेमावा याविषयीं मीं ऐकिलें आहे तें सांगतों.

ब्राह्मण, क्षत्रिय, अथवा आप्त, हे अधिकारावर योग्य नाहींत. पैसा येणें असला तरी मोठ्या पंचाइतीनेंसुद्धां ब्राह्मण देत नाहीं. क्षत्रिय असला तर तो लागलीच तलवार दाखवितो. आप्त असला तर तो नात्यामुळें आपलाच पगडा चालवून सर्व नाहींसें करितो.

फार दिवसांचा चाकर असतो तो अपराध घडला तरी भीत नाहीं. धन्याचा अपमान करून पाहिजे तसा वागूं लागतो.

ज्यानें आपणावर उपकार केला आहे त्यास अधिकार दिला तर तो आपला अपराध मानीत नाहीं. उपकार पुढें करून सर्व लुटतो.

प्रधानाबरोबर थट्टाविनोद केल्यास तो राजाप्रमाणें करूं लागतो.

प्रधान श्रीमान् झाला तर तो आपल्या स्वाधीन राहणार नाहीं. साधूंचें असें सांगणें आहे कीं, संपत्ति चित्तास विकार करणारी आहे.

हें सर्व योग्य वेळीं जाणून वागावें.

**पिंगलक**—हें खरें, पण हे दोघे माझें मुळींच ऐकत नाहींत.

**स्तब्धकर्ण**—हें तर फारच अयोग्य. कारण,—

आज्ञाभंग केल्यास राजानें आपल्या मुलाचीसुद्धां क्षमा करूं नये. मग नुसती प्रीति असलेल्या मनुष्याविषयीं काय मोठी पंचाईत आहे ?

आळशी असतो त्याची कीर्ति, कपट्याचा स्नेह, ज्याचीं इंद्रियें नष्ट

झालीं त्याचें कुल, केवळ द्रव्य मिळविण्याकडे लक्ष देतो त्याचा धर्मः व्यसनी असतो त्याच्या विद्येचें फळ, कृपणाचें सौख्य, आणि ज्याचे प्रधान उन्मत्त झाले आहेत अशा राजाचें राज्य, हीं नष्ट होतात.

दुसरें,—

चोर, अधिकारी, शत्रु, आपल्या मेहरबानींतला मनुष्य, आणि आपला लोभ, यांपासून राजानें पित्याप्रमाणें प्रजांचें रक्षण करावें.

दादा, सर्वप्रकारें मी सांगतों त्याप्रमाणें वागावें. मला व्यवहाराची पुष्कळ माहिती आहे. हा संजीवक गवत खाणारा आहे, याकरितां यास जामदारखान्यावर नेमावें.

याप्रमाणें केल्यावर पिंगलकाचा संजीवकाशीं फारच स्नेह जमून सर्व मित्रांस टाकून ते दोघे पुष्कळ दिवस स्वस्थ राहिले. तेव्हां चाकरांस खाण्यास देण्याची देखील हयगय होऊं लागली. हें पाहून दमनक आणि करटक एकमेकांशीं विचार करूं लागले.

**दमनक**—करटका, काय करावें, हा आपलाच दोष आहे. तरी त्याविषयीं आतां शोक करून उपयोग नाहीं.

**करटक**—हें खरें, परंतु या दोघांचा स्वभाव जमून फार दृढ स्नेह झाला आहे, तो कसा मोडेल ?

**दमनक**—उपाय करावा. ह्मटलें आहे,—

उपायानें करितां येतें तें पराक्रमानें होत नाहीं. कावळीनें सुवर्णाच्या हारानें कृष्णसर्प मारिला.

**करटक**—ही काय गोष्ट आहे ?

**दमनक**—एका झाडावर कावळयाचा जोडा होता, त्याचीं पिलें त्या वृक्षाच्या ढोलींत राहणाऱ्या कृष्णसर्पानें खाल्लीं. नंतर पुनः गरोदर झाल्यावर कावळी कावळयास ह्मणाली, हें झाड आतां सोडून द्यावें. एथें राहणारा कृष्णसर्प नेहमीं आपलीं पिलें खातो.

दुष्ट बायको, लुच्चा मित्र, उलट जबाब करणारा चाकर, सर्प असलेल्या घरांत राहणें, हा केवळ मृत्युच आहे.

**कावळा**—प्रिये, भिऊं नको. मीं वारंवार याचे मोठे अपराध सोसले, आतां पुनः क्षमा करणार नाहीं,

**कावळी**—या बळकटाबरोबर तुह्मांस कसें भांडतां येईल ?

**कावळा**—याची शंका नको. कारण,—

ज्याला बुद्धि त्याला बळ. निर्बुद्धाला बळ कोठलें? पहा मदोन्मत्त सिंह सशानें मारिला.

**कावळी**—ही काय गोष्ट आहे?

**कावळा**—मंदरपर्वतावर दुर्दांत नांवाचा सिंह रहात असे. तो नेहमीं पशूंचा वध करीत असे. तेव्हां सर्व पशूंनीं मिळून त्यास विनंती केली कीं, एकदम पशु कशास मारितां? कृपा कराल तर आह्मीच रोज तुह्मांस खाण्याकरितां एक एक पशु पाठवीत जाऊं.

सिंह ह्मणाला, तुमची मर्जी असली तर असें होऊं द्या. तेव्हांपासून पशूंनीं पाठविलेला एक पशु खाऊन सिंह रहात असे. नंतर एके दिवशीं ह्मातार्‍या सशावर पाळी आली. तेव्हां त्यानें विचार केला,—

पीडा होऊं लागली ह्मणजे जगण्याच्या आशेनें आर्जवें करावयाचीं. मरणेंच आहे, तर सिंहाचें आर्जव करून मला काय करावयाचें?

असें आहे तर हळूहळू जातों. नंतर सिंहही क्षुधेनें पीडित झाल्यामुळें रागानें त्यास ह्मणाला, कांरे उशीरानें आलास?

**ससा**—मी अपराधी नाहीं. वाटेनें येत असतां दुसर्‍या सिंहानें पकडलें, तथापि पुनः येईन अशी त्यापाशीं शपथ वाहून महाराजांस सांगण्यास येथें आलों.

**सिंह**—(रागावून) जवळ जाऊन तो दुष्ट कोठें आहे तें दाखीव.

नंतर त्यास घेऊन एका खोल विहिरीजवळ जाऊन महाराज, खरें कीं खोटें तें आपणच पहा, असें ह्मणून सशानें त्या विहिरीच्या पाण्यांत त्यास त्याचेंच प्रतिबिंब दाखविलें. तेव्हां रागावून जबडा पसरून पंजे आपटून सटा उभारून सिंहानें आंतल्या सिंहावर उडी टाकिली, तेव्हां तो मरून गेला. ह्मणून मी ह्मणतों कीं, ज्याला बुद्धि त्याला बळ.

**कावळी**—म्यां सर्व ऐकिलें. आतां काय करावें तें सांगा.

**कावळा**—येथील जवळच्या सरोवरावर राजपुत्र रोज स्नानास येतो. अंघोळीच्या वेळेस त्यानें सोन्याचा हार अंगावरून काढून तीरावरील दगडावर ठेविला ह्मणजे तो या ढोलींत आणून ठेव.

नंतर एके समयीं राजपुत्र स्नान करण्यास पाण्यांत शिरला असतां कावळीनें त्याप्रमाणें केलें. तेव्हां हार शोधण्याकरितां पाठीमागून आलेल्या राजाच्या सेवकांनीं झाडाच्या ढोलींत कृष्णसर्प पाहिला आणि मारिला. ह्मणून मी सांगतों कीं, उपायानें होतें तें पराक्रमानें होत नाहीं.

करटक—अस असेल तर तू जा. मार्गांत तुझें कुशल असो.

नंतर दमनक पिंगलकाजवळ जाऊन ह्मणाला, महाराज, मोठा विकट भयंकर प्रसंग गुदरला आहे; ह्मणून आलों आहें. कारण,—

हितेच्छूनें आपत्कालीं, दुर्मार्गगमनकालीं, व कार्याची वेळ निघून जात असतां, विचारल्याशिवायही चांगलें असेल तें सांगावें.

दुसरें,—

उपभोग करणें राजाकडे आहे; कामें करणें राजाकडे नाहीं. राजाच्या कामाचा घात झाला तर प्रधानास दोष लागतो. पहा, प्रधानाची काय अवस्था आहे ती.

प्राण गेलेला बरा, शिरछेद झालेला पतकरला, परंतु राजाचें पद प्राप्त करून घेण्याचें पातक करण्यास जो इच्छितो, त्याची उपेक्षा करणें ठीक नाहीं.

पिंगलक–(सन्मानपूर्वक) तुह्मी काय ह्मणतां?

दमनक–महाराज, संजीवक तुमच्याशीं अयोग्य वर्तन करितो असें दिसतें. आमच्यासमक्ष महाराजांचा उत्साह, मसलत, सामर्थ्य, यांची निंदा करून राज्य घेईन असें ह्मणतो.

हें ऐकून पिंगलक भयानें व आश्चर्यानें चकित होऊन उगाच बसला.

दमनक–महाराज, सर्व प्रधान दूर करून या एकट्यासच सर्व अधिकार आपण दिला त्याचा दोष हा. कारण,—

राजा आणि प्रधान दोघेही जबरदस्त झाले ह्मणजे लक्ष्मी कांहीं वेळ राहते. परंतु ती स्त्रीस्वभावाची असल्यामुळें दोघांचा भार सोसण्यास असमर्थ होऊन दोघांतून एकास सोडिते.

दुसरें,—

राजानें सर्व राज्याचा अधिकार एकासच दिला ह्मणजे तो लक्ष्मीच्या मोहानें उन्मत्त होतो, उन्मत्त झाला ह्मणजे आळशी होतो. आळशी झाला ह्मणजे त्यास स्वतंत्रतेची इच्छा होते, स्वातंत्र्याची इच्छा झाली म्हणजे राजाचा द्वेष करून त्याच्या मरणाची इच्छा करितो.

आणखी,—

आंधळा जसा कोणी वाट दाखविण्यास नसला ह्मणजे दुःख पावतो; त्याप्रमाणें जो राजा सर्व राज्यलक्ष्मीचा कारभार प्रधानाच्या स्वाधीन करतो, तो प्रधान नाहींसा झाला ह्मणजे दुःख पावतो.

विशेषेंकरून,—

प्रधान अतिश्रीमान् झाला ह्मणजे स्वाधीन रहात नाहीं. साधूंचें ह्मणणें आहे कीं, संपत्ति चित्तास विकार करणारी आहे.

तो सर्व कामें आपल्या मनास वाटेल त्याप्रमाणें करितो, याविषयीं आपला आपणच विचार करा. मला एवढें ठाऊक आहे,—

ज्यास लक्ष्मी नको असा पुरुष जगांत नाहीं. परस्त्री तरुण, रूपवान् असली तर तिला लक्षपूर्वक कोण पहाणार नाहीं?

**सिंह**–(विचार करून) असें असेल, परंतु संजीवकाशीं माझा मोठा स्नेह आहे. पहा,—

पुष्कळ वाईट केलें तरी जो आवडता तो आवडताच. अनेक दोषांनीं युक्त असला तरी देह कोणास प्रिय नाहीं?

दुसरें,—

वाईट केलें तरी आवडता तो आवडताच. वरदार जळालें तरी अग्नि कोणास नकोसा झाला आहे काय?

**दमनक**–हेंच फार वाईट. कारण,—

ज्याकडे राजा अधिक लक्ष पुरवितो तो मुलगा असो, प्रधान असो, किंवा तिऱ्हाईत असो, लक्ष्मी त्याचा आश्रय करिते. महाराज, ऐका,—

अप्रिय असलें तरी परिणामीं चांगलें असें बोलणारा आणि ऐकणारा जेथें आहे तेथेंच संपत्ति रममाण होते.

तुह्मीं मूळच्या सेवकांस दूर करून हा आगंतुक हातीं धरिला हें अयोग्य केलें. पहा,—

मूळच्या सेवकांस टाकून देऊन आगंतुकाचा मान करूं नये, कारण राज्यांत फुटाफूट करणारा यासारखा दुसरा कोणताही दोष नाहीं.

**सिंह**—यांत मोठें आश्चर्य काय आहे? ज्यास अभिवचन देऊन म्यां आणिलें आणि वाढविलें तो कसा माझा द्वेष करील?

**दमनक**—कुत्र्याचें वांकडें शेंपूट भिजविलें, तेलानें चोपडिलें, तरी सरळ होत नाहीं. त्याप्रमाणें दुर्जन जो आहे त्याची रोज बरदास्त ठेविली तरी तो नीट व्हावयाचा नाहीं.

दुसरें,—

कुत्र्याचें शेंपूट चोळून मारखून बारा वर्षें दोऱ्यांनीं बांधून ठेविलें तरी सोडल्यावर जसेंच्या तसें व्हावयाचेंच.

आणखी,—

सन्मान वाढविला ह्मणून दुष्टांचा संतोष कोठून होणार? अमृताचें शिंपणें केलें तरी विषवृक्षास चांगलीं फळें येत नाहींत. ह्मणून मी सांगतों,—

ज्याचा पराभव होऊं नये अशी आपली इच्छा असेल त्यानें विचारल्याशिवायही त्यास त्याच्या हिताची गोष्ट सांगावी; हाच साधूंचा धर्म आहे. दुष्टांचा धर्म याच्या उलट आहे. ह्मटलें आहे,—

जो दुष्कर्मापासून निवृत्त करितो तो मित्र, जें निर्मल तें कर्म, जी मनाप्रमाणें वागते ती बायको, साधु ज्यास मान देतात तो बुद्धिमान्, जी उन्मत्त करीत नाहीं ती संपत्ति, जो निर्लोभी तो सुखी, जो निष्कपट तो मित्र, ज्यास इंद्रियें पीडा देत नाहींत तो पुरुष.

महाराजांस संजीवकाचें व्यसन लागल्यासारखें झालें आहे. विनंति केली असतांही आपण त्यापासून निवृत्त न व्हाल तर सेवकाचा दोष नाहीं.

राजा मोहित झाला ह्मणजे आपलें कर्तव्य काय, आपलें हित कशांत आहे, याचा विचार करीत नाहीं. स्वच्छंद होऊन उन्मत्त झालेल्या हत्तीप्रमाणें यथेष्ट आचरण करितो. नंतर गर्विष्ठ झाल्यामुळें जेव्हां शोकांत पडतो, तेव्हां आपला मूर्खपणा न समजून सेवकास दोष लावितो.

**पिंगलक**—( मनांत ) एकाच्या अपराधानें दुसऱ्यास दंड करूं नये. आपण नीट समजून घेऊन मग दंड करावा किंवा बक्षीस द्यावें. ह्मटलें आहे,—

गुण आणि दोष यांचा निश्चय केल्याशिवाय सन्मान किंवा शिक्षा करूं नये. गर्वानें सापाच्या तोंडांत हात घातला तर आपलाच नाश होतो.

(उघडपणें) तर मग संजीवकास काय सांगावें?

**दमनक**—( त्वरेनें ) हं हं, महाराज, असें करूं नका. अशानें मसलत बाहेर फुटते. ह्मटलें आहे,—

जशी बी जरा फुटली ह्मणजे उगवत नाहीं, त्याप्रमाणें मसलतीचें आहे. याकरितां तिचें चांगलें रक्षण करावें ती जरा फुटली कीं व्यर्थ होते.

आणखी,—

घेणें, देणें, व कोणतेंही काम करणें हीं लवकर केलीं नाहींत तर काल त्यांचा रस शोषून घेतो.

त्याचा दोष दिसूनही दोषांपासून निवृत्त करून त्याशीं पुनः सख्य करणें असेल तर हें फारच वाईट. कारण,—

*खेचरी जशी काय आपल्या नाशाकरितांच गर्भधारण करिते, त्याप्रमाणेंच एकवार विघडलेल्या मित्राशीं जो पुनः सख्य करण्यास इच्छितो, तो मृत्यूलाच बोलावितो असें समजावें.

**सिंह**—तो आमचें काय करण्यास समर्थ आहे, याची चौकशी तर कर.

**दमनक**—एकमेकांचा प्रसंग झाल्याशिवाय सामर्थ्याचा निश्चय कसा करितां येईल ? पहा, एवढ्याशा टिटव्यानें समुद्रास त्रास दिला.

**सिंह**—हें कसें झालें ?

दमनक सांगतो. दक्षिण समुद्राच्या तीरीं एक टिटवी आणि टिटवा राहत असत. टिटवी गरोदर होऊन प्रसूतिकाल जवळ आला असतां टिटव्यास ह्मणाली, महाराज, वाळंत होण्यास चांगली एकीकडे जागा पाहावी.

**टिटवा**—प्रिये, हीच जागा वाळंतपणास योग्य आहे.

**टिटवी**—ही जागा अगदीं समुद्राच्या कांठीं आहे.

**टिटवा**—मी अशक्त आहें काय ? मी समुद्रास बधेन काय ?

**टिटवी**—(हंसून) महाराज, तुह्मी आणि समुद्र यांमध्यें फार अंतर. जो योग्यायोग्य जाणत नाहीं, त्याचा पराभव होतो. परंतु हें ज्यास कळतें, त्याचा संकटकाळींसुद्धां नाश होत नाहीं.

दुसरें,—

वाईट कामाचा आरंभ, स्वजनांशीं वांकडें, बलवानांशीं वैर, स्त्रियांवर विश्वास, हीं चार मृत्यु येण्याचीं दारें आहेत.

नंतर नवऱ्याच्या ह्मणण्याप्रमाणें ती तेथेंच प्रसूत झाली. समुद्रानें त्यांचें भाषण ऐकिलें होतें त्यामुळें टिटव्याचें सामर्थ्य जाणण्याकरितां तीं अंडीं नेलीं. टिटवी शोकानें पीडित होऊन नवऱ्यास ह्मणाली, महाराज, अनर्थ झाला. अंडीं नाहींतशीं झालीं.

**टिटवा**—प्रिये, भिऊं नको.

असें ह्मणून सर्व पक्ष्यांस एकत्र मिळवून पक्ष्यांचा राजा जो गरुड

---

*खेचराची उत्पत्ति घोडा व गाढव यांपासून आहे हें प्रसिद्धच आहे. खेचरीपासून उत्पत्ति होत नाहीं. गर्भ राहिल्यास ती मरते.

त्याकडे जाऊन, तेथें सर्व वृत्तांत त्यापाशीं सांगून ह्मणाला, महाराजः मी आपल्या घरांत असून कांहीं अपराध न करितां समुद्रानें मला त्रास दिला. नंतर त्याचें ह्मणणें ऐकून गरुडानें विश्वाचे उत्पत्तिस्थितिलय करणारा जो भगवान् विष्णु त्यास ही गोष्ट कळविली. विष्णूनें अंडीं परत देण्यास समुद्रास आज्ञा केली. तेव्हां नारायणाची आज्ञा शिरसा वंद्य मानून समुद्रानें टिटव्याला अंडीं परत दिलीं. याकरितां मी ह्मणतों कीं, प्रसंगाशिवाय सामर्थ्याचा निश्चय कसा करितां येईल?

**पिंगलक**—हा आमचा द्वेष करितो हें कसें समजावें?

**दमनक**—जेव्हां हा गर्वानें शिंगें हालवीत समोर धांवत येईल तेव्हां महाराजांस कळेल.

याप्रमाणें बोलून तो संजीवकाजवळ गेला. तेथें हळूहळू जाऊन आश्चर्ययुक्त झाल्याप्रमाणें उभा राहिला.

**संजीवक**—(सन्मानपूर्वक) कसें काय, बरें आहेना?

**दमनक**—सेवकांना कोठून बरें असणार? कारण,—

जे राजाचे चाकर असतात त्यांची संपत्ति पराधीन, चित्त नेहमीं अस्वस्थ, आणि जीव जाण्याचा देखील धाक, याप्रमाणें अवस्था असते.

दुसरें,—

संपत्ति मिळून गर्व कोणास झाला नाहीं? कोणत्या विषयी पुरुषाच्या आपत्ति नाहींतशा झाल्या? जगांत स्त्रियांनीं कोणाचें मन बिघडविलें नाहीं? राजांचा आवडता कोण आहे? काळाच्या तावडींत कोण सांपडला नाहीं? कोणत्या याचकाची प्रतिष्ठा झाली? आणि दुर्जनाच्या फांसांत सांपडल्यावर कोण सुरक्षित सुटून गेला?

**संजीवक**—मित्रा, काय आहे तें सांग.

**दमनक**—मी दुर्दैवी, सांगूं काय? पहा,—

कोणी समुद्रांत पडून गटांगळ्या खाऊं लागल्यामुळें धरावयास गेला तों साप हातीं लागला, मग त्यास धरवेना आणि सोडवेना, त्याप्रमाणें माझी अवस्था झाली आहे. कारण,—

एकीकडे राजाचा विश्वास नाहींसा होतो, दुसरीकडे मित्र नाहींसा होतो, यामुळें दुःखसमुद्रांत पडलों आहें. आतां करूं काय आणि जाऊं कोठें? असें बोलून मोठा उसासा टाकून खालीं बसला.

**संजीवक**—मी काय करतों तें तुला ठाऊक आहेच. तरी मित्रा, काय मनांत आहे तें सविस्तर सांग.

दमनक हळूच कानांत सांगतो. राजानें विश्वासानें सांगितलेली गोष्ट सांगूं नये. परंतु तू आमच्या सांगण्यावरून येथें येऊन राहिलास याकरितां ईश्वराला भिऊन म्यां तुझें हित असेल तें सांगितलें पाहिजे. ऐक. हा राजा तुजवर रागावला आहे; त्यानें मला गुप्तपणें सांगितलें कीं, संजीवकालाच मारून आह्मांला खाऊं घालून संतुष्ट करतों. हें ऐकून संजीवकास फारच दुःख झालें.

**दमनक**–दुःख करून काय करावयाचें? आलेल्या प्रसंगास योग्य असेल तें करावें.

**संजीवक**—(क्षणभर विचार करून) हें खरें, ह्मटलें आहे, स्त्रिया दुर्जनांस वश होतात, राजा दुष्टांस आश्रय देतो, कृपणांस द्रव्य मिळतें, आणि पाऊस पर्वतावर व समुद्रावर पडतो.

(मनांत) न जाणो कदाचित् कोणा दुष्टाचेंच कृत्य असेल. हें व्यवहारांत निर्णय करणें मोठें बिकट आहे. कारण,—

बायकांच्या डोळयांत काजळ घातलें ह्मणजे चांगलें दिसतें; त्याप्रमाणें कित्येक दुर्जन मोठ्याजवळ असल्यामुळें चांगले वाटतात.

पुनः विचार करून ह्मणतो, हें फारच वाईट आहे.

राजाची प्रयत्नानें सेवा केली तरी तो संतुष्ट होत नाहीं. यांत काय आश्चर्य आहे? परंतु सेवा करून शत्रु होतो हें मात्र अपूर्व आहे.

आतां याविषयीं यत्न करणें कठिण आहे. कारण,—

जो कारणानें रागावतो, तो तें कारण नाहींसें झाल्यावर चांगला होतो; परंतु विनाकारण द्वेष करणारें ज्याचें मन आहे, त्याचा संतोष लोक कसा ठेवितील?

म्यां राजाचें काय वाईट केलें? किंवा राजे कारणाशिवायच अपकार करतात.

**दमनक**—असेंच खरें, ऐक—

एकादा, शहाणे प्रीति करणारे अशांनीं उपकार केला तरी द्वेष करितो, दुसऱ्यांनीं अपकार केला तरी त्यांवर प्रीतिच करितो; ज्यांची बुद्धि स्थिर नाहीं अशांचें यापेक्षां चमत्कारिक आचरण तें कोणतें? सेवा करणें फार कठिण आहे. तें योग्यास देखील साधावयाचें नाहीं.

दुसरें,—

दुष्टांवर शेंकडों उपकार केले तरी व्यर्थ, मूर्खांस शेंकडों चांगल्या गोष्टी सांगितल्या तरी व्यर्थ; आणि अप्रबुद्धांस शंभर वेळां शिकविलें तरी व्यर्थ.

आणखी;—

मुळांत साप, फुलांवर भ्रमर; खांद्यांवर वानर, शिखरावर आस्वल याप्रमाणें चंदनतरूचा एकही असा भाग नाहीं कीं, जो अतिदुष्ट घातुकांनीं व्यापिलेला नाहीं.

हा राजा बोलण्यांत मोठा गोड परंतु पोटांत मोठा विषारी आहे. दुरून पाहतांक्षणींच हात पुढें करणें, प्रेमाश्रु आणणें, आपल्या बैठकीवर बसविणें, गाढ आलिंगन देणें, गोड गोष्टी सांगणें, विचारिलें असतां मन लावून ऐकणें, याप्रमाणें बाहेरून गोड परंतु आंतून विषानें भरलेला असा हा कपटानें परिपूर्ण नवाच नाटकप्रकार दुर्जनांनीं काढिला आहे, यास काय ह्मणावें?

ह्मटलें आहे,—

दुस्तर समुद्र तरण्यास नौका, अंधकाराचा नाश करण्यास दिवा, वारा नाहींसा झाला तर पंखा, माजलेल्या हत्तीस ताळ्यावर आणण्यास अंकुश, याप्रमाणें अशी पृथ्वीवर एकही गोष्ट नाहीं कीं; ज्याविषयीं ब्रह्मदेवानें तजवीज केली नाहीं. मला असें वाटतें कीं, दुर्जनाचें मनोधारण करण्याचा उपाय योजण्याविषयीं ब्रह्मदेवाचा देखील उद्योग व्यर्थ झाला.

**संजीवक**—(पुनः श्वास टाकून) शिव शिव! मी गवत खाणारा; माझा सिंहानें द्वेष करावा काय? कारण,—ज्यांचें द्रव्य सारखें, बल सारखें, त्यांमध्येंच भांडण किंवा मैत्री होणें ठीक आहे. लहानमोठ्यांमध्यें भांडण किंवा मैत्री होणें योग्य नाहीं.

(पुनः विचार करून) मजविषयीं राजाचें मन कोणीं कसें वाईट केलें असेल तें समजत नाहीं; तरी एकदा मन बिघडलें ह्मणजे त्यापासून भ्यालें पाहिजे. कारण,—

स्फटिकाच्या कड्याप्रमाणें राजाचें चित्त आहे. तें एकदा फुटलें ह्मणजे पुनः घडण्यास कोण समर्थ आहे?

दुसरें,—

वज्र आणि राजतेज हीं दोन फार भयंकर आहेत. परंतु एक एके ठिकाणीं पडतें, आणि दुसरें एकदम पुष्कळ ठिकाणीं पडतें.

असें आहे तर आतां युद्धांत मरणें बरें, परंतु त्याच्या आज्ञेंत राहणें ठीक नाहीं. कारण,—

आपण मेला असतां स्वर्गास जातो, शत्रु मेला तर सुख प्राप्त होतें. हे दोन्ही गुण शूराला चांगलेच आहेत. ही युद्धाची वेळ आहे.

युद्ध न केलें असतां खास मरायाचेंच; युद्ध केलें असतां वांचण्याचा संशय आहे; अशा वेळेसच युद्ध करावें असें शहाणे ह्मणतात.

दुसरें,—

युद्ध न करून आपला कोणताही फायदा नाहीं, असें समजलें ह्मणजे शहाणा शत्रूंशीं युद्ध करून मरून जातो.

जय झाला तर लक्ष्मी प्राप्त होईल, मेला तर अप्सरा मिळेल, देह क्षणभंगुर आहे, तर रणांत मरण्यास काय हरकत आहे ?

याप्रमाणें विचार करून संजीवक ह्मणाला, मित्रा, तो मला मारणार आहे असें कसें समजावें ?

**दमनक**—जेव्हां पिंगलक शेंपूट उभारून पाय उचलून आ पसरून तुजकडे पाहील, तेव्हां तूही आपला पराक्रम दाखीव. कारण,—

बळकट असूनही निस्तेज झाला ह्मणजे त्याचा पराभव कोण करणार नाहीं ? पहा, विस्तव विझाल्यावर राखेच्या ढिगावर लोक निःशंकपणें पाय देतात.

परंतु हें सर्व अगदीं गुप्त रीतीनें करावें, नाहीं तर तू आणि मी दोघेही नाहींसे होऊं. असें बोलून दमनक करटकाजवळ गेला.

**करटक**—काय झालें ?

**दमनक**—त्यांची फुटाफूट झाली.

**करटक**—यांत काय संशय ? कारण,—

दुष्टांचा भाऊ कोण ? फार मागितल्यावर कोणास राग येणार नाहीं ? धनानें कोणास संतोप होत नाहीं ? आणि दुष्कर्मामध्यें कोण पंडित नाहीं ?

दुसरें,—

लुच्चे जे आहेत ते आपल्या भरभराटीकरितां श्रीमानास दुराचरणी करितात. अग्नि ज्याचा आश्रय करितो त्याचा नाश करितो. त्याप्रमाणें दुष्टांची संगति काय करणार नाहीं ?

नंतर दमनक पिंगलकाजवळ जाऊन ह्मणाला; महाराज, तो दुष्ट आला, तयारींत रहावें. असें सांगून त्यानें बैलास सांगितल्याप्रमाणें सिंहाचें रूप करविलें. संजीवकानें येऊन तें पाहिल्यावर आपल्यास योग्य असा पराक्रम केला. तेव्हां त्या युद्धांत पिंगलक संजीवकास

मारून दमून शोकयुक्त बसला आणि ह्मणाला, म्यां फार वाईट कर्म केलें. कारण,—

राज्याचा उपभोग लोक करितात, पातक मात्र राजा भोगतो. हत्तीला मारण्यानें सिंहास पातक लागतें, परंतु त्याच्या मस्तकांतील मोतीं दुसऱ्यासच मिळतें.

दुसरें,—

राज्याचा भाग नाहींसा होणें आणि बुद्धिमान् सेवक नाहींसा होणें या दोहोंमध्यें सेवकाचा नाश हा राजास मरणासारखा आहे. राज्य गेलें तर पुन्हा मिळेल, परंतु चांगला सेवक पुनः मिळणें कठिण.

**दमनक**—महाराज, शत्रूला मारून शोक करीत बसणें हा नवीनच प्रकार आहे. कारण,—

प्राण घेण्यास इच्छितो तो बाप, भाऊ, मित्र असला तरी आपलें हित इच्छिणाऱ्या राजानें त्याचा वध करावा.

आणखी,—

धर्म, अर्थ, काम, यांचें तत्त्व जो जाणतो तो अतिकरुणायुक्त असणार नाहीं. जो अतिक्षमाशील आहे त्यास हातावरचा घांस देखील खातां येणार नाहीं.

शत्रु आणि मित्र यांवर सारखी क्षमा करणें हें संन्याशास भूषण आहे. अपराध्यांस क्षमा करणें हें राजास मोठें दूषण आहे.

दुसरें,

राज्यलोभानें किंवा गर्वानें जो धन्याचें पद घ्यावयास इच्छितो त्यास प्राणत्याग हें एकच प्रायश्चित्त आहे, दुसरें नाहीं.

आणखी,—

८ दयालु राजा, सर्वभक्षी ब्राह्मण, स्वाधीन नसलेली स्त्री, वाईट स्वभावाचा मित्र, प्रतिकूल चाकर, उन्मत्त अधिकारी, हे सात आणि आठवा उपकार न जाणणारा हे टाकून द्यावे. ह्मटलें आहे,—

खरी, खोटी, कठोर, मृदु, घातकी, दयालु, लोभी, उदार, नेहमीं खर्च करणारी, आणि पुष्कळ रत्नें व द्रव्य मिळविणारी, अशी वेश्येप्रमाणें राजनीति बहुरूपी आहे.

याप्रमाणें दमनकानें सांत्वन केल्यावर पिंगलक स्वस्थ झाला. दमनकही संतुष्ट होऊन महाराजांचा विजय असो, सर्व जगाचें कल्याण असो, असें ह्मणून स्वस्थ झाला.

**विष्णुशर्मा**—तुह्मीं सुहृद्भेद ऐकिला ?

**राजपुत्र**—तुमच्या कृपेनें ऐकिला. आह्मांस आनंद झाला.

**विष्णुशर्मा**—आणखी हेंही असो.

तुमच्या शत्रूंच्या घरीं मित्रांची फुटाफूट होवो, काळानें ओढिल्याप्रमाणें नेहमीं दुष्ट नाश पावोत, संपूर्ण लोक संपत्ति आणि सुख यांनीं युक्त होवोत, आणि या सुंदर कथेनें अज्ञजनांस सुद्धां आनंद होवो.

## सुहृद्भेद समाप्त.

# विग्रह.

पुनः गोष्टींच्या वेळेस राजपुत्र ह्मणाले, महाराज, आह्मी राजपुत्र आहों याकरितां विग्रह (लढाई) ऐकण्याची आमची इच्छा आहे.

**विष्णुशर्मा**—जर तुह्मांस आवड असेल तर सांगतों. विग्रहाचा हा पहिला श्लोक आहे.

हंसांशीं युद्ध मोरांचें चालतां तुल्यविक्रम ॥
काकांनीं वंचिले हंस शत्रूंच्या घरिं राहुनी ॥ १ ॥

**राजपुत्र**—हें कसें ?

विष्णुशर्मा सांगतो. कर्पूरद्वीपामध्यें पद्मकेलि नांवाचें सरोवर आहे. तेथें हिरण्यगर्भ नांवाचा राजहंस रहात असे. त्यास सर्व पक्ष्यांनीं जमून आपल्या राज्याचा अधिकार दिला. कारण, चांगला अंमल करणारा राजा नसला तर, नावाडी नसला ह्मणजे जशी नाव समुद्रांत बुडते; त्याप्रमाणें प्रजा बुडून जाईल.

दुसरें,—

राजा प्रजेचें रक्षण करितो, प्रजा राजाची भरभराट करिते, यासाठीं भरभराटीपेक्षां प्रजेचें रक्षण अधिक हितकारक आहे. तें नसेल तर जें आहे तें नाहींच ह्मटलें पाहिजे.

एका समयीं हा राजहंस कमलांच्या विस्तीर्ण पलंगावर बसला होता, सभोंवतीं पदरचे लोक उभे होते, इतक्यांत तेथें एक दीर्घमुख नांवाचा बगळा देशांतराहून आला आणि नमस्कार करून उभा राहिला.

**राजहंस**—दीर्घमुखा, तू दुसऱ्या देशाहून आला आहेस, बातमी सांग.

**दीर्घमुख**—महाराज, मोठी बातमी आहे, ती सांगण्याकरितां लवकर आलों, ऐकावी. जंबुद्वीपामध्यें विन्ध्य नांवाचा पर्वत आहे. तेथें चित्रवर्ण नांवाचा मोर पक्ष्यांचा राजा रहातो. मी वणव्यानें जळून गेलेल्या अरण्यांत फिरत असतां त्याचे सेवक कित्येक पक्षी फिरत होते त्यांनीं मला पाहिलें आणि तू कोठून आलास असें मला विचारिलें. तेव्हां म्यां सांगितलें; कर्पूरद्वीपाचा चक्रवर्ती जो हिरण्यगर्भ राजहंस त्याचा मी सेवक आहें; मौजेनें दुसरा देश पहावयास आलों. हें ऐकून ते पक्षी ह्मणाले, या दोन देशांमध्यें आणि राजांमध्यें श्रेष्ठ कोणता? म्यां ह्मटलें, अंः, असें काय ह्मणतां ? यांत मोठें अंतर आहे.

कारण कर्पूरद्वीप ह्मणजे केवळ स्वर्ग, आणि राजा ह्मणजे साक्षात् इंद्रच. या मारवाडांत राहून तुह्मी काय करिता? चला आमच्या देशांत. नंतर माझें बोलणें ऐकून सर्व रागावले. ह्मटलें आहे,—

मूर्खास उपदेश केला असतां शांति न होतां उलटा राग येतो. सापास दूध पाजिलें तर विषाची वृद्धि होते.

दुसरें,—

शहाण्यास उपदेश करावा, मूर्खास कधींही करूं नये. वानरांला उपदेश करून पक्षी स्थानभ्रष्ट झाले.

**राजहंस**—हें कसें?

**दीर्घमुख**—नर्मदेच्या कांठीं मोठा एक शेवरीचा वृक्ष होता. त्यावर घरटीं करून पक्षी पर्जन्यकाळींसुद्धां सुखानें रहात असत. एका समयीं वर्षाकाळीं ढग येऊन मोठा पाऊस पडला. तेव्हां वानर झाडाखालीं बसून थंडीनें कुडकुडत आहेत असें पाहून दयेनें पक्षी ह्मणाले, वानरहो ऐका,—

नुसत्या चोंचींनीं गवत आणून आह्मीं घरटीं केलीं; तुह्मांस हातपाय असून असे कां कुडकुडता?

हें ऐकून वानर ह्मणाले, काय हो, हे पक्षी स्वस्थ निवाऱ्यांत घरट्यांमध्यें बसून आमची निंदा करितात. पाऊस थांबूंदे तर खरा. नंतर पाऊस उभाल्यावर वानरांनीं झाडांवर चढून सर्व घरटीं मोडून पक्ष्यांचीं अंडीं खालीं पाडिलीं. ह्मणून मी ह्मणतों कीं, शहाण्यालाच उपदेश करावा, मूर्खाला करूं नये.

**राजहंस**—नंतर त्यांनीं काय केलें?

**दीर्घमुख**—नंतर ते पक्षी रागानें ह्मणाले, राजहंसाला राजा कोणीं केलें? मीही क्रोधानें ह्मणालों कीं, तुमच्या मोराला कोणीं राज्य दिलें? हें ऐकून ते सर्व मला मारण्यास उठले. नंतर म्यांही आपला पराक्रम दाखविला. कारण,—

इतर प्रसंगीं स्त्रियांस जशी लज्जा भूषणास्पद होते त्याप्रमाणेंच पुरुषांस क्षमा शोभते. परंतु सुरतकाळीं स्त्रियांनीं लज्जा सोडिली पाहिजे, तसा पुरुषांनीं पराजयाच्या वेळेस पराक्रम केला पाहिजे.

राजहंस हंसून ह्मणाला, आपल्या आणि दुसऱ्याच्या बळाची तुलना करून जो अंतर जाणत नाहीं, त्यास शत्रु पीडा देतात.

दुसरें,—

गाढव वाघाचें कातडें पांघरून पुष्कळ दिवस शेतांत चरत असे; परंतु मूर्खपणानें शब्द केल्यामुळें तो मृत्यु पावला.

**वगळा**—हें कसें?

**राजहंस**—हस्तिनापुरांत विलास नांवाचा परीट राहत असे. त्याचा गाढव ओझें वाहतां वाहतां मृतप्राय झाला. तेंव्हां परिटानें अंगावर वाघाचें कातडें घालून त्यास एका शेतांत सोडिलें. त्यास पाहून शेतकरी वाघ आला असें समजून दूर पळाले. नंतर एक शेतकरी कांबळा पांघरून तीरकमठा तयार करून आड उभा राहिला. गाढवही यथेच्छ धान्य खाऊन भला गलेलठ्ठ बळकट झाला होता, त्यामुळें दुरून कांबळा पांघरलेल्या शेतकऱ्यास पाहून त्यास वाटलें कीं, ही गाढवी आहे. त्यामुळें मोठ्यानें ओरडून तो तिकडे चालला. त्याच्या शब्दावरून हा गाढव आहे असें कळलें; तेंव्हां शेतकऱ्यानेंही त्यास सहज मारून टाकिलें. ह्मणून मीं सांगितलें कीं, मूर्खपणानें शब्द करून गाढव मेला.

**दीर्घमुख**—नतर ते पक्षी ह्मणाले, रे दुष्टा पाप्या बगळ्या, आमच्या देशांत राहून आमच्या राजाची निंदा करितोस काय? आतां तुझी क्षमा करणें योग्य नाहीं. असें ह्मणून मला चोंचीनें टोंचून ह्मणाले, पहा रे मूर्खा, तो राजहंस फार भळू, त्याला राज्याधिकार कोठला? कारण, फार अशक्त असतो त्यास हातांतलें द्रव्यसुद्धां राखितां येत नाहीं, त्यानें पृथ्वीचें रक्षण कसें करावें? आणि त्याला राज्य तरी काय करावयाचें? तू विहिरींतल्या बेडकासारखा गैरमाहित आहेस, ह्मणून, आह्मांस त्याकडे जाण्यास सांगतोस. ऐक,—

ज्यावर फळें पुष्कळ, ज्याची छाया मोठी, अशा मोठ्या झाडाचा आश्रय करावा; जरी नशीबानें फळ मिळालें नाहीं, तरी सावली तर कोणाच्यानें नाहींशी करवणार नाहीं.

दुसरें,—

नीचाची सेवा करूं नये, मोठ्याचा आश्रय करावा. दारूवालीच्या हातांत दूध असलें तरी लोक दारूच ह्मणतात. आणखी,—

मोठा हत्ती लहान आरशांत लहान दिसतो, त्याप्रमाणें पुष्कळ गुण अंगीं असले तरी ते वाईटाच्या संगतीनें नाहींतसे होतात.

आणखी,—

राजा अतिसमर्थ असला तरी युक्तीनें कार्यसिद्धि होते. चंद्राची युक्ति करून ससे सुखी झाले. तेव्हां म्यां विचारिलें हें कसें ?

**पक्षी**—कोणी एका काळीं वर्षाऋतूंतही पाऊस न पडल्यामुळें हत्ती तान्हेनें व्याकुळ होऊन कळपाच्या मुख्यास ह्मणाले, महाराज, आतां आमच्या उपजीवनाची वाट काय ? क्षुद्र प्राण्यांससुद्धां पाणी मिळत नाहीं. आह्मांस बुचकळ्या मारण्यास पाणी मिळत नाहीं; त्यामुळें आह्मी मेल्यासारखे झालों आहों. आतां काय करावें ? जावें कोठें ? नंतर त्यांच्या राजानें त्यांस जवळच एक तलाव दाखविला, तेथें ते राहूं लागले. तेव्हां तळयाच्या कांठीं राहणारे ससे त्यांच्या पायांखालीं चिरडून मरूं लागले. तेव्हां शिलीमुख नांवाच्या सशास वाटलें, तान्हेनें व्याकुळ झालेला हत्तींचा कळप रोज येथें येणार, यामुळें आमचा कुळक्षय होणार. त्यास विजय नांवाचा ससा ह्मणाला, कांहीं खेद करूं नका. मी हा त्रास दूर करण्याची तजवीज करितों. अशी प्रतिज्ञा करून तो चालला. वाटेनें जात असतां तो आपल्या मनांत ह्मणाला, हत्तीच्या कळपापुढें उभें राहून काय बोलावें? कारण,—

हत्ती स्पर्शानेंच मारितो, साप वास घेऊनच मारितो, राजा पळत असतां मारितो, आणि दुर्जन हंसत हंसत मारितो.

यासाठीं मी पर्वताच्या शिखरावर उभा राहून कळपाच्या मुख्याशीं बोलतों. तसें केल्यावर कळपाचा मुख्य त्यास ह्मणाला, कोणरे तू? कोठून आलास ? तो ह्मणाला, मी ससा, मला चंद्रानें तुमच्या जवळ पाठविलें आहे.

**हत्ती**—काय काम आहे तें सांग.

**विजय**—शस्त्र उगारिलें तरी दूत खोटें बोलत नाहीं. दूतास मारूं नये असें असल्यामुळें तो खरेंच बोलतो.

यासाठीं मी चंद्राच्या आज्ञेनें सांगतों तें ऐकावें. ह्या चंद्रसरोवरावर राहणाऱ्या सशांस तुह्मीं पीडा दिली, हें फार वाईट केलें. ह्या सशांस आह्मीं पुष्कळ दिवसांपासून पाळिलें आहे. ह्मणूनच मला शशांक असें ह्मणतात. याप्रमाणें दूताचें भाषण ऐकतांच तो कळपाचा मुख्य ह्मणाला, महाराज, हें अज्ञानानें झालें; पुनः असें करणार नाहीं.

**ससा**—हें खरें असेल तर ह्या सरोवरांत शशांक ह्मणजे चंद्र रागानें कांपत आहे त्यास नमस्कार करून प्रसन्न करून जा.

नंतर त्यानें हस्तिनायकास नेऊन त्या सरोवरांतलें चंचल चंद्रबिंब दाखविलें, आणि ह्मटलें, महाराज, अज्ञानानें यानें अपराध केला, याकरितां यास क्षमा करावी. हा पुनः असें करणार नाहीं. असें ह्मणून त्याला लावून दिलें. याकरितां आह्मी ह्मणतों कीं, युक्तीनें कार्य सिद्धीस जातें.

नंतर म्यां ह्मटलें, तो आमचा राजा राजहंस मोठा पराक्रमी आहे. तो त्रैलोक्याचा देखील राजा होण्यास योग्य आहे. नंतर, दुष्टा आमच्या देशांत कां आलास? असें ह्मणून त्यांनीं मला चित्रवर्ण राजाजवळ नेलें. तेथें राजापुढें मला उभा करून राजास नमस्कार करून ते ह्मणाले, महाराज, आह्मी बोलतों इकडे लक्ष असावें. हा दुष्ट बगळा आमच्या देशांत फिरत असून महाराजाच्या चरणांची निंदा करितो.

**चित्रवर्ण**—हा कोठून आला?

ते ह्मणाले, हिरण्यगर्भ नांवाच्या राजाचा सेवक हा आहे. कर्पूरद्वीपाहून येथें आला. नंतर मला चित्रवर्णाचा प्रधान जो गृध्र त्यानें विचारिलें, तेथें मुख्य प्रधान कोण आहे? म्यां सांगितलें, सर्वशास्त्रांमध्यें निपुण असा सर्वज्ञ नांवाचा चक्रवाक आमच्या राजाचा प्रधान आहे.

**गृध्र**—योग्यच आहे, तो स्वदेशांतीलच आहे. कारण,—

स्वदेशांतला, कुलाचारानें युक्त, प्रामाणिक, शुद्ध, मसलत जाणणारा, निर्व्यसनी, सदाचरणी, विद्वान् असून व्यवहार जाणणारा, चांगल्या घराण्यांतला, चतुर, द्रव्याची वृद्धि करणारा, असा राजानें प्रधान नेमावा.

नंतर शुक (पोपट) ह्मणाला, महाराज, कर्पूरद्वीपादिक लहान देश जंबुद्वीपांतलेच समजावयाचे. तेथेंही महाराजांच्या चरणाचें आधिपत्य आहेच.

**चित्रवर्ण**—खरी गोष्ट आहे. कारण,—

राजा, उन्मत्त, बालक, वेडा, धनानें गर्विष्ट झालेला, हे मिळण्यासारखें नसतें त्याचीही इच्छा करितात; मग मिळण्यासारखें आहे त्याविषयीं काय सांगावें?

म्यां ह्मटलें कीं, बोलण्यानेंच जर आधिपत्य प्राप्त होतें, तर मग आमचा राजा जो हिरण्यगर्भ याचेंही आधिपत्य जंबुद्वीपावर आहे.

**शुक**—हें कसें ठरवावें?

म्यां सांगितलें हें ठरविण्यास युद्धच केलें पाहिजे.

**चित्रवर्ण**—(हंसून) आपल्या राजाकडे जाऊन त्यास तयार कर. मी बोललों; आपलाही दूत पाठवावा.

**राजा**—कोण दूत होऊन जाणार? कारण,—

धन्यावर भक्ति करणारा, गुणी, शुद्ध, हुशार, प्रौढ, निर्व्यसनी, क्षमाशील, ब्राह्मण, दुसऱ्याचें मर्म जाणणारा, आणि विद्वान्, असा दूत असावा.

**गृध्र**—असे पुष्कळ आहेत. परंतु ब्राह्मणच पाठवावा. कारण,—तो राजाचें हित करितो, धनाची इच्छा करीत नाहीं. शिवाच्या संगतीनें देखील काळकूट विषाचा काळेपणा जात नाहीं, त्याप्रमाणें हलक्या जातीचा मनुष्य मोठ्याच्या आश्रयानेंसुद्धां चांगला होत नाहीं.

**चित्रवर्ण**—असें आहे तर शुकानेंच जावें. शुका, त्वां जाऊन आमच्या इच्छेप्रमाणें सांगावें.

**शुक**—आपली आज्ञा मान्य आहे. परंतु हा बगळा दुष्ट आहे; याबरोबर मी जात नाहीं; ह्मटलें आहे,—

दुष्ट दुष्कर्म करितो आणि साधूला त्याचें फळ भोगावें लागतें; रावणानें सीता चोरिली आणि समुद्राच्या उरावर धोंडे पडले.

दुसरें,—

कधींही दुर्जनाजवळ बसूं नये, व त्याबरोबर जाऊं नये. कावळ्याजवळ बसल्यामुळें हंसाचा नाश झाला, आणि कावळ्याबरोबर गेल्यामुळें लाव्याचा नाश झाला.

**चित्रवर्ण**—हें कसें?

**शुक**—उज्जनीच्या वाटेवर एक पळसाचें झाड आहे. त्यावर हंस आणि कावळा रहात होते. उन्हाळ्यांत कोणा एका वेळीं कोणी वाटसरू थकल्यामुळें हातांतला तिरकमठा जवळ ठेवून त्या वृक्षाखालीं निजला. कांहीं वेळानें त्याच्या तोंडावरची सावली गेली. त्याच्या तोंडावर उन्ह आलें, असें पाहून झाडावरच्या हंसानें पंख पसरून पुनः त्याच्या तोंडावर सावली केली. तेव्हां गाढ झोंप लागून स्वस्थ झाल्यामुळें वाटसरानें झोंपेंत आ पसरला. स्वभावतः दुष्ट असल्यामुळें कावळ्यास हें सुख सहन न होऊन तो त्याच्या तोंडांत शिटून पळून

गेला. वाटसरू जागा होऊन पहातो तों हंस त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां तिरकमठा घेऊन त्यानें त्यास ठार केलें.

## लाव्याची गोष्ट.

एके वेळीं गरुडराजाचें दर्शन घेण्याकरितां सर्व पक्षी समुद्रतीरीं चालले, तेव्हां लावा कावळ्याबरोबर जात होता. तिकडून एक गवळी दह्याचें भांडें डोक्यावर घेऊन जात होता. त्या भांड्यांतील दहीं कावळा वारंवार खात असे. नंतर दह्याचें भांडें ठेवून गवळ्यानें वर पाहिलें तों कावळा आणि लावा त्याच्या दृष्टीस पडले, तेव्हां तो त्यांस मारूं लागला. तेव्हां कावळा पळून गेला. लाव्यानें कांहीं अपराध न केल्यामुळें तो स्वस्थ चालत होता, त्यास गवळ्यानें ठार मारिलें. ह्मणून मी सांगतों कीं, दुर्जनाबरोबर बसूं नये, व जाऊंही नये.

म्यां ह्मटलें, राघुभाऊ, असें कां बोलता ? मला जसे महाराजांचे चरण तसेच आपले.

शुक—हें खरें. पण,—

भलत्याच वेळेस वृक्षास फुलें आलीं ह्मणजे दुश्चिन्ह वाटून जसें भय वाटतें, त्याप्रमाणें दुर्जनानें चांगलीं गोड भाषणें केलीं तरी त्यांपासून भीति उत्पन्न होते.

तुझ्या बोलण्यावरूनच तू दुर्जन आहेस असें समजलें. कारण ह्या दोवां राजांच्या कलहास तुझें बोलणेंच कारण. आपलाच दोष असला तरी मूर्ख सल्ला करून संतुष्ट होत नाहीं.

नंतर राजानें चालीप्रमाणें सत्कार करून माझी रवानगी केली. शुकही माझ्या पाठीमागून येत आहे. हें सर्व कळविलें, आतां जें करणें असेल तें करावें.

चक्रवाक—(हंसून) महाराज, दुसऱ्या देशांत जाऊनदेखील बगळ्यानें आपल्या सामर्थ्याप्रमाणें कामगिरी बजाविली. परंतु महाराज, मूर्खांचा स्वभावच हा. कारण,—

शहाण्याचें असें मत आहे कीं, शेंकडों तोटे सोसावे, परंतु भांडूं नये. कारणाशिवायदेखील कलह करणें हें मूर्खाचें लक्षण आहे.

राजा—झाल्या गोष्टीची निंदा करून काय उपयोग ? आतां काय करावें त्याची तजवीज काढा.

चक्रवाक—एकांतीं सांगेन. कारण,—

वर्ण, आकार, प्रतिध्वनि, नेत्र आणि मुख यांचे विकार, येणेंकरून मनांतील समजतें.

नंतर राजा आणि प्रधान तेथें राहिले, इतर लोक दुसरीकडे गेले. तेव्हां चक्रवाक ह्मणतो, मला असें वाटतें कीं, आमच्या पदरच्या सेवकास वळवून हें कोणी तरी केलें असावें. कारण,—

कोणास रोग झाला ह्मणजे वैद्यास बरें वाटतें, धनी संकटांत पडला ह्मणजे चाकराचें हित होतें, मूर्खांपासून विद्वान् आपलें काम साधून घेतात, आणि सद्धर्माच्या योगानें साधु उपजीविका करितात.

**राजहंस**—असो, कारणाची चौकशी मागून करितां येईल. तूर्त काय करावें याची योजना करावी.

**चक्रवाक**—दूत पाठवून शत्रु काय करीत आहेत, त्यांचें सैन्य किती आहे, वगैरे मजकूर समजून घ्यावा. ह्मटलें आहे,—

आपल्या व दुसऱ्याच्या राष्टामध्यें काय चाललें आहे, हें पाहण्यास राजास दूत हाच डोळा आहे. तो ज्यास नाहीं, तो अंध होय.

दूताबरोबर दुसरा एक विश्वासू पाठवावा. दूतानें तेथें राहून राजा काय करितो त्याची गुप्तपणें बातमी काढून दुसऱ्याजवळ सांगून त्यास इकडे पाठवावें. ह्मटलें आहे,—

दूतानें तपस्व्यांचीं सोंगें घेतलेले दुसरे लोक बरोबर घेऊन तीर्थ, आश्रम, देवालयें, इत्यादि ठिकाणीं रहावें.

गुप्तरीतीनें ज्यास पाण्यावर अथवा जमिनीवर संचार करितां येईल, असा दूत असावा. याकरितां या बगळ्यासच पाठवावें. असाच कोणी दुसरा बगळा त्याबरोबर पाठवावा. त्याच्या घरचे लोक असतील त्यांनीं राजवाड्यांत येऊन रहावें. परंतु महाराज, हें देखील गुप्तरीतीनें करावें. कारण,—

मसलत सहा कानीं गेली, किंवा तिजविषयीं बातमी उठली ह्मणजे फुटते, याकरितां राजानें आपण व दुसरा कोणी तरी एक घेऊन मसलत करावी.

आणखी,—

मसलत फुटल्यामुळें राजास ज्या अडचणी येतात, त्या दूर करितां येत नाहींत, असें नीति जाणणाऱ्यांचें मत आहे.

**राजा**—(विचार करून)—म्यां एक चांगला दूत योजिला आहे.

**प्रधान**—तर मग रणांत विजय मिळाला ह्मणून समजावें.

इतक्यांत द्वारपाळ येऊन मुजरा करून ह्मणाला, जंबुद्वीपाहून आलेला शुक दारांत उभा आहे. हें ऐकून राजा आणि प्रधान एकमेकांकडे पाहूं लागले.

**चक्रवाक**—त्यास वाड्यांत घेऊन जावें. मग राजाची भेट होईल. हें ऐकून चोपदार त्यास वाड्यांत घेऊन गेला.

**राजा**—लढाई तर उपस्थित झालीच.

**चक्रवाक**—एकदम लढाई करणें ठीक नाहीं. कारण,—

जो विचार केल्याशिवाय राजास एकदम आपलें स्थान सोडून युद्धास जाण्यास सांगतो, तो प्रधान ह्मणावा काय ?

दुसरें,—

दोघे युद्ध करूं लागले ह्मणजे कोणाचा जय होईल याचा नियम नाहीं; यासाठीं युद्धानें शत्रूंस जिंकण्याचा यत्न कधीं करूं नये.

आणखी,—

साम, दान, भेद हीं वेगळालीं किंवा सर्व योजून युद्ध न करितां, शत्रूंस स्वाधीन करण्याचा यत्न करावा.

दुसरें,—

युद्ध पाहिलें नाहीं तोंपर्यंत सर्व लोक सुखी आहेत. दुसऱ्याचें सामर्थ्य दृष्टीस पडलें नाहीं तोंपर्यंत गर्विष्ठ कोण होणार नाहीं ?

आणखी,—

पाचरेचें लांकूड ज्याप्रमाणें धोंडा उचलितें त्याप्रमाणें प्राण्याच्यानें उचलवत नाहीं, अल्प उपायानें मोठें कार्य साधावें हेंच मसलतीचें मोठें फळ होय.

असें आहे तरी लढाई करावी लागणार असें समजून चालावें.

कारण,—

महाराज, योग्य वेळीं उद्योग केला ह्मणजे कृपि सफल होते त्याप्रमाणें विचारानें नीति लवकर सफल होते.

दुसरें,—

संकट दूर असलें ह्मणजे भिणें, परंतु जवळ आलें ह्मणजे शौर्य दाखविणें, आणि गुदरल्यास धैर्यानें सोसणें, हा मोठ्यांचा गुण होय.

आणखी,—

तापटपणा हें सर्वकार्यसिद्धींचें विघ्न आहे. पाणी फार थंड आहे तरी तें पर्वतांस फोडीत नाहीं काय ?

तशांत हा चित्रवर्ण राजा मोठा बलाढ्य आहे.

बलवानाशीं युद्ध करूं नये अशी नीति आहे. असें असून लोक हत्तीबरोबर दांडगाई करूं लागले तर त्यांचा नाश होईल.

दुसरें,—

वेळ आल्याशिवाय शत्रूंवर जाईल तो मूर्ख होय. बलवानाशीं कलह करणें हें किड्याला पंख येण्यासारखें आहे.

आणखी,—

नीति जाणणाऱ्यानें कांसवाप्रमाणें पोटांत पाय घालून मारसुद्धां सोसावा; वेळ आली ह्मणजे सापाप्रमाणें उठावें.

नदीचा पूर, झाडें व गवत या दोहोंसही उपटितो, त्याप्रमाणें उपाय जाणणारा जो आहे, तो लहानमोठ्या शत्रूंस जिंकण्यास सारखाच समर्थ होतो.

याकरितां किल्ला तयार होईपर्यंत त्याच्या दूतांशींही नीट बोलून त्यास येथेंच ठेवून घ्यावें. कारण,—

तटावर जर एक योद्धा असला तर तो शंभरांबरोबर लढेल, शंभर असले तर ते लाख योद्ध्यांस पुरतील. याकरितां किल्ल्याची योग्यता मोठी आहे.

आणखी,—

ज्या देशांत किल्ला नाहीं, तो कोणत्या शत्रूस जिंकितां येणार नाहीं ? ज्या राजाजवळ किल्ले नाहींत, तो नावेंतून पडलेल्या मनुष्याप्रमाणें निराश्रित होय.

किल्ला विस्तीर्ण व आंत प्रवेश करण्यास विकट असा बांधून त्यास मोठा खंदक व उंच तट करावा; आंत यंत्रें, पाणी, डोंगर, मैदान, झाडी, धन, धान्य, तेल, तूप, हीं असावीं.

राजा, प्रधान, मित्र, कोश, राष्ट्र, किल्ला, सैन्य, हीं परस्परांस उपयोगी असल्यामुळें राज्याचीं सात अंगें आहेत असें ह्मटलें आहे.

किल्लेदार, सेनापति, कोशपति, भूमिपति, दूत, गुरु, ज्योतिषी, वैद्य, हे मंत्री होत.

**राजहंस**—किल्ला तयार करण्यास कोणास सांगावें?

**चक्रवाक**—जो ज्या कामांत हुशार त्यास तें काम सांगावें. शास्त्रज्ञ असूनही काम केलेलें पाहिलें नसलें तर त्यास कांहीं सुचत नाहीं. याकरितां सारसास बोलवावें. [बोलावणें गेल्यावर सारस आला. त्यास राजहंस ह्मणाला,] सारसा, किल्ला लवकर तयार कर.

**सारस**—(नमस्कार करून) महाराज, किल्ला तयारच आहे. या मोठ्या सरोवरामुळें आपलें द्वीप किल्ल्याप्रमाणेंच आहे, येथें सामग्रीमात्र भरपूर केली पाहिजे. कारण,—

सर्वसंग्रहांपेक्षां धान्यसंग्रह उत्तम होय. तोंडांत रत्न घातलें तर जीव वांचत नाहीं.

दुसरें,—

सर्व रसांमध्यें मीठ हा उत्तम रस होय. त्यावांचून पदार्थ शेणासारखा आहे.

**राजहंस**—लवकर जाऊन सर्व तयारी कर.

इतक्यांत चोपदार येऊन ह्मणाला, महाराज, सिंहलद्वीपाहून मेघवर्ण नांवाचा कावळा आपल्या मंडळीसहवर्तमान येऊन दारांत उभा आहे, महाराजांच्या चरणांचें दर्शन घेण्यास इच्छितो.

**राजहंस**—कावळे सर्वज्ञ असून मोठे माहितगार आहेत, याकरितां ते आपल्या जवळ असावे असें वाटतें.

**चक्रवाक**—महाराज, खरें, परंतु कावळा स्थलचर आहे. तो आमच्या शत्रूंकडला आहे. त्यास आपण आश्रय कसा द्यावा? ह्मटलें आहे,—

आपल्या लोकांस टाकून जो दुसऱ्यांस जवळ ठेवितो, त्या मूर्खास निळीनें रंगलेल्या कोल्ह्याप्रमाणें शत्रु मारितात.

**राजहंस**—हें कसें?

**चक्रवाक**—एका रानांतील कोल्हा शहराजवळ सहज फिरावयास गेला असतां, एका रंगाऱ्याच्या घराजवळ निळीचें भांडें होतें त्यांत पडला. नंतर त्यांतून बाहेर पडतां येईना, त्यामुळें त्यानें मेल्याचें सोंग घेतलें. रंगाऱ्यासही तो मेला असें वाटून त्यानें भांडें दूर नेऊन त्यास फेंकून दिलें; तेव्हां तो पळून गेला. रानांत गेल्यावर आपलें श-

रीर निळें झालें असें पाहून तो मनांत ह्मणाला, माझा वर्ण उत्तम झाला आहे; तर आपलें काम कां साधून घेऊं नये? असा विचार करून त्यानें कोल्ह्यांस बोलावून सांगितलें कीं, मला वनदेवतेनें स्वहस्तें करून अरण्याच्या राज्यावर बसविलें. याकरितां आजपासून सर्व अरण्यांतील व्यवहार आमच्या हुकुमाप्रमाणें चालावे. त्याचा उत्तम वर्ण पाहून कोल्हेही साष्टांग नमस्कार घालून ह्मणाले, महाराजांच्या आज्ञेप्रमाणें सर्व होईल.

याप्रमाणें सर्व वनपशूंवर त्यानें आपला अंमल बसविला. सिंह, व्याघ्र, इत्यादि सर्व मोठमोठे पशु आपले सेवक झाले असें पाहून आपल्या जातीच्या लोकांची त्यास लाज वाटूं लागली, त्यामुळें त्यानें सर्वांस घालवून दिलें. तेव्हां सर्व कोल्हे खिन्न झाले, असें पाहून एक ह्मातारा कोल्हा ह्मणाला, खेद पावूं नका. आह्मी नीति जाणणारे मसलती असे असून या मूर्खानें आह्मांस जवळून दूर केलें, त्यापेक्षां याचा नाश होईल असें केलें पाहिजे. वाघ वगैरे सर्व केवळ याच्या रंगानें फसले जाऊन, यास राजा मानितात; याकरितां ते यास ओळखतील असें करा ह्मणजे झालें. असें करावें कीं, आज संध्याकाळ झाला ह्मणजे सर्वांनीं एकदम मोठ्यांनीं ओरडूं लागावें. नंतर तोही आमचें ओरडणें ऐकून जातिस्वभावामुळें आपणही ओरडूं लागेल. असें झालें ह्मणजे काम झालें. कारण,—

जो ज्याचा स्वभाव तो त्यास कधीं टाकतां येणार नाहीं. कुत्र्यास राजा केलें तरी तो वाहणा चाटणें टाकील काय? नंतर तो ओरडूं लागला, तेव्हां शब्द ओळखून वाघानें त्यास मारिलें.

ह्मटलें आहे,—

आपल्या शत्रूला छिद्र, मर्म, वीर्य, सर्व समजतें. विस्तव जसा पोटांत शिरून सुकलेल्या वृक्षास जाळितो, त्याप्रमाणेंच तो नाश करितो.

ह्मणून मी सांगतों कीं, आपल्या लोकांस टाकून दुसऱ्यास जवळ करितो त्या मूर्खाचा नाश होतो.

**राजहंस**—असें आहे तरी हा दुरून आला आहे, याकरितां याची भेट तरी घ्यावी; जवळ बाळगण्याविषयीं विचार करितां येईल.

**चक्रवाक**—महाराज, दूत पाठविला, किल्ला तयार झाला, याकरितां शुकाचीही भेट घेऊन त्यास वाटेस लावावें. कारण,—

क्रूर दूत पाठवून चाणक्यानें[1] नंदास मारिलें. याकरितां दुरून आलेल्या दूतास नीट तजविजीनें भेटावें.

नंतर सभा भरवून शुक व कावळा या दोघांसही बोलावून आणिलें. शुक किंचित् चोंच वर करून दिलेल्या आसनावर बसून बोलूं लागला. हिरण्यगर्भ महाराज, महाराजाधिराज चित्रवर्ण यांची तुह्मांस अशी आज्ञा आहे कीं, जीवाची किंवा राज्याची गरज असेल तर येऊन आमच्या पायां पडावें. नाहींपेक्षां दुसरीकडे राहण्यास जागा शोधून काढावी.

**राजहंस**—(रागावून) याला गचांडी देण्यास कोणी जवळ नाहीं काय?

हें ऐकून मेघवर्ण कावळा उठून ह्मणाला, महाराज, मला आज्ञा करा, या दुष्ट शुकास ठार मारतों. सर्वज्ञ चक्रवाक राजास आणि कावळयास शांत करून ह्मणाला. ऐका,—

जींत वृद्ध नाहींत ती सभा नव्हे, जे धर्म सांगत नाहींत ते वृद्ध नव्हत, ज्यांत सत्य नाहीं तो धर्म नव्हे, आणि ज्यापासून भय प्राप्त होतें तें सत्य नव्हे.

धर्म असा आहे कीं,

दूत म्लेंच्छ असला तरी तो अवध्य होय. कारण दूत राजाचें मुख होय. शस्त्र उगारिलें तरी दूत खोटें बोलत नाहीं.

दुसरें,—

आपला पराजय व शत्रूचा जय दूताच्या बोलण्यावरून कोण मानितो? तो सर्वकाळ अवध्य असल्यामुळें पाहिजे तें बोलतो.

हें ऐकून राजा आणि कावळा स्वस्थ झाले. राघूही उठून चालता झाला. तेव्हां चक्रवाकानें त्यास बोलावून समजावून सुवर्णाचे अलंकार देऊन पाठविलें. तोही विंध्याद्रीवर जाऊन मुजरा करून राजापुढें उभा राहिला.

**चित्रवर्ण**—शुका, काय वर्तमान? कसा काय तो देश आहे?

**शुक**—एकंदर वर्तमान इतकेंच आहे कीं, युद्धाचा उद्योग करावा.

---

१. चाणक्य हा पूर्वीं चंद्रगुप्तराजाचा प्रधान होता. हा मोठा मसलती होता. त्यानें आपल्या युक्तीनें नंदवंशाचा क्षय केला. याची विशेष माहिती मुद्राराक्षसनाटकांत मिळेल.

हा कर्पूरद्वीपदेश स्वर्गासारखा आहे. राजा तर केवळ दुसरा इंद्रच. त्याचें वर्णनसुद्धां करणें कठिण.

नंतर सर्व शिष्टांस बोलावून राजा मसलत करण्यास बसला. तो ह्मणाला, आतां युद्ध करावयाचें, याकरितां काय तजवीज करावयाची तें सांगा. लढाई तर करावयाचीच. कारण,—

असंतुष्ट ब्राह्मण वाईट, आणि संतुष्ट राजा वाईट. लाजणारी वेश्या वाईट व निर्लज्ज कुलस्त्री वाईट.

हें ऐकून दूरदर्शी नांवाचा गृध्र ह्मणाला, महाराज, लढाईमध्यें फार संकटें आहेत याकरितां ती करणें ठीक नाहीं. कारण,—

आपले मित्र, प्रधान, आप्त, यांची जेव्हां आपणावर दृढ भक्ति असेल, आणि शत्रूच्यांची त्यावर नसेल, तेव्हां युद्ध करावें.

आणखी—राज्य वाढविणें, दुसऱ्या राजाशीं स्नेह करणें, लूट मिळविणें, हीं तीन लढाईचीं फळें आहेत. यांतून एकादें तरी खास होईल अशी खात्री असेल तेव्हां युद्ध करावें.

**चित्रवर्ण**—प्रधानजी, माझी शक्ति तर पहा. मग तुह्मी सांगता त्याचा उपयोगही कळलाच पाहिजे. जोशास बोलावून चांगला मुहूर्त पहावयास सांगा.

**प्रधान**—एकदम स्वारी करणें अयोग्य होय. कारण,—

जे मूर्ख शत्रूच्या बलाचा विचार केल्याशिवाय युद्धास एकदम प्रवृत्त होतात, ते निश्चयेंकरून तलवारीच्या धारेचें आलिंगन करितात.

**राजा**—प्रधानजी, तुह्मी आमचा उत्साह अगदीं खचवूं नका. जिंकण्यास इच्छिणाऱ्यानें शत्रूच्या देशावर हल्ला कसा करावा, तें सांगा.

**गृध्र**—सांगतों, परंतु त्याप्रमाणें झालें तर फल येतें. ह्मटलें आहे,—

राजा शास्त्रज्ञ असून त्यानें मसलत चांगली केली आणि त्याप्रमाणें वडली नाहीं, तर तीपासून काय उपयोग? औषध ठाऊक असल्यानें रोगाचा नाश कधींहि होत नाहीं.

राजानें विचारिलें असतां सांगितलें पाहिजे; ह्मणून जसें ऐकिलें आहे, तसें सांगतों. ऐकावें,—

नदी, पर्वत, अरण्य, किल्ला, इत्यादि ज्या ज्या ठिकाणीं भय असेल, त्या त्या ठिकाणीं सेनापतीनें सैन्याची चांगली रचना करून जावें मुख्य सेनापतीच्या खालच्या प्रतीचा सेनेचा अधिकारी असेल त्यानें

शूर लोक घेऊन पुढें जावें. जनानखाना, राजा, जामदारखाना व अशक्त लोक असतील, त्यांस सैन्याच्यामध्यें ठेवावें; दोहों बाजूंला घोड्यांच्या रांगा असाव्या, घोड्यांच्या बाजूंला रथ असावे, आणि रथांच्यामागें हत्ती, आणि हत्तींच्यामागें पायदळ. याप्रमाणें रचना करून मुख्य सेनापतीनें जखमी वगैरे लोक मागें असतील त्यांचें सांत्वन करीत सर्वांच्या मागून जावें. प्रधान, मोठेमोठे योद्धे, व हत्ती यांस बरोबर घेऊन राजानें जलयुक्त प्रदेश किंवा पर्वत इत्यादि विकट ठिकाणीं जावें.

जमिनीवरून चाललें असतां घोडे असावे, पाण्यांतून चाललें असतां नौका असाव्या, पायदळ सर्व ठिकाणीं असावें; पावसाळा असला तर हत्ती बरोबर असणें फार चांगलें, इतर ऋतूंमध्यें घोडे फार उपयोगी, पायदळ तर सर्वकाळ उपयोगी आहेच. पर्वत, विकट मार्ग, इत्यादिकांच्याठायीं राजास लोकांनीं फार संभाळिलें पाहिजे. सैन्यानें रक्षण केलें तरीं योग्याप्रमाणें राजाची झोंप जागृत असावी, शत्रूंचा नाश करावा, कांटे, धोंडे, असतील अशा विकट ठिकाणीं त्यांस पळावयास लावावें. गैरमाहित ठिकाणीं जावयाचे वेळेस रानांतील माहितगारांस पुढें करावें. जेथें राजा असेल, तेथें जामदारखाना असला पाहिजे. जामदारखान्याशिवाय राजास राजेपणा नाहीं. जामदारखान्यांतून आपल्या लोकांस पैसा द्यावा. पैसा देणाऱ्याकरितां कोण लढणार नाहीं ? हे राजा, मनुष्य मनुष्याचा चाकर नाहीं, तो पैशाचा चाकर आहे. मोठेपणा व लहानपणा हा द्रव्याच्या संबंधानें आहे. आपल्या लोकांत फुटाफूट पडूं देऊं नये. परस्परांचें रक्षण करावें. कमी योग्यतेचें सैन्य असेल तें सर्वांच्या मध्यभागीं ठेवावें. राजानें सैन्याच्या अग्रभागीं पायदळ ठेवावें. शत्रूंस वेढा घालून त्यांच्या राष्ट्रास पीडा द्यावी. घोडे व रथ घेऊन जमिनीवर युद्ध करावें. जलमय प्रदेश असेल तेथें नावा आणि हत्ती यांच्या साधनानें लढावें. झाडी असेल तेथें धनुष्यानें युद्ध करावें. इतर ठिकाणीं ढालतलवार घेऊन युद्ध करावें. शत्रूंची वैरण, अन्न, उदक, सर्पण, यांचा नाश करावा. तळीं, कोट, खंदक, हीं मोडून टाकावीं. सैन्यामध्यें हत्ती मुख्य होय, असा दुसरा नाहीं. आपल्या अवयवांच्या योगानें हत्तीस अष्टायुध असें ह्मटलें आहे. घोडे हे तर चालता किल्लाच आहे. याकरितां ज्या राजाजवळ घोडे पुष्कळ असतात, तो जमिनीवरील युद्धांत विजयी होतो. योद्धे घोड्यांवर बसले ह्मणजे देवांसदेखील त्यांस जिंकितां ये-

णार नाहीं. शत्रु त्यांपासून दूर असले तरी जवळ होतात. सर्व सैन्याचें रक्षण करणें हें योद्ध्यांचें पहिलें काम होय. दूर गेलेल्या योद्ध्यांस पायदळांनीं शोधून काढावें. स्वभावतः शूर, अस्त्रें जाणणारे, स्वामिभक्त, श्रम सोसणारे, क्षत्रियकुलाभिमानी, असे बहुत लोक ज्या सैन्यांत असतील, तें सैन्य उत्तम होय. राजा, राजानें शूराचा मान ठेविला असतां ते जसे लढतात, त्याप्रमाणें द्रव्य दिल्यानेंहि लढत नाहींत.

चांगलें सैन्य थोडें असलें तरी हरकत नाहीं; उगाच मुंडकीं पुष्कळ असून हांशील नाहीं. वाईट सैन्य पुष्कळ असून त्याचा पराभव झाला ह्मणजे चांगल्याचासुद्धां नाश होतो. योद्ध्यांस संतुष्ट न ठेवणें, देखरेख न करणें, द्यावयाचें तें न देणें, काम लांबणीवर टाकणें, अडचण आली तर तिचा प्रतीकार न करणें, या गोष्टींनीं सेनेंतील लोक उदासीन होतात. शत्रूंच्या सैन्यास पीडा देऊन आपल्या सैन्यास अतिसंतुष्ट ठेवावें. शत्रूंच्या सैन्यास पुष्कळ पळावयास लाविल्यानें तें लवकर दमून आपल्या हातांत येतें. शत्रूंकडे फितूर करण्यास त्यांच्या भाऊबंदासारखा दुसरा कोणी मसलती नसतो, याकरितां यत्न करून त्यांच्या भाऊबंदांस त्यांवर उठवावें. राज्याचा पुढला वारस किंवा मुख्य प्रधान यांशीं संधान बांधून शत्रूंकडे कलह उत्पन्न करावा. त्याचा शूर मित्र असेल त्याचा नाश करावा किंवा गाईप्रमाणें परदेशांतून धरून आणून आपल्या देशांत ठेवावा; अथवा दानमानांनीं सत्कार करून ठेविला तरी त्यापासून फायदा होतो.

**राजा**—अंः, फार बोलून काय उपयोग ?

आपला उदय आणि शत्रूंचा नाश एवढीच काय ती नीति. हेंच नीतिशास्त्र असें शहाणे समजतात.

**गृध्र**—( हंसून ) आपण ह्मणता हें सर्व खरें. परंतु मी एक विशेष सांगतों; एक यथेच्छ आचरण करणारा, व दुसरा शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें करणारा, यांची बरोबरी होणार नाहीं. प्रकाश आणि अंधकार एके ठिकाणीं कसे राहतील ?

नंतर राजानें जोशानें सांगितलेल्या मुहूर्तावर प्रस्थान केलें. इतक्यांत पाठविलेला दूत येऊन राजहंसास ह्मणाला, महाराज, चित्रवर्ण राजा येऊन ठेपल्याप्रमाणेंच आहे. हल्लीं त्यानें मलय पर्वताच्या माथ्यावर तळ दिला आहे. एकदम किल्ल्याची चवकशी केली पाहि-

जे. कारण गृध्र हा त्याचा मोठा मसलती प्रधान आहे. तो कोणावरोवर विश्वासानें गोष्टी सांगत असतां मीं असा तर्क केला कीं, त्यानें पूर्वींच कोणी तरी आमच्या किल्ल्यांत पाठविला आहे.

**चक्रवाक**—महाराज, हा बहुतकरून कावळाच असावा बरें.

**राजा**—अशी गोष्ट होणार नाहीं. असें असतें तर तो शुकास मारावयास कां उद्युक्त होता? दुसरें असें कीं, शुक आल्यापासून त्यास लढाईविषयीं विशेष उत्साह आला आहे. शिवाय तो फार दिवस येथेंच आहे.

**चक्रवाक**—कांहीं असलें तरी आगंतुकाची शंका घेतली पाहिजे.

**राजा**—आगंतुकांनीं कधीं कधीं उपकार केलेला आढळतो, ऐका,—

परकी असला तरी हित करितो तो बंधु; बंधु असूनहि अहित करितो तो परकी. रोग देहांत उत्पन्न होतो, परंतु तो नाश करितो; औषध अरण्यांत उत्पन्न होतें; तरी तें कल्याण करितें.

दुसरें,—

शूद्रक राजाचा वीरवर नांवाचा सेवक होता, त्यानें थोड्याच काळानें आपला मुलगा बळी दिला.

**चक्रवाक**—हें कसें?

**राजा**—शूद्रक राजाच्या क्रीडेच्या सरोवरावर कर्पूरकेलि नांवाचा राजहंस राहत असे. त्याची कन्या कर्पूरमंजरी नांवाची होती. तिचें व माझें मोठें प्रेम जमलें होतें. तेथें वीरवर नांवाचा एक राजपुत्र एका देशाहून आला आणि राजवाड्यापाशीं जाऊन द्वारपालास ह्मणाला, मला चाकरीची गरज आहे, या करितां राजाची भेट घ्यावयाची आहे. नंतर द्वारपालानें त्यास राजाजवळ नेलें, तेव्हां तो ह्मणाला, महाराज, मला चाकरीस ठेवणें असेल तर मी मागेन तें वेतन मला दिलें पाहिजे.

**शूद्रक**—तुला किती वेतन पाहिजे?

**वीरवर**—रोज पांचशें होन द्या.

**शूद्रक**—तुझ्याजवळ असें साधन तरी काय आहे?

**वीरवर**—दोन हात आणि तिसरी तलवार.

**शूद्रक**—आह्मांकडून तजवीज होणार नाहीं.

हें ऐकून वीरवर जाऊं लागला तेव्हां प्रधान ह्मणाले, महाराज, चार दिवसांचा रोजमुरा देऊन पहावें तर खरें हा काय करितो तें. इ-

तका रोजमुरा फुकट घेतो किंवा याचा कांहीं उपयोग आहे तें समजेल. प्रधानांचें भापण ऐकून राजानें वीरवरास बोलावून विडा देऊन पांचशें होन दिले. त्या द्रव्याचें वीरवर काय करितो याची राजा गुप्तपणें चौकशी करीत होता. त्या द्रव्यापैकीं वीरवरानें देवब्राह्मणांस अर्धे दिलें. बाकी राहिलेल्यांतून अर्धे संकटांत पडलेल्या मनुष्यांस दिलें, आणि राहिलेलें आपल्या खाण्यापिण्याकडे खर्चिलें. याप्रमाणें रोज करून अहोरात्र हातांत तलवार घेऊन राजवाड्याच्या देवडीवर वसलेला असे. राजानें आज्ञा दिल्यास आपल्या बिऱ्हाडींही जात असे. एके वेळेस कृष्णपक्षांत चतुर्दशीच्या रात्रीस कोणी रडत आहे असें राजानें ऐकिलें; तेव्हां तो ह्मणाला, देवडीवर कोण आहेरे?

**वीरवर**—मी वीरवर आहें महाराज.

**राजा**—कोण रडतें तें जाऊन पहा वरें.

आज्ञा महाराज, असें ह्मणून तो वीरवर चालता झाला. तो गेल्यावर राजास वाटलें, ह्या एकट्या राजपुत्रास अशा गाढ अंधारांत पाठविलें हें योग्य नाहीं. याकरितां याच्या मागून जाऊन काय आहे तें आपणदेखील पाहूं. नंतर राजाहि तलवार घेऊन त्याच्या मागून शहराच्या बाहेर गेला. वीरवर पुढें गेला; त्यानें एक तरुण, रूपवान्, सर्व अलंकारांनीं भूपित, अशी स्त्री पाहिली. तेव्हां तू कोण? कां रडतेस? असें त्यानें तिला विचारिलें.

**स्त्री**—मी ह्या शूद्रक राजाची राजलक्ष्मी आहें. पुष्कळ दिवस सुखानें यापाशीं राहिलें. आतां दुसरीकडे जाणार.

**वीरवर**—जेथें अपाय आहे तेथें उपायही असेल. तर आपलें येथें कोणत्या उपायानें रहाणें होईल?

**लक्ष्मी**—जर तू बत्तीस लक्षणांनीं युक्त असा शक्तिधर नांवाचा आपला पुत्र सर्वमंगलादेवीला बळी देशील, तर मी पुनः चिरकाळ येथें राहीन.

असें ह्मणून ती गुप्त झाली. नंतर वीरवरानें आपल्या बिऱ्हाडीं जाऊन बायको व मुलगा निजला होता, त्यांस जागें केलें. तीं जागीं होऊन बसल्यावर वीरवरानें त्यांस लक्ष्मीबरोबर झालेलें सर्व भापण सांगितलें. तें ऐकून शक्तिधर आनंदानें ह्मणतो, मी धन्य आहें. धन्याचें राज्यरक्षण करण्यास माझा उपयोग व्हावा हें योग्य आहे. तर आतां उशीर कां? अशा कर्मांत देहसार्थक होणें चांगलें आहे. कारण,—

धन आणि जीव हीं शहाण्यानें दुसऱ्याकरितां सोडावीं. त्यांचा नाश जर खास व्हावयाचा आहे तर तीं दुसऱ्याच्या उपयोगास लावणें चांगलें.

**शक्तिधराची आई**—हें न करावें तर एवढें मोठें थोरलें वेतन घेतलें आहे त्याची फेड दुसऱ्या कोणत्या गोष्टीनें होईल?

याप्रमाणें विचार करून तीं सर्व सर्वमंगलादेवीच्या देवळाजवळ गेलीं. देवीची पूजा करून वीरवर ह्मणाला, हे देवी, प्रसन्न हो. शूद्रक महाराजांचा जयजयकार असो, या बळीचा स्वीकार करावा. असें ह्मणून त्यानें पुत्राचा शिरच्छेद केला. नंतर तो ह्मणाला, राजाचें वेतन घेतलें त्याचा उपकार फेडिला. आतां पुत्राशिवाय मला वांचून तरी काय करावयाचें? असें ह्मणून त्यानें आपलाही शिरच्छेद केला. हें पाहून भर्त्याच्या आणि पुत्राच्या शोकानें पीडित झालेल्या त्याच्या स्त्रीनेंही आपला शिरच्छेद केला. हें सर्व पाहून राजास मोठें आश्चर्य वाटून तो ह्मणाला,—

माझ्यासारखे क्षुद्र जंतु उत्पन्न होतात आणि मरतात. परंतु यासारखा जगांत कधीं झाला नाहीं आणि होणारहि नाहीं.

असें आहे तर असा सेवक नाहींसा झाल्यावर मला राज्याचें तरी काय करावयाचें? असें ह्मणून त्यानेंही आपला शिरच्छेद करण्यास हातांत तलवार घेतली. तेव्हां सर्वमंगलादेवी राजाचा हात धरून त्यास ह्मणाली, पुत्रा, मी तुला प्रसन्न झालें, असें साहस करूं नको. मेल्यावर सुद्धां तुझें राज्य नाहींसें व्हावयाचें नाहीं. राजा साष्टांग नमस्कार घालून ह्मणाला, देवी, मला राज्याचें किंवा जीवाचें काय करावयाचें? मजवर कृपा करणें असेल तर माझें आयुष्य देऊन ह्या राजपुत्रास स्त्रीपुत्रांसहवर्तमान जिवंत कर.

**देवी**—पुत्रा, या तुझ्या सर्वोत्कृष्ट सेवकवात्सल्यानें मी संतुष्ट झालें. जा, तुझा विजय असो. हा राजपुत्रही स्त्रीपुत्रांसहवर्तमान जिवंत होवो.

असें ह्मणून देवी गुप्त झाली. नंतर वीरवरही स्त्रीपुत्रांशीं सहवर्तमान सजीव होऊन आपल्या बिऱ्हाडीं गेला. राजाही त्यांच्या दृष्टीस पडल्याशिवाय वाड्यांत गेला.

प्रातःकाळीं पुनः वीरवर देवडीवर आला तेव्हां राजानें त्यास रात्रीस कोण रडत होतें याविषयीं विचारिलें. तेव्हां तो ह्मणाला, महा-

राज, एक स्त्री रडत होती. ती मला पाहतांच गुप्त झाली, याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. हें ऐकून राजा ह्मणाला, केवढें मोठें स्तुत्य औदार्य याचें हें! कारण,—

उदार असून गोड बोलणारा, शूर असून गर्व न करणार, दाता असून अपात्रीं न देणारा, आणि धीट असून दयाळु, हीं सर्व थोरांचीं लक्षणें यामध्यें आहेत.

नंतर राजानें सभा भरवून सर्वांस झालेला वृत्तांत सांगून वीरवराची स्तुति करून त्यास कर्नाटकचें राज्य दिलें. असें आहे तर आगंतुक एवढ्यामुळेंच कोणी वाईट आहे काय?-त्यांतही उत्तम, मध्यम, कनिष्ट, आहेत.

**चक्रवाक**—राजास आवडतें ह्मणून अकार्य करण्यास सांगतो तो मंत्री ह्मणावा काय? राजाची मर्जी नाखुष झालेली वरी, परंतु भलतेंच करण्यास सांगूं नये. वैद्य, गुरु, मंत्री, हे राजास गोड वाटेल तें सांगूं लागले ह्मणजे त्याचें शरीर, धर्म, कोश, हीं लवकरच नाहींतशीं होतात.

ऐका महाराज,—

पुण्याच्या योगानें एकाला मिळालें तेंच मला मिळेल असें मानून द्रव्याच्या लोभानें भिकाऱ्यास मारल्यामुळें न्हावी प्राणास मुकला.

**राजा**—हें कसें?

**चक्रवाक**—अयोध्येमध्यें चूडामणि या नांवाचा एक क्षत्रिय राहत असे. त्यानें धनप्राप्तीकरितां मोठ्या कष्टानें शिवाची आराधना पुष्कळ दिवस केली. त्यामुळें पापक्षय होऊन त्यास स्वप्नामध्यें कुबेरानें असें सांगितलें कीं, उद्यां सकाळीं क्षौर करून हातांत सोटा घेऊन गुप्तपणें आंगणांत उभा रहा. तेथें एक भिकारी तुझ्या दृष्टीस पडेल त्यास खुब बडीव, ह्मणजे तुला एक सोन्यानें भरलेलें भांडें मिळेल. तें मिळालें ह्मणजे तुझी जन्मभर चैन होईल. याप्रमाणें केल्यावर कुबेरानें सांगितल्याप्रमाणें झालें. ही गोष्ट क्षौर करण्यास आलेल्या न्हाव्यानें पाहिली होती, त्यामुळें त्यास वाटलें कीं, आपणहि हा द्रव्यप्राप्तीचा उपाय कां न करावा? तेव्हांपासून तो न्हावी रोज हातांत सोटा घेऊन भिकाऱ्याची वाट पहात असे. एके दिवशीं भिकारी येतांच त्यानें त्यास चोपिलें, त्यामुळें तो मेला. या अपराधाबद्दल राजाच्या कामदारांनीं न्हाव्यास पकडून फांशीं दिलें. ह्मणून मी सांगतों कीं, पुण्याच्या योगानें एकास मिळालें इत्यादि.

**राजा**—पूर्वी घडलेल्या गोष्टी सांगून दुसऱ्याविषयीं निर्णय कसा करावा? कोणी निष्कारण बंधुहि होतो, व कोणी विश्वासघातकीहि होतो. असो, सांप्रत काय करावें याकडे लक्ष दिलें पाहिजे. मलय पर्वतावर चित्रवर्ण आला असल्यास आतां काय करावें?

**चक्रवाक**—तिकडून आलेल्या दूताच्या मुखापासून म्यां असें ऐकिलें कीं, त्याचा मोठा मसलती प्रधान जो गृध्र त्याचा उपदेश चित्रवर्णानें ऐकिला नाहीं. असें असेल तर त्या मूर्खास तेव्हांच जिंकतां येईल. ह्मटलें आहे.

लोभी, क्रूर, आळशी, खोटा, ज्याच्या भोंवतालीं निःकाळजी कामदार आहेत असा, मूर्ख, योद्ध्यांचा अपमान करणारा, असा शत्रु असेल त्याचा सहज उच्छेद करितां येतो.

याकरितां त्यानें आपल्या किल्ल्यास वेढा घातला नाहीं तोंच नद्या, पर्वत, यांतील मार्गांत त्याच्या सैन्याच्या टोळया मारण्याकरितां सारसादिक सेनापतींस पाठवावें. ह्मटलें आहे,—

फार वाट चालल्यामुळें दमलेलें, नद्या, पर्वत, रानें, यांनीं पीडित झालेलें; वणव्याच्या भयानें त्रासलेलें; क्षुधातृषांनीं व्यापलेलें; बेसावध; जेवणांत गुंतलेलें; रोग किंवा दुष्काळ यांनीं पीडित झालेलें; चांगल्या जागीं न राहिलेलें; तुटातूट झालेलें; पाऊस, वारा, यांनीं त्रास पावलेलें; चिखल, धूळ, पाणी, यांनीं त्रस्त झालेलें; अव्यवस्थेनें राहिलेलें; चोरांनीं घाबरविलेलें; असें शत्रूचें सैन्य असेल त्याचा राजानें नाश करावा.

दुसरें.—

छापा येईल ह्मणून जागून श्रमल्यामुळें दिवसास झोंपेनें गुंगलेल्या परसैन्याचा राजानें नाश करावा.

याकरतां तो बेसावध आहे तोंच आपल्या सेनापतींनीं जाऊन सवड सांपडेल त्याप्रमाणें रात्रीस व दिवसास त्याच्या सैन्याचा नाश करावा.

असें केल्यामुळें चित्रवर्णाचे पुष्कळ योद्धे व सेनापति मेले. तेव्हां चित्रवर्ण खिन्न होऊन आपला मंत्री जो दूरदर्शी गृध्र त्यास बोलावून ह्मणाला, बाबा, कां आमची उपेक्षा करतोस? आमचा काय दांडगेपणा झाला? ह्मटलें आहे,—

राज्य प्राप्त झालें ह्मणून अयोग्य वर्तन करूं नये, जरेनें सौंदर्य नाहींसें होतें, त्याप्रमाणें अविचारानें संपत्ति नाहींशी होते.

कुशलास लक्ष्मी प्राप्त होते; पथ्य करील त्याची प्रकृति चांगली रहाते; निरोगी असतो त्यास सुख प्राप्त होतें; उद्योगी आहे त्यास सर्व विद्या होतात; आणि नम्र आहे त्यास धर्म, अर्थ, आणि यश, हीं प्राप्त होतात.

गृध्र—पाण्याजवळचा वृक्ष जसा फार वाढतो, त्याप्रमाणें राजा अविद्वान् असला तरी विद्यावृद्ध मनुष्याच्या सान्निध्यानें मोठी संपत्ति पावतो.

मद्यपान, स्त्रिया, पारध, द्यूत, उधळेपणा, कठोर भाषण, आणि कडक दंड, हीं राजाचीं घातक व्यसनें आहेत.

आणखी,—

नीति आणि शौर्य यांचेठायीं मोठी संपत्ति रहाते, ती नेहमीं साहस करणाऱ्यास प्राप्त होत नाहीं, किंवा नेहमीं भिणाऱ्यासही प्राप्त होत नाहीं.

तुह्मांस आपल्या सैन्याचा उत्साह पाहून साहस करावेंसें वाटलें, त्यामुळें म्यां सांगितलेल्या मसलतीकडे दुर्लक्ष करून तुह्मीं पाहिजे तसें बोललां, त्यामुळें अनीतीचें हें फळ आलें. ह्मटलें आहे,—

भलतीच मसलत केली असतां नीतिदोष कोणास प्राप्त होत नाहींत? लक्ष्मी कोणास गर्विष्ठ करीत नाहीं? मृत्यु कोणास मारीत नाहीं? आणि विषयवासना कोणास पीडा देत नाहीं?

दुसरें,—

खेदानें हर्ष नाहींसा होतो, हिंवाळा आला ह्मणजे शरदृतु नाहींसा होतो, सूर्य अंधकाराचा नाश करितो, कृतघ्नतेनें पुण्य नाहींसें होतें, इष्टप्राप्ति झाली ह्मणजे शोक नाहींसा होतो, आपत्ति प्राप्त झाली ह्मणजे नीति सुटते, आणि मोठी वाढलेली संपत्ति असली तरी अनीतीनें नाहींशी होते.

याप्रमाणें बोलून प्रधानानें विचार केला कीं, हा राजा बुद्धीहीन आहे. ह्मटलें आहे,—

ज्याला आंगची बुद्धि नाहीं, त्याला शास्त्र काय करील? ज्याला डोळे नाहींत, त्याला आरसा काय करावयाचा?

असें बोलून उगाच बसला, तेव्हां राजा हात जोडून त्यास ह्मणाला,

बावा; माझाच अपराध आहे. आतां राहिलेलें सैन्य घेऊन विंध्याद्रीकडे जाणें होईल अशी युक्ति सांग. हें ऐकून गृध्र मनांत ह्मणाला; कांहीं तरी तोड काढिली पाहिजे. कारण,—

देव, गुरु, गाय, राजा, ब्राह्मण, बाल, वृद्ध, रोगी, यांवर राग धरूं नये.

असा विचार करून तो हास्य करून राजास ह्मणाला, महाराज; भिऊं नका; स्वस्थ असा, मी सांगतों तें ऐका.

मसलत बिघडली असतां प्रधानाची अक्कल दिसून येते, सन्निपात झाला असतां वैद्याचें शहाणपण कळतें. स्वस्थपणा असल्यावर पंडित कोण नाहीं ?

अप्रबुद्ध असतात ते लहानसें काम आरंभितात तरी फार व्यग्र होतात. बुद्धिमान् असतात ते मोठाले उद्योग आरंभून स्वस्थ असतात.

असें आहे तर तुमच्या प्रभावानें मी किल्ला सर करून कीर्ति व पराक्रम यांसहित आपणांस विंध्याद्रीकडे नेईन.

**राजा**—एवढ्याशा सैन्यानें हें कसें होईल ?

**गृध्र**—महाराज, सर्व होईल. जय इच्छिणाऱ्यानें प्रथमतः चेंगटपणा टाकिला पाहिजे, याकरितां एकदम किल्ल्यास वेढा घालावा.

याप्रमाणें झाल्यावर बगळ्यानें हिरण्यगर्भास कळविलें कीं, गृध्राची मसलत ऐकून चित्रवर्ण राजानें थोडेंसें सैन्य बरोबर असतांही किल्ल्यास वेढा घातला.

**हिरण्यगर्भ**—प्रधानजी, आतां काय करावें ?

**चक्रवाक**—आपल्या सैन्यापैकीं चांगलें कोणतें व वाईट कोणतें याची निवड करावी. आणि योग्यतेप्रमाणें सर्वांस सुवर्ण, वस्त्रें वगैरे बक्षिसें द्यावीं. कारण,—

जो गल्लींत पडलेली कवडी देखील सुवर्णाप्रमाणें उचलून घेतो, परंतु योग्यवेळीं कोट्यावधि रुपये भराभर खर्चितो, अशा राजसिंहास लक्ष्मी सोडीत नाहीं.

हे राजा, यज्ञ, लग्न, संकट, शत्रुक्षय, शुभकर्म, मित्रसंपादन, प्रियस्त्री, दरिद्री बांधव, या आठ गोष्टींविषयीं फार खर्च होतो असें ह्मणूं नये. कारण,—

मूर्ख असतो तो थोड्या खर्चास भिऊन सर्वांचा नाश करितो. असा कोण शहाणा आहे कीं, व्याज बुडतें ह्मणून मुद्दलही बुडवील ?

**राजा**—अशा वेळेस कसा फार खर्च करावा? आपत्कालाकरितां धनरक्षण करावें अशी ह्मण आहे.

**प्रधान**—श्रीमानास कसली आपत्ति?

**राजा**—कदाचित् संपत्ति नाहींशी झाली तर?

**प्रधान**—संचय केलेलाही कधीं कधीं नाहींसा होतो. याकरितां महाराज, कृपणपणा सोडून देणग्या देऊन आपल्या योद्ध्यांचा सत्कार करावा. ह्मटलें आहे,—

परस्पर मिलाफानें असणारे, आनंदित, जिवावर उदार झालेले, कुलीन, अशा वीरांचा सत्कार केला तर ते शत्रूंचें सैन्य जिंकितात.

दुसरें,—

विश्वासू, एकजुटाचे, दृढनिश्चयी, असे पांच योद्धे आपलेकडे असले तर ते शत्रूच्या शंभर लोकांबरोबर लढतील.

आणखी,—

ज्यास लहान मोठे सर्व सारखे, जो उग्र, दुसऱ्याच्या स्वाधीन किंवा आपलपोट्या, अशा मनुष्यास लोक सोडून देतात.

आणखी,—

सत्य, शौर्य, दया, दान, हे राजाचे मोठे गुण होत. हे ज्याच्या अंगीं नाहींत, त्याची निंदा होते.

अशा वेळेस प्रधानावर सर्व काम सोंपावें. कारण,—

जो शहाणपण शिकवील, त्याच्या अनुमतानेंच धन मिळविणें, किंवा खर्च करणें या गोष्टी कराव्या. त्यावर विश्वास ठेवून आपला प्राण व धन त्याच्या स्वाधीन करावें. कारण,—

लुच्चा, स्त्री, अल्पवयी, हे ज्या राजाचे कारभारी असतील, तो अनीतिरूप वादळांत सांपडून संकटसमुद्रांत बुडतो.

आणखी ऐका महाराज,—

जो हर्ष आणि क्रोध या दोहोंच्या वेळेस सारखा, शास्त्राचें तत्त्व जाणणारा, जो दुसऱ्यावर अवलंबून न राहणारा, अशास पृथ्वी फलद्रूप होते.

राजाची वृद्धि तीच आपली वृद्धि, राजाचा नाश तोच आपला नाश, असें ज्यांस वाटतें ते खरे प्रधान होत; त्यांचा राजानें कधींही अपमान करूं नये.

दुसरें,—

हत्तीप्रमाणें मदांध होऊन राजा पडूं लागला असतां पुष्कळ दिवसांचा चांगला प्रधान असतो तो त्यास आश्रय देतो.

असें बोलणें चाललें आहे तों मेघवर्ण कावळा आला आणि नमस्कार करून ह्मणाला, महाराज, कृपावलोकन करावें, शत्रु किल्ल्याजवळ येऊन ठेपला. याकरितां महाराजांच्या चरणांची आज्ञा असेल तर बाहेर जाऊन आपला पराक्रम दाखवितों, आणि महाराजांच्या ऋणांतून मुक्त होतों.

चक्रवाक—असें करूं नका. बाहेर पडून युद्ध करावयाचें असेल तर किल्ल्यांत राहाणेंच व्यर्थ आहे. दुसरें असें आहे कीं,

मगर पाण्यांत असला ह्मणजे मोठा बळकट असतो, परंतु बाहेर आला ह्मणजे दुर्बळ होतो. सिंह आपल्या रानांतून दूर गेला तर तोही कोल्ह्यासारखा होतो. याकरितां महाराज, आपण स्वतः जाऊन युद्ध पहावें. कारण,—

सैन्यास युद्ध करण्यास पुढें करून राजानें पहात असावें. धनी जवळ असला ह्मणजे कुत्रादेखील सिंहाप्रमाणें धैर्य धरीत नाहीं काय ?

नंतर ते किल्ल्याच्या दाराशीं जाऊन मोठें युद्ध करूं लागले. दुसऱ्या दिवशीं चित्रवर्ण गृध्रास ह्मणाला, आतां आपली प्रतिज्ञा शेवटास ने. गृध्र ह्मणाला, महाराज, ऐका तर खरें.

उतावीळ, फार थोडे, ज्यांचा अधिकारी मूर्ख किंवा व्यसनी आहे असे, अव्यवस्थित, भित्रे, असे योद्धे असले ह्मणजे किल्ला सर करितां येत नाहीं. तसें येथें नाहीं.

फितुर, पुष्कळ दिवस वेढा घालणें, हल्ला करणें, किंवा पराक्रम करणें, हे चार उपाय किल्ला सर करण्याचे सांगितले आहेत.

आतां यथाशक्ति यत्न करीत आहें; असें ह्मणून त्यानें चित्रवर्णाच्या कानांत कांहीं गोष्ट सांगितली. नंतर प्रातःकाळीं सूर्योदयाबरोबर चोहोंबाजूंस युद्ध सुरू झालें असतां किल्ल्यांतील घरांस कावळ्यांनीं आग लाविली. तेव्हां 'किल्ला घेतला, किल्ला घेतला,' असा एकदम गोंगाट झाला. तो ऐकून आणि सर्व बाजूंला आग भडकलेली पाहून राजहंसाच्या सेनेंतील व इतर किल्ल्यांतील लोकांनीं डोहांत उड्या टाकिल्या. कारण, अशा विकट प्रसंगीं कांहीं मसलत योजावी, पराक्रम करावा, युद्ध करावें किंवा पळून तरी जावें; परंतु शक्तीप्रमाणें उपाय न करितां विचार करीत बसूं नये.

नंतर राजहंस स्वभावतः मंदगति असल्यामुळें त्याचा सेनापति जो सारस त्यासहवर्तमान त्यास चित्रवर्णाचा सेनापति कोंबडा यानें पकडिलें. तेव्हां हिरण्यगर्भ सारसास ह्मणतो, सारसा, माझ्याकरितां आपणास कां मारून घेतोस? तुला पळतां येईल, याकरितां तसें करून पाण्यांत शिरून आपलें रक्षण कर. सर्वज्ञ चक्रवाकाच्या सह्यानें माझा पुत्र जो चूडामणि त्यास राज्यावर बसवावें.

**सारस**—असें कठोर भाषण करूं नका. चंद्रसूर्य आकाशांत आहेत तोंपर्यंत तुमचा विजय असो, मी महाराजांच्या किल्ल्याचा अधिकारी आहें. माझ्या रक्तानें शिंपडलेल्या मार्गानें शत्रु आंत शिरेल. दुसरें असें आहे कीं,

दाता, क्षमाशील, गुणग्राही, असा धनी मिळणें कठीण.

**राजहंस**—हें खरें, परंतु प्रामाणिक, हुशार, अनुकूल, असा सेवकही दुर्लभ.

**सारस**—महाराज, समरांगणांतून पळाल्यावर मृत्यूचें भय नाहीं, असें असेल तर येथून जाणें ठीक आहे. प्राण्यास मरण अवश्य प्राप्त होणार आहे, तर मग व्यर्थ अपकीर्ति तरी कां करून घ्यावी?

दुसरें,—

हा संसार वाऱ्यानें हालविलेल्या उदकाच्या लाटेप्रमाणें नश्वर आहे, असें असतां पदरीं पुण्य असल्यास एखाद्यास परोपकारार्थ प्राणत्याग घडतो.

आपलें सर्वस्वीं रक्षण केलें पाहिजे. कारण प्रधान केवढाही मोठा श्रीमान् असला तरी राजाशिवाय त्याचें जीवन होत नाहीं. धन्वंतरीही वैद्य असला तरी आयुष्य संपल्यावर तो काय करील?

दुसरें,—

राजा नष्ट झाला ह्मणजे प्रजा नष्ट होतात, सूर्याचा उदय झाला तरच कमलें प्रफुल्लित होतात.

इतक्यांत कोंबडा जवळ येऊन राजहंसास मोठमोठ्या जखमा करूं लागला. तेव्हां सारसानें लवकर पुढें होऊन राजास पळवून पाण्यांत सोडून दिलें. कोंबड्यानें नखांनीं पुष्कळ जखमा केल्या तरी सारसानें त्याचेंही पुष्कळ सैन्य मारिलें. शेवटीं त्यास कोंबड्यानें चोंचीनें बोंचकारून ठार केलें. नंतर चित्रवर्णराजा किल्ल्यांत शिरला. तेथें पुष्कळ

द्रव्य मिळाल्यामुळें त्याच्या लोकांनीं त्याचा मोठा जयजयकार केला. तेव्हां तोही आनंदानें आपल्या सेनेनें तळ दिला होता तेथें गेला.

**राजपुत्र**—त्या राजहंसाच्या सैन्यांत सारस मोठा पुण्यवान् ह्मणावयाचा. त्यानें स्वामिरक्षणाकरितां प्राणत्याग केला.

**विष्णुशर्मा**—तो प्रतापी अप्सरांशींसहवर्तमान स्वर्गसुख अनुभवो. ह्मटलें आहे,—

जे शूर, स्वामिभक्त, कृतज्ञ, धन्याकरितां समरांगणांत प्राण सोडितात, ते स्वर्गास जातात.

जो शूर शत्रूंच्या कचाटींत सांपडून धैर्य न सोडितां मरतो, त्यास अक्षय्य स्वर्ग प्राप्त होतो.

**राजपुत्र**—विग्रह ऐकून आह्मांस आनंद झाला.

**विष्णुशर्मा**—ठीक आहे. आणखी हेंही असो.

हत्ती, घोडे, पायदळ, घेऊन राजांशीं लढाई करण्याचा प्रसंग तुह्मांस कधीं न येवो. नीति आणि मंत्र यांच्या वाहुटळीनें उडविलेले असे तुमचे शत्रु पर्वतांच्या गुहेंत लपून राहोत.

**विग्रह समाप्त.**

## संधि.

पुनः गोष्टी सांगत असतां राजपुत्र ह्मणाले, महाराज, विग्रह ऐकिला. आतां संधि सांगावा.

**विष्णुशर्मा**—ऐका; संधिही सांगतों. त्याचा हा पहिला श्लोक.

महायुद्धांत दोन्हीही सैन्यें नाशास पावतां ॥
मध्यस्थगृध्रचक्रांनीं संधी केलाच तत्क्षणीं ॥ १ ॥

**राजपुत्र**—हें कसें झालें ?

**विष्णुशर्मा**—नंतर राजहंसानें विचारलें कीं, कोणीं परक्यानें किल्ल्यास आग लाविली, अथवा आपल्याकडचा कोणी फितूर झाला ?

**चक्रवाक**—महाराज, तो आपला निष्कारण मित्र मेघवर्ण आपल्या मंडळीसहवर्तमान कोठें दिसत नाहीं, यावरून असें वाटतें कीं, हें त्याचेंच कृत्य असावें.

**राजा**—(विचार करून) माझें दुर्दैव ह्मणावयाचें. कारण काम चांगलें विचारानें केलें तरी नासतें, हा दैवाचा अपराध समजावयाचा, प्रधानाचा नाहीं.

**चक्रवाक**—ह्मटलें आहे,—

मूर्ख असतो तो दुर्दशा प्राप्त झाली ह्मणजे दैवाची निंदा करितो, परंतु आपले कर्मदोष जाणत नाहीं.

दुसरें,—

हितेच्छु मित्राचें वाक्य ज्यास आवडत नाहीं, तो मूर्ख काठीपासून पडलेल्या कांसवाप्रमाणें नाश पावतो.

**राजा**—हें कसें ?

**चक्रवाक**—मगध देशामध्यें फुल्लोत्पल नांवाचें सरोवर आहे. तेथें संकट आणि विकट या नांवांचे दोन हंस फार दिवस रहात असत. तेथेंच त्यांचा कंबुग्रीव नांवाचा कांसव मित्र रहात होता. एकदा तेथें कोळी आले आणि ह्मणाले, आज येथें वस्तीस राहून सकाळीं मासे, कांसवें वगैरे मारावीं. हें ऐकून कांसव हंसांस ह्मणाला, मित्रांनो, हें भाषण ऐकिलें ना ? आतां म्यां काय करावें ?

**हंस**—एकादी युक्ति तर शोधून काढा, सकाळीं त्याप्रमाणें करितां येईल.

**कांसव**—छे छे, अशानें नाश झालेला म्यां पाहिला आहे. कारण,—

अनागतविधाता[1] आणि प्रत्युत्पन्नमति[2] हे दोघे सुखानें राहिले, परंतु यद्भविष्याचा[3] नाश झाला.

**हंस**—हें कसें ?

**कांसव**—पूर्वीं याच सरोवरांत अनागतविधाता, प्रत्युत्पन्नमति, आणि यद्भविष्य, या नांवांचे तीन मासे रहात असत. एके समयीं हल्लींप्रमाणेंच कोळी येऊन बोलले असतां अनागतविधाता खोल पाण्यांत जावें असें ह्मणून डोहांत गेला. प्रत्युत्पन्नमति ह्मणाला, आपणावर संकट येईलच असा नियम नाहीं. याकरितां मी कोठें जात नाहीं. आलेंच तर त्या वेळेस सुचेल तसें करूं. यद्भविष्य ह्मणाला,—

जें नेमलेलें नसेल तें होणार नाहीं, नेमलेलें असेल तें चुकणार नाहीं; हें चिंतारूपविषाचा नाश करणारें औषध कां पिऊं नये ?

प्रातःकाळीं प्रत्युत्पन्नमति जाळयांत सांपडला तेव्हां त्यानें मेल्याचें सोंग घेतलें. त्यामुळें कोळयानें त्यास जाळयाबाहेर काढून टाकिलें, तेव्हां तो उडी मारून खोल पाण्यांत शिरला. यद्भविष्य जाळयांत सांपडला, त्यास कोळयांनीं मारिलें. ह्मणून मी ह्मणतों कीं, अशानें नाश व्हावयाचा. याकरितां मी दुसऱ्या जलाशयाकडे जाईन अशी तजवीज करा.

**हंस**—जलाशयांत गेल्यावर ठीक आहे. परंतु, जमिनीवरून जातानां अडचण आली तर कसें करावें ?

**कांसव**—तुह्मी दोघेजण मला अधांत्रीं उचलून न्या.

**हंस**—हें कसें होईल ?

**कांसव**—तुह्मी दोघे चोंचीनें एक काठी धरा ह्मणजे तिला मध्यभागीं धरून मला जातां येईल. तुह्मी आपल्या पंखांच्या जोरानें उडालां ह्मणजे माझें सहज जाणें होईल.

**हंस**—हा उपाय आहे खरा, परंतु,

---

१ संकट प्राप्त होण्यापूर्वींच त्यांतून पार पडण्याचा उपाय करणारा.

२ संकट प्राप्त झाल्यावर सुटण्याचा उपाय योजूं लागणारा.

३ जें होईल तें होईल, असें ह्मणून स्वस्थ बसणारा.

शहाण्यानें उपायाचा विचार करते वेळेस अपायाचाही विचार केला पाहिजे. मूर्ख बगळयांदेखत त्यांचीं पिलें मुंगसानें खाल्लीं.

**कांसव**—हें कसें झालें ?

**हंस**—उत्तरेकडे गृध्रकूट नांवाच्या पर्वतावर मोठा एक पिंपळाचा वृक्ष आहे, तेथें पुष्कळ बगळे रहात असत. त्या वृक्षाखालीं बिळांत एक सर्प रहात असे. तो त्यांचीं पिलें खाई. एके समयीं बगळयांचा शोकविलाप ऐकून एक बगळा ह्मणाला, असें करूं नका. मासे आणून मुंगसांच्या बिळापासून तों सापाच्या बिळापर्यंत ओळीनें टाकून ठेवा. ते मासे खात मुंगसें आलीं ह्मणजे साप त्यांच्या दृष्टीस पडेल. मग त्यास तीं खाऊन टाकितील. याप्रमाणें केल्यावर बगळयानें सांगितल्याप्रमाणें झालें. नंतर मुंगसांनीं झाडावर पक्षांच्या पिलांचा शब्द ऐकिला, तेव्हां वर चढून त्यांनीं त्यांस खाऊन टाकिलें; ह्मणून आह्मी ह्मणतों कीं, उपायाचा विचार करतेवेळेस अपायाचाही विचार केला पाहिजे. तुला नेतांना आह्मांस लोकांनीं पाहिलें ह्मणजे ते कांहीं तरी बोलतीलच, तें ऐकून त्वां त्यांस उत्तर दिलें तर मरण ठेवलेलेंच. याकरितां येथेंच रहावें हें बरें.

**कांसव**—मी इतका मूर्ख आहें काय? मी उत्तर देणार नाहीं, मी कांहीं बोलणार नाहीं.

नंतर त्यानें सांगितल्याप्रमाणें करून त्यास घेऊन हंस चालले असतां सर्व गुराखी त्यांच्या पाठीस लागून बोलूं लागले. एक ह्मणाला; जर हा कांसव खालीं पडला तर मी यास येथेंच शिजवून खाईन. दुसरा ह्मणाला, भाजूनच खावा. तिसरा ह्मणाला, घरीं नेऊन खावा. हीं भाषणें ऐकून त्या कांसवास राग आला. त्यामुळें पूर्वीचा उपदेश विसरून तो ह्मणाला, तुह्मी राखाडी खा. असें ह्मणत आहे तोंच पडला, तेव्हां गुराख्यांनीं त्यास ठार केलें. ह्मणून मी ह्मणतों कीं, हितेच्छु मित्राचें ऐकत नाहीं, इत्यादि.

इतक्यांत शत्रूकडे पाठविलेला बगळा येऊन ह्मणाला, महाराज, मी पहिल्यानेंच सांगत होतों कीं, क्षणोक्षणीं किल्ल्यांत चौकशी करावी; तें तुह्मीं केलें नाहीं, यामुळें हें दुर्लक्ष केल्याचें फळ आलें. गृध्रानें पाठविलेल्या मेघवर्ण कावळयानें किल्ला जाळिला.

**राजा**—( श्वास टाकून ) प्रीति व उपकार करून जो शत्रूवर विश्वास ठेवितो, तो झाडावर निजलेला मनुष्य खालीं पडल्यावर जागा होतो, त्याप्रमाणें हानि झाल्यावर शुद्धीवर येतो.

**बगळा**—मेघवर्ण किल्ला जाळून येथून गेला तेव्हां चित्रवर्ण राजा प्रसन्न होऊन ह्मणाला, मेघवर्णास कर्पूरद्वीपाच्या गादीवर बसवावें. ह्मटलें आहे,—

सेवकानें काम केल्यावर त्याचे उपकार कधींही विसरूं नये. बक्षीस देऊन, मनांत हित इच्छून, आनंदानें पाहून, गोड बोलून, त्याचा संतोष करावा.

**चक्रवाक**—पुढें काय झालें ?

**बगळा**—नंतर गृध्र ह्मणाला, महाराज, हें योग्य नाहीं, दुसरें कांहीं बक्षीस द्यावें. कारण,—

हे राजा, अविचाऱ्यास युक्तीची गोष्ट सांगणें हें कोंडा कांडिल्याप्रमाणें आहे. तसेंच नीचावर उपकार करणें वाळवेंत मुतल्याप्रमाणें आहे. मोठ्यांच्या पदावर नीचास कधींही बसवूं नये. ह्मटलें आहे,—

वाघ झालेला उंदीर जसा ऋषीस मारण्यास प्रवृत्त झाला, त्याप्रमाणें नीचाला मोठें पद प्राप्त झालें ह्मणजे तो धन्यास मारण्यास इच्छितो.

**चित्रवर्ण**—हें कसें ?

**गृध्र**—गौतम ऋषीच्या तपोवनांत महातपा नांवाचा ऋषि होता, त्यानें एका उंदिराच्या पिलास कावळ्यानें धरून नेतांना पाहिलें. तेव्हां दया येऊन त्यास सोडवून सांव्याचे दाणे खाऊं घालून वाढविलें. तेथें त्यास खावयास बोका त्याच्या पाठीस लागला. तेव्हां उंदीर ऋषीच्या मांडीवर जाऊन बसला. तेव्हां ऋषि ह्मणाला, उंदिरा, तू मांजर हो. त्याप्रमाणें मांजर झाल्यावर तो कुत्र्यास भिऊं लागला. तेव्हां ऋषि ह्मणाला, कुत्र्यास भितोस तर तूच कुत्रा हो. कुत्रा झाल्यावर तो वाघास भिऊं लागला, तेव्हां ऋषीनें त्यास वाघ केलें. त्यास तो वाघ उंदिराप्रमाणें दिसत असे. त्या ऋषीला आणि वाघाला पाहून सर्व लोक ह्मणत कीं, ऋषीनें उंदिराचा वाघ केला. हें ऐकून त्या वाघानें विचार केला कीं, हा ऋषि आहे तोंपर्यंत ही माझ्या मूळच्या स्वरूपाची अपकीर्तिकारक चर्चा बंद होणार नाहीं. याप्रमाणें विचार करून तो त्या ऋषीला मारण्यास निघाला. तें पाहून ऋषीनें पुनः उंदीरच हो, असें ह्मटलें; तेव्हां तो लागलींच उंदीर झाला. याकरितां मी सांगतों कीं; वाघ झालेला उंदीर इत्यादि. दुसरें असें आहे कीं, ही गोष्ट सहज होईल असें समजूं नये. ऐका,—

लहान, मोठे, मध्यम, सगळे मासे खाऊन अतिलोभामुळें बगळा खेंकड्यास गिळूं लागल्यामुळें मरून गेला.

**चित्रवर्ण**—हें कसें ?

**गृध्र**—माळवा प्रांतांत पद्मगर्भ नांवाचें एक सरोवर आहे. तेथें एक झातारा बगळा शक्तिहीन झाल्यामुळें खिन्नवदन होऊन बसला. त्यास पाहून खेंकडा ह्मणाला, खाणें पिणें टाकून आपण येथें उगीच कां बसलां ?

**बगळा**—माझा उदरनिर्वाह सगळा माशांवर; त्यांस कोळी येऊन मारणार, अशी बातमी शहराजवळ मीं ऐकिली. तेव्हां आतां खावयास न मिळून आपणास मृत्यु येणार, असें मनांत येऊन आतां खाणें पिणें कांहीं सुचत नाहीं. हें ऐकून माशांनीं विचार केला कीं, या वेळेस हा आपला मोठा उपकारी दिसतो, याकरितां आतां काय करावें ? हें यालाच पुसावें. ह्मटलें आहे,—

उपकार करणाऱ्या शत्रूशीं स्नेह करावा, परंतु अपकार करणाऱ्या मित्राशीं करूं नये. उपकार व अपकार हेंच मित्रत्वाचें व शत्रुत्वाचें चिन्ह आहे.

**मासे**—बगळेबोवा, आतां रक्षणाचा उपाय काय ?

**बगळा**—रक्षणाचा उपाय आहे. दुसऱ्या सरोवरांत जावें. मी एकेकास नेऊन तेथें तुह्मांस सोडितों.

**मासे**—ठीक आहे.

नंतर तो बगळा एकेकास नेऊन खाऊं लागला. नंतर खेंकडा त्यास ह्मणाला, बगळ्यादादा, मलादेखील त्या ठिकाणीं ने. तेव्हां खेंकड्याचें मांस कसें लागतें, तें पाहण्याकरितां मोठ्या आनंदानें त्यास घेऊन आपल्या घरीं गेला. तेथें माशांचीं हाडें पडलेलीं आहेत असें पाहून तो मनांत ह्मणाला, मी करंटा, मेलोंरे मेलों. असो, आतां प्रसंगास योग्य असें आचरण करीन. कारण,—

भय प्राप्त झालें नाहीं तों भ्यावें; येऊन ठेपलें ह्मणजे न भितां प्रहार करावा.

दुसरें,—

सख्य करून कांहीं हित होत नाहीं, असें दिसलें ह्मणजे शहाण्यानें शत्रूशीं युद्ध करून मरावें.

आणखी,—

युद्ध न करितां खास मरण, युद्ध करून वांचण्याचा संशय, असें जेव्हां असेल तोच युद्धाचा काल असें शहाणे लोक ह्मणतात.

असें ह्मणून खेकड्यानें त्याची मान चावली. त्यामुळें तो बगळा मरण पावला. ह्मणून मी ह्मणतों कीं, लहान, मोठे, मध्यम, मासे खाऊन अतिलोभानें बगळा मेला.

हें गृध्राचें भापण ऐकून चित्रवर्ण राजा ह्मणाला, प्रधानजी, ऐका. मी असें ह्मणतों कीं, मेघवर्ण कर्पूरद्वीपीं राहून तेथल्या सर्व उत्तम वस्तु आह्मास पाठवील. त्यामुळें विंध्याद्रीवर आपली चैन होईल.

**गृध्र**—( हंसून ) महाराज, जें प्राप्त झालें नाहीं, त्याचा विचार करून जो आनंदित होतो, तो मडकीं फोडणाऱ्या ब्राह्मणाप्रमाणें पीडा पावतो.

**चित्रवर्ण**—हें कसें ?

**प्रधान**—देवीकोट नांवाच्या शहरांत देवशर्मा नांवाचा ब्राह्मण रहात असे. त्यास महासंक्रांतीच्या दिवशीं कोणीं सातूच्या पिठानें भरलेला परळ दिला. तो घेऊन घरीं जात असतां दमून विश्रांतीकरितां कुंभाराच्या मंडपांत एका बाजूला निजला. तेथें कुंभारानें मडकीं रचून ठेवलीं होतीं. आडवा पडला तरी पीठ राखण्याकरितां त्यानें हातांत सोंटा घेतला होता. तो जमिनीवर आपटीत असतां मनांत ह्मणाला, हें पीठ विकून दहा पैसे मिळाले तर त्याचीं मडकीं घेऊन विकीन. त्यामुळें बरेच पैसे मिळतील. त्यांची सुपारी घेऊन विकीन. त्याचे पैसे मिळाले ह्मणजे कापडाचा व्यापार करीन. अशा योगानें मला लक्षावधि रुपये मिळतील. मग मी चार लग्नें करीन. त्या चार बायकांत तरुण व रूपवान् असेल तीवर माझी अधिक प्रीति जडेल. मग त्या सवती सवती भांडूं लागल्या ह्मणजे दांडक्यानें एकेकीला मारीन. असें ह्मणून त्यानें सोंटा फेंकिला, तो पिठाच्या परळास लागून त्याचा चुरा झाला व आणखी कुंभाराचींही पुष्कळ मडकीं फुटलीं. मडकीं वाजलेलीं ऐकून कुंभार आंतून आला, त्यानें मडक्यांची ही दशा पाहून ब्राह्मणाची खूब खरडपट्टी काढून त्यास मांडवांतून हांकून लाविलें. ह्मणून मी ह्मणतों कीं, जें प्राप्त झालें नाहीं त्याचा विचार करून इत्यादि.

**चित्रवर्ण**—( गृध्राच्या कानाशीं लागून ) काय करावें तें सांगा तर मग.

**गृध्र**—हत्ती मदोन्मत्त होऊन धांवूं लागला तर माहुतास दोप देतात; त्याप्रमाणें राजा गर्वानें फुगून भलतीच गोष्ट करूं लागला तर लोक प्रधानाची निंदा करितात.

महाराज, ऐका. आपण पराक्रमानें किल्ला घेतला काय ? असें तर नाहीं, परंतु तुमच्या युक्तीच्या सामर्थ्यानें घेतला.

**राजा**—तुमच्या उपायानें हें झालें.

**गृध्र**—माझें ऐकाल तर आतां स्वदेशीं चला. नाहीं तर पावसाळा येऊन पुनः युद्ध करण्याचा प्रसंग आला तर आह्मांस परदेशांतून स्वदेशीं पळूनसुद्धां जातां यावयाचें नाहीं. आपल्या हिताकरितां व लौकिकाकरितां तह करून चालतें व्हावें. किल्ला घेतला, कीर्तिही झाली. मी असें सांगतों याचें कारण असें आहे कीं, राजास आवडेल किंवा न आवडेल याचा विचार न करितां धर्म मनांत आणून राजास न आवडली तरी खरी गोष्ट सांगतो, तोच राजाचा मित्र होय.

दुसरें,—

कोण शहाणा युद्ध करून मित्र, सैन्य, राज्य, देह, आणि कीर्ति, यांस संशयांत घालील ?

आणखी,—

युद्ध केलें असतां जय मिळण्याचा संशय असतो, याकरितां शत्रु आपल्या बरोबरीचा असला तरी त्याशीं तह करावा. सुंद आणि उपसुंद हे दोघे सारखे बळकट असतां नाश पावले नाहींत काय ?

**राजा**—हें कसें ?

**प्रधान**—पूर्वीं सुंद आणि उपसुंद या नांवाचे मोठे पराक्रमी दैत्य होते. त्यांनीं त्रैलोक्याचें राज्य मिळवावयाकरितां पुष्कळ दिवस शिवाची आराधना केली. तेव्हां शिव प्रसन्न होऊन त्यांस वर मागा असें ह्मणाला. तेव्हां मनांत एक असून सरस्वतीच्या अवकृपेनें त्यांच्या मुखांतून असें निघालें कीं, आपण आह्मांवर प्रसन्न झालां असाल तर आपली पार्वती आह्मांस द्यावी. हें ऐकून शिवास फार क्रोध आला; तरी वर मागा ह्मटल्यावर अवश्य दिलाच पाहिजे, असें समजून त्यानें पार्वतीसारखी दुसरी एक स्त्री उत्पन्न करून त्या मूर्खांस दिली. तेव्हां तिचें तें उत्तम लावण्य पाहून ते दुष्ट कामांध होऊन माझी ही, माझी

हीं, ह्मणून एकमेकांशीं भांडूं लागले. शेवटीं तिऱ्हाइतास याचा न्याय करण्यास सांगावें, असें त्यांनीं ठरविलें. तेव्हां शिवच ब्राह्मणाचें रूप घेऊन तेथें आला. तेव्हां आह्मीं उभयतांनीं तपश्चर्या करून ही मिळविली आहे, तर आतां ही कोणीं घ्यावी ? असें त्यांनीं त्यास विचारिलें.

**ब्राह्मण**—तुह्मी क्षात्रधर्मी आहां, याकरितां युद्ध करूनच तुमचा तंटा मिटला पाहिजे.

ब्राह्मणानें असें सांगितलें; तेव्हां यानें चांगलें सांगितलें, असें ह्मणून युद्ध करूं लागले, तेव्हां सारखे बलवान् असून एकदम परस्परांवर सारखा हल्ला केल्यामुळें मृत्यु पावले. ह्मणून मी ह्मणतों कीं, शत्रु बरोबरीचा असला तरी त्याशीं तह करावा.

**चित्रवर्ण**—पूर्वींच असें कां सांगितलें नाहीं ?

**गृध्र**—माझें बोलणें शेवटपर्यंत तुह्मी ऐकिलें काय ? माझ्या संमतीनें ही लढाई झाली नाहीं. हा हिरण्यगर्भ राजा मोठा गुणवान् आहे. याशीं लढाई करूं नये. ह्मटलें आहे,—

सत्यशील, श्रेष्ठ, धार्मिक, बळकट, भावांशीं जुटानें असणारा, बलवान्, अनेक लढायांत ज्यानें जय मिळविला आहे असा, या सातांशीं सन्धि करावा.

सत्यशील असतो तो आपलें वचन पाळितो, याकरितां तो तह झाल्यावर प्रतिकूळ होत नाहीं. श्रेष्ठ असतो तो जीव जाण्याची वेळ आली तरी नीचपणा करीत नाहीं. धार्मिक युद्ध करूं लागला तर त्याकरितां सर्व लोक पराक्रम करितात, प्रजेच्या प्रीतीमुळें व धार्मिकपणामुळें त्याचा पराभव करितां येत नाहीं. आपला नाश होण्याची वेळ आली तर हलक्याशींसुद्धां तह करावा. त्याच्या मदतीशिवाय काम होत नाहीं, असें झालें तर उगाच वेळ घालवूं नये. वेळू जसे एकांत एक गुंतलेले असून कांट्यांनीं वेष्टित असल्यामुळें मोडत नाहींत त्याप्रमाणें ज्यांचें भावांशीं सख्य आहे त्यांस जिंकितां येत नाहीं. बलवानांशीं युद्ध करावें अशी नीति नाहीं. कारण ढगास वाऱ्याच्या उलट कधींही जातां येणार नाहीं. परशुरामाप्रमाणें ज्यानें अनेक युद्धांत जय मिळविला आहे, तो आपल्या प्रतापानेंच सर्व ठिकाणीं अजिंक्य होतो. अशाशीं तह केला तर त्याच्या प्रतापामुळें शत्रु आपल्यास वश होतात.

याकरितां बहुत गुणांनीं युक्त असा हा हिरण्यगर्भ राजा आहे याशीं तह करावा.

याप्रमाणें बगळ्यानें सांगितलेलें वर्तमान ऐकून चक्रवाक ह्मणाला; पुनः जा, आणि सर्व ठिकाणीं फिरून ये.

**हिरण्यगर्भ**—प्रधानजी, तह कोणकोणाशीं करूं नये, तें ऐकण्याची इच्छा आहे.

**चक्रवाक**—बाल, वृद्ध, दीर्घरोगी, जातीबाहेर असलेला, भित्रा, ज्याचे लोक भित्रे आहेत तो, लोभी, ज्याचे लोक लोभी आहेत तो, उदासीन, विषयासक्त, अस्थिरबुद्धि, देवब्राह्मणांची निंदा करणारा, दुर्दैवी, दैवावर भरंवसा ठेवून चालणारा, दिवाळखोर, बहुदुःखयुक्त, अडचणीच्या जागेंत सांपडलेला, ज्यास बहुत शत्रु आहेत तो, ज्याचें सैन्य वेळेवर हजर होत नाहीं तो, सत्यधर्मापासून सुटलेला, या विसांबरोबर सन्धि करूं नये. यांशीं युद्ध केलें असतां ते लवकर शरण येतात.

बाल असतो त्यास स्वतः पराक्रम नसल्यामुळें त्याचे लोक लढण्यास इच्छित नाहींत, कारण त्यास युद्ध करावें किंवा न करावें हें स्वतः कळत नाहीं. वृद्ध आणि दीर्घरोगी यांस उत्साह आणि शक्ति नसल्यामुळें त्यांचेच लोक त्यांचा पराभव करितात. जातीबाहेर असतो त्याचा सहज उच्छेद करितां येतो. कारण त्याच्या जातीचे लोक आपणाकडे वळवून घेतले ह्मणजे तेच त्याचा नाश करितात. भित्रा असतो तो युद्धांतून पळून जाऊन आपलाच नाश करून घेतो. लोक भित्रे असले ह्मणजे ते रणांतून पळून गेल्यामुळें राजाचा नाश होतो. लोभी पदरच्या मंडळीस बक्षीस देत नाहीं, ह्मणून ते मनापासून झटत नाहींत. कामदार लोभी असले तर ते लांच खाऊन धन्याचा नाश करितात. उदासीनास प्रधान सोडून देतात. विषयासक्त असतो तो चैनींत राहून आपला नाश करून घेतो. अस्थिरबुद्धि असतो त्याचा प्रधान नाश करितो, कारण धन्याचें चित्त अव्यवस्थित असल्यामुळें तो आपणास वाटेल तसा कारभार करूं लागतो. दुर्दैवी आपोआप नष्ट होतो. संपत्तीचें आणि विपत्तीचें कारण दैवच असें धरून चालणारा असतो, तो स्वतः मुळींच उद्योग करीत नाहीं. दिवाळखोर असतो तो आपोआप नाश पावतो. ज्यास व्यसनें फार असतात त्यास युद्ध करण्याचें सामर्थ्य नसतें. देवब्राह्मणांची निंदा करणाऱ्यास सर्वदा अधर्म घडल्यामुळें त्याचा नाश होतो. अडचणीच्या जागीं असतो त्यास सहज मारितां येतें; कारण सुसर लहान आहे तरी पाण्यांत असला ह्मणजे तो हत्तीस देखील ओढितो. पारवा स-

साण्यांत गेला ह्मणजे नाश पावतो, त्याप्रमाणें ज्यास पुष्कळ शत्रु असतात, तो जिकडे जाईल तिकडे नाश पावतो. रात्रीस कावळयास दिसत नाहींसें झालें ह्मणजे घुबड त्यास मारितो, त्याप्रमाणें ज्याचें सैन्य वेळेस हजर होत नाहीं, त्याचा ज्याचें सैन्य पाहिजे तेव्हां हजर असतें तो नाश करितो. सत्यधर्मापासून सुटलेला असेल त्याशीं कधींही सन्धि करूं नये. सन्धि केला असला तरी तो दुष्ट असल्यामुळें लवकरच विरुद्ध होतो.

आणखीही सांगतों,—

संधि, विग्रह, यान[1], आसन[2], संश्रय[3], द्वैधीभाव[4], हे सहा गुण; लढाई सुरू करणें, सामानाचा पुरवठा करणें, योग्य स्थान व काल योजणें, शत्रूपासून पराभव न होण्याची तजवीज करणें[5], आणि हातीं घेतलेलें काम शेवटास नेणें, हा पांच प्रकारचा मंत्र; साम, दान, दंड, भेद, हे चार उपाय; उत्साहशक्ति, मंत्रशक्ति, आणि प्रभुशक्ति या तीन शक्ति; या सर्वांचा यथायोग्य विचार केला असतां राजास सर्वदा जय प्राप्त होतो.

पहा, प्राण सोडिला तरी मिळावयाची नाहीं अशी जी चंचल लक्ष्मी ती नीति जाणणाऱ्यांच्या मागें लागते. ह्मटलें आहे,

जो धनाचा यथायोग्य विभाग करितो, गुप्त दूत पाठवितो, मसलत गुप्त ठेवितो, लोकांस वाईट बोलत नाहीं, तो समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य करितो.

मोठा प्रधान जो गृध्र त्यानें सन्धि करावा ह्मणून सांगितलें तरी जय झाल्यामुळें गर्वानें फुगलेला राजा तें ऐकणार नाहीं. याकरितां महाराज, असें करावें. महाबळ नांवाचा सारस सिंहलद्वीपाचा राजा हा आमचा मित्र आहे; त्यानें राजाच्या पाठीमागें जम्बुद्वीपावर हल्ला करावा. कारण,—

शूरानें गुप्तरीतीनें चांगलें जुटानें रहाणारें सैन्य पाठवून शत्रूस पीडा द्यावी, ह्मणजे तो तह करण्यास तयार होतो. कारण दोन्ही तापलेलीं असलीं ह्मणजे जोड चांगला बसतो.

योग्य आहे, असें ह्मणून हिरण्यगर्भराजानें विचित्र नांवाचा बगळा गुप्त लेख देऊन सिंहलद्वीपास पाठविला. इतक्यांत दीर्घमुख बगळा येऊन ह्मणाला, महाराज, ऐका तिकडील बातमी. गृध्र ह्म-

---

१ स्वारी करणें. २ वेढा घालणें. ३ दुसऱ्याचा आश्रय घेणें. ४ फितूर करणें. ५ मसलत.

णाला, महाराज, मेघवर्ण त्याचे जवळ फार दिवस राहिला होता. त्यास माहिती असेल कीं, हिरण्यगर्भ राजा सन्धि करण्यास योग्य आहे किंवा नाहीं. नंतर राजानें मेघवर्णास हाक मारून विचारिलें कीं, हिरण्यगर्भ राजा कसा आहे? त्याचा प्रधान चक्रवाक कसा आहे?

**मेघवर्ण**—महाराज, हिरण्यगर्भ धर्मराजासारखा मोठा कीर्तिमान् आहे. चक्रवाकासारखा प्रधान तर कोठें दृष्टीसच पडत नाहीं.

**राजा**—असें आहे तर त्वां त्यास कसें फसविलें?

**मेघवर्ण**—( हंसून ) महाराज, आपणावर ज्यांनीं विश्वास ठेविला, त्यांस फसविण्यांत काय चातुर्य आहे? मांडीवर निजलेल्यास मारण्यांत पराक्रम तो कोणता?

महाराज, त्या प्रधानानें मला पाहिल्याबरोबर ओळखिलें. परंतु राजा मोठा उदार मनाचा असल्यामुळें मीं त्यास फसविलें. ह्मटलें आहे,—

आपणाप्रमाणें दुष्टास खरें बोलणारा असें जो समजतो, तो फसतो. ज्याप्रमाणें लुच्चांनीं बोकड नेणाऱ्या ब्राह्मणास फसविलें.

**चित्रवर्ण**—हें कसें?

**मेघवर्ण**—गौतम ऋषीच्या तपोवनांत कोणी ब्राह्मण यज्ञ करणार होता. तो एका गांवांत जाऊन बोकड विकत घेऊन त्यास खांद्यावर घेऊन येत होता, त्यास तिघां लुच्चांनीं पाहिलें. तेव्हां ते ह्मणाले, जर कांहीं युक्ति करून हा बकरा आपणांस मिळेल तर मोठी मौज होईल. असा विचार करून ते तिघे त्या ब्राह्मणाच्या वाटेवर एकमेकांपासून दूर एकेक कोसाच्या अंतरानें तीन झाडांखालीं बसले. नंतर ब्राह्मण चालला असतां एक लुच्चा ह्मणाला, भटजीबोवा, कुत्र्याला खांद्यावर कां घेतलें?

**ब्राह्मण**—हा कुत्रा नव्हे, बोकड आहे.

नंतर दुसऱ्या लुच्चानें त्याप्रमाणेंच विचारिलें. तें ऐकून बोकडास खालीं उतरून रेखून पाहून पुनः खांद्यावर घेऊन चालला, तरी त्याचें मन संशयांत पडलें, कारण,—

दुष्टांच्या भाषणानें साधूंचें देखील मन संशयांत पडतें, तिघांनीं विश्वास ठेवण्यास लाविलें ह्मणजे चित्रकर्णाप्रमाणें नाश होतो.

**चित्रवर्ण**—हें कसें?

**मेघवर्ण**—एका अरण्यांत मदोत्कट नांवाचा सिंह रहात असे. त्यापाशीं कावळा, वाघ, व कोल्हा असे तीन सेवक होते. फिरत असतां त्यांनीं एक उंट पाहिला; तेव्हां त्यास विचारिलें, तू कळपांतून येथें कोठें आलास ? त्यानें आपली हकीकत सांगितली. नंतर त्यांनीं त्यास नेऊन सिंहाच्या स्वाधीन केलें. सिंहानें त्यास अभयवचन देऊन चित्रकर्ण असें नांव ठेवून आपणाजवळ ठेविलें. नंतर एकेवेळीं सिंहास अशक्तपणा आल्यामुळें व फार पाऊस पडल्यामुळें त्यांस कांहीं खावयास मिळालें नाहीं. त्यामुळें ते काळजींत पडले. नंतर त्यांनीं विचार केला कीं, सिंह चित्रकर्णासच मारील अशी कांहीं युक्ति करावी. या कांटेखाऊला ठेवून काय करावयाचें ?

**वाघ**—राजानें अभयवचन देऊन त्यास बाळगिलें आहे, तर हें कसें होईल ?

**कावळा**—या वेळेस राजा व्याकुळ झाला आहे, तो पाप देखील करील. कारण,—

क्षुधेनें व्याकुळ झालेला वायकामुलांस टाकील, भुकावलेली नागीण पोरांस खाईल, बुभुक्षित कोणतें पाप करीत नाहीं ? लोक व्याकुळ झाले ह्मणजे निर्दय होतात.

दुसरें,—

वेडा, बेसावध, उन्मत्त, दमलेला, रागीट, बुभुक्षित, लोभी, भित्रा, नेहमीं घाई करणारा, कामातुर हे धर्म जाणत नाहींत.

याप्रमाणें विचार करून सर्व सिंहाजवळ गेले. तेव्हां सिंहानें विचारिलें. कांहीं खावयास आणलें काय ? कांहीं नाहीं ह्मणून त्यांनीं सांगितलें.

**सिंह**—आतां उपजीविकेचा उपाय काय ?

**कावळा**—महाराज, खावयास आपल्याजवळ असून तें टाकिल्यामुळें सर्वांचा नाश होण्याचा प्रसंग आला आहे.

**सिंह**—आमच्याजवळ काय खाण्यासारखें आहे ?

**कावळा**—( सिंहाच्या कानांत ) चित्रकर्ण.

**सिंह**—(कानावर हात ठेवून) शिवशिव ! आह्मीं त्यास अभयवचन देऊन येथें ठेवून घेतलें आहे; तर असें कसें करावें ? ह्मटलें आहे,—

सर्वदानांमध्यें अभयप्रदान हें श्रेष्ठ होय. तसें भूमिदान नाहीं, सु-

वर्णदान नाहीं, गोप्रदान नाहीं, फार काय, पण अन्नदानही तसें श्रेष्ठ नाहीं.

दुसरें,—

सर्वसाधनांनीं युक्त असा अश्वमेध केला असतां जें फळ प्राप्त होतें, तेंच शरणागताचें रक्षण केलें असतां प्राप्त होतें.

**कावळा**—महाराज, आपण त्यास मारूं नका; परंतु तोच मरायास तयार होईल; अशी तजवीज आह्मी करितों.

हें ऐकून सिंह उगाच बसला. नंतर तिघे मसलत करून चित्रकर्णास घेऊन सिंहाजवळ गेले.

**कावळा**—महाराज, यत्न करूनही कांहीं खावयास मिळत नाहीं. महाराजांस तर उपास फार पडल्यामुळें क्षीणता आली आहे. आतां माझें मांस खाऊन निर्वाह करावा. कारण,—

राजामुळें प्रधान आहेत, वृक्षाच्या मुळ्या कायम असल्या तर त्यास वांचविण्याचा यत्न केला तर सफळ होईल.

**सिंह**—जीव गेलेला बरा, परंतु असें कर्म करण्याविषयीं प्रवृत्त होऊं नये.

नंतर कोल्हा त्याप्रमाणेंच बोलला, त्यासही सिंहानें त्याप्रमाणेंच उत्तर दिलें. नंतर वाघ त्याप्रमाणें बोलला; त्यासही असें करणें योग्य नाहीं ह्मणून सिंहानें सांगितलें. हें पाहून चित्रकर्णही त्याप्रमाणें बोलला. त्याबरोबर वाघानें त्याचें पोट फाडिलें, तेव्हां सर्वांनीं त्यास खाऊन टाकिलें. ह्मणून मी सांगतों कीं, दुष्टांच्या भापणानें साधूंचें देखील मन संशयांत पडतें.

नंतर तिसरा ठकही त्याप्रमाणेंच बोलला, तेव्हां आपणासच बुद्धिभ्रंश झाला आहे, असें मानून बोकडास टाकून ब्राह्मण स्नान करून घरीं गेला. नंतर तो बकरा त्या लुच्चांनीं घेऊन खाल्ला. ह्मणून मी ह्मणतों कीं, आपणाप्रमाणें दुष्टास खरें बोलणारा समजतो तो फसतो.

**चित्रवर्ण**—मेघवर्णा, तू इतके दिवस शत्रूंमध्यें कसा राहिलास? शत्रूंचीं आर्जवें करून राहिलास काय ?

**मेघवर्ण**—महाराज, धन्याच्या किंवा आपल्या कामाकरितां काय करावें लागत नाहीं ? पहा,—

लोक जाळण्याकरितां लांकडांस डोक्यावर घेऊन जात नाहींत

काय ? नदीचा पूर वृक्षांचे पाय धुतो, तरी त्यांस मोडतो. ह्मटलें आहे,—

आपल्या कामाकरितां शहाण्यानें शत्रूला खांद्यावरसुद्धां घ्यावें. याप्रमाणें करून ह्मातार्‍या सर्पानें बेडूक खाऊन टाकिले.

**चित्रवर्ण**—हें कसें ?

**मेघवर्ण**—एका जुन्या बागेंत मंदविप नांवाचा साप रहात असे. तो अशक्तपणामुळें खावयास मिळविण्यास असमर्थ होऊन तळयाच्या कांठीं पडून राहिला होता. त्यास पाहून दूरून त्यास एक बेडूक विचारूं लागला; कांहीं खावयास मिळविण्याचा यत्न कां करीत नाहींस?

**साप**—बाबा, आपल्या वाटेनें जा. मला हतभाग्याला प्रश्न करून तुला काय करावयाचें ?

**बेडूक**—सांगा तर खरें.

**साप**—बाबा, ब्रह्मपुरांत राहणारा विद्वान् ब्राह्मण कौंडिन्य, त्याचा मुलगा वीस वर्षांचा सर्वगुणसंपन्न असा होता. परंतु त्याच्या दुर्दैवामुळें व माझ्या दुष्टस्वभावामुळें मीं त्यास दंश केला. त्या मुलाचें नांव सुशील असें होतें. त्यास मूर्च्छित पाहून कौंडिन्य मूर्च्छेनें जमिनीवर लोळूं लागला. तेव्हां ब्रह्मपुरांत राहणारे त्याचे सर्व आप्त तेथें आले. त्यांत एक कपिल नांवाचा विद्वान् ब्राह्मण होता तो ह्मणाला, कौंडिन्या, वेडा आहेस ह्मणून असा विलाप करितोस. ऐक,—

प्राणी उत्पन्न झाला ह्मणजे तो प्रथम अनित्यतेच्या स्वाधीन होतो, आणि नंतर आईच्या स्वाधीन होतो. असें आहे तर शोक कां करावा ?

तसेंच,—

प्रधान, सेना, वाहनें, यांसहवर्तमान राजे कोठें गेले? ज्यांच्या वियोगाची साक्ष देणारी पृथ्वी अद्याप तशीच आहे.

दुसरें,—

शरीराचा नाश व्हावयाचाच, संपत्ति हें विपत्तीचें स्थान, समागम वियोगानें नाहींसा होतो, सर्वच उत्पन्न झालेलें नश्वर आहे.

हें शरीर प्रतिक्षणीं न कळतां क्षीण होत आहे; परंतु कच्चें मडकें पाण्यांत ठेविलें असतां विरघळल्यावर कळतें, त्याप्रमाणें नाश झाल्यावर लोकांस कळतें.

पशूला मारण्याच्या जागीं नेत असतां त्याचा मृत्यु जसा पदोपदीं

जवळ जवळ येतो, त्याप्रमाणें रोज रोज प्राण्यांचा मृत्यु जवळ जवळ येतो.

तारुण्य, रूप, आयुष्य, द्रव्यसंचय, ऐश्वर्य, प्रियसमागम, हीं अनित्य आहेत; त्यांविषयीं शहाण्यानें मोह पावूं नये.

समुद्रांत दोन लांकडें वहात येऊन एके ठिकाणीं होतात, आणि पुनः वेगळालीं होतात; त्याप्रमाणेंच प्राण्यांचा समागम आहे.

जसा एकादा वाटसरू झाडाखालीं बसतो, आणि विश्रांति घेऊन पुनः चालूं लागतो, तसाच प्राण्यांचा समागम आहे.

आणखी,—

*पंचमहाभूतांचे अंश एकत्र होऊन हा देह निर्माण होतो. तीं भूतें वेगळीं होऊन आपापणांत मिळालीं ह्मणजे शोक कां करावा ? मनुष्य जितके प्रियसंबंध करितो, तितके त्याच्या हृदयास शंकु टोंचतात.

अत्यंत समागम कोणाशींही प्राप्त होत नाहीं, आपल्या शरीराशीं-सुद्धां होत नाहीं; मग दुसऱ्याची काय कथा ?

दुसरें,—

जन्म झाला ह्मणजे मृत्यु यावयाचाच. त्याप्रमाणें संयोग झाला ह्मणजे तेथें वियोग व्हावयाचाच.

कुपथ्य खातांना क्षणभर गोड वाटतें, परंतु परिणाम फार भयंकर होतो. त्याप्रमाणें इष्टमित्रांशीं समागम प्रारंभीं आनंद देतो, परंतु शेवटीं भयंकर होतो.

आणखी,—

नदीचें पाणी वाहून गेल्यावर परत येत नाहीं, त्याप्रमाणें रात्रि आणि दिवस हीं मनुष्याचें आयुष्य घेऊन जातात, तीं परत यावयाचीं नाहींत.

संसारामध्यें सत्समागम एवढा गोड आहे; परंतु परिणामीं वियोग झाल्यामुळें तो अति दुःखप्रद होतो. याकरितां साधु त्याची इच्छा करीत नाहींत. कारण वियोगरूप खड्गानें तोडलेल्या मनास औषध नाहीं. सगरादि राजांनीं पुण्यकर्मे केलीं परंतु ते त्या कर्मांशींसहवर्तमान लयास गेले.

ज्याचा दंड उग्र आहे, असा मृत्यु मनांत येऊन शहाण्या मनुष्याचे सर्व प्रयत्न पाण्यांत भिजलेल्या कातड्याप्रमाणें निर्जीव होतात.

---

* पृथ्वी, जल, तेज, वायु, आकाश.

ज्या रात्रीस मनुष्य प्रथम गर्भांत येतो, तेव्हांपासून तो एकसारखा मृत्यूच्या जवळ जात असतो.

याकरितां या संसाराचा विचार कर. शोक हा अज्ञानाचा विस्तार आहे. पहा—

शोकाचें कारण अज्ञान नसून वियोग असेल तर नेहमीं शोक वाढावा. असें असतां कमी कां होतो?

याकरितां विचार करून शोक सोडून दे. कारण,—

भलत्याच ठिकाणीं लागून मर्मभेद करणारे असे जे हे प्रखर शोकप्रहार यांकडे लक्ष न देणें हेंच मोठें औषध आहे.

हें भाषण ऐकून कौंडिन्य शुद्धीवर आल्यासारखा उठून बोलूं लागला, पुरे आतां गृहरूप नरकांत रहाणें. मी अरण्यांतच जातों.

**कपिल**—पुनः सांगतों. विषयवासना असली ह्मणजे अरण्यांतही दोष घडतात; घरांत राहिलें तरी पांच इंद्रियांचा निग्रह केला तर तपश्चर्याच घडते. विषयवासनेपासून निवृत्त होऊन जो सत्कर्मांविषयीं प्रवृत्त होतो, त्यास घर हेंच तपोवन आहे. कारण,—

कोणत्याही आश्रमांत असून पीडा झाली तरी धर्माचरण करावें आणि सर्वभूतांच्या ठिकाणीं समदृष्टि ठेवावी. धर्मास बाह्य चिन्हांचें कारण नाहीं. ह्मटलें आहे,—

प्राण वांचण्याकरितां ज्यांचें भोजन, संततीकरितां स्त्रीसंभोग, सत्यकथनाकरितां भाषण, असे असतात ते मोठीं संकटेंही तरतात.

धर्मराजास कोणीं सांगितलें आहे,—

पांडुपुत्रा, आत्मा ही पवित्र नदी, सत्य हें तींतील उदक, सुस्वभाव हें तिचें तीर, दया ह्या लाटा, ह्या नदींत तू स्नान कर. पाण्यानें मन शुद्ध होत नाहीं. आणखी,—

जन्म, मृत्यु, जरा, व्याधि, यांच्या दुःखांनीं व्याप्त आणि तरण्यास कठिण अशा या चिन्तायुक्त संसारास टाकून देईल, त्यास सुख होईल. दुसरें,—

सर्व दुःखच आहे, सुख मुळींच नाहीं, कारण दुःखानें पीडित असतो त्याचें दुःख कमी झालें ह्मणजे त्यास सुख झालें असें ह्मणतात.

**कौंडिन्य**—बरें आहे.

नंतर त्यानें मला शाप दिला कीं, आजपासून बेडूक तुजवर बसतील.

**कपिल**—या वेळेस तुमचें हृदय शोकानें व्याप्त झालें आहे, या-

करितां तुह्मांस उपदेश करून उपयोग नाहीं, तथापि काय करावें तें सांगतों. ऐका,—

संग सर्वथा सोडून द्यावा. न सुटेल तर साधूंशीं तरी करावा. साधूंचा संग हें औषध आहे.

दुसरें,—

काम सर्वथा टाकावा. नच टाकितां येईल तर स्वस्त्रीविपयींमात्र धरावा. तीच त्याचें औषध आहे.

हें ऐकून कपिलाच्या उपदेशामृतानें शोकाग्नि शांत झाल्यामुळें कौंडिन्यानें यथाशास्त्र संन्यास घेतला. वर सांगितल्याप्रमाणें मी ब्राह्मणाच्या शापानें बेडकांस मस्तकावर धारण करण्यास येथें राहिलों आहें. नंतर हें वर्तमान बेडकानें आपला राजा जो जनपद त्यास कळविलें. तो येऊन सर्पाच्या पाठीवर बसला. त्यास पाठीवर धारण करून सर्पानें चमत्कारिक नृत्य केलें. दुसऱ्या दिवशीं नाचण्यास सामर्थ्य नाहींसें झालें तेव्हां बेडकांचा राजा त्यास ह्मणाला, आज तुमच्यानें चालवत कां नाहीं?

**सर्प**—महाराज, खावयास न मिळाल्यामुळें अशक्त झालों.

**जनपद्**—आमच्या हुकुमावरून बेडकांस खात जा.

नंतर, महाराज, ही आपली मोठी कृपा झाली; असें ह्मणून एकामागून एक बेडूक खाऊं लागला. तळयांतील बेडूक संपले तेव्हां त्यानें त्यांच्या राजासदेखील खाल्लें. ह्मणून मी सांगतों कीं, आपल्या कामाकरितां शत्रूला खांद्यावर देखील घ्यावें. महाराज, आतां पूर्वींच्या गोष्टी सांगणें पुरे. हिरण्यगर्भराजा सर्वांशीं सन्धि करण्यास योग्य आहे. याशीं सन्धि करावा असें माझें मत आहे.

**चित्रवर्ण**—हें असें कसें तुमचें चमत्कारिक मत? आह्मीं त्यास जिंकिलें आहे तर त्यानें आमची सेवा करून रहाणें असेल तर रहावें; नाहीं तर आणखी लढाई करावी.

इतक्यांत जंबुद्वीपापासून शुक आला. त्यानें सांगितलें, महाराज, सिंहलद्वीपाचा राजा सारस, यानें येऊन जंबुद्वीपास वेढा घातला.

**चित्रवर्ण**—( घाबरून ) काय?

शुकानें पुनः पूर्वींप्रमाणें सांगितलें.

**गृध्र**—( मनांत ) वाहवारे चक्रवाका, सर्वज्ञा प्रधाना, वारेवा!!

**चित्रवर्ण**—( रागानें ) हा असूंदे. आधीं जाऊन त्यासच समूळ नाहींसा करून टाकितों.

**गृध्र**—( हंसून ) शरत्कालच्या मेघाप्रमाणें व्यर्थ गर्जना करूं नये. मोठ्यानें आपला अर्थ व अनर्थ लोकांस दाखवूं नये.

दुसरें,—

पुष्कळ शत्रूंबरोबर राजानें एकदम युद्ध करूं नये. सर्प मोठा मदांध असला तरी पुष्कळ किडे त्यास मारून टाकितात.

महाराज, तह केल्याशिवाय येथून कसें जावें ? कारण आह्मी गेल्यावर मागें हा सूड उगवील.

आणखी,—

जो खरें कारण न समजतां क्रोधाच्या स्वाधीन होतो, तो मुंगसास मारणाऱ्या ब्राह्मणाप्रमाणें पश्चात्ताप पावतो.

**चित्रवर्ण**—हें कसें ?

**गृध्र**—उज्जनीमध्यें माधव नांवाचा ब्राह्मण राहत असे. त्याची बायको बाळंतीण झाल्यावर एके दिवशीं मुलाजवळ नवऱ्यास ठेवून नदीवर धुवावयास गेली. इतक्यांत ब्राह्मणास राजवाड्यांतील श्राद्धाचें आमंत्रण आलें, तेव्हां अतिदरिद्री असल्यामुळें त्यास वाटलें, लवकर गेलों नाहीं आणि दुसऱ्या कोणास कळलें तर तोच आमंत्रण घेईल. कारण,—

घेणें, देणें, आणि अवश्य करावयाचें कर्म, हीं लवकर न केल्यामुळें तोटा होतो.

परंतु मुलास पाहण्यास कोणी नाहीं यास काय करावें ? असो. या मुंगुसाला पुष्कळ दिवस पुत्राप्रमाणें पाळिलें आहे, यालाच मुलाजवळ राखण ठेवून जावें. याप्रमाणें करून तो गेल्यावर मुंगसानें एक कृष्णसर्प मुलाजवळ येतांना पाहिला. तेव्हां त्यास मारून रागानें त्याचे तुकडे तुकडे करून खाऊन टाकिलें. नंतर ब्राह्मण परत आला असें पाहून मुंगूस लवकर पुढें जाऊन त्याच्या पायांवर लोळूं लागला. त्याचें तोंड व पाय रक्तानें भरले होते तें पाहून यानें मुलास खाल्लें असें समजून ब्राह्मणानें त्यास ठार केलें. नंतर पुढें जाऊन पहातो तों मूल स्वस्थ निजलें आहे, आणि साप जवळ मारिलेला आहे, हें पाहून मुंगुसास मारिल्यामुळें त्यास मोठा पश्चात्ताप होऊन. फार दुःख झालें. ह्मणून मी ह्मणतों कीं, खरें कारण न समजतां इत्यादि.

आणखी असें आहे कीं,—

काम, क्रोध, मोह, लोभ, मान, मद, हे सहा टाकून द्यावे. यांस टाकिल्यानें राजा सुखी होतो.

**चित्रवर्ण**—प्रधानजी, तुह्माला असेंच वाटतें काय?

**गृध्र**—असेंच. कारण,—

एकाएकीं कोणतेंही काम करूं नये. विपत्तीचें मुख्य स्थान अविचार होय. संपत्ति गुणाविषयीं लोभी आहेत, त्या विचार करून काम करणाऱ्यांकडे आपण होऊन येतात.

याकरितां आमच्या ह्मणण्याप्रमाणें करणें असेल तर तह करून जावें. कारण,—

कार्य साधण्याविषयीं चार[1] उपाय सांगितले आहेत, तरी ते सांगावयाचे इतकेंच; खरी कार्यसिद्धि ह्मटली तर सामानेंच होते.

**चित्रवर्ण**—तह कसा होईल?

**गृध्र**—लवकर होईल. कारण,—

दुर्जन असतो तो मडक्याप्रमाणें लवकर फुटतो, पण त्यास जोडितां येत नाहीं; परंतु सुजन आहे तो सोन्याच्या पात्राप्रमाणें फुटणारा नसून लवकर जोडितां येतो. दुसरें,—

मूर्खाचें समाधान लवकर करितां येतें, शहाण्याचें फारच लवकर समाधान होतें; परंतु ज्ञानाच्या लेशानें करपटलेला असतो त्याची समजूत ब्रह्मदेवाच्यानेंही व्हावयाची नाहीं. विशेष कारण असें आहे कीं, तो हिरण्यगर्भराजा धर्मज्ञ असून प्रधान सर्वज्ञ आहे; हें मेघवर्णाच्या सांगण्यावरून व त्यानें केलेल्या कामावरून मला पूर्वींच कळलें आहे.

**चित्रवर्ण**—आतां बोलणें पुरे. काय करणें असेल तें करावें. याप्रमाणें मसलत करून, महामंत्री गृध्र तेथें काय करावें तें सांगून किल्ल्यांत चालला. ही बातमी बगळ्यानें हिरण्यगर्भास कळवून सांगितलें कीं, महाराज, तो तह करण्यास आपणापाशीं येत आहे.

**हिरण्यगर्भ**—प्रधानजी, पूर्वींप्रमाणेंच कोणी सख्य करण्यास येत असेल.

**चक्रवाक**—( हंसून ) महाराज, शंका घेण्याचें कारण नाहीं. तो दूरदर्शी मोठा सज्जन आहे. ( मनांत ) किंवा मंदबुद्धि लोकांची स्थितिच अशी आहे. ह्मटलें आहे,—

दुर्जनानें फसविलें ह्मणजे सज्जनाचे ठिकाणींही विश्वास बसत नाहीं. दुधानें तोंड भाजलें ह्मणजे मूल दहींसुद्धां फुंकून खाऊं लागतें.

---

१ साम; दान, दंड, भेद.

महाराज, त्याच्या आदरसत्काराकरितां पोपाक, अलंकार, वगैरे तयार करावे. त्याप्रमाणें केलें, इतक्यांत गृध्र आला. त्यास सामोरा जाऊन चक्रवाकानें राजाजवळ आणून भेट करवून बिछायतीवर वसविलें.

**चक्रवाक**—हें राज्य तुमच्या स्वाधीन आहे, याचा यथेच्छ उपभोग करावा.

**हिरण्यगर्भ**—योग्य आहे.

**गृध्र**—आपण ह्मणतां हें खरें; परंतु आतां उगाच पुष्कळ बोलणें नको. कारण,—

लोभी असेल त्यास द्रव्य देऊन आपल्या स्वाधीन करून घ्यावें, रागीट असेल त्यास हात जोडून आपलासा करून घ्यावें, मूर्खास त्याच्या ह्मणण्याप्रमाणें वागून स्वाधीन करून घ्यावें, आणि पंडित खरें सांगून आपलासा करावा.

दुसरें,—

खरेपणानें वागून मित्रास वश करावें, व बांधवांस प्रीति दाखवून वश करावें. स्त्री आणि सेवक यांस द्रव्य व मोठेपणा देऊन वश करावें. कुशलपणानें इतरांस वश करावें.

याकरितां तह करून निघून जावें, असें आमचें मत आहे. चित्रवर्णराजा मोठा प्रतापी आहे.

**चक्रवाक**—तह कसा करणार तेंही सांगावें.

**हिरण्यगर्भ**—तहाचे किती प्रकार आहेत ?

**गृध्र**—महाराज, सांगतों ऐकावें.

बलवानाशीं लढाई सुरू होऊन त्याचा पराभव करण्याचा कांहीं उपाय नाहींसा होऊन पीडा झाली ह्मणजे प्रसंग टाळण्याकरितां राजानें सन्धि करावा.

( १ ) कपाल, ( २ ) उपहार, ( ३ ) संतान, ( ४ ) संगत, ( ५ ) उपन्यास, ( ६ ) प्रतीकार, ( ७ ) संयोग, ( ८ ) पुरुषांतर, ( ९ ) अदृष्टनर, ( १० ) आदिष्ट, ( ११ ) आत्मादिष्ट, ( १२ ) उपग्रह, ( १३ ) परिक्रय, ( १४ ) उच्छिन्न, ( १५ ) रभूपपण, ( १६ ) स्कंधोपनेय, असे सन्धीचे सोळा प्रकार विद्वानांनीं सांगितले आहेत.

१ दोघे सारखे असून सन्धि होतो तो कपालसन्धि होय.

२ खंडणी देऊन सन्धि करतात त्यास उपहारसन्धि ह्मणतात.

३ मुलगी देऊन सन्धि करायाचा त्यास संतानसन्धि ह्मणतात.

४ दोघे सज्जन असून परस्परांची मैत्री जमून जो सन्धि होतो, त्यास संगतसन्धि ह्मणतात. हा सन्धि दोघेही जिवंत आहेत तोंपर्यंत रहातो. दोघांसही याचा सारखा उपयोग होतो. एकाचीं भरभराट

झाली आणि दुसऱ्यास आपत्ति प्राप्त झाली, तरी कोणत्याही कारणानें हा मोडत नाहीं; ह्मणून सर्व धातूंमध्यें सोनें श्रेष्ठ, तसा हा संधींमध्यें श्रेष्ठ होय. यास कोणी सुज्ञ लोक सुवर्णसंधि ह्मणतात.

५ द्रव्यप्राप्ति किंवा दुसरी कांहीं कार्यसिद्धि यांच्या उद्देशानें जो सन्धि करितात, त्यास विद्वान् लोक उपन्याससंधि असें ह्मणतात.

६ मीं यावर पूर्वीं उपकार केला, पुढें हाही मजवर करील, अशा उद्देशानें जो संधि करितात, त्यास प्रतीकारसंधि असें ह्मणतात. मी याचें हित करितों, ह्मणजे हाही माझें करील, अशा उद्देशानें राम आणि सुग्रीव यांप्रमाणें जो संधि करितात, त्यासही प्रतीकारसंधि असें ह्मणतात.

७ संधि करून एकाच कामाकरितां दोघे जमून जेव्हां जातात, तेव्हां त्यास संयोगसंधि ह्मणतात.

८ आपणा उभयतांच्या मुख्य योद्ध्यांनीं माझें काम साधावें, असा ज्यांत करार असतो, त्यास पुरुषांतरसंधि ह्मणतात.

९ त्वां एकट्यानेंच मजपासून खंडणी घ्यावी, असा करार ज्यामध्यें शत्रु करितो, त्या संधीस अदृष्टनर असें ह्मणतात.

१० संधि करून देशाचा कांहीं भाग देऊन शत्रूस दूर लावितात, त्यास आदिष्ट असें ह्मणतात.

११ प्राणरक्षणाकरितां आपल्या सैन्याबरोबर संधि करावा लागतो, त्यास आत्मादिष्ट असें ह्मणतात.

१२ सर्वस्व देऊन सन्धि करितात, त्यास उपग्रह असें ह्मणतात.

१३ जामदारखान्यांतील कांहीं अर्धें किंवा सगळें द्रव्य देऊन बाकीच्याचें रक्षण करण्याकरितां जो संधि करितात, त्यास परिक्रय ह्मणतात.

१४ चांगले सुपीक प्रदेश देऊन संधि करितात, त्यास उच्छिन्न असें ह्मणतात.

१५ जमिनीचें उत्पन्न होईल तें सर्व देऊन संधि करितात, त्यास परभूपण असें ह्मणतात.

१६ एकमेकांचें नुकसान होईल तें परस्परांनीं भरून द्यावें, अशा करारानें संधि करितात त्यास स्कंधोपनेय असें ह्मणतात.

परस्परांवर उपकार करून केलेला, स्नेहामुळें झालेला, शरीरसंबंधामुळें झालेला, व खंडणी देऊन केलेला हे चार मुख्य संधि होत. यांपैकीं उपहारसंधि चांगला, असेंच माझें मत आहे. मित्रत्वामुळें केलेला जो संगतसंधि याशिवाय बाकीचे सर्व त्याचेच प्रकार आहेत. शत्रु बळकट असला ह्मणजे तो खंडणी घेतल्याशिवाय युद्धापासून निवृत्त होत नाहीं, ह्मणून यासारखा दुसरा कोणताही संधि चांगला नाहीं.

**चक्रवाक**—हा आपला, हा दुसऱ्याचा; हें हलक्या मनाच्या

लोकांचें पहाणें आहे, उदार असतात ते सर्व पृथ्वी आपलेंच कुटुंब आहे असें समजतात.

दुसरें,—

आईप्रमाणें परस्त्रीस समजतो, परद्रव्यास मातीप्रमाणें मानितो, सर्व प्राण्यांस आपणाप्रमाणें मानितो, तोच पंडित.

**हिरण्यगर्भ**—आपण मोठे विद्वान्, काय करावें तें आह्मांस सांगा.

**गृध्र**—हंहं, असें काय ह्मणतां.

दुःख, रोग, यांच्या तापानें आज किंवा उद्यां नष्ट होणाऱ्या या शरीराकरितां कोण दुराचरण करील? पाण्यांत हालणाऱ्या चंद्राप्रमाणें प्राण्यांचें जीवित चपल आहे; असें समजून सर्वदा सदाचरण करावें. मृगजलाप्रमाणें संसार क्षणभंगुर आहे, हें पाहून धर्माकरितां आणि सुखाकरितां सज्जनांची संगति करावी.

याकरितां माझ्या मतें सत्यव्यवहार करावा. कारण,—

हजारों अश्वमेध आणि सत्य यांची तुलना केली तर हजारों अश्वमेधांपेक्षां सत्यच अधिक आहे.

**चक्रवाक**—योग्य आहे.

नंतर राजहंसानें वस्त्रें व अलंकार देऊन दूरदर्शी नामक गृध्रप्रधानाचा सत्कार केला, तेव्हां तो आनंदित होऊन चक्रवाकास बरोबर घेऊन चित्रवर्ण राजाजवळ गेला. तेथें गृध्रानें सांगितल्यावरून चित्रवर्णानें सर्वज्ञ चक्रवाकाचा मोठाल्या देणग्या देऊन सत्कार करून झालेला तह कबूल करून त्यास हिरण्यगर्भाकडे पाठविलें.

**गृध्र**—महाराज, आपलें काम झालें. आतां आपल्या विन्ध्याचलास परत चलावें.

याप्रमाणें सर्व आपापल्या जागीं जाऊन सुखी झाले.

**विष्णुशर्मा**—आणखी काय सांगूं? बोला.

**राजपुत्र**—तुमच्या कृपेनें राज्यव्यवहाराचीं सर्व अंगें समजलीं, यामुळें आह्मी सुखी झालों.

**विष्णुशर्मा**—बरें आहे, आणखी हेंही असो.

सर्व राजांशीं तुमचा सन्धि असो; विजयी असल्यामुळें तुह्मांस सर्वदा आनंद होवो; साधूंच्या आपत्ति नष्ट होवोत; पुण्यवानांची कीर्ति चिरकाल वाढो; वारविलासिनीप्रमाणें नीति प्रधानांच्या वक्षस्थळीं राहून त्यांचें मुखचुंबन करो; आणि प्रत्यहीं अभिनव उत्साह असो.

**सन्धि समाप्त.**